18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

GRB/ 11:00

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-1

GRB/ D/ MHM/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**आय.सी.एस.ई. बोर्डाच्या इयत्ता दहावीच्या पुस्तकात क्रांतीविरांना आतंकवाद्यांची उपमा दिली असल्याबाबत**

**(1) * 17351 श्रीमती सुधा जोशी , श्री. संजय दत्त, मेजर सुधीर सावंत, श्री. सुधाकर गणगणे** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) आय.सी.एस.ई.बोर्डाच्या इयत्ता दहावीच्या पुस्तकांतील रिवायवल ऑफ टेरेरिस्ट या पाठात शहिद भगतसिंग राजगुरु व सुखदेव या क्रांतीवीरांना आतंकवाद्यांची उपमा देण्यात आल्याने ठाणे येथील राष्ट्रवादी विद्यार्थी व काँग्रेसचे अध्यक्ष यांनी आय.सी.एस.ई. व मॉर्निक स्टार पब्लिशरच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करुन दिनांक 4 मे, 2006 रोजी वा त्या दरम्यान निषेध केला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर पुस्तकातून हा पाठ काढून टाकून विद्यार्थ्यांना खरी माहिती देण्यात आली नाही तर तीव्र आंदोलन करण्याबाबतचा राष्ट्रवादी विद्यार्थी व काँग्रेस अध्यक्ष, ठाणे यांनी इशारा दिला आहे, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(4) असल्यास, सदर पुस्तकांतून हा पाठ काढून विद्यार्थ्यांना खरी माहिती देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांचेकरिता** : (1) ही बाब महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संबंधित नाही.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रश्न क्र. 2, 3, 4 व 5 या प्रश्नांना दिलेल्या उत्तरामध्ये पुढील दुरुस्ती करतो. "सेन्ट्रल बोर्ड ऑफ सेकन्डरी स्कूल एज्युकेशन हा पार्ट काढून टाकण्याच्या सूचना आम्ही शिक्षण विभागातर्फे केंद्र शासनाला देत आहोत."

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.17351** .......

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, शहिद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव हे महान देशभक्त होते. अशा क्रांतिवीरांना आतंकवादी ठरविणे म्हणजे अक्षम्य गुन्हा आहे. यामुळे भारतीयांच्या अस्मितेला ठेच लागलेली आहे. "आम्ही त्यांना हा पार्ट काढून टाकण्यास सांगितलेले आहे" अशी उत्तरामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी दुरुस्ती सुचविलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, राज्य शासनाने यासंदर्भात केंद्र शासनाकडे निषेध नोंदविलेला आहे काय ? हा पार्ट लिहिणारा लेखक कोण आहे ? तसेच, या पुस्तकाचा प्रकाशक कोण आहे ?

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, यासंदर्भात केंद्र शासनाला कळविले आहे आणि जे बोर्ड आहे ते राज्याच्या अखत्यारीत नाही.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, हा प्रश्न ॲडमिट केल्यानंतर उपप्रश्न येतीलच. या पुस्तकाचा प्रकाशक कोण आहे ? हा पार्ट लिहिणा-या लेखकाची बोर्डाकडे फेर तपासणी होत नाही काय ? तसेच, यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे निषेध का नोंदविला नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये केंद्र शासनाचे दोन अभ्यासक्रम आहेत. इंडियन कौन्सिल ऑफ सेकंडरी एज्युकेशन आणि सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी स्कूल एज्युकेशन हे ते दोन बोर्ड आहेत. या दोन बोर्डाचे हे अभ्यासक्रम आहेत. त्यांचा स्वतंत्र अभ्यासक्रम असतो. त्यांची मान्यता वेगळी असते. आपण महामंडळाकडून पुस्तकांची छपाई करुन घेतो आणि ते प्रायव्हेट कंपनीकडून पुस्तकांची छपाई करुन घेत असतात.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (पुढे चालू...) ता.प्र.क्र.17351 ...

आणि हा पाठ पाठ्यपुस्तकातून काढून टाकण्याच्या सूचना आम्ही त्यांना करीत आहोत. मात्र याबद्दल त्यांच्याकडे खेद वा निषेध व्यक्त केलेला नाही. पण सभागृहाच्या भावना तशा असतील तर आम्ही तेही करू.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ... )

श्री. दिवाकर रावते : हे तुमचे कर्तव्य नाही काय ? ....

श्री. मधुकर चव्हाण : भगतसिंह हे तुमच्यासाठी, तुमच्यादृष्टीने देशभक्त नाहीत का ? सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांचे हे उत्तर बेजबाबदारपणाचे आहे. ...

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यात त्यांनी असे विचारले की, ही निषेधाची बाब आहे. यापूर्वी आपण केंद्रीय बोर्डाला निषेधाची बाब कळविले नसेल तर आता तरी तुम्ही कळविणार आहात का ? त्यावर आपण उत्तर दिले की, 'सभागृहाला असे वाटत असेल तर ....' . पण ही भावना या सभागृहातील सर्वांचीच आहे, आपल्या सर्वांच्याच अस्मितेचा हा प्रश्न आहे, हे आपण लक्षात घ्यावे आणि त्यादृष्टीने कारवाई करावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझ्या म्हणण्याचा तसा भाग नव्हता. केवळ हा प्रश्न मर्यादित स्वरूपाचा असल्याने तेवढ्या पुरते मी सांगितले की, हा पाठ काढून टाकण्यास सांगितले जाईल तसेच असा पाठ ठेवल्याबद्दल निषेध देखील नोंदविला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्याप्रमाणे यापूर्वी जेम्स लेन या लेखकाच्या विरोधात आपण खटला दाखल केला त्याप्रमाणे हे सरकार या बाबतीत महाराष्ट्रात खटला दाखल करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही जरूर खटला दाखल करू.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आयसीएसई यांनी त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये हा जो पाठ दिला आहे त्यामध्ये हुतात्मा भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांना आतंकवादी म्हटलेले आहे. या गोष्टीचा केवळ निषेध करून महाराष्ट्र सरकारचे समाधान होणार आहे काय ? खरे तर आयसीएसई यांनी हा पाठ मंजूरच कसा केला ? आणि केला असेल तर 'मॉर्निक स्टार' या प्रकाशकाच्या विरोधात असे साहित्य प्रकाशित केल्याबद्दल आपण फौजदारी गुन्हा दाखल करणार

...... बी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.17351....

का ? सभापती महोदय, कित्येकदा आपल्या माध्यमिक पाठ्यपुस्तकांमध्ये देखील अशा प्रकारच्या भयानक चुका केल्या जातात. उदाहरण सांगावयाचे झाल्यास, भगवान बुद्ध यांच्या मातेचे नाव महामायादेवी असे असताना 'मायावती' असे दाखविले आहे. तेव्हा अशा प्रकारे पाठ्यपुस्तकांमध्ये चुकीची नोंद करणारे जे लोक असतात त्यांच्यावर देखील अशाच प्रकारची कारवाई आपण करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शहीद भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव या तिघांबद्दल 'टेररिस्ट' असा शब्द वापरला आहे त्याबद्दल त्यांचा निषेध केला जाईल तसेच त्यांच्या विरोधात कोर्टामध्ये खटला देखील दाखल आपण करू आणि याबाबतीत अधिक तपासणी करून जरूर तर सुधारणा देखील केली जाईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा केंद्र सरकारच्या अखत्यारीतील प्रश्न आहे हे बरोबर आहे. परंतु राज्य सरकारची देखील यामध्ये काही जबाबदारी आहे हेही आपण मान्य केले पाहिजे. आता आपण संबंधितांच्या विरोधात खटले दाखल करणार आहात. परंतु 15 दिवसाच्या आत केंद्र सरकारकडून तसेच संबंधित प्रकाशकाकडून त्यांचे याबद्दल काय मत आहे हे आपण मागवून घेऊन एक महिन्याच्या आत संबंधितांवर खटला दाखल करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याबाबतीत आम्ही रोखीने काम करू आणि एक महिन्याच्या आत आपण म्हणता त्याप्रमाणे कारवाई करू.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, महाराष्ट्रात येऊन कोठल्याही बोर्डाने, शिक्षण मंडळाने, काहीही शिकवावे आणि राज्यातील, देशातील देशभक्तांची चेष्टा करावी आणि आपल्या हातामध्ये त्यांच्या विरूद्ध कारवाई करण्यासाठी काहीही नाही असे राज्य सरकारने म्हणणे बरोबर नाही. हे चुकीचे आहे. जेव्हा आयसीएसई, सीबीएससी वा अन्य कोणतेही शिक्षण मंडळ आपल्या राज्यामध्ये शाळा उघडणार असतील तर त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये, पाठ्यपुस्तकांमध्ये महाराष्ट्राच्या, देशाच्या मानबिंदूंचा अपमान होणार नाही या दृष्टीने त्यांनी काळजी घेतली पाहिजे असे आपण अगोदरच सांगितले पाहिजे होते तसे का घडले नाही ? तेव्हा आताच्या आता त्यांच्या अभ्यासक्रमातून हा पाठ काढून टाकून त्यांनी याबद्दल दिलगिरी व्यक्त केली नाही तर यापुढे तुम्हाला या राज्यामध्ये एकही शाळा उघडण्यास आम्ही परवानगी देणार नाही असे सांगणारे दमदार पाऊल आपण उचलणार का ?

...... बी 3 ...



KBS/ MHM/ D/ श्री. बोरले नंतर --- 11:05

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही असे करू आणि त्यांची पाठ्यपुस्तके देखील तपासू हे मी यापूर्वीदेखील सांगितले आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.कं. 17351...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी ताबडतोबीने खटला भरतो असे सांगितले. माझे असे म्हणणे आहे की, ही एक लहानशी गोष्ट असून ती आपल्या अधिकारातील आहे. यामधून कायदा व सुव्यवस्थेची स्थिती निर्माण व्हायला सुरुवात झाली आहे. आणि आपण उलट्या दिशेने उत्तर दिले तर ती स्थिती वाढत जाणार आहे. टेरेरिस्ट हे भित्रे असतात, ते लपून कारवाया करीत असतात. याठिकाणी नुसती सूचना देऊन चालणार नाही तर महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेमध्ये हे पुस्तक चालणार नाही असे आदेश आपण ताबडतोब काढणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आजच आदेश काढतो.

श्री. अरविंद सावंत : माझी आपणास विनंती आहे की, आपण हे संपूर्ण धडे काढून टाकणार आहात? परंतु संपूर्ण धडा काढून टाकल्यानंतर शहिद भगतसिंग हा विद्यार्थ्यांना कळणार कसा? आज त्यांना अलेक्झांडर शिकवावयाचा आहे, शिवाजी महाराज शिकवायचे नाहीत. तेव्हा हेच धडे सुधारीत स्वरुपामध्ये त्या पुस्तकामध्ये अंतर्भूत करण्यासाठी आपण आग्रह धरणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तसा आग्रह धरण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या संपूर्ण शिक्षण प्रक्रियेमध्ये शासनाचे किती लक्ष आहे? या शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, अशाप्रकारचा सिलॅबस हा देशाच्या अस्मितेवर घाला घालणारा आहे. या संदर्भात काही कारवाई होणार आहे की नाही? अशा गोष्टी तपासणारी यंत्रणा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामध्ये अस्तित्वात आहे की नाही? ही अत्यावश्यक बाब आहे. या राज्यामध्ये पुस्तकातील जे धडे विद्यार्थ्यांना शिकविले जातात, त्यातील आशय हा महाराष्ट्राच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीने असतो की नाही हे तपासणारी यंत्रणा आपण तयार केली आहे काय? केली नसेल तर ती करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, असे यापुढे होणार नाही. यापुढे या राज्यामध्ये येणारी पाठयपुस्तके, सिलॅबस यांची तपासणी केल्यानंतर ते महाराष्ट्रामध्ये शिकविण्यास परवानगी देण्यात येईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अलिबाग (जि.रायगड) येथे समुद्र किनारी अनधिकृत बांधलेले बंगले**

**(२) * १७४५४ श्री. अनिल परब , श्री. विलास अवचट , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) रेवस, मांडवा व थळ येथील समुद्रकिनारी, सीआरझेड, बिगरशेती परवाना इत्यादी सर्व नियमांची पायमल्ली करुन काही उच्चभ्रुनी बांधलेल्या अनधिकृत बंगलेधारकांना जिल्हाधिकारी यांनी दिनांक ७ मे, २००६ रोजी वा त्या सुमारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व या परिसरात अशा किती बंगल्याची बांधकामे झालेली आहेत व ती पाडण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता** : (१) नाही, तथापि, जिल्हाधिकारी, रायगड यांनी अशा अनधिकृत बांधकामाबाबत शोध मोहिम राबविण्याबाबत दिनांक १२.०४.२००५ व दिनांक २३.११.२००५ च्या पत्रान्वये जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, व तहसिलदारांना आदेश दिलेले आहेत.

(२) होय.

(३) अलिबाग तालुक्यातील एकूण १६ ठिकाणी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, त्यापैकी दोन प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे. तसेच सदर अनधिकृत बांधकामधारकांकडून त्याबाबत म.ज.म.१९६६ मधील तरतुदीनुसार दंड वसुली करण्यात आली आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय,तारांकित प्रश्न क्रमांक १७४५४...

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने प्रश्न क्रमांक ३ च्या छापील उत्तरामध्ये "१६" ऐवजी "५" अशाप्रकारची दुरुस्ती करण्यात यावी. या दुरुस्तीसह उत्तर छापल्याप्रमाणे...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता केलेल्या दुरुस्तीसह हे चुकीचे उत्तर दिले असून मंत्रिमहोदयांना हे उत्तर पुन्हा दुरुस्त करावयाचे आहे काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** १७४५४ ...**

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, नाही.

**सभापती :** माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील मी आपणास नंतर प्रश्न विचारण्यास परवानगी देईन त्यावेळी आपण प्रश्न विचारावा.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, समुद्र किनाऱ्यावर सी.आर. झेड कायद्याचे उल्लंघन करुन अनधिकृत वसाहती उभ्या राहिल्या आहेत, अनधिकृत बंगले बांधले गेले आहेत हे मंत्रिमहोदयांनी मान्य केले आहे. याठिकाणी त्यांनी उत्तरामध्ये दुरुस्ती करतांना "१६" ऐवजी "५" ठिकाणी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत असे म्हटले आहे. एखादे बांधकाम अनधिकृत असेल तर ते कोणत्याही नियमामध्ये बसू शकत नाही. असे असतांना "प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे. तसेच सदर अनधिकृत बांधकाम धारकांकडून त्याबाबत म.ज.म. १९६६ मधील तरतुदीनुसार दंड वसूली करण्यात आली आहे" असे म्हटले आहे. अशाप्रकारची दंड वसूली करुन आपण त्यांना संरक्षण देत आहात काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, यामध्ये कुणालाही संरक्षण देण्याचा प्रश्न नाही. या अगोदर सुध्दा जी अनधिकृत बांधकामे उभारण्यात आली होती, त्यापैकी ५ बांधकामे अगोदर पाडण्यात आली आहेत. त्या बांधकामधारकांकडून दंड वसूली करणे आणि ते बांधकाम पाडणे ही दोन्ही कारवाई करण्यात येते. यामध्ये अगोदर दंड वसूली केली जाईल आणि त्यानंतर बांधकाम पाडले जाईल. दंड वसूली करण्यास विलंब होत असेल तर बांधकाम पाडण्याच्या कारवाईबरोबर दड वसूली कली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये याच विषयावर दिनांक १४ जुलै रोजी तारांकित प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी उत्तर देतांना असे म्हटले आहे की,"अलिबाग तालुक्यातील समुद्र किनाऱ्यावर अनधिकृत बांधकामांचा शोध घेतला असता २५ ठिकाणी अनधिकृत बांधकामे आढळून आली". आणि आज मंत्रिमहोदयांनी लेखी उत्तरामध्ये सुरुवातीला "१६" बांधकामे सांगितली व नंतर उत्तर दुरुस्त करुन "५" बांधकामे असल्याचे सांगितले. त्यामुळे याठिकाणी दिलेले उत्तर चुकीचे आहे. म्हणून या प्रश्नाला सुरुवात करीत असतांना मला मघाशी आपल्या निदर्शनास ही बाब आणून द्यावयाची होती. मंत्रिमहोदयांना हे उत्तर दुरुस्त करणार काय असे मी विचारल्यानंतर त्यांनी "नाही" असे म्हटले. विधानसभेमध्ये याच

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

- **१७४५४....**

श्री. जयंत प्र. पाटील...

प्रश्नाला वेगळे उत्तर दिले जाते आणि आपल्या सभागृहामध्ये वेंगळे उत्तर दिले जाते, यापैकी खरे उत्तरे कोणते आहे?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17351 (पुढे सुरु...

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगतात ती गोष्ट खरी आहे. त्या ठिकाणी 1986 पूर्वीची बांधकामे झालेली आहेत. त्या बांधकामावर अतिरिक्त बांधकामे तेथील लोकांनी सुरु केलेली आहेत. या अतिरिक्त बांधकामाला परवानगी नव्हती. काही मूळ बांधकामांना परवानगी आहे, काही बांधकामांना परवानगी नाही. अशी अनधिकृत बांधकामे आहेत.

डॉ.दीपक सावंत : पाच लोकांनी अनधिकृत बांधकामे केलेली आहेत, त्यांची नावे काय आहेत ? दुसरा प्रश्न असा की, जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे, असे म्हटलेले आहे. नेमकी कोणती कारवाई करण्यात येत आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : या पाच लोकांची नावे या प्रमाणे आहेत :- श्रीमती लिलावती भोमय्या, श्रीमती तुलसी जानी, श्री.अरुण जैन, श्री.जमशेद कामा, श्री.दिनेश पारेख. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 कलम 45 (1), 45 (1) (ब) खाली नोटीस देऊन अकृषक कर 40 पट लावून दंड वसूल करुन, बांधकाम पाडण्याची कारवाई सुरु आहे.

श्री.अरविंद सावंत : अलिबाग तालुक्यातील उल्लेख केलेला आहे. मांडवापासून मुरुड पर्यन्तचे क्षेत्र निश्चित करुन सर्व्हे करण्यात येऊन ही 25 किंवा पाच अनधिकृत बांधकामे निदर्शनास आलेली आहेत काय ? नागला, आक्सी, रेवदंडा हे क्षेत्र याम मोडते. या सगळ्या किनाऱ्यावरील बांधकामे सीआरझेड खाली येतात. अशी 50 पेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे सापडतील. त्याप्रमाणे मुरुडपर्यन्तच्या क्षेत्राचे सर्व्हेक्षण केलेले आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : अलिबाग तालुक्यातील रेवस, मांडवा, थळ या तीनच किनाऱ्यावरील अनधिकृत बांधकामाच्या संबंधात उत्तर दिलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : त्या ठिकाणी बांधकाम करत असतांना पंचायतीमधून खोटे घरांचे दाखले घेऊन, खोटे घरांचे नंबर देऊन जुने बांधकाम आहे, असे दाखविले आणि त्यावर नवीन वाढीव बांधकाम करण्यात आले असे दाखविलेले आहे, या प्रकरणी शासन चौकशी करणार आहे काय ? पंचायतींनी खोटे दाखले दिले, घर नंबर खोटा देऊन बांधकामांना परवानगी दिलेली आहे यामध्ये जे अधिकारी गुंतलेले आहेत, त्यांची उच्च पातळीवर चौकशी करण्यात येणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : परवानगी न घेताच बांधकामे केलेली आहेत. परवानगी घेऊन बांधकामे केलेली नाहीत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ D/

ता.प्र.क्र.17351 (पुढे सुरु...

श्री.जयंत प्र.पाटील : मंत्री महोदयांना माझा प्रश्न कळलेला नाही. मी अलिबाग तालुक्यातील आहे. मी त्या ठिकाणी पंचायत समितीपासून काम करत आलेलो आहे. त्यामुळे मला सगळी माहिती आहे. ती फक्त 25 अनधिकृत बांधकामे नाहीत तर जवळपास 2 हजार अनधिकृत बांधकामे आहेत. घर नंबर बोगस देऊन ही बांधकामे केलेली आहेत. या संबंधातील पंचायतीमधील रजिस्टर तपासले तर दिसून येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय मी प्रश्न विचारत आहे हे मी नम्रपणाने सांगतो. इतर सगळे सन्माननीय सदस्य प्रश्न विचारत असतांना, तो प्रश्न डेव्हपल करतात. माझ्या तालुक्याचा प्रश्न आहे.

**सभापती** : तुम्हाला प्रश्न डेव्हलप करण्याची संधी दिली नाही, असे झालेले नाही. परंतु प्रश्न डेव्हलप करण्याला काही मर्यादा आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : मी एक मिनिटही बोललेलो नाही. मंत्री महोदयांना माझा प्रश्न समजलेला नाही. मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत. आपल्याकडून संरक्षण मिळावे ही अपेक्षा आहे.मी नम्रपणाने प्रश्न विचारतो की...

**सभापती** : सगळेच सन्माननीय सदस्य नम्रपणाने बोलतात, तुम्हीच बोलता असे नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत. म्हणून मला आपले संरक्षण पाहिजे.

**सभापती** : माझे आपल्याला कायम संरक्षण आहे. आपण प्रश्न विचारा.

श्री.जयंत प्र.पाटील : ग्रामपंचायतीमध्ये रेकॉर्ड आहे, त्यामध्ये अधिकारी आणि संबंधित पदाधिकारी गुंतलेले आहेत, त्यांची उच्च पातळीवर चौकशी होईल काय ?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 17454 .....

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, होय.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सीआरझेडचे उल्लंघन करुन तसेच बिगरशेती परवाना इत्यादी सर्व नियमांचे उल्लंघन करुन अलिबागमध्ये झालेल्या अनधिकृत बांधकामासंबंधीचा हा प्रश्न आहे. सीआरझेडचे उल्लंघन करुन, बिगरशेती परवान्याचे उल्लंघन करुन ज्या ज्या ठिकाणी समुद्र किनारी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्याचा शासन संपूर्ण आढावा घेईल काय ? त्यासंदर्भात कारवाई करुन शासन संपूर्ण अहवाल सभागृहासमोर ठेवणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, हा प्रश्न अलिबाग तालुक्यापुरता मर्यादित असला तरी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या पध्दतीने निश्चितपणे संपूर्ण समुद्र किनाऱ्यावर अशा प्रकारे सीआरझेडचे उल्लंघन करुन, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे उल्लंघन करुन अनधिकृत बांधकामे कोणी केली असतील तर त्यासंदर्भातील संपूर्ण आढावा येत्या महिनाभरात घेतला जाईल आणि त्यासंदर्भातील कारवाईचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MHM/

**मुंबईतील 12 गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांची गिरणीच्या व्यवस्थापनाकडून होत असलेली पिळवणूक**

**(3) * 17360 श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. विनायकराव मेटे , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील 12 गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या सुमारे 2000 कंत्राटी कामगारांची गिरणीच्या व्यवस्थापनाकडून पिळवणूक होत असून त्यांना दीड वर्षापासून पगार वाढ देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(2) या कंत्राटी कामगारांना पगार वाढ देऊन त्यांना कायमस्वरुपी आस्थापनेवर घेण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने मे, 2006 मध्ये शासनाकडे मागणी केली आहे हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गणेश नाईक** : (1) राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या कार्यरत असलेल्या 10 पैकी 8 कापड गिरण्यामध्ये 1660 कंत्राटी कामगार नेमण्यात आलेले आहेत. या गिरण्यांमधील कंत्राटी कामगारांच्या वेतनवाढीबाबत राष्ट्रीय मिल मजदूर संघटनेने केलेल्या मागण्यांबाबत एनटीसी व्यवस्थापन व राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांच्यामध्ये चर्चा सुरु आहे.

(2) राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या कापडगिरण्याकरिता समुचित शासन केंद्र शासन असून कंत्राटी कामगारांच्या वेतन वाढीबाबत राष्ट्रीय मिल मजदूर संघाने एनटीसी व्यवस्थापनाकडे मागणी केलेली आहे.

(3) याबाबत एनटीसी व्यवस्थापन आणि राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांच्यात आपापसात चर्चा सुरु आहे. तसेच एनटीसी गिरण्यांबाबत केंद्र शासन समुचित शासन असल्यामुळे राज्य शासनाने कार्यवाही केलेली नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या कार्यरत असलेल्या 10 पैकी 8 कापड गिरण्यांमध्ये 1660 कंत्राटी कामगार नेमण्यात आलेले आहेत. या गिरण्यांमधील कंत्राटी कामगारांच्या वेतनवाढीबाबत राष्ट्रीय मिल मजदूर संघटनेने केलेल्या मागण्यांबाबत एनटीसी व्यवस्थापन व राष्ट्रीय मिल मजदूर संघ यांच्यामध्ये चर्चा सुरु आहे. सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने निरनिराळ्या प्रकरणांमध्ये निवाडे दिलेले आहेत की, राज्य शासन आणि केंद्र शासनाने या कल्याणकारी राज्यामध्ये मॉडेल ओनर म्हणून काम करावयास पाहिजे. नोकरांचे किंवा कामगारांचे वेतन देत असताना त्यांना रिझनेबल वेतन दिले जाते की, नाही हे केंद्र शासन आणि राज्य शासनाने मॉडेल ओनर म्हणून पाहिले पाहिजे. या ज्या गिरण्या आहेत त्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खाजगी गिरण्या नाहीत. या राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या अखत्यारितील गिरण्या आहेत. त्या ठिकाणी दीड दोन वर्षे प्रयत्न करुनही वेतनवाढ दिली जात नाही. यामध्ये राज्य शासनाने जबाबदारी झटकून चालणार नाही. त्यामध्ये ट्रायपार्टी म्हणून राष्ट्रीय मिल मजदूर संघ, केंद्र शासन आणि राज्य शासन यांनी पुढाकार घेऊन हा प्रश्न ताबडतोबीने सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार काय ? किती दिवसात प्रयत्न करणार ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी एनटीसीच्या 8 गिरण्यांसंबंधी प्रश्न विचारलेला आहे. राष्ट्रीय मिल मजदूर संघाने एनटीसीच्या उच्च व्यवस्थापनाकडे मागणी केलेली आहे की, या गिरण्यांमध्ये जे कंत्राटी कामगार आहेत त्यांच्या वेतनामध्ये वाढ करावी. परंतु एनटीसी हा राज्य शासनाच्या अखत्यारित येणारा भाग नाही. त्याच्याकरिता त्यांची स्वतंत्र यंत्रणा आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे राज्य शासन केंद्र सरकारच्या कामगार विभागाला विनंतीपत्र देईल आणि त्यांच्यामध्ये लवकरात लवकर बैठक होऊन हा जो वेतनाचा प्रलंबित प्रश्न आहे तो सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुळात सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी एनटीसीच्या गिरण्यांच्या बाबतीत प्रश्न विचारलेला नाही. मूळ प्रश्न मुंबईतील 12 गिरण्यांसंबंधी विचारलेला आहे. या ठिकाणी आपण पाहिले तर अनेक प्रश्नांच्या बाबतीत अधिकाऱ्यांकडून ट्विस्ट केले जाते. महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या आणि टेकओव्हर केलेल्या किती गिरण्या आहेत आणि तेथील कंत्राटी कामगारांबद्दल काय धोरण आहे ? असा मूळ प्रश्न विचारलेला आहे. मूळ प्रश्न राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या गिरण्यांबाबत विचारलेला नाही.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेतृत्वाने जी मागणी केलेली आहे त्यामध्ये राष्ट्रीय मिल मजदूर संघाने एनटीसीच्या गिरण्यांसंबंधी विचारलेले आहे. बाकीच्या गिरण्यांची माहिती माझ्याकडे आहे परंतु ती माहिती आता देणे प्रस्तुत होणार नाही.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MHM/

**राज्यातील स्वस्त धान्य दुकाने व रॉकेल परवाने**
**महिला बचत गटाकडे सोपविण्याबाबत**

**(4) * 17833 श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्रीमती सुधा जोशी , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे : तारांकित प्रश्न क्रमांक 31321 ला दिनांक 13 एप्रिल, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या स्वस्त धान्य दुकाने व किरकोळ रॉकेल परवाने महिला बचत गटाकडे हस्तांतरीत करण्यासंबंधीच्या कार्यवाहीचा फेरविचार करण्याबाबत शासनाने दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी वा त्या सुमारास निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनील तटकरे** : (1), (2) व (3) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ D/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 11:25

(ता.प्र.क्र. 17833...

श्री. गोविंदराव आदिक : ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे असे छापील उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. तीन-चार महिन्याचा कालावधी लोटून देखील या प्रश्नासंबंधी निर्णय घेण्यास शासनाला विलंब का लागत आहे ? तेव्हा निश्चित किती कालावधीमध्ये शासन हा निर्णय घेणार आहे ?

श्री. सुनील तटकरे : हा निर्णय घेत असताना राज्यभरातील अस्तित्वात असलेल्या सर्व दुकानांसहीत निर्णय घेण्याचे राज्य सरकारने सुरुवातीला ठरविले होते. या निर्णयाविरुध्द प्रस्थापित दुकानदार, लोकप्रतिनिधी यांनी या निर्णयाबाबत फेरविचार करावा अशा भावना व्यक्त केल्या होत्या. तसेच उच्च न्यायालयामध्येही या निर्णयाला आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिलेली आहे. यासंबंधात सभागृहामध्ये चर्चा होत असताना अशा प्रकारचा निर्णय झालेला होता की, यापूर्वी अस्तित्वात असलेल्या दुकानांच्या बाबतीतील निर्णय तसाच ठेवावा आणि जी काही नवीन दुकाने घेण्यात येणार आहेत ती बचत गटांना देण्यासंबंधी निर्णय घ्यावा. अशा प्रकारच्या भावना विधानसभा आणि विधानपरिषदेतील सन्माननीय सदसयांनी व्यक्त केलेल्या होत्या.त्यानुषंगाने माहिती गोळा करण्याचे काम सुरु करण्यात आले. सदरहू माहिती प्राप्त झालेली असून येत्या 15 दिवसात हा निर्णय घेतला जाईल.

श्रीमती सुधा जोशी : एका लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना, या निर्णयासंबंधी फेर तपासणी करुन निर्णय घेण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर मंत्री महोदयांनी एप्रिलमध्ये दिले होते. त्यांनी असेही सांगितले होते की, हे अधिवेशन संपल्यानंतर मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात येईल. मंत्रिमंडळाची बैठक एप्रिलमध्ये झालेली असेलच. असे असताना हा निर्णय घेण्याबाबत इतका कालावधी का लागत आहे ? दुसरे असे की, महिलांना काही द्यावयाचे म्हटले की, अशा प्रकारची चालढकल का केली जाते ?

श्री. सुनील तटकरे : मंत्रिमंडळासमोर जात असताना आपण किती नवीन दुकाने निर्माण करु शकतो याबाबतचा विचार करीत असताना रद्द झालेली दुकाने, प्रलंबित असलेली दुकाने यासंबंधी माहिती घेणे आवश्यक होते. म्हणून निर्णय घेण्यामध्ये थोडासा विलंब झालेला आहे. माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, महिलांना हे

..2..

(ता.प्र.क्र. 17833...) (श्री. सुनील तटकरे...

काम देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतलेला आहे. याबाबतीत पुनर्विचार व्हावा अशा भावना दोन्ही सभागृहातील सभासदांनी व्यक्त केलेल्या होत्या.

श्री. भास्कर जाधव : या प्रश्नाला मंत्री महोदयांनी सकारात्मक आणि विस्तृत उत्तर दिलेले आहे. पूर्वीची जी दुकाने आहेत त्याबाबतही विचार करण्याची सरकारची मानसिकता दिसते. तेव्हा पूर्वीची जी दुकाने आहेत ती काढून घेतली जाणार नाहीत ना ?

श्री. सुनील तटकरे : या निर्णयाचा फेरविचार करीत असताना ज्यांच्याकडे दुकाने अस्तित्वात आहेत त्यांच्याकडे ती ठेवावीत आणि नव्याने निर्माण होणारी दुकाने, दुकानदारांना शिक्षा झालेली दुकाने, रद्द झालेली दुकाने ही बचत गटांना द्यावीत असे निर्णयामध्ये प्रस्तावित करण्याचे विभागाने सुचविले.

श्री. जयंत प्र. पाटील : किती नवीन दुकाने प्रस्तावित आहेत ? निलंबित झालेली दुकाने किती आहेत ? बचत गटांना किती दुकाने द्यावयाची आहेत ?

श्री. सुनील तटकरे : ही दुकाने बचत गटांना देण्याच्या संदर्भात फेर विचार व्हावा अशा भावना दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या होत्या असे मंत्री महोदयांनी सांगितले. महिला बचत गटांना ही दुकाने देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. शहरी भागामध्ये जेथे कुपोषण झालेले आहे त्याठिकाणी अशा प्रकारची दुकाने आहेत. परंतु त्या दुकानांवर रेशनिंग उपलब्ध होत नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17833........... डॉ.नीलम गोऱ्हे....

प्रश्न असा आहे की, ज्या भागामधून कुपोषणग्रस्ताच्या तक्रारी येतात, त्या ठिकाणी अनेक वेळेला अन्नधान्य मिळत नाही. याचा मतितार्थ लक्षात घेऊन अशा भागातील जी रेशन दुकाने ब्लॅकलिस्ट झाली असतील ती रेशन दुकाने महिला बचत गटांना प्राधान्याने दिली जातील का?

श्री.सुनील तटकरे : शासन या निर्णयामध्ये हाच विचार करीत आहे, ज्या ठिकाणी दुकाने ब्लॅकलिस्ट झाली आहेत त्यांची परवानगी रद्द करुन महिला बचत गटांना ती दुकाने देण्याबाबतचा विचार शासन निश्चितपणे करणार आहे.

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी रेशन दुकानांचे परवाने निलंबित झाले, अशी प्रकरणे शासनाकडे व आयुक्त कार्यालयाकडे प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे त्वरित निकाली काढून ते परवाने महिला बचत गटांना दिले जातील का?

श्री.सुनील तटकरे : विचार केला जाईल.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, गेल्या 4-5 वर्षापासून सतत वृत्तपत्रात अशा बातम्या येत आहेत की, ठाणे, नागपूर, जळगाव व इतर भागात अवैध रॉकेलची विक्री केली जाते. हजारो गोरगरीब शिधापत्रिका धारकांना रॉकेल मिळत नाही. नागपूरमध्ये मदन पाटील या इसमाने रॉकेलच्या धंद्यामध्ये धुमाकूळ घातला आहे. सामान्य माणसांना रॉकेल मिळण्यासाठी शासन रॉकेलची खुली विक्री करील काय आणि जे विक्री करण्यास पुढे येतील त्यांना रॉकेल विक्रीचा परवाना दिला जाईल का? रॉकेलचा काळाबाजार होऊ नये म्हणून शासन कोणती यंत्रणा राबविणार व शासनाचे मत काय आहे?

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी जी तक्रार केली त्या अनुषंगाने वेगवेगळया उपाययोजना राज्य सरकारच्या या विभागाने योजलेल्या आहेत आणि त्यांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही सतत प्रयत्नशील आहोत.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**१४०० प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व इतर माध्यमांच्या शाळांना मंजूरी देणे**

**(५) * १७३७५ श्री. व्ही. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने माध्यमिक, उच्च माध्यमिक व इतर माध्यमांच्या एकूण सुमारे १४०० कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन शाळांना दिनांक १६ मे, २००६ किंवा त्या दरम्यानच्या आदेशाने मान्यता दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा उत्तम प्रकारे चालविणे, शिक्षक-कर्मचाऱ्यांना संस्थेनी नियमित वेतन अदा करणे, शाळेची इमारत व इतर सुविधा निर्माण करणे, याबाबत शिक्षण संस्थांकडून शासनाने हमीपत्र घेतले आहे काय,

(३) संस्थांकडून उक्त बाबींचे पालन न झाल्यास शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे.

(२) कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळांच्या संस्था चालकांकडून सदरची शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र घेतले जाते.

(३) नियमानुसार कायम विनाअनुदानित संस्थांनीही आवश्यक भौतिक सुविधा पुरविणे, कर्मचाऱ्यांना वेतन देणे आवश्यक आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या प्रश्नावरुन सभागृहात गदारोळ झाला होता. या १४९५ शाळांच्या संदर्भात माननीय हायकोर्टाने देखील ७ जुलै, २००६ रोजी या शाळा रद्द करण्याचा निर्णय दिला. शासनाने हायकोर्टाच्या या निर्णयाप्रमाणे या १४९५ शाळा रद्द केल्या का? याशिवाय ज्या शाळांची प्रकरणे कोर्टात गेली नाही परंतु शासनाने मंजुरी दिली होती अशा कायम विनाअनुदानित शाळांमध्ये विनाअनुदानित शाळातील शिक्षकांप्रमाणे बँकेतून वेतन दिले जाईल का?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा प्रश्न कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळांच्या संस्थाचालकांकडून भौतिक सुविधा मिळत नाहीत, शिक्षकांना वेतन दिले जात नाही या संदर्भात विचारलेला आहे. उच्च न्यायालयाने ज्या १४९५ शाळांची मान्यता रद्द केली त्या व्यतिरिक्तही शाळा आहेत. एकदा निर्णय दिल्यानंतर त्या सगळया शाळा रद्द करण्याची कार्यवाही केली आहे. उच्च न्यायालयाच्या निकालाची सही शिक्क्यासह प्रत मिळाली नसल्यामुळे कारवाई केलेली नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 17375...**

श्री. हसन मुश्रीफ ....

त्या शाळा रद्द झालेल्या आहेत. तसेच ज्या शाळा कायम विना अनुदानित असतात अशा संस्था चालकांकडून शाळा उत्तम प्रकारे चालविणे, शिक्षक-कर्मचा-यांना संस्थेची नियमित वेतन अदा करणे, शाळेची इमारत व इतर सुविधा पुरविण्याच्या संदर्भात हमी पत्र लिहून घेतले जात असते. व यासंदर्भातील देखरेख शिक्षण संचालक करीत असतात. ज्या संस्था अशा प्रकारच्या सुविधा देत नसतील तर अशा संस्थांचे परवाने रद्द करण्याचे अधिकार शिक्षण संचालकांना देण्यात आलेले आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय सभापती महोदय, 1495 शाळांची परवानगी आपण रद्द केलेली आहे. परंतु यामुळे आता त्या विद्यार्थ्याच्या प्रवेशाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे प्रश्न असा आहे की, ज्या शाळांची मान्यता आपण रद्द केलेली आहे अशा शाळेतील विद्यार्थ्यांना जवळच्याच मान्यता प्राप्त शाळेत प्रवेश दिला जाणार आहे काय? तसेच जवळच्याच शाळेत मुलांना प्रवेश देण्याच्या संदर्भात, त्या ठिकाणीगरज असल्यास तुकडया देण्याच्या संदर्भात आपण काही निर्णय घेतलेला आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून जवळच्याच शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची कार्यवाही सुरु आहे. शाळांचे परवाने रद्द केल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी शासनाने घेतलेली आहे. तसेच अतिरिक्त तुकडया देण्याच्या संदर्भात शासन निश्चितपणे विचार करेल.

श्री. वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, ज्या शाळांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत तेथील विद्यार्थ्यांना इतर शाळेत प्रवेश देण्याचे मान्य केलेले आहे. परंतु आता या शाळेत ही अतिरिक्त मुले गेल्यामुळे गर्दी होणार आहे त्यामुळे ज्या शाळेत ही मुले जातील त्या शाळांना अतिरिक्त तुकडया दिल्या जाणार आहेत काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अशा शाळांना तुकडया देण्याचे मान्य केलेले आहे.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रीमहोदयांना विचारु इच्छितो की, कायम विना अनुदानीत तत्वावरील शाळांना मान्यता दिल्यानंतर संस्था

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 17375...**

डॉ. वसंत पवार.........

चालकांकडून हमी पत्र घेतले जाते. त्याच बरोबर चांगल्या प्रकारच्या सुविधा देण्याच्या संदर्भात तसेच कर्मचा-यांना वेळेवर पगार देण्याच्या संदर्भात सुध्दा संस्था चालकांकडून हमीपत्र घेतले जाते. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, सध्या विद्यार्थ्यांकडून जी फी घेतली जाते त्या फी मध्ये गेल्या 10-15 वर्षापासून काहीही वाढ झालेली नाही. अगोदर जी फी घेतली जात होती तीच फी आताही घेतली जात आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना चांगल्या प्रकारच्या सोयी संस्था चालकांना पुरविता याव्यात यासाठी शासन कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांना काही तदर्थ अनुदान देणार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांना मान्यता देण्याचा निर्णय शासनाने सन 2000 मध्ये घेतला होता. त्यानंतर कायम विना अनुदानित संस्था अनुदानित करण्याच्या संदर्भात उच्च न्यायालयात एक शपथ पत्र दाखल करण्यात आलेले आहे. शाळा अनुदानित झाल्यानंतर टप्प्या टप्प्याने म्हणजे प्रथम मागास भागातील शाळा, आदिवासी भागातील शाळा, झोपडपट्टीतील शाळा, भौगोलिक दृष्टया अडचणीच्या शाळांना टप्प्या टप्प्याने अनुदानित करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर आणून तो टप्प्या टप्प्याने देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी फी वाढीच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे परंतु शासनाने अजूनपर्यंत फी वाढीच्या संदर्भात धोरण ठरविलेले नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे 1495 शाळांची मान्यता रद्द करावी लागली त्यामुळेच आम्हाला माननीय शिक्षण मंत्र्यांचा सभागृहात राजीनामा मागावा लागला. अधिवेशन चालू असतांना त्यासंदर्भातील न्यायालयीन प्रत सदस्यांना मिळू नये हे कितपत योग्य आहे? तसेच यासंदर्भात हायकोर्टाने जो निकाल दिलेला आहे त्याची प्रत अद्याप का उपलब्ध करुन घेतलेली नाही?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भात आमचे अधिकारी न्यायालयात बसून आहेत. निकाल कधी काढावा, त्यावर सही कधी करावी, खरे म्हणजे ही न्यायालयाची बाब आहे. सभापती महोदय, आम्हाला अजून पर्यंत निकालाची कॉपी मिळालेली नाही. न्यायालयाकडून निकालाची कॉपी लवकरता लवकर मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. ....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : **17375...**

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे साहेबांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याला उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, 1495 शाळांची परवानगी रद्द करण्यात आलेली आहे त्या व्यतिरिक्त काही शाळांना मान्यता देण्यात आलेली आहे काय?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 17375......

प्रा.जोगेंद्र कवाडे........

विनाअनुदान तत्वावर शाळा देण्याचे धोरण असताना सुध्दा काही शाळांना फेरविचारांती अनुदान देण्यात आले हे खरे आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 492 शाळांना नंतर परवानगी देण्यात आली.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेली आहे. त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर फार मोठा परिणाम झालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये अनेक तुकड्या बंद होणार असून अतिरिक्त शिक्षकांची संख्या वाढणार आहे. तेव्हा अतिरिक्त शिक्षक होऊ नयेत तसेच तुकड्या कमी होऊ नयेत म्हणून पटसंख्येमध्ये शिथिलता आणणार आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, गावोगावी अनेक शाळा झाल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. तरी सुध्दा ही बाब तपासून पाहिली जाईल. विद्यार्थ्यांच्या पटसंख्येमध्ये शिथिलता आणण्याचे शासनाचे आज तरी धोरण नाही.

--------------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 18209-**

( सदस्य अनुपस्थित )

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे........

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या वेळी प्रश्न विचारणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी सदनात उपस्थित राहिले पाहिजे. त्यासंबंधी मी अनेकवेळा सूचना दिलेल्या आहेत. विशेषत: गट नेत्यांनी याची गांभीर्याने नोंद घेण्याची आवश्यकता आहे. हा प्रश्न अन्य कोणत्या मार्गाने उपस्थित करता येईल याबाबत मी जरुर विचार करीन. हे अधिवेशन संपण्यापूर्वी म्हणजे दिनांक 21 जुलै 2006 रोजी पूर्वी हा विषय कसा चर्चेला येईल ते मी पाहतो. आता मी पुढील प्रश्न पुकारीत आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी नोंद घेतलेली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी एप्रिल 2006 मध्ये चलने भरुन अद्याप त्यांना धान्य न मिळाल्याबाबत**

**(7) * 17448 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सांगली जिल्ह्यातील सुमारे 1200 स्वस्त धान्य दुकानदारांनी एप्रिल 2006 च्या पहिल्या आठवड्यात खुल्या वर्गाचे धान्य मिळण्यासाठी चलनाने अडीच कोटी रुपयाचा भरणा केला असूनही अद्याप त्यांना धान्य मिळालेले नाही हे खरे आहे काय,

(2) असल्यास, धान्य मिळण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असणाऱ्याविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सुनील तटकरे** : (1) व (2) सांगली जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी माहे एप्रिल, 2006 मध्ये एपीएल योजनेच्या धान्यासाठी रुपये 8,17,034 चा भरणा केला होता. त्यापैकी रुपये 6,82,263 चे धान्य उपलब्ध करुन देता आले नाही कारण सन 2006-07 साठीची पतमर्यादा दिनांक 20.5.2006 रोजी उपलब्ध झाली. दुकानदारांना माहे एप्रिल चे नियतन माहे मे, 2006 मध्ये देण्यात आले असून दिनांक 24.5.2006 रोजी धान्यांची उचल करुन त्याचे वाटप केले आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, " दुकानदारांना माहे एप्रिलचे नियतन माहे मे, 2006 मध्ये देण्यात आले असून दिनांक 24.5.2006 रोजी धान्याची उचल करुन त्याचे वाटप केले आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, धान्य उपलब्ध करुन देण्यास विलंब का झाला ? त्याची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे आर्थिक वर्ष संपल्यानंतर त्याच्या पुढील वर्षात पतमर्यादा मान्य झाल्याशिवाय राज्य सरकारचे कोषागार निधी काढून असे धान्य उचलू शकत नाही. त्यामुळे उशीर झालेला आहे. उशीर झाला ही गोष्ट उत्तरामध्ये नमूद केलेली आहे. यापुढे विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17448.......

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दोनच दिवसांपूर्वी मुरुड येथे धान्य कुजले म्हणून मी प्रश्न उपस्थित केला होता. धान्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाचे नियोजन नाही. एका ठिकाणी जादा धान्य दिले जाते तर काही ठिकाणी कमी धान्य देण्यात येते. सांगलीमध्ये ज्या दुकानदारांना धान्य वाटप करण्यात आले त्यांची संख्या किती आहे ? धान्य देण्यास ज्यांनी विलंब केला त्यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही योजना एपीएल खालील आहे. ग्रामीण भागात एपीएल योजनेखालील धान्याची उचल कमी होते. बाजाराच्या समप्रमाणात धान्याचे दर असल्यामुळे अनेकवेळा धान्याची उचल होत नाही. म्हणून ग्रामीण भागात अंत्योदय व बीपीएल खालील योजनेद्वारे धान्य उपलब्ध करुन देण्याचा आमचा प्रयत्न असतो. सांगली जिल्ह्यातील स्वस्त धान्य उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. धान्य उपलब्ध करुन देण्यास विलंब का झाला याबाबत संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करण्यात येऊन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17448...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, किती दुकानदारांनी धान्याचा पुरवठा केला ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, एकूण सांगली जिल्हयातील 59 दुकानदारांनी निधीचा भरणा केलेला आहे. मिरजमध्ये 1, कवठे महंकाळ 7, आटपाडी 27, कडेगांव 17, विटा 5, तासगांव 2 अशा एकूण 59 दुकानदारांनी निधीचा भरणा केलेला आहे. तसेच, याबाबतीतील तारीखवाईज माहिती पाहिजे असेल तर ती मी पटलावर ठेवतो.

-------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे पेल्हार (ता.वसई,जि.ठाणे) येथील शेत जमिनीवर**
**बेकायदेशीरपणे बांधकामे करुन नफा मिळविल्याबाबत**

**(८) * १८५१८ श्री. शांताराम करमळकर , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पेल्हार (ता.वसई,जि.ठाणे) येथील बावखल पेट्रोल पंपाजवळ असलेल्या अनेक सरकारी जमिनी तेथील रहिवाशांना शेती करण्यासाठी एकसाली लीज पध्दतीने देण्यात आलेल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित लाभार्थीनी त्या जमिनींवर शेती न करता बेकायदेशीरपणे बांधकामे करुन व त्यांची विक्री करुन लाखो रुपयांची नफेखोरी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमिनीवर होत असलेल्या बांधकामाची व त्याद्वारे करण्यात येत असलेल्या नफेखोरीची माहिती संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी मांडवी, यांना असतानाही या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यास त्यांच्याकडून टाळाटाळ केली जात आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित जमिनधारक तसेच तलाठी व मंडळ अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे,श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) होय, सदर जमीनी स्थानिक रहिवाशांना शेती प्रयोजनास्तव नवीन अविभाज्य शर्तीवर देण्यात आल्या आहेत.
(२) व (३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत असे उत्तर देण्यात आले आहे की, "होय", सदर जमिनी स्थानिक रहिवाशांना शेती प्रयोजनास्तव नवीन अविभाज्य शर्तीवर देण्यात आल्या आहेत. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, "अविभाज्य शर्तीवर" म्हणजे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ज्यांना ज्यांना आपण ज्या ज्या कारणास्तवर जमिनी दिलेल्या आहेत, त्या दोन वर्षापर्यंत वाटप करण्यात येईल, अशा या अविभाज्य भागांना ती देण्यात आली आहे, असा त्याचा अर्थ आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, मौजे पेल्हार येथील किती रहिवाशांना आपण जमिनी दिल्या, किती एकरांची जमीन दिली व त्यातून शासनाला किती रुपयांचा महसूल मिळाला ? तसेच, आपण एकसाली लीज पध्दतीने ज्या जमिनी देतो, त्याप्रमाणे पुन्हा या जमिनी देण्यात येणार काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, एकंदरित 9 व्यक्तिंना 8 हेक्टर 54 आर जमीन देण्यात आली. दि.9.3.19970 व दि.16.4.1970 च्या निर्णयाप्रमाणे 9 व्यक्तिंना जमिनीचे वाटप करण्यात आले.

(..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18518....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या प्रश्नास "होय" असे उत्तर दिलेले आहे. याठिकाणी दुसरा प्रश्न असा विचारण्यात आला आहे की, संबंधित लाभार्थींनी त्या जमिनींवर शेती न करता बेकायदेशीरपणे बांधकामे करुन व त्यांची विक्री करुन लाखो रुपयांची नफेखोरी केली आहे, हे खरे आहे काय ? परंतु या प्रश्नास आपण "प्रश्न उद्‌भवत नाही" अशा प्रकारे उत्तर दिले आहे, ते योग्य नाही. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, ती जमीन आजही शेतीसाठीच वापरली जाते का ? असल्यास, त्यातून शासनाच्या तिजोरीत किती महसूल आला ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 9 पैकी 4 व्यक्तिंना शेतीच्या कारणास्तव जमिनी दिल्या. परंतु त्यांनी ती जमीन तशीच पडिक ठेवली. त्यामुळेच आपण त्या 4 व्यक्तिंकडून जमीन काढून शासन जमा केलेली आहे. महसुलाच्या बाबतीत सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही, ती मी पटलावर ठेवतो. तसेच, त्याठिकाणी कुठल्याही प्रकारचे बांधकाम किंवा इतर कोणत्याही अधिकृत किंवा अनधिकृत बांधकाम झालेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सुधारणा करुन अशा प्रकारचा कुठल्याही प्रकारे बेकायदेशीर वापर झाला नाही, असे सांगितले. याबाबत माझा असा प्रश्न आहे की, आम्ही याबाबतची व्ही.डी.ओ. फिल्म दाखवली तर त्याबाबतीत आपण महसूल मंत्र्यावर हक्कभंग सादर करण्याची परवानगी द्याल का ?

**सभापती** : आता आपण पुढील प्रश्न चर्चेसाठी घेऊ.

-------

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यात नेमबाजीचे प्रशिक्षण देण्यासंदर्भात**

**(९) * १९४२० प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. रमेश निकोसे , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात नेमबाजीचे प्रशिक्षण देण्यासाठी क्लोव्हर ६ सोटिर्झियम या संस्थेद्वारे एअर रायफल नेमबाजीच्या प्रशिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रात सर्वच जिल्ह्यांमध्ये नेमबाजीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था पुढे याव्यात आणि जिल्हा पातळीवर नेमबाजी प्रशिक्षण केंद्र सुरु करावे याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात असे केंद्र स्थापन करण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत अशी केंद्रे प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यासाठी एकूण किती कालावधी लागेल ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) शासनाच्या क्रीडा धोरणानुसार शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत महाराष्ट्रात पुणे, कोल्हापूर व नाशिक क्रीडा प्रबोधनीमध्ये नेमबाजीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, एशियाडमध्ये किंवा ऑलंपिकमध्ये आपल्या राज्यातील चांगले रायफल नेमबाज पाठविण्याच्या दृष्टीने शासनाची एक योजना आहे. या योजनेंतर्गत ठाणे जिल्हयामध्ये क्लोव्हर ६ सोटिर्झियम या संस्थेद्वारे एअर रायफल नेमबाजीच्या प्रशिक्षणाची सुविधा देण्याची शासनाकडे विनंती करण्यात आली आहे. याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, रायफल नेमबाजीच्या प्रशिक्षणाची सुविधा निर्माण केली आहे काय ? नसल्यास, का करण्यात आली नाही ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे क्लोव्हर ६ सोटिर्झियम अशा प्रकारची संस्था नाही. तिचे खरे नांव क्लोव्हर सोटिर्झियम असे असून ती खाजगी संस्था आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.19420 पुढे सुरु..........**

डॉ.राजेंद्र शिंगणे.......

रायफल शुटिंग, धर्नुविद्या, तलवारबाजी अशा प्रकारचे साहसी क्रीडा प्रकार त्या ठिकाणी शिकविले जातात. परंतु, या संस्थेशी शासनाच्या क्रीडा धोरणाचा संबंध नाही व तशा प्रकारची परवानगी संबंधित संस्थेने शासनाकडे मागितलेली नाही.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, राज्यात ज्या खाजगी क्रीडा प्रशिक्षण संस्था आहेत त्यांना शासनाकडून अनुदान दिले जाते का ? तसेच, प्रत्येक जिल्हयामध्ये क्रीडा प्रबोधनीचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येतील काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, नेमबाजीचे प्रशिक्षण क्रीडा प्रबोधनीच्या माध्यमातून देण्यात येत असते. पुणे, कोल्हापूर आणि नाशिक या 3 जिल्हयात सध्या अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. शासनाने आता असा निर्णय घेतलेला आहे की, पुणे, कोल्हापूर व नाशिक या विभागांपुरतेच हे प्रशिक्षण वर्ग मर्यादित न ठेवता नागपूर, अमरावती व औरंगाबाद या विभागांमध्येही नेमबाजीचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात यावेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शासनाच्या क्रीडा धोरणानुसार शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत महाराष्ट्रात पुणे, कोल्हापूर व नाशिक क्रीडा प्रबोधनींमध्ये नेमबाजीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे, याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे अमरावती, नागपूर आणि औरंगाबाद या विभागांमध्ये देखील अशाच प्रकारचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, या विभागांमध्ये हे प्रशिक्षण वर्ग किती कालावधीत सुरु करण्यात येतील ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, यासंदर्भातील प्रस्ताव ताबडतोबीने मागविले जातील व नागपूर, अमरावती व औरंगाबाद येथे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच, आवश्यकता असेल तर कोकण विभागामध्ये देखील प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येतील.

श्री.रामनाथ मोझे : सभापती महोदय, पुणे, कोल्हापूर व नाशिक या ठिकाणी क्रीडापीठाच्या माध्यमातून नेमबाजीचे प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे. मुंबई आणि ठाणे या ठिकाणी सुध्दा अशा प्रकारचे प्रशिक्षण वर्ग शासन सुरु करणार काय ? आणि नेमबाजीचे प्रशिक्षण देणा-या ज्या खाजगी संस्था महाराष्ट्रामध्ये सुरु झालेल्या आहेत त्या संस्थांनी शासनाची मान्यता घेतलेली आहे काय ?

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) K-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MHM/

**<u>ता.प्र.क्र.19420 पुढे सुरु</u>..........**

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्रात काही खाजगी संस्थांव्दारा प्रशिक्षण देण्यात येते. अशा खाजगी संस्थांनी शासनाकडे कोणतीही मान्यता मागितलेली नाही व कोणत्याही प्रकारची मागणीही केलेली नाही. मात्र, शासनामार्फत क्रीडा प्रबोधनीच्या माध्यमातून आपण हा उपक्रम राबवित आहोत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी महाराष्ट्रातील सर्व विभागांचा उल्लेख केला. कोकण विभाग हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे, याची शासनाला कल्पना आहे काय ? असल्यास, त्या ठिकाणी अशी संधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आवश्यकता असल्यास कोकण विभागाचा देखील विचार करण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, नेमबाजांपैकी ज्यांना आंतरराष्ट्रीय स्वरुपाची किर्ती मिळालेली आहे अशी नेमबाज, अंजली भागवत यांची मुलाखत आम्ही वाचली. "जे नेमबाज सातत्याने नेमबाजीचा सराव करीत आहेत त्यांना काही अडचणी आहेत, नेमबाजांना लागणारी साधन-सामुग्री मिळविण्यासाठी शासनाकडून काही परवानग्या मिळत नाहीत, काही बाबतीत नेमबाजांना शासनाचे सहकार्य आवश्यक आहे" अशा प्रकारची विनंती या मुलाखतीमधून त्यांनी केली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरापर्यन्त पोहोचण्यासाठी नेमबाजांना जे कौशल्य वाढवावयाचे असते त्यासाठी शासनाकडून क्रीडा धोरणाच्या माध्यमातून काही सहकार्य करण्यात येईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा खरा आहे व याबाबत शासनाकडे सुध्दा काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. खरे म्हटले तर, आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे, ऑलिंम्पिक स्तरावरील खेळाडू निर्माण करीत असतांना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करुन प्रतिभावान खेळाडू निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाकडून होत असतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नेमबाजांच्या बाबतीत काही अडचणी आहेत याची शासनाला पूर्णपणे जाणीव आहे. यासाठी पुढच्या महिन्यामध्ये एक बैठक आयोजित करण्यात येत आहे व त्यांच्या ज्या ज्या अडचणी असतील त्या सर्व जाणून घेऊन उपाययोजना करण्याचा निश्चितपणे प्रयत्न शासनाकडून करण्यात येईल.

**----------------------**

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**मागासवर्गीय/अल्पसंख्यांक संस्थांना कायम विनाअनुदानित न ठेवणेबाबत**

**(10) * 17474 प्रा. फौजीया खान, श्री. वसंतराव चव्हाण, श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. सदाशिवराव पोळ** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सध्या मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकाच्या नवीन शिक्षण संस्थांनाही कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांमधील शिक्षणाचे प्रमाण इतर समाज घटकाच्या तुलनेत कमी आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक समाज हा इतर समाज घटकाच्या तुलनेत आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, या समाज घटकांचे मागासलेपण लक्षात घेवून त्यांच्या शैक्षणिक संस्थांना कायम स्वरुपी विनाअनुदानित तत्त्व लागू करण्याचा शासनाचा विचार आहे काय वा त्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत हंडोरे** : (1), (2), (3) व (4) शालेय शिक्षण व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत शाळा/महाविद्यालयाना कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली जाते. परंतु मान्यता दिली जाते. परंतु मान्यता देताना मागासवर्गीय व अल्पसंख्यांक शिक्षण संस्था असे कुठलेही निकष लावून मान्यता दिली जात नाही. मात्र सामाजिक न्याय विभागा अंतर्गत शाळा/वसतिगृहाना कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली जात नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सध्या मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांच्या नवीन शिक्षण संस्थांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात येत आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "शालेय शिक्षण व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत शाळा/महाविद्यालयांना कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली जाते. परंतु मान्यता देतांना मागासवर्गीय व अल्पसंख्यांक शिक्षण संस्था असे कुठलेही निकष लावून मान्यता दिली जात नाही." माझा प्रश्न असा आहे की, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून मागासवर्गीयांच्या आणि अल्पसंख्यांकांच्या नवीन शिक्षण संस्थांना अनुदान तत्वावर मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे काय ? आणि असेल तर माननीय मंत्री महोदय ते कोणत्या क्षणापासून सुरु करणार आहेत ?

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.17474** ........

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यामार्फत संस्थांना विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली जाते. तसा हा विषय शिक्षण विभागाशी संबंधीत आहे. मला असे वाटते की, सामाजिक न्याय विभागाकडे .....

**सभापती** : सभागृहामध्ये शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने शिक्षण मंत्र्यांनी आवश्यक ते सहकार्य करावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, जरी हा प्रश्न शिक्षण विभागाशी संबंधीत दिसत असला तरी अल्पसंख्यांक आणि मागासवर्गीयांसाठी सामाजिक न्याय विभाग कार्य करीत असतो, सामाजिक न्याय विभागामार्फत अनुदान दिले जाईल काय या हेतूने हा प्रश्न आलेला आहे. परंतु दिनांक 24.11.2001 च्या राजकोषिय सुधारणा तत्वाच्या निमित्ताने राज्यामध्ये असे धोरण आहे की, आता कायम विनाअनुदान तत्वावरच शाळा दिल्या जातात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे एकमेकांकडे बोट दाखवून उत्तर देण्यास टाळाटाळ करीत आहेत. कोणतीही संस्था मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक नसते. त्या संस्थेला तशा प्रकारचा दर्जा दिला जातो. संस्था काढणारा अल्पसंख्यांक असत नाही. हा तुमच्याच विभागाचा प्रश्न आहे. अनुदान देखील तुम्हीच हाताळता.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आदिवासी शाळांना आदिवासी विभाग अनुदान देते. शिकणारी मुले जर मागासवर्गीय असतील, म्हणजे कोणी संस्था काढली हा भाग नाही. त्याला सामाजिक न्याय विभाग अनुदान देईल काय ? या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात आला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक शाळांमध्ये इतर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नाही, असे शासनाने धोरण ठरविले आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कायम विनाअनुदान तत्वावर शाळा द्यावयाच्या असे सन 2000 सालापासून धोरण ठरविण्यात आले आहे. हायकोर्टामध्ये काय सांगितले ते मी सांगितले आहे. मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक समाजासाठी असलेल्या शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मुभा आहे.

...3/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.17474** ........

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन 2006 मध्ये मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक समाजासाठी ज्या शाळा काढण्यात आल्या त्यापैकी किती शाळांना राज्य शासनाने परवानगी दिली ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, माझ्याकडे यासंदर्भातील निश्चित आकडेवारी नाही. ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग शाळा आणि वसतिगृहे कायम स्वरुपी अनुदानावर देत नाही, हे खरे आहे.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डायगव्हाणे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.17474 ...

ज्या आदिवासी आणि दुर्गम भागामध्ये शालेय शिक्षण विभागाकडून शाळा चालविल्या जातात त्यांच्या बाबतीत आपण एक दोन महिन्यांमध्ये निर्णय घेऊन, त्या कायम विनाअनुदान तत्त्वावर न ठेवता अनुदान तत्त्वावर आपण आणणार काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, तूर्त तरी या तत्त्वालाच आम्ही स्टीकअप आहोत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांच्या शाळा आहेत त्यातील विद्यार्थ्यांच्या फीचा बोजा शासन उचलणार काय ? कारण या शाळांना कोणतेही अनुदान मिळत नाही त्यामुळे निदान त्यांना फीसाठीचे अनुदान तरी आपण देणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याबाबतीत आपण सहानुभूतीने विचार करू.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांच्या शिक्षण संस्थांमध्ये मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक समाजातील मुलांना प्रवेश मिळतच नाही आणि तेथे धनदांडग्यांनाच प्रवेश मिळतो आहे. तेव्हा अशा संस्था चालकांवर शासन काही कारवाई करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : त्याबाबतीत सुप्रीम कोर्टाचे, हाय कोर्टाचे अनेक निर्णय झालेले आहेत. ते तपासून त्या दृष्टीने विचार करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

****

...... एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

श्री. सुनील तटकरे (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "भिवंडी (जिल्हा ठाणे) येथील भंडारी कंपाऊंड येथे 560 लीटर रॉकेल जप्त केल्याबाबतची चौकशी" या विषयावरील श्री.अनंत तरे, माजी वि.प.स., डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांच्या दिनांक 19 जुलै 2005 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 6103 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी. )

...... एम 2ए ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

श्री. सुनील तटकरे (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "औरंगाबाद शहराला पुरवठा करणाऱ्या निळ्या रॉकेलमध्ये भेसळ करण्यासाठी नेण्यात येणारे 6 टँकर कसाब खेड्यातील केंद्रावर पकडल्याबाबत." या विषयावरील श्री.श्रीकांत जोशी,वि.प.स. यांच्या दिनांक 19 जुलै 2005 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 6604 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( **प्रेस** : कृपया येथे जोडलेली अधिक माहिती येथे छापावी. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....... एम 3 ...

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकआयुक्तांचे दिनांक 30 जुलै 2001, 1 ऑगस्ट 2001, 24 ऑगस्ट 2001, 29 जानेवारी 2002, 3 एप्रिल 2002, 29 मे 2002, 7 जून 2002, 21 जून 2002, 25 जून 2002, 24 जुलै 2002, 24 डिसेंबर 2002, 16 एप्रिल 2003, 5 मे 2003, 11 ऑगस्ट 2003 तसेच उप लोकआयुक्तांचा दिनांक 17 डिसेंबर 2002 चा विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापना-सह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लोकआयुक्त व उपलोकायुक्त यांचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादितचा सन 2004-05 चा एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

****

**लक्षवेधी सुचनेसंबंधात औचित्याचा मुद्दा.**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. मागील आठवड्यामध्ये कोकणासाठी स्वतंत्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ देण्यासंबंधातील लक्षवेधी सूचना चर्चेला आली असताना मंगळवारी सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा.पुरके यांनी या संबंधात माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून निर्णय जाहीर करू म्हणून सांगितले होते आणि त्यासाठी आपण सदरहू लक्षवेधी सूचना रोखन ठेवली होती. पण आज या संबंधी काही निवेदन मंत्री महोदय करणार आहेत काय ? याबाबतीतील शासनाचा निर्णय त्यांनी जाहीर करावा अशी मी या निमित्ताने आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, तो प्रस्ताव लगेचच मी सादर करतो.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी ही लक्षवेधी सूचना सभागृहात आणली होती. राज्याच्या निरनिराळ्या विभागांमध्ये माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणाचे परीक्षा घेण्यासाठी आपण स्वतंत्र मंडळे नेमली आहेत. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

सभापती महोदय, मला हे समजत नाही की, लातूर या एका जिल्हयासाठी स्वातंत्र मंडळ होऊ शकते. तर मग रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे कोल्हापूरला कां जोडता? रत्नागिरी येथे मंत्रिमंडळाची बैठक झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले असतांना देखील अशाप्रकारे हे शासन हेळसांड कां करीत आहे?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशानुसार 21 तारखेपूर्वी कारवाई होईल.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय आपण यासंबंधी तातडीने निर्णय घेऊन 21तारखेपूर्वी या सभागृहामध्ये तो निर्णय सादर करावा.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : लो□ले□ा समितीचा अहवाल सादर □र□

श्री. विलास अवचट (समिती सदस्य) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा पाचवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : लो□ले□ा समितीचा पाचवा अहवाल सभा□ृहाला सादर झाला आहे.

----------------

**पृ.शी./मु.शी.** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर □र□

श्री. धोंडीराम राठोड (समिती सदस्य) :सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ रोजगार हमी योजना समितीचा पुणे, सोलापूर व नांदेड या जिल्हयांसंदर्भात तयार केलेला पाचवा अहवाल सभा□ृहाला सादर □रतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा पाचवा अहवाल सभा□ृहाला सादर झाला आहे.

----------------

**पृ.शी./मु.शी.** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

प्रा. जोगेंद्र कवाडे (समिती सदस्य) :सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ अनुसूचित जाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभा□ृहाला सादर □रतो.

**सभापती** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभा□ृहाला सादर झाला आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा
अहवाल सादर □र□

श्री. वसंतराव खोटरे (समिती सदस्य) :सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभा□ृहाला सादर □रतो.

सभापती महोदय, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा राज्यातील पुणे, सातारा, कोल्हापूर, अकोला व अमरावती जिल्हा परिषदेच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीयांच्या कल्याणाबाबतच्या शासकीय योजनांसंबंधीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करताना मी या अहवालातील काही महत्वाच्या ठळक शिफारशींकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

जिल्हा परिषदेचा निधी खर्च करताना जरी आपण अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या सर्व मागासवर्गीयांसाठी एकत्रित खर्च करीत असला तरी त्यातही विमुक्त जाती व भटक्या जमाती सारख्या उपेक्षित घटकाकडे आपण विशेष लक्ष देऊन त्यांच्या उपलब्ध असलेल्या लोकसंख्यानुसार त्यांना कल्याणकारी योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने विशेष लक्ष देण्यात यावे.

दिनांक 5 मार्च, 2005 रोजीचा शासन पत्रकामध्ये जात पडताळणी केल्याशिवाय व वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय मागासवर्गीयांच्या उमेदवारांना पदोन्नती देण्यात येऊ नये असा स्पष्ट उल्लेख असताना देखील पुणे जिल्हा परिषदेने शिक्षकाकडून जातीचे वैद्य प्रमाणपत्र न घेता 21 शिक्षकांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती दिली आहे, ही बाब गंभीर असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या प्रकरणामुळे समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. या प्रकरणाबाबत संबंधित विभागीय सचिवाने उक्त प्रकरणाची गंभीर नोंद घेऊन संबंधित 3 पदोन्नती दिलेल्या मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी व यापुढे अशाप्रकारची पुनरावृत्ती होऊ नये याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे...

अशा संवर्गातील अनुशेष दूर करण्याबाबत अडचणी निर्माण होत असतील तर किंवा एखाद्या संवर्ग्‍ा्‍तील उमेदवार उपलब्ध होत नसतील तर त्यांच्या भरतीतील किंवा पदोन्नतीसाठी असलेली अट शिथिल करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे विमुक्त जाती व भटक्या जमातीचा काही संवर्गातील पदोन्नतीतील रेशिओत बदल केल्यास सदर उमेदवारांचा अनुशेष दूर होईल अशी समितीची धारणा आहे. म्हणून समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली असता कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी 50.50% असा रेशिओ असावा अशी मागणी केलेली आहे. परंतु वर्ग 3 च्या भरतीमध्ये 75% थेट भरती करता येते हा रेशियो बदलण्याच्या बाबतीत सदरहू बाब तपासून पहावी व त्यात काही बदल करता येईल का तेही पहावे.

जे विविध जात पडताळणीबाबतचे शासन निर्णय आहेत ते सर्व जिल्हा परिषदांना पुन्हा स्मरणार्थ पाठविण्यात यावेत आणि त्याची कडक अंमलबजावणी कशी करता येईल याची नोंद घेण्यात यावी. जेणेकरुन अवैध प्रमाणपत्रधारक व्यक्ती संबंधित जातीच्या सवलतीच्या किंवा शासनाकडून मिळणाऱ्या या सवलतींचा फायदा घेऊ शकणार नाही आणि खोटया प्रमाणपत्रधारकांना आळा बसेल अशा प्रकारची कारवाई शासनाने आणि संबंधित विभागाने करावी.

संबंधित विभागाने विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांच्या जिल्हापरिषदांमधील अनुशेष त्वरीत भरुन काढण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना पुन्हा लेखी स्वरुपात निर्देश देण्यात यावेत.

सामान्य प्रशासन विभागाने जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी असतील त्यांनी किती दिवसात जात प्रमाणपत्र संबंधातील पुरावे पडताळणीसाठी किती दिवसात सादर करावे आणि किती दिवसात ते तपासले जावेत याबाबत आदेश काढून संबंधित कार्यालयांना मार्गदर्शन करावे, सामान्य प्रशासन विभागाने यासंबंधात आदेश काढला तर जात पडताळणीची बाब गांभीर्याने घेतली जाईल व त्याचा निश्चित परिणाम होईल असे समितीला वाटते तेव्हा याबाबत लवकरात लवकर निर्णय व्हावा. तसेच अवैध प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कायद्यानुसार कारवाईसाठी ही सर्व प्रकरणे संबंधितांकडे पाठविण्यात यावीत.

जे कर्मचारी जात पडताळणीच्या बाबतीत सहकार्य करीत नाहीत त्यांच्यावर कारवाई करावी, त्यांची सेवा समाप्त करण्याची वेळ आली तर अशा प्रकारची सुध्दा कारवाई करण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे...

शासनाने मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी जो कालबध्द कार्यक्रम दिलेला आहे. त्या कार्यक्रमाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी व शासनाच्या सदर आदेशाप्रमाणे अमंलबजावणी झाली आहे किंवा नाही. या संबंधीचा आढावा दरमहा घेण्यात यावा.

जात पडताळणी समितीकडून जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सहा महिन्यांपेक्षाही जास्त कालावधी लागतो म्हणून जिल्हा पातळीवर जात पडताळणी समिती होणे आवश्यक आहे. हा समितीचा शिफारशीचा उद्देश आहे.

**सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:औचित्याच्या मुद्दयासंबंधी

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आपला औचित्याचा मुद्दा उपस्थित करावा.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयामध्ये गेल्या काही दिवसापासून चिकनगुनिया या साथीच्या तापाने थैमान घातले आहे. दिनांक 17 जुलै या एका दिवशी या तापामुळे तीन लोकांचा मृत्यू झाला आहे. या जिल्हयातील खामगाव, जलंब, माटरगाव, ब्राम्हणवाडा, बेलुरा, खोलखेड, वरद, इच्छापूर, मच्छिंद्रखेड इत्यादी गावांमध्ये गेल्या दहा दिवसापासून मोठया प्रमाणावर या तापाचे रुग्ण आढळून आले आहेत. या जिल्हयामध्ये या रोगाची साथ मोठया प्रमाणावर असतांना आणि अनेक लोक मरण पावले असतांना या रोगावरील औषधांची वानवा त्या विभागामध्ये आहे. या रोगावरील औषधे तेथील बाजारामध्ये मिळत नाहीत. रोगावर उपचार करणारे डॉक्टर देखील त्या ठिकाणी उपलब्ध नाहीत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा काहीच लक्ष देत नाही. लोकांचे नाहक बळी जात आहेत. कालच माझ्या खामगावामध्ये तीन लोकांचे मृत्यू झालेले आहेत. श्री.संजय गुप्ता, कु.सीमा वसंतकार आवार, श्री.सुपडा सखाराम खंडेराव या तिघांचा मृत्यू चिकुन गुनिया या रोगाने झालेला आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये जवळपास दोन-दोन, तीन-तीन हजार रुग्ण आहेत. जिल्हापरिषदेचा आरोग्य विभाग झोपलेला आहे. त्यांचे कोणत्याही गावामध्ये कॅम्प नाहीत. ग्रामीण भागामध्ये चिकुन गुनिया या रोगाची लागण झालेली आहे. शासनाने याची गंभीर दखल घेवून बुलढाणा जिल्हयातील या रोगावर ताबडतोब उपाययोजना करावी, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी याची नोंद घेऊन आरोग्य मंत्री आणि आरोग्य विभागाला कळवावे.

डॉ.विजयकुमार गावित : नोंद घेण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ D/

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, 12 डिसेंबर 2003 आणि 10 डिसेंबर 2004 रोजीच्या अधिवेशनामध्ये महिलांची छेडछाड विधेयक क्रमांक 5, हे मांडले होते. त्यानुसार महिलांची छेडछाड दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा करावा,अशी विधेयकाच्या माध्यमातून विनंती केलेली होती. त्याला उत्तर देत असतांना माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, काही गुन्ह्यांमध्ये लवकर जामीन मिळतो, परिणामी गुन्हेगारांवर वचक बसत नाही, गुन्हेगारांना कमी प्रमाणात शिक्षा होते, याच्याशी मी सहमत आहे. या दृष्टीने सर्वंकष कायदा केला जाईल. सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याद्वारे निदर्शनास आणून देते की, 16 जून 2006 रोजी शासनाच्या प्रसिध्दी विभागाने बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये विशेषत: महिलांची छेडछाड या गुन्ह्यामध्ये दखलपात्र आणि अजामिनपात्र गुन्हा, असल्याचा अधिनियम जारी केल्याचे मंत्रालयामध्ये पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली त्यामुळे मला धक्का बसला. शासनाने अधिनियम प्रसृत केला आणि नंतर प्रेस कॉन्फरन्स घेऊन तो विड्रॉ केला आणि आम्ही यावर विचार करत आहोत असे सांगितले. हे अधिवेशन संपत आलेले आहेत, आता तीन-चार दिवस राहिलेले आहेत. शासनाने इरादा जाहीर केलेला आहे. महिलांच्या छेडछाडीबद्दलचा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र करण्याबाबतचा अधिनियम जारी करावा, अशी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करते.

**सभापती** : सन्माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी. ही अत्यंत महत्वाची बाब असल्यामुळे त्याकडे योग्य ते लक्ष द्यावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे.

---

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्दा सभागृहात मांडू इच्छितो. कल्याण तालुक्यातील मोडकळीस आलेल्या प्राथमिक शाळांच्या 21 शाळा खोल्या आहेत. 12 जूनपासून शाळा सुरु झाल्या, परंतु अद्यापही या वर्गांच्या दुरुस्तीचे काम झालेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होत आहे. एका वर्गामध्ये तीन-तीन, चार-चार वर्गातील मुले बसतात. यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होत आहेत. त्याचप्रमाणे शहापूर तालुक्यातील वाशिंद येथील शाळा,आणि शाळा खोल्या मोडकळीस आलेल्या असून त्या ठिकाणच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ D/

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरु....

500 विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय झालेली आहे. कसारा तालुक्यातील जवळजवळ 68 प्राथमिक शिक्षक हे प्रतिनियुक्तीवर गेलेले आहेत, त्यामुळे त्या ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये मुलांना शिक्षण देण्यासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

शहापूर तालुक्यातील बेलवली येथील शाळा 12 दिवसांपासून बंद आहे. ग्रामस्थांनी त्या शाळेला टाळा लावलेला आहे. या बाबीकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. याबाबत आपण निदेश द्यावेत अशी विनंती करतो.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत नोंद घ्यावी आणि सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची माहिती माननीय शिक्षण मंत्र्यांना द्यावी.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, होय.

----

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पंढरपूर (जि. सोलापूर) येथे 2 जुलै, 2006 रोजी बॉम्ब सापडला असून बॉम्ब जिवंत नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. परंतु दि. 13.7.2006 रोजी तोच बॉम्ब जिवंत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. यात्रा काळात घातपात होऊ नये म्हणून पोलिसांनी दक्षता घेणे गरजेचे आहे. यादृष्टीने मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्यावर्षी 26 जुलैला झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने राज्य शासनाने असे जाहीर केले होते की, लेप्टोस्पायरोसीस, डेंग्यूची लागण झालेल्या ज्या लोकांनी खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेतलेले आहेत त्यांचे बिल शासनातर्फे रिएम्बर्स केले जाईल. श्री. विजय गुरव, राहणार कृष्णनगर, वाकोला पाईल लाईन यांनी अनेक लोकांचे जीव वाचवले पण त्यांना स्वत:ला लेप्टोस्पायरोसीस झाला. त्या ठिकाणी महापालिकेच्या व्ही. एन. देसाई रुग्णालयामध्ये सुविधा नसल्यामुळे त्यांना आर.के. रुग्णालयामध्ये ट्रान्सफर करण्यात आले. त्या ठिकाणी आम्ही भेट दिली होती. त्या ठिकाणचे व्हेंटिलेटर बिघडल्यामुळे त्याला हिंदुजा रुग्णालयामध्ये शिफ्ट करण्यात आले. हा मुलगा टपाल खात्यामध्ये काम करतो आणि टपाल खात्यामार्फत राज्य शासनाला एक पत्र देखील दिले गेले. त्यांना असे सांगण्यात आले की, जे.जे. रुग्णालयातून सर्टिफिकेट घेऊन या, मग तुम्हाला रिएम्बर्समेंट मिळेल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

डॉ. दीपक सावंत .....

त्यांचे 95 हजार रुपयांचे रिएम्बर्समेंटचे बिल आहे. 26 जुलैनंतर सहा महिने तो जे.जे. हॉस्पिटलमध्ये खेटे घालत आहे. मी स्वत: दोन पत्रे दिलेली आहेत. तरी सुध्दा अद्यापपर्यंत देण्यात आलेले बिल वाजवी असल्याबाबतचे सर्टिफिकेट त्याला दिलेले नाही. काल तो मुलगा माझ्याकडे आला होता. कालपर्यंत त्याला जे.जे. हॉस्पिटलचे डीन डॉ. शिनगारे यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. डॉ. शिनगारे यांनी त्याला वैद्यकीय अधिक्षकाकडे पाठवले होते. ते बिल सर्टिफाय करण्याऐवजी एखादी तांत्रिक चूक काढतात आणि बिल अडकवून ठेवतात. अशा प्रकारे त्या मुलाची अवहेलना केलेली आहे. या औचित्याच्या मुद्याव्दारे मी एवढेच सांगू इच्छितो की, त्याला लवकरात लवकर सर्टिफिकेट मिळावे. या 26 जुलैला 1 वर्ष पूर्ण होईल. त्याला रिएम्बर्समेंट मिळाली पाहिजे.

**सभापती** : माननीय शिक्षणमंत्र्यांनी नोंद घ्यावी. सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. गेल्यावर्षीच्या अतिवृष्टीमध्ये दुर्दैवाने तो गंभीर आजाराने पछाडलेला रुग्ण आहे. त्याच्यावर वेगवेगळ्या हॉस्पिटलमध्ये उपचार झाले परंतु त्याचे पेमेंट अद्याप झालेले नाही. आपण स्वत: आरोग्य विभागाला सांगून त्याला पैसे मिळतील अशी व्यवस्था करावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. माझा जो औचित्याचा मुद्दा आहे त्याबाबत माझी माननीय उपसभापतींबरोबर काल चर्चा झाली. त्यांनी सांगितले की, औचित्याचा मुद्दा मांडावा. यासंदर्भात हक्कभंग सुध्दा दाखल झालेला आहे. मला जे सांगावयाचे आहे ते मी सभागृहात सांगेन. याबाबत आमची चर्चा झाली. माननीय उपसभापती सभागृहात माननीय सभापतीस्थानी असतील त्यावेळी आपण मला हा औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी द्यावी.

**सभापती** : मी सभागृहातून बाहेर जाताना माननीय उपसभापतींना याबाबत निरोप देईन.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तीन दिवसांपूर्वी मी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. मी इंजिनिअरींगच्या ऑनलाईन प्रवेशासंबंधी मुद्दा उपस्थित केला होता आणि याबाबत शासनाने दखल घ्यावी असे माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते. उद्या फॉर्म भरण्याची मुदत संपत आहे. सायबर कॅफेमध्ये अतिशय गोंधळ आहे. त्या ठिकाणी रांगा लागतात. विद्यार्थ्यांना आणि पालकांना मनस्ताप झालेला आहे. शासनाने याबाबत काय विचार केलेला आहे हे समजू शकलेले नाही. अधिवेशन चालू असतानाही शासन याबाबत विचार करीत नाही आणि या ठिकाणी निवेदन करीत नाही.

**सभापती** : माननीय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत नोंद घ्यावी. याबाबतीत चार दिवसांची मुदतवाढ द्यावी अशी विनंती औचित्याच्या मुद्याव्दारे करण्यात आली होती. आपण कृपया याबाबतीत लक्ष घालावे. याकरिता चार दिवसांची मुदत वाढवावी. बॉम्बस्फोटानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे काही विद्यार्थी पोहोचू शकले नसतील. म्हणून ही मुदतवाढ द्यावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, ठीक आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : याबाबतीत काय केले यासंबंधी निवेदन केले पाहिजे.

प्रा. वसंत पुरके : मागे जेव्हा अतिवृष्टी झाली होती त्यावेळी प्रवेशप्रक्रियेसाठी दोन दिवस मुदत वाढवून देण्यात आली होती.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजाबाबत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण मागील आठवड्यामध्ये, निवेदने ताबडतोबीने आली पाहिजेत, अशा प्रकारचे आदेश सरकारला दिले होते. रोज सहा निवेदने घेण्यात येतील असेही आपण सांगितले होते. हा शेवटचा आठवडा आहे. आज फक्त दोनच निवेदने आलेली आहेत.

**सभापती** : काल 6 निवेदने होती. आज 2 निवेदने आहेत. आजची उर्वरित 4 आणि उद्याची 6 अशी एकूण 10 निवेदने उद्या घेण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : पहिल्या आठवडयामध्ये विचारलेल्या सूचनांची निवेदने अद्याप आलेली नाहीत. अधिवेशनाचे शेवटचे तीन दिवस राहिलेले आहेत.

**सभापती** : परवा सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी यासंदर्भात मुद्दा उपस्थित केल्यानंतर मी सर्व संबंधित मंत्र्यांना सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांच्या माध्यमातून कळविण्याची व्यवस्था केलेली आहे. मागील तीन अधिवेशनांमध्ये 93 अन्वये किती सूचना देण्यात आल्या आणि किती निवेदने प्रत्यक्षात आली याबाबतची माहिती घेण्यास मी माझ्या विभागालाही सांगितलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण दिलेले आदेश मंत्री महोदय पाळत नाहीत. त्यामुळे आम्हाला न्याय कसा मिळेल ?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी पाच-सहा दिवसांपूर्वी अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांविरुध्द हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. हा हक्कभंग जनतेच्या प्रश्नाशी, झुणका-भाकर केन्द्राशी निगडित आहे. त्यासंदर्भात या सदनामध्ये निदेश दिले गेले होते, त्याची अंमलबजावणी झालेली नाही. उलट झुणका-भाकर केन्द्र उद्ध्वस्त करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्या संबंधातील हक्कभंगाचा प्रस्ताव या अधिवेशनामध्ये चर्चेला आला नाही तर सर्व लोकांवर अन्याय होणार आहे. या हक्कभंगाच्या संदर्भात मी सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना कल्पना दिलेली आहे. तेव्हा मी दिलेल्या हक्कभंगाच्या संदर्भात लवकर निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, नियम 93वरील निवेदनांवर आम्हाला दोन-तीन प्रश्न विचारण्याची संधी द्यावी, अशी आपणास विनंती आहे.

**सभापती** : 5 निवेदनांसाठी 15 मिनिटे आणि 10 निवेदनांसाठी 30 ते 35 मिनिटे वेळ देण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात नागपूर हायकोर्टामध्ये एक रिट दाखल करण्यात आलेली आहे. या सदनामध्ये मी तो विषय मांडलेला असताना आपण असे म्हणाला होता की, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो. तेव्हा दोन दिवसामध्ये हक्कभंगाचा विषय सदनामध्ये आणला जाईल असेही आपण सांगितले होते. काही तांत्रिक गोष्टींमुळे उशीर झाला असेल....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी देखील व्यक्तिगत एक हक्कभंग दिलेला आहे. त्याबाबतीत तो हक्कभंग सुमोटो आणण्याचे आदेश दिले होते. त्या हक्कभंगाच्या संदर्भात देखील निर्णय द्यावा.

**सभापती** : ठीक आहे. आता 93च्या सूचना घेण्यात येतील.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ D/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 12:25

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : डॉ.दिपक सावंत, वि.प.स. यांनी "मोखाडा, जि.ठाणे तालुक्यात एका नव्या आजाराने घातलेले थैमान व त्यावर उपाययोजना करण्याबाबत शासनाने दाखविलेली दिरंगाई" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "मुंबईतील रे रोड येथील संत सावता मार्गावरील झोपडपट्टीतील 30 लाख रुपयांची वीज चोरी बेस्टच्या सुरक्षा व दक्षता पथकाने उघडकीस आणणे,त्यात बांगलादेशी घुसखोरांचा हात असल्याचा संशय असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "ठाणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रेकॉर्ड नुकतीच आग लागून जळून खाक होणे, या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करुन कडक कारवाई करण्याची गरज"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "दि.13 जुलै, 2006 पासून ए.सी.सी.चांदा सिमेंट वर्क्स, घुघ्घुस (जि.चंद्रपूर) या कारखान्यातील कामगारांनी वेतनवाढ व बोनसच्या मागणीसाठी सुरु केलेले बेमुदत उपोषण व त्यांच्यावर पोलिसांनी केलेला लाठीमार"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "दि.17 जुलै, 2006 रोजी भिवंडी, जि.ठाणे येथे पोलिसांनी नाकेबंदी केली असता संशयीत आरोपींनी दोन पोलिसांना चालत्या वाहनातून फेकून दिल्याची घडलेली गंभीर घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, मी पुणे जिल्हयातील राजगुरुनगर येथील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी एमआयडीसीने संपादित केल्याबद्दल नियम 93 ची सूचना दिली आहे. या उपजाऊ जमिनी आहेत. 11 जुलै रोजी हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा निघाला होता.

**सभापती** : शासनाने यासंबंधी निवेदन करावे असा मी निदेश देत आहे.

अन्य नियम 93 अन्वये प्राप्त झालेल्या सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

---------

..3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विद्यार्थीनीने वर्गामध्ये संशयास्पदरित्या गळफास घेऊन केलेली आत्महत्या.

**मु.शी.**: विद्यार्थीनीने वर्गामध्ये संशयास्पदरित्या गळफास घेऊन केलेली आत्महत्या याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी "विद्यार्थीनीने वर्गामध्ये संशयास्पदरित्या गळफास घेऊन केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) R.4

SGB/ MAP/ D/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 12:25

निवेदन क्रमांक.1...........

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझ्याकडे या भागातील शिवसेनेचे शाखाप्रमुख श्री.राजू तळके, दलित पँथरचे श्री.उत्तम बनसोडे व गौतम सोनावणे यांचे निवेदन आहे. याठिकाणी उत्तरामध्ये म्हटले आहे की, रात्री प्रेत सापडले. संध्याकाळी शाळा बंद झाल्यावर अशी पध्दत असते की, शिक्षक व विद्यार्थी संपूर्णपणे वर्गखोल्या रिकाम्या आहेत का हे पाहतात. ही मुलगी घरी आली नाही म्हणून 3-4 वेळा तिच्या पालकांनी तपास केला व पोलिसांकडे विचारणा केली. त्यानंतर रात्री 1.00 वाजता तिचे प्रेत शाळेमध्ये सापडले. संध्याकाळी 6.00 वाजता शाळा बंद झ ाली त्यावेळी प्रेत दिसले नाही का? प्रेत न पाहताच शाळेतील वर्गांचे व शाळेचे दार बंद करण्यात आले का? या शाळेमध्ये असे प्रकार यापूर्वी तीनवेळा घडले आहेत. म्हणून या प्रकरणाचा तपास उच्चस्तरीय समितीकडे दिला जाईल का? खरे म्हणजे ज्यांनी उत्तर तयार केले त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. ही मुलगी स्वत: डिस्टर्ब होती म्हणून तिने आत्महत्या केली असे उत्तरामध्ये म्हटले आहे. तिला मानसिक आधार शाळेकडून किंवा घरामधून मिळाला नाही. शाळेमध्ये संध्याकाळी 6.00 ते रात्री 1.00 पर्यंत प्रेत लटकलेले राहते याबद्दल शाळेला जबाबदार धरणार का? वारंवार या शाळेमध्ये अशी घटना घडते म्हणून या घटनेचा संदर्भ देऊन सीआयडीकडे तपास दिला जाईल का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सायंकाळी 6.00 वाजता शाळा बंद झाली आणि त्या शाळेतील 10 वी ब वर्ग पहिल्या मजल्यावर आहे. नेहमीप्रमाणे वर्गातील सर्व विद्यार्थी व शिक्षक खाली उतरुन आल्यानंतर खालच्या भागातील शटर बंद केले जाते व त्यानंतर शाळेचे मुख्य प्रवेशद्वार बंद केले जाते व कुलुपाच्या किल्ल्या शेजारी राहणाऱ्या शिक्षकांकडे दिल्या जातात. मुलगी घरी का आली नाही म्हणून तिच्या पालकांनी शाळेत जाऊन पाहिले परंतु शाळा बंद होती म्हणून शोधाशोध करुन पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी शोधाशोध करुन शिक्षकांकडे विचारणा केली, वर्गखोल्या उघडून पाहिल्या त्यावेळी तिचे शव लटकलेले आढळून आले. यापूर्वी या शाळेत असे प्रकार घडले आहेत का याची माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे देण्याची आवश्यकता वाटत नाही. हे आत्महत्येचे प्रकरण आहे. ही मुलगी सतत म्हणत होती की, मला आत्महत्या करायची आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे....

सभापती महोदय, त्या शाळेतील शिक्षकांनी तुमची मुलगी असे असे म्हणते यासंदर्भात तिच्या पालकांना सांगितले होते तसेच श्री. प्रतीक पाटील हे त्या ठिकाणी कौन्सीलींगचे काम करीत होते. आत्महत्या केलेली मुलगी सुध्दा थोडी सायकीकच होती.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, ज्यावेळेस शाळा सुटते त्यानंतर तेथील शिपाई प्रत्येक वर्गात जाऊन आत कोणी नाही ना ? हे बघून वर्ग बंद करीत असतो. ज्यावेळेस शिपायाने हा वर्ग बंद केला त्यावेळी वर्गात त्याला कोणीही आढळून आले नाही का? खरे म्हणजे वर्ग बंद करतांना वर्गाची पाहणी करण्याची जबाबदारी त्या शाळेची आहे त्यामुळे या शाळेवर कारवाई झालीच पाहिजे. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, "मी आत्महत्या करीन" अशी मुलगी बोलत होती तर त्या दृष्टीने पालकांची आणि विद्यार्थ्यांची कौन्सीलींग करण्याच्या दृष्टीने प्रत्येक शाळेत उपाययोजना केली जाणार आहे काय? कौन्सीलींग जर व्यवस्थीत झाले तर असे प्रकार घडणार नाहीत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जिज्ञासा मुक्ती संघटने मार्फत श्री. प्रतीक पाटील हे या ठिकाणी कौन्सीलींग करीत होते. ही मुलगी अशी अशी वागते, मुलगी विक्षिप्त वागते यासंदर्भात संबंधित मुलीच्या पालकांना सांगण्यात आले होते. यासंदर्भात संबंधित मुलीच्या वडीलांचे स्टेटमेंट आहे. तसेच या ठिकाणी अगोदर चार घटना घडलेल्या आहेत अशी माहिती सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. परंतु या ठिकाणी अगोदर चार घटना घडलेल्याच्या संदर्भात माझ्या जवळ माहिती नाही. त्यामुळे याबाबत तपास करुन ही सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, शाळा संपल्यानंतर वर्गाची तपासणी करुन वर्गाला कुलूप लावण्याची जबाबदारी ही त्या शाळेचीच असते. परंतु या ठिकाणी शाळा संपल्यानंतर वर्गातच मुलीने आत्महत्या केलेली आहे. शाळा संपल्यानंतर या ठिकाणी मुलीने कशी काय आत्महत्या केली? त्यामुळे शाळा संपल्यानंतर वर्ग खोल्याची तपासणी करण्याची जबाबदारी शाळेची असल्यामुळे संबंधित शाळा चालकांवर कारवाई केली जाणार आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, शाळेच्या जबाबदारीच्या संदर्भात चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय,या घटनेच्या अगोदर सुध्दा या शाळेत अशा प्रकारच्या चार घटना घडलेंल्या आहेत परंतु यासंदर्भातील माहिती माझ्याजवळ नाही असे माननीय राज्यमंत्र्यांनी आताच सांगितलेले आहे. त्यामुळे अशा प्रकारची या शाळेतील ही कितवी घटना आहे याची चौकशी केली जाईल काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सर्व घटनेची माहिती घेऊन, चौकशी करुन कारवाई केली जाईल.

--------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईत डेंग्यु, लेप्टो, गॅस्ट्रो, कॉलरा व ॲथ्रँक्स आदि साथीच्या रोगाची सुरुवात होणे.

**मु. शी.** : मुंबईत डेंग्यु, लेप्टो, गॅस्ट्रो, कॉलरा व ॲथ्रँक्स आदि साथीच्या रोगाची सुरुवात होणे याबाबत सर्वश्री मधु चव्हाण व इतर विधान परिषद सदस्यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विमल मुंदडा ( आरोग्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधु चव्हाण व इतर विधान परिषद सदस्यांनी मुंबईत डेंग्यु, लेप्टो, गॅस्ट्रो, कॉलरा व ॲथ्रँक्स आदि साथीच्या रोगाची सुरुवात होणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेवर शासनाने परस्पर विसंगत अशी उत्तरे दिलेली आहेत. मी विचारले होते की, साथीच्या रोगाचे अचुक निदान वेळेत करता यावे व गेल्या वर्षी डेंग्यु, लेप्टो, गॅस्ट्रो, कॉलरा इत्यादी साथीने थैमान घातले असता त्यावेळी रोगाचे निदान करण्यासाठी रुग्णांच्या रक्ताचे नमुणे तपासणीची सोय मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात निमार्ण करुन द्यावी परंतु ही सुविधा या ठिकाणी अजून पर्यंत सुरु झालेली नाही परंतु यावर शासनाचे उत्तर आहे की, "महानगरपालिकेच्या सर्व महाविद्यालयामध्ये व उपनगरीय रुग्णालयामध्ये या सर्व रोगाचे निदान करण्यासाठी चाचण्या उपलब्ध आहेत. पुणे व अंदमान येथे अचूक निदानाकरिता लेप्टो व डेंग्यूच्या काही संशयिंत रुग्णाचे रक्तनमुने पाठविले जातात." सभापती महोदय, जर आपल्या येथे रोगाचे निदान करण्याची सोय उपलब्ध आहेत तर मग पुणे व अंदमान येथे रोगाचे निदान करण्याच्या चाचण्यासाठी का पाठविले जाते? सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, "अचूक आणि योग्य" निदानासाठी पुणे व अंदमान येथे लेप्टो व डेंग्युच्या काही संशयित रुग्णोच रक्तनमुने पाठविले जातात. त्यामुळे "योग्य" आणि "अचूक" यामध्ये काय फरक आहे? त्यामुळे कस्तुरबा हॉस्पीटलमध्ये आधुनिक प्रयोगशाळा निर्माण करण्यास उशिर का झाला? उत्तराच्या पहिल्या पानावर असे म्हटले आहे की,

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.मधुकर चव्हाण.........

"कस्तुरबा रुग्णालयामध्ये मॉलिक्युलर डायग्नोस्टिक रेफरन्स लॅबारॅटरी (टर्न की प्रोजेक्ट ) सुरु करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. सर्व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन व लिफाफा उघडण्यात आलेला असून या टर्न की प्रोजेक्ट करिता अंदाजित खर्चाच्या रक्कमेपेक्षा 1 कोटी रक्कम जास्त येत असल्यामुळे महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात येणार आहे." माझा प्रश्न आहे की, ही जाहिरात केव्हा देण्यात आली ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, कस्तुरबा रुग्णालयात मॅलिक्युलर डायग्नोस्टिक रेफरन्स लॅबारॅटरी सुरु करण्याबाबतची जाहिरात दिनांक 20 मार्च 2006 रोजी देण्यात आली होती. दिनांक 17 एप्रिल, 2006 रोजी या निविदांची छाननी करण्यात आली. हा प्रकल्प 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्यामुळे महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली अतिरिक्त आयुक्त ( पूर्व उपनगरे), सह आयुक्त ( वैद्यकीय शिक्षण व आरोग्य ), उपप्रमुख लेखापाल ( रुग्णालय) यांचे समवेत सभा घेण्यात येणार असून त्या सभेमध्ये टर्न की प्रोजेक्ट सुरु करण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. सभापती महोदय, महानगरपालिकेच्या सर्व महाविद्यालयामध्ये आणि रुग्णालयांमध्ये सर्व रोगांचे निदान करण्यासाठी चाचण्या उपलब्ध आहेत. सुरुवातीला रुग्णाला मलेरिया किंवा अन्य कोणता आजार आहे याबाबत रक्ताची तपासणी करण्यात येते. त्यानंतर रुग्णाची डेंग्यू किंवा लेप्टोस्पारोसिसची टेस्ट पॉझिटीव्ह आहे की, निगेटीव्ह आहे हे पाहिले जाते. तरी सुध्दा लेप्टोस्पारोसिसच्या व डेंग्यूच्या संशयित रुग्णांचे रक्तनमुने अचूक निदानाकरिता पुणे व अंदमान येथे पाठविले जातात. लेप्टोस्पारोसिसच्या व डेग्यूच्या रक्तनमुन्यासाठी 10-12 टेस्ट घेतल्या जातात.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, गेल्या काही वर्षात लेप्टोस्पायरोसीसमुळे काही रुग्ण दगावले आहेत. तेव्हा पुण्याच्या धर्तीवर मुंबईतील हाफकीन इन्स्टिटयुट येथे "व्हायरल लॅब" तयार करण्यात येणार आहे का ? सैबिक पहाडी याची रॅपिड टेस्ट घेण्यात आली होती काय ? महानगरपालिका रुग्णालयामध्ये आय.जी.जी आणि आय.जी.एम या डेंग्युच्या व लेप्टोस्पायरोसीसच्या टेस्ट होतात काय ?

..2.

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) T-2

AJIT/ MAP/ KGS/ 12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सायन व कस्तुरबा रुग्णालयामध्ये काही टेस्ट होतात, रुग्णालयांमध्ये आय.जी.एम. आणि आय.जी.जी. टेस्ट करण्यास सुरुवात करणार आहेत. आम्ही 60 दिवसांच्या आत प्रयोगशाळा सुरु करु शकतो. सैबिक पहाडी याची रॅपिड टेस्ट करण्यात आली होती.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी निवेदनात नमूद केले आहे की, डेंग्यू, लेप्ट्रो, गॅस्ट्रो इत्यादी रोगांची लागण पावसाळ्यात होते. मॉलिक्युलर डायग्नोस्टिक रेफरन्स लॅबोरेटरी सुरु करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. तेव्हा माझा प्रश्न आहे की, अशाप्रकारचा निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने विलंब का केला ?

यानंतर श्री.पुरी...............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, याठिकाणी विलंब झालेला नाही. लेप्टोस्पायरोसीस गेल्या चार वर्षापासून आला असेल, परंतु त्याबाबतीत आपण चांगल्या प्रकारच्या उपाययोजना केलेल्या आहेत. 26 जुलैला झालेल्या पूर परिस्थितीमुळे त्या काळात मोठया प्रमाणात अशा प्रकारचे लेप्टोस्पायरोसीसचे रुग्ण आढळून आले. अशा रुग्णांना आपण त्यावेळी चांगल्या प्रकारची ट्रीटमेंट दिलेली असून कमीत कमी रुग्ण दगावण्याच्या दृष्टीने आपण काळजी घेतलेली आहे. याबाबतीत मला सगळया लोकप्रतिनिधींनाही विनंती करावयाची आहे. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या अडचणी येतात, अशा प्रकारची साथ त्याठिकाणी पसरु नये यादृष्टीने कंट्रोल करण्याचा प्रयत्न महापालिका किंवा ग्रामपंचायत नेहमीच करीत असते. आता आपण उंदिरांसाठी पिंजराही उपलब्ध करुन देत आहोत. तसेच....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, लेप्टोस्पायरोसीसच्या बाबतीत जी जी प्रिव्हेंटीव्ह मेजर्स घेण्याची आवश्यकता असते ती ती आपण घेतलेली आहे. गॅस्ट्रोची साथ पसरु नये यासाठी शुध्द पाणी, चांगला आहार घेण्याची आवश्यकता असून याबाबतीतही आपण काळजी घेतलेली आहे. तसेच, डेंग्यूच्या बाबतीतही आपण प्रिव्हेंटीव्ह मेजर्स घेतलेली आहे. लेप्टोस्पायरोसीसच्या संदर्भात आपण चांगल्या प्रकारे कंट्रोल करु शकलो आहोत. आजच्या परिस्थितीमध्ये पावसाळयापूर्वी जी व्यवस्थापनाने काळजी घ्यावयास पाहिजे ती घेतलेली आहे. याबाबतीत आपण प्रसार, प्रचार, इलेक्ट्रॉनिक मिडिया, वृत्तपत्रांद्वारे आवश्यक ती माहिती दिलेली आहे. औषधांचा साठाही पूर्णपणे संपूर्ण मुंबईच्या हॉस्पीटलमध्ये उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे लेप्टोस्पायरोसीसच्या बाबतीत आपण सर्व सोयी उपलब्ध करुन दिलेल्या असून कुठेही कसल्याही प्रकरची कमतरता भासणार नाही, याची काळजी आपण घेतलेली आहे.

(गोंधळ)

सभापती महोदय, लेप्टोस्पायरोसीसच्या बाबतीत सर्व प्रकारची काळजी घेतलेली आहे. परंतु याठिकाणी आपल्याला काही होणारच नाही, याची आपण आज गॅरंटी देऊ शकत नाही. मी याठिकाणी एवढेच सांगू इच्छिते की, लेप्टोस्पायरीसीसच्या बाबतीत सर्व प्रकारची प्रिव्हेंटीव्ह मेजर्स घेण्यात आल्या आहेत.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, दुदैवाची गोष्टी अशी की, गेल्या चार वर्षापासून डेंग्यूच्या संदर्भातील प्रश्न सातत्याने या सभागृहात येत आहे. याबाबतीत तत्कालीन मंत्री महोदय, श्री.दिग्विजय खानविलकर यांनी सभागृहात मान्य केले होते की, या संदर्भातील चाचणी करण्यासाठी लागणारी व्हायरलालॉजीची प्रयोगशाळा हाफकीन इंस्टीटयूटमध्ये सुरु करण्यात येईल. आज आपल्याला कन्फरमेटरी टेस्टसाठी पुणे किंवा अंदमान येथे जावे लागते. त्यामुळे आपण अशा प्रकारची व्हायरलालॉजीची प्रयोगशाळा केव्हा सुरु करणार ? तसेच, दुसरे असे की, उंदिरांच्या संदर्भात आपण वृत्तपत्रामध्ये सूचना दिल्या होत्या की, उंदीर पकडून आणून दिल्यास बक्षिस दिले जाईल. परंतु अनेक लोकांनी उंदीर पकडून आणूनही त्यांना बक्षिस देण्यात आले नाही. आज ते उंदीर पकडून बसलेले आहेत, त्यामुळे याबाबत आपण तातडीने कारवाई करणार का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, डेंग्यूच्या बाबतीतील व्यवस्था आपण हाफकीन इन्स्टीटयूटमध्ये केलेली आहे. तसेच, आपण डेंग्यूच्या एन.आय.व्ही. टेस्ट पुण्याला पाठवतो, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. याबाबतीतील उत्तर मी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या वेळी दिलेले आहे. 60 दिवसांमध्ये नवीन लॅब सुरु करण्यात येणार आहे. आपण याठिकाणी जे जे प्रश्न विचारलेले आहेत, त्या सर्व प्रश्नांची उत्तरे "होय" अशी आहेत.

------

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सन्माननीय सदस्यांना करण्यात आलेल्या अटक व सुटकेबाबत घोषणा**</u>

**उपसभापती** : मला पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नागपूर शहर यांचेकडून कळविण्यात आले आहे की, दिनांक 15 जुलै, 2006 रोजी सन्माननीय विधानपरिषद सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या कलम 69 अन्वये सदर पोलीस स्टेशन, नागपूर येथे 14.45 वाजता स्थानबध्द करण्यात येऊन त्यांना 15.20 वाजता मुक्त करण्यात आले आहे व सन्माननीय सदस्य, श्री.सागर मेघे यांना मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या कलम 135 अन्वये पोलीस स्टेशन सीताबर्डी, नागपूर येथे 16.30 वाजता अटक करण्यात येऊन त्यांना 17.20 वाजता मुक्त करण्यात आले आहे.

-----------------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील आदिवासी विकास महामंडळाच्या गोदामाला लागलेली आग

**मु. शी.** :यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा येथील आदिवासी विकास महामंडळाच्या गोदामाला लागलेली आग यासंबंधी सर्वश्री रमेश निकोसे, सुधाकर गणगणे, गोविंदराव आदिक, संजय दत्त, दिवाकर रावते, अरविंद सावंत, विलास अवचट, अनिल परब, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गो-हे, श्री.गोपीकिसन बाजोरिया, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, प्रा.फौजिया खान, श्री.जितेंद्र आव्हाड, श्री.विनायकराव मेटे, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.वसंत चव्हाण, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील अदिलाबाद रोडस्थित आदिवासी विकास महामंडळाच्या गोदामाला दिनांक १८ जून, २००६ रोजी लागलेली आग, यात अडीच कोटी रुपयांचे आदिवासी आश्रमशाळांना पुरविण्यात येणारे धान्य जळून खाक होणे, या आगीबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, आग विझविण्यास लागलेला विलंब, त्यामुळे शासनाचे झालेले कोटयावधी रुपयांचे नुकसान, घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शासनाने घ्यावयाची विशेष काळजी, या आगीमागे आदिवासी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा हात असल्याचा संशय, आगीची चौकशी करण्याबाबत तेथील जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती / उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, निवेदनामध्ये दुरुस्ती आहे. निवेदनाच्या पहिल्या पानावरील खालच्या तीन ओळी कृपया पुढीलप्रमाणे वाचाव्यात. "एकाधिकार खरेदी योजनेच्या मालाचा राज्यस्तरावरील रु.20.00 कोटीचा विमा दि ओरिएंटल इन्श्युरन्स कंपनीकडून घेण्यात आला असून त्याचा कालावधी दिनांक 24.3.2006 ते 23.3.2007 पर्यन्त आहे."

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, गोदामात 94.93 लक्ष किमतीचा माल साठविण्यात आला होता. मात्र वर्तमानपत्रात यासंदर्भात जी बातमी आलेली आहे आणि त्यामध्ये जो संशय व्यक्त केला आहे त्यावरुन असे दिसते की, महामंडळातील काही अधिका-यांनी भ्रष्टाचार केला आणि 2/3 लोकांना निलंबित करण्यात आले व चौकशी सुरु करण्यात आली. त्यामुळे यासंदर्भात जे संशयाचे वातावरण आहे ते दूर करण्यासाठी सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सध्या पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. गरज भासल्यास सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, प्रश्न विचारण्याचे कारण असे आहे की, 20 कोटी रुपयांचा विमा उतरविण्यात आला आहे. त्यामुळे एवढा माल त्या गोदामामध्ये साठविण्यात येतो काय ? ज्या गोडाऊनला आग लागली त्या गोडाऊनची माल साठवण्याची क्षमता किती होती ? त्या ठिकाणी किती किमतीचा माल साठविण्यात येतो ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी निवेदनामध्ये सुरुवातीलाच दुरुस्ती सुचविलेली आहे. संपूर्ण राज्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या 247 गोडाऊनसाठी 20 कोटी रुपयांचा विमा उतरविण्यात आलेला आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असा उल्लेख आला आहे की, एकूण 95 लक्ष रुपये किमतीचा माल डेड स्टॉक असून तो भस्मसात झाला आहे. मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी उत्तर दिले की, 20 कोटी रुपयांचा विमा उतरविण्यात आला आहे. माझा प्रश्न असा आहे की, एवढया किमतीचा माल त्या ठिकाणी का साठवून ठेवण्यात आला ? हा माल वितरीत का करण्यात आला नाही ? अनावश्यक माल साठवून ठेवणा-या व कामात हलगर्जीपणा करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात आली आहे काय ? नसल्यास, करण्यात येईल काय ?

..4........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या गोदामामध्ये जो माल ठेवण्यात आला होता तो एकाधिकार खरेदी योजनेचा माल होता. आश्रमशाळांना जो पुरवठा करण्यात येतो तो माल जून महिन्यामध्ये स्टॉक केला जातो व ज्या आश्रमशाळांना माल हवा असेल त्यांना तो देण्यात येतो. आश्रमशाळांकडे जुलै महिन्यापर्यन्तचा स्टॉक असल्यामुळे त्यांच्याकडून मागणी आली नाही व तो माल गोदामात होता. फर्निचर, इतर वस्तु असा 0.16 लक्ष रुपयांचा डेड स्टॉक होता. एकूण त्या गोदामात 94.93 लक्ष रुपये किमतीचा माल होता. ज्या अधिका-यांनी निष्काळजीपणा केलेला आहे त्या अधिकारी/कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ..... 12:50

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.विनोद तावडे)**

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, गोदामाला जी आग लागली ती कशामुळे लागली ? एका वर्षापासून गोदामाचा वीज पुरवठा बंद होता. म्हणून इलेक्ट्रीक सप्लायमुळे गोदामाला आग लागण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. यासंदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदयांकडे आलेली आहे काय ? आणि अशा प्रकारची आग लागू नये म्हणून शासनाने कोणती प्रतिबंधात्मक यंत्रणा तयार केलेली आहे ? मंत्री महोदयांनी सांगितले की, त्रिसदस्य समिती नियुक्त करुन तीन लोकांना निलंबित करण्यात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, आगीचे कारण काय आहे ? ज्या अधिका-यांना निलंबित केले आहे ते अधिकारी तेथेच आहेत की दुसरीकडे आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, ज्या अधिका-यांना निलंबित केलेले आहे ते तिन्ही अधिकारी पांढरकवडयामध्येच राहतात. आग कशामुळे लागली याचे कारण कळू शकलेले नाही. पोलीस त्याची चौकशी करीत आहेत.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सांगितले की, एका वर्षापासून तेथे इलेक्ट्रीक सप्लाय नव्हता. माझा प्रश्न असा आहे की, जाणीवपूर्वक हा माल हस्तांतरीत करुन आग लावण्यात आली आहे काय ? या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय ? तसेच, जे अधिकारी तेथे राहतात त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, त्या अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. आगीचे कारण अजून समजलेले नाही. पोलीस चौकशी करीत आहेत. आवश्यकता वाटली तर पोलिसांकडून हे प्रकरण सी.आय.डी.कडे देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ते अधिकारी तेथे किती वर्षापासून होते ? आग लागल्यामुळे जे नुकसान झाले त्याचा विमा मिळाला आहे काय ? विदर्भामध्ये गोदामांना आगी लावण्याचे प्रकार मोठया प्रमाणार होत असतात. म्हणून विदर्भातील गोदामांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासन काळजी घेणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, तेथे जे चौकीदार होते ते सन 1999 पासून होते. गोडाऊन किपर नुकतेच 4 महिन्यापूर्वी रुजू झाले होते. श्री.वुईके, निरीक्षक आणि श्री.एम.के.मढावी, गोडाऊन किपर म्हणून काम बघत होते.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ही घटना दिनांक 18 जून, 2006 रोजी घडलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विचारले की, विदर्भातील आदिवासी विभागामध्ये अन्न पुरवठा करण्यासाठी जी गोदामे आहेत त्या गोदामासंदर्भात अशा प्रकारच्या तक्रारी येतात. माझ्ा प्रश्न असा आहे की, दिनांक 18 जून, 2006 नंतर आता पर्यंत पोलीस विभागाकडून कोणती चौकशी करण्यात आली ? चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले ? जी आग लागली ती जाणीवपूर्वक लावण्यात आली आहे काय ? असे प्रकार अनेक ठिकाणी होत आहेत त्याची शासनाकडे माहिती आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी असा प्रश्न विचारला होता की, जे नुकसान झाले त्याचा विमा मिळाला काय ? चौकशी केलेली आहे. इन्शुरन्स कंपनीकडून विमा मिळालेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी असा प्रश्न विचारला की, अशा पद्धतीच्या तक्रारी वेगवेगळया ठिकाणावरुन येत आहेत. सभापती महोदय, अशा प्रकारच्या तक्रारी अजून आलेल्या नाहीत. अशा प्रकारच्या तक्रारी आल्या तर त्याची चौकशी केली जाईल. आम्हाला असा संशय आहे की, ही आग कोणी तरी लावली असावी. गोडाऊन किपर आणि तेथील लोकांवर आमचा संशय असल्यामुळे त्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी सुरु आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मघाशी असे उत्तर दिले की, आग का लागली त्याचे कारण कळू शकलेले नाही. आता असे उत्तर देत आहेत की, आम्हाला संशय आहे. मग यासंदर्भातील नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, यासंबंधी आम्हाला संशय होता म्हणूनच आम्ही तेथील तीन अधिका-यांना निलंबित केले आहे आणि याबाबत पोलीस चौकशी सुरु आहे. चौकशीतून जे निष्पन्न होईल त्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

---------

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

यानंतर श्री.सुंबरे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील बोर्डी नाला प्रकल्प, करजगाव प्रकल्प व शिंदी (बु.) बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प या तीन प्रकल्पांना मान्यता मिळण्याबाबत.

**मु.शी.** : जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील बोर्डी नाला प्रकल्प, करजगाव प्रकल्प व शिंदी (बु.) बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प या तीन प्रकल्पांना मान्यता मिळण्याबाबत प्रा. बी.टी.देशमुख, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

-----

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अनुशेष दूर करण्याच्या प्रयोजनासाठी पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात यावे, या मा.राज्यपालांनी घटनात्मक अधिकारानुसार दिलेल्या दिनांक 15 डिसेंबर, 2001 च्या निदेशांची (परिच्छेद 7.13) अंमलबजावणी न होणे, पुन्हा मा.राज्यपालांनी दिनांक 6 मार्च, 2006 रोजीच्या निदेशान्वये तसेच निदेश (परिच्छेद 7.10) देवूनही त्याची अंमलबजावणी न होणे, जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील बोर्डी नाला प्रकल्प, करजगांव प्रकल्प व शिंदी (बु.) बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प हे तीन प्रकल्प अनेक महिन्यापासून प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पडून असणे, अवर्षणप्रवण भागातील योजनांची सांगड बृहत आराखडयाशी घालू नये, केवळ प्रस्तावित प्रकल्पस्थळी पाणी उपलब्धता आहे किंवा नाही हे तपासावे अशा प्रकारचे आदेश दिनांक 18 ऑक्टोबर, 2005 रोजी कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत जलसंपदा विभागाने काढणे, मोठा अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील प्रकल्पासाठी सुध्दा अशाच प्रकारची भुमिका जलसंपदा मंत्र्यांनी मंत्रालयात दिनांक 22 जून, 2005 रोजी झालेल्या बैठकीत घेणे, अनुशेष निर्मूलनार्थ जलसंपदा विभागाने स्विकारलेल्या उपरोक्त भुमिकेमुळे अमरावती जिल्ह्यातील उपरोक्त 3 प्रकल्पांना नाशिकच्या जलविज्ञान प्रकल्पाकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाले असले तरी या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता न मिळणे, पाटबंधारे विभागाने अनुशेष निर्मूलनास सहाय्यभूत होणाऱ्या या

...... एक्स 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख .....

प्रकल्पांना संपूर्णपणे अनुकूल भुमिका घेतली असली तरी 5 कोटी रुपयावरील प्रकल्प वित्त विभागाकडे पाठविण्याच्या दिनांक 29 नोव्हेंबर, 2005 च्या घटनाबाह्य शासन परिपत्रकाचा आधार घेऊन वित्त विभागाने राज्यपालांच्या निदेशांचा अवमान करणारे अनेक आक्षेप उभे करणे, त्यामुळे प्रशासकीय मान्यतेस होत असलेला प्रदीर्घ विलंब, परिणामी जनमानसामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....... एक्स 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मा. वित्त मंत्र्यांच्या, लक्षवेधी सुचनेवरील निवेदनानंतर ... )

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अनुशेषग्रस्त भागांच्या संदर्भात घटनात्मक प्रश्न गुंतलेला आहे अशी ही लक्षवेधी सूचना आहे. या संबंधातील घटनात्मक बाबींबद्दल मी या सूचनेमध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील बोर्डी नाला प्रकल्प, करजगाव प्रकल्प व शिंदी (बु.) बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प हे तिन्ही प्रकल्प पाटबंधारे विभागाने केलेल्या तपासणीमध्ये फिजिबल झालेले आहेत. तेव्हा आता माझा पहिला प्रश्न असा आहे की, वित्त विभागाने यासाठी सम्मती देण्याबाबतीत मात्र अतिशय दुष्टपणाचे वर्तन केलेले आहे. तेव्हा या तिन्ही प्रकल्पांना मान्यता देण्यात आपल्याला अडचण काय आहे ? नसल्यास या तिन्ही प्रकल्पांना आपण आज, उद्या, परवा मान्यता देणार काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, एकत्रितपणे राज्य शासनाने या विभागामध्ये जलसंपदा विभागाची अशी घेतलेली जी जबाबदारी आहे त्याबाबतीत विशेषत: अमरावती जिल्ह्यामध्ये एकंदर घेतलेले प्रकल्प हे 795 कोटी रूपयांचे आहेत. 11 बांधकामाधीन प्रकल्पांमध्ये ....

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी येथे केवळ एवढाच प्रश्न विचारला आहे की, अमरावती जिल्ह्यातील या तीन प्रकल्पांना मान्यता देण्यामध्ये आपल्याला काय अडचण आहे ? तेव्हा मंत्री महोदयांनी तेवढेच येथे सांगावे. ...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, त्यांनी मला त्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याच्या दृष्टीने बोलू द्यावे. ... मी अजून दीड वाक्य देखील पूर्ण केलेले नाही. ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, जो प्रश्न मी येथे विचारला आहे त्याला लेखी निवेदनात उत्तर शासनाने, मंत्र्यांनी दिलेले नाही याची मला लाज वाटते. आम्ही गेली अनेक वर्षे, जवळपास 60 वर्षे पिळले गेलो आहोत. आज देशाचे पंतप्रधान तेथे येऊन जातात. माननीय राष्ट्रपतींनी देखील आदेश काढून या बाबतीत राज्याच्या माननीय राज्यपालांना खास अधिकार दिलेले आहेत. तेव्हा माझ्या नेमक्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. मी विचारले आहे की, जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील या तीन लघु प्रकल्पांना मान्यता देण्यात आपल्याला काय अडचण आहे ? या तिन्ही प्रकल्पांना वित्त विभागाने विळखा घालून ठेवलेला आहे. म्हणूनच मी हा प्रश्न विचारलेला आहे त्याला मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

.... एक्स 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी मघापासून तेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. अमरावती जिल्ह्यात एकंदर 795 कोटी रूपये ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या पहिल्या प्रश्नाला लेखी उत्तर का दिले नाही हे प्रथमत: सांगावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, हा सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न झाला. प्रथमत: त्यांच्या पहिल्या प्रश्नाला उत्तर देण्याची संधी त्यांनी मला दिली तर मी त्यांच्या या दोन्ही प्रश्नाचे उत्तर देऊ शकेन. ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी निदेश दिले हे यामध्ये कबूल केले आहे, त्या निदेशांचे पालन त्यांनी केलेले नाही हेही कबूल केले आहे. तेव्हा हे तीन लहान लहान प्रकल्प आहेत, जे तुम्ही अडवून ठेवले आहेत. त्यामागील कारणे काय आहेत ? हे नामदार वित्त मंत्र्यांनी सांगावे. त्यांचे उत्तर आम्हाला समजत नसेल तर सभापती महोदय, आपण ते ऐकून घ्यावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यामध्ये एकंदर 11 प्रकल्प आहेत आणि 795 कोटीची त्यांची उर्वरित किंमत आहे. यावर्षी त्यांना 158 कोटी रूपये मिळणार आहेत. माननीय पंतप्रधानांनी जी भूमिका घेतली आहे ती योग्य आहे. तेव्हा एकत्रितपणे या जिल्ह्याला मिळणारे पैसे आहेत ते गृहीत धरून, म्हणजे राज्य सरकार 158 कोटी रूपये देणार आहे. .... पुढील दोन वर्षांमध्ये एकत्रितपणे येणारे पैसे, राज्य सरकारकडून मिळणाऱ्या निधीतील 800 कोटी रूपयांचे प्रकल्प पूर्ण व्हायला 5 ते 6 वर्षे लागू शकतात. ....

( यानंतर श्री. सरफरे .... वाय 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

दरम्यानच्या काळात माननीय पंतप्रधान नागपूर विभागामध्ये आले होते. त्यावेळी त्यांनी अे.आय.बी.पी. मार्फत हातात घेतलेले सर्व प्रकल्प घेण्यात यावेत असा उल्लेख केला. त्यामुळे कदाचित परिस्थिती बदलली असेल, त्यामध्ये केंद्र सरकारचा निधी अधिक राज्य सरकारचा निधी एकत्रित करुन तो त्या जिल्हयामध्ये अधिक जाणार असेल तर त्या प्रमाणात त्या जिल्हयातील प्रकल्पांना परवानगी देता येऊ शकेल. हा प्रश्न एका जिल्हयापुरता मर्यादित नाही. मी आपल्या निदर्शनास आणतो की, एकूण आपल्या हातामध्ये असलेले प्रकल्प लक्षात घेऊन या जिल्हयासाठी दिलेला निधी कमी पडत असला तरी हे प्रकल्प हातामध्ये घेऊन ते पूर्ण करण्यासाठी या सर्व प्रकल्पांना थोडा थोडा निधी विभागून देण्यापेक्षा काही अपूर्ण प्रकल्प हे ठराविक कालावधीमध्ये पूर्ण करावेत....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपल्याला उत्तर समजले काय? ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख सरांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. या तीन पाटबंधारे प्रकल्पासंबंधी आपण स्पेसिफिक माहिती सांगण्यामध्ये अडचण काय आहे?

(गोंधळ)

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, तीन प्रकल्पाबाबत काहीही उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले नाही. ते देण्यामध्ये अडचण काय आहे? आपल्याला काही सांगायला अडचण काय आहे? आपण साऱ्या देशाचा निबंध वाचून कां दाखविता?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा स्पेसिफिक प्रश्न आहे. इतर अपूर्ण प्रकल्पांना आपल्याला निधी द्यावयाचा असेल तर तो नंतर द्या...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. तीन प्रकल्पाबाबत या लेखी निवेदनामध्ये एका शब्दाचा देखील उल्लेख नाही. याबाबत आपण काहीतरी बोलावे अशी माझी मागणी आहे. हे याठिकाणी ऐकत असतांना आपल्याला लाज वाटते. मूळ मुद्दा असा आहे की, या लघू प्रकल्पांना कां मान्यता दिली जात नाही? ही लाजिरवाणी गोष्ट आहे असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

मला वाटते. यासंबंधी चार वेळा तोंडी विचारणा केली. सभापती महोदय, मंत्रिमहोदयांच्या उत्तराने आपले समाधान झाले असे आपण म्हणाला नाहीत त्याबद्दल मी आपला आभारी आहे...

श्री. जयंत पाटील : या जिल्हयामध्ये हातात घेतलेले प्रकल्प पुढील सहा वर्षात पूर्ण होतील अशापध्दतीने घेतले आहेत. त्यामुळे नवीन प्रकल्प त्या जिल्हयामध्ये मंजूर करता येतील किंवा नाही...

(गोंधळ)

प्रा. बी. टी.देशमुख : सभापती महोदय, केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे? महाराष्ट्रातील सर्वात जास्त अनुशेष असलेला हा जिल्हा आहे...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख सरांनी सांगितल्याप्रमाणे सर्वात जास्त अनुशेष असलेला हा जिल्हा आहे. तसेच, प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्यात येतो. या प्रकल्पाला आपण प्रशासकीय मान्यता देणार नसाल तर या जिल्हयावर अन्याय करणारी गोष्ट आहे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, प्रशासकीय मान्यता देणे याचा अर्थ असा की, तेवढी कमिटमेंट करावी लागते. आपण 800 कोटींचे प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यांना दरवर्षी 158 कोटींचा निधी द्यावा लागणार आहे. अनुशेष दूर होण्यासाठी जेवढा निधी दिला पाहिजे तेवढया निधीतून काही प्रकल्प पूर्ण व्हावेत म्हणून ते हातामध्ये घेतले आहेत. त्यामुळे हे प्रकल्प अर्धवट ठेवण्याची भूमिका घेतली तर त्या विभागातील जनतेला फसविलयासारखे होईल. त्यामुळे काहीतरी मर्यादा राहिली पाहिजे, आणि जे प्रकल्प हातामध्ये घेतले आहेत ते पूर्ण केले पाहिजेत. आणि म्हणून 800 कोटींच्या प्रकल्पामधून त्या जिल्हयासाठी 158 कोटी देणार आहोत. 2000 कोटींचा अनुशेष असला तरी ज्यावेळी रक्कम वाढवून दिली जाईल त्यावेळी हे प्रकल्प मंजूर करता येतील. आणि त्यामुळे राज्यामध्ये अर्धवट अवस्थेत असलेले प्रकल्प अर्धवट ठेवणे योग्य होणार नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, 1994 च्या सरासरीप्रमाणे 2000 कोटींचा अनुशेष आहे. हे ऐकतांना आपली मान लाजेने खाली गेली पाहिजे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे प्रकल्प नवीन नाहीत. हे प्रकल्प जुने असून ते प्रशासकीय मान्यतेसाठी पडले आहेत.आपण पैसे देऊ नका परंतु प्रशासकीय मान्यता तरी द्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, पाटबंधारे विभागाने प्रवाही सिंचनाचे हे सफल प्रकल्प म्हटले आहे. इतर जिल्हयामध्ये आपण 400-400 मीटर उंचीवर पाणी चढविता. 2100 कोटींचा प्रकल्प करता. आणि या जिल्हयातील लघुपाटबंधारेच्या प्रकल्पांना मान्यता देत नाही? पाटबंधारे विभागाने या

प्रकल्पासाठी अनुकूल शिफारस करुन पाठविली आहे, पाटबंधारे विभागाने पाणी उपलब्ध करुन दिले आहे. हा महत्तम अनुशेष असलेला जिल्हा असल्यामुळे माझ्या दोन्ही प्रश्नांना आपण उत्तर दिले नाही. 1994 च्या सरासरीनुसार 2000 कोटींच्या वर अनुशेष असून हे प्रकल्प दिल्यानंतर सुध्दा तीन पट अनुशेष शिल्लक राहणार आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, त्या विभागामध्ये सर्वात जास्त अनुशेष अमरावती जिल्हयामध्ये आहे. त्यामुळे अमरावती जिल्हयातील अनुशेष आपल्याला भरुन काढावयाचा आहे...

(अडथळा)

सभापती महोदय, मला जर बोलूच द्यावयाचे नसेल तर मी खाली बसतो, आपण माननीय सदस्यांना बोलू द्यावे...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मंत्र्यांना बोलू दिले पाहिजे. उत्तर पूर्ण करण्याची मला संधी मिळणार नसेल तर मी खाली बसतो. सभापती महोदय, मला आपण संरक्षण द्यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : या लेखी निवेदनामध्ये आपण तसे का उत्तर दिले नाही ?

**उपसभापती** : सन्माननीय देशमुख साहेब, आपल्या या प्रश्नाच्या बाबतीत तीव्र भावना आहेत याची मला कल्पना आहे, या प्रश्नाच्या बाबतीत सदनाच्याही तीव्र भावना आहे. हा प्रश्न नेहमी चर्चिला जात आहे. माझी आपल्याला एक विनंती आहे की, या लक्षवेधी सूचनेवर आपण हवे तेवढे प्रश्न उपस्थित करावेत, मी कोणाला अडविणार नाही. माझी एवढीच विनंती आहे की,या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांना व्यवस्थित उत्तर देण्याची संधी द्यावी. त्यानंतर आपण बोलावे.

प्रा.बी.टी.देशमुख : माझा प्रश्न हा आहे की, या लाजिरवाण्या कृतीबद्दलचे लेखी उत्तर का देण्यात आले नाही ?

श्री.जयंत पाटील : ज्या तीन प्रकल्पांचा उल्लेख केलेला आहे, त्या तीनही प्रकल्पाचे प्रपोजल नियोजन विभागाकडे आहे, त्यावर प्रोसेस चालू आहे. असे लक्षात आले की, त्या जिल्ह्यातील एकंदर हातामध्ये घेतलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सध्याचा निधी पुरेसा नाही. म्हणून अधिक प्रकल्पांना मान्यता दिली तर दिलेला नियतव्यय सर्व प्रकल्पांना विभागून दिला जाईल आणि प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होईल. तीन वर्षामध्ये जो काही निधी दिला जाईल त्यापेक्षा जास्त प्रकल्प मंजूर झ ाले तर ते प्रकल्प पूर्ण होणार नाहीत. म्हणून आधीचे हातामध्ये धेतलेले 11 पकल्प पूर्णत्वाजवळ गेले तर नवीन प्रकल्पांना मान्यता द्यावी, अशी नियोजन विभागाने भूमिका घेतलेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : नियोजन विभागाने हीन वृत्तीची भूमिका घेतलेली आहे, हे लक्षात घेऊन माझ्या पुढच्या प्रश्नाला उत्तर द्यावे. 10 हजारच्या आतील तीन प्रकल्प आहेत, ते प्रकल्प पूर्ण करुन देखील या जिल्ह्याचा एक तृतीयांश अनुशेष दूर होत नाही, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. "हीन वृत्तीची प्रवृत्ती", अशाप्रकारचा शब्दप्रयोग सन्माननीय सदस्यांनी वापरलेला आहे, तो पार्लमेंटरी आहे की नाही हे तपासावे.

प्रा.बी.टी.देशमुख : ते शब्द अन पार्लमेंटरी नाहीत, म्हणून ते शब्द जाणूनबुजून वापरलेले आहेत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी दिशाहीन पॉईन्ट ऑफ ऑर्डर उपस्थित करु नये.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी कोणत्या भाषेमध्ये प्रश्न मांडावा, हा त्यांचा प्रश्न आहे, त्याबद्दल मी मत प्रदर्शन करत नाही. तो ज्यांच्या त्यांच्या कुवतीचा प्रश्न आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : माझे म्हणणे असे आहे की, आज हाती असलेले प्रकल्प हे किरकोळ आहेत, हे लक्षात घेता, आज जरी ते पूर्ण केले तरी तो अनुशेष दूर होत नाही. त्यामुळे याकडे दुर्लक्ष केले जात असेल तर ही हीन वृत्ती आहे,ही वृत्ती चांगली नाही. ही वृत्ती कमी दर्जाची आहे. या वृत्तीचे प्रदर्शन करणाऱ्या अधिकाऱ्यांना लगाम घालावा. माझा पॉईन्टेड प्रश्न आहे की, सन 1994 च्या सरासरीवर 2 हजार कोटीचा अनुशेष आहे. तो पूर्ण होईल, इतक्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देणारा बृहत् आराखडा आपण किती दिवसात पूर्ण करणार आहात ?

श्री.जयंत पाटील : या सर्व प्रकल्पांना एकाचवेळी प्रशासकीय मान्यता दिली तर सगळेच प्रकल्प अर्धवट राहतील. म्हणून एवढया सगळया प्रकल्पांना मान्यता न देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : हा अनुशेष कसा दूर होईल ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण झालेले नाही. विरोधी पक्ष नेत्यांना माझी विनंती आहे की, त्यांनीही मला संरक्षण द्यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : पंतप्रधानांनीही सांगितलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी आता माझे म्हणणे ऐकून घ्यावे आणि नंतर प्रश्नाचे उत्तर द्यावे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : आपण दुसरेच उत्तर देत आहात. ती बाब सर्वांच्या लक्षात येत आहे.

श्री. जयंत पाटील : मी उत्तरच दिलेले नाही त्यामुळे लक्षात कसे येणार ?

प्रा. बी. टी. देशमुख : माझ्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर द्यावे. मी पुन्हा प्रश्न विचारतो. आपण "नाही" म्हणावे पण गोलगोल उत्तर देऊ नका. यासंदर्भात देशाच्या माननीय पंतप्रधानांनी आदेश दिले. माननीय राष्ट्रपतींनी विशेषाधिकार वापरुन राज्यपालांना निदेश दिले. त्यांनी तुम्हाला सांगितले की, अधिकाराचे विकेंद्रीकरण करा. ते तुम्ही केले नाही. दुष्टपणा करुन अनेक दिवसांपासून चालू असलेली पध्दत बंद केली. मागच्या वर्षी आदेश काढला की, वित्त विभागामध्ये हे अकडवून ठेवा. मी "दुष्टपणा" असे का म्हणतो ? आधी 1972 च्या आदेशाप्रमाणे हे सर्व चालू होते. परंतु आता 2005 च्या आदेशाप्रमाणे नवीन पध्दत सुरु केलेली आहे. सन 1994 च्या सरासरीवर 2 हजार कोटी रुपयांच्या वर अनुशेष आहे. हा अनुशेष दूर करीत नाही असे म्हणावे किंवा तो अनुशेष पूर्ण होईल याबाबचा बृहत आराखडा नियोजन विभागाच्या बुध्दिमान अधिकाऱ्यांना आदेश देऊन दोन महिन्यात सभागृहाला सादर करावा.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, अनुशेष दूर करणे ही सरकारची कटिबध्दता आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : आम्हाला बोगस उत्तर नको. दोन महिन्यात आराखडा सादर करणार काय ? हिंमत असेल तर "नाही" म्हणा.

श्री. जयंत पाटील : हिंमत सगळीच आहे. सभापती महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी. मंत्र्यांना बोलू दिले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे. ऐकून घेण्यासाठी सुध्दा शक्ती लागते. आपण उत्तर ऐकून घ्यावे. योग्य असेल किंवा अयोग्य असेल पण उत्तर देण्यासाठी जरा तरी वेळ द्यावा.

प्रा. बी.टी.देशमुख : दोन महिन्यांमध्ये आराखडा देतील काय असा प्रश्न सभापती महोदय, आपणच विचारावा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांमध्ये कोणीही अतिरेकी नाही, या ठिकाणी कोणताही बॉम्ब न येता परिस्थिती स्फोटक व्हावयास लागली आहे. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी असे मी म्हणत नाही परंतु...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे प्रश्न विचारतील त्याचे उत्तर देण्यास मी तयार आहे. मला उत्तर देण्याची संधी दिली तर उत्तर देता येईल. सन्माननीय सदस्य मंत्र्यांचे एक वाक्य सुध्दा ऐकून घेण्यास तयार नाहीत. ज्या विस्तृतपणे सन्माननीय सदस्य प्रश्न विचारत आहेत तसेच विस्तृत उत्तर मला देऊ द्यावे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी एकाच वाक्याचा प्रश्न विचारतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सन्मामाननीय मंत्रिमहोदयांना उत्तर देऊ द्यावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्याची माझी तयारी आहे. आपण परवानगी दिल्यावर ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी एक प्रश्न विचारला. समजा मी जर चुकीचे उत्तर दिले तर त्यांनी शांतपणे सांगावे. माझे उत्तर दुरुस्त करण्याची संधी द्यावी. मी त्यांच्यापेक्षा लहान आहे. त्यामुळे मला त्यांच्यापेक्षा जास्त चुका करण्याचा अधिकार आहे. पण या ठिकाणी उलट व्हावयास लागले आहे.

**उपसभापती** : हा देशमुख-पाटील वाद थांबवू या.

श्री. आर. आर. पाटील : (बसून) देशमुख-पाटील वाद राज्याला परवडणारा नाही...

**उपसभापती** : देशमुख-पाटील वाद राज्याला परवडणारा नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हा दोन व्यक्तीतला वाद नाही. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी बसून म्हटल्याप्रमाणे हा अनुशेषाचा वाद खरोखरच परवडणारा नाही. या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. उभे राहून तो वाद चालू आहे....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात माननीय राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांना उत्तर देण्यास सांगावे म्हणजे हा वाद लगेच मिटेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझा पॉइन्टेड प्रश्न आहे. शासनातर्फे उत्तर कोणीही द्यावे. त्याबद्दल माझी काही हरकत असण्याचे कारण नाही. महत्तम अनुशेष असलेला नंबर एकचा हा जिल्हा आहे. 1994 च्या सरासरीवर 2 हजार कोटी रुपयांचा अनुशेष आहे. हा अनुशेष दूर करण्याचा बृहत आराखडा तयार करुन दोन महिन्यामध्ये ठेवणार काय ?

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : अशा प्रकारचा आराखडा तयार करुन त्यांना सादर करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी 3 प्रकल्पांचा उल्लेख केला होता त्याबाबतची माहिती माझ्याकडे नव्हती म्हणून मी त्यासंबंधी उत्तर देऊ शकलो नव्हतो. शिंदी प्रकल्प प्रशासकीय मान्यतेसाठी नुकताच शासनास प्राप्त झालेला आहे. पाणी उपलब्धतेचे विहित प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने प्रकल्प अहवालाचे प्राक्कलन पूर्ण करणे शक्य झाले नव्हते. ही माहिती माझ्याकडे नव्हती. करजगाव प्रकल्प अहवालाबाबत शेरेपूर्तता करुन नियोजन विभागाला पुन्हा सादर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची किंमत 40 कोटी रुपये आहे. 1510 हेक्टर जमीन पाण्याखाली येणार आहे. सिद्दी प्रकल्पाची किंमत 57 कोटी रुपये आहे. 1800 हेक्टर जमीन पाण्याखाली येणार आहे. बोर्डीनाला प्रकल्पाची किंमत 100 कोटी रुपये आहे. प्रकल्प अहवाल उपसचिव, जलसंपदा यांच्याकडून नियोजन विभागाकडे मंजुरीसाठी प्राप्त झालेला आहे....

प्रा. बी.टी.देशमुख : माझ्याकडे जी माहिती आहे तीच माहिती मंत्री महोदयांनी सांगितली आहे.

श्री. जयंत पाटील : जी वस्तुस्थिती आहे तीच मी सांगत आहे. माझ्याकडे वेगळी माहिती असू शकत नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : माझ्याकडे नसलेली माहिती मंत्री महोदयांनी दिली तर बरे होईल.

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांनी या प्रकल्पाची सद्य:स्थिती सांगितली.

प्रा. बी.टी.देशमुख : या तिन्ही प्रकल्पांच्या संदर्भात डीपीडीसीमध्ये आम्हाला कागदपत्रे सर्क्युलेट झाली आहेत. या तिन्ही प्रकल्पांना पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळालेले आहे हे मी लक्षवेधीमध्ये नमूद केलेले आहे. तेव्हा या प्रकल्पांच्या बाबतीत पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र दिलेले असल्यामुळे 8 दिवसात आपण या प्रकल्पांना मान्यता देणार आहात काय ?

श्री. जयंत पाटील : जर त्या जिल्ह्यांना देण्यात येणारे पैसे हातात घेतलेल्या प्रकल्पांना पुरेसे असतील आणि नवीन प्रकल्प चालू करण्याची आवश्यकता असेल तर नक्की त्यांना मान्यता देण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : याबाबतीत कोण निर्णय घेणार?

श्री. जयंत पाटील : मी स्वत: निर्णय घेतो.

प्रा. बी.टी.देशमुख : आपण 8-10 दिवसात मान्यता देणार काय ?

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : मान्यता देण्यासारखे असेल त्याप्रमाणे मान्यता देण्यात येईल.

प्रा. बी.टी. देखमुख : माननीय मंत्री महोदय जे निषेधार्ह वाक्य बोलले त्याचा मी निषेध करतो. माननीय मंत्री महोदयांनी सरळ नाही म्हणून तरी सांगावे...

श्री. जयंत पाटील : सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी असा प्रश्न विचारला होता की , आपण याला मान्यता देणार का ? त्यावेळी मी बॅकग्राऊंड सांगितली. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला. सचिवांकडे...

प्रा. बी.टी.देशमुख : सचिवांचे काय सांगता ...मला सचिवांचे कौतुक सांगू नका.

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. या सर्व नस्त्या सचिव स्तरावर येतात आणि त्यानंतर माझ्याकडे येतात. सन्माननीय सदस्य माझ्या सारख्या गरिबावर अन्याय का करतात हेच मला कळत नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : उपसभापती महोदय, मी साधा प्रश्न विचारला. लक्षवेधी सूचना देऊन 15 दिवस झाले. एकदा ही लक्षवेधी पुढे ढकलण्यात आली. दुस-यावेळी ती ट्रान्स्फर करण्यात आली. याबाबतीत माननीय मंत्री महोदय निर्णय घेणार आहेत ही आनंदाची बाब आहे. 8 दिवसामध्ये याबाबतीत निर्णय घेणार काय ?

श्री. जयंत पाटील : मान्यता देण्याचा निर्णय झाल्यानंतर.....

प्रा. बी.टी. देशमुख : माननीय मंत्री महोदयांच्या या उत्तराचा मी निषेध करुन पुढचा प्रश्न विचारतो. मी नोटीस देऊन देखील इतके दिवस या लघु प्रकल्पाच्या संदर्भात तुम्हाला उत्तर देता आले नाही. द्वेष-बुध्दीने काम करणारे हे अधिकारी आहेत. त्यांनी माननीय राज्यपालांच्या निदेशांची अंमलबजावणी करणारे आदेश काढले नाहीत. ते आदेश 8 दिवसात काढणार काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 13:20

लक्षवेधी सूचना क्र.2....

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी जे अधिकार दिलेले आहेत त्या अधिकारामध्ये परिच्छेद 7.13 डिसेंट्रलायझेशन ऑफ पावर्स प्रमाणे इरिगेशन डिपार्टमेंटला मर्यादित अधिकार दिलेले आहेत, अमर्यादित अधिकार दिलेले नाहीत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, राज्याच्या राज्यपालांनी शासनाला निदेश दिले की, अधिकाराचे विकेंद्रीकरण करावे. ते शासनाने केले आहे का?

श्री.जयंत पाटील : अधिकाराचे विकेंद्रीकरण 5 कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांचे केलेले आहे आणि मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे की, राज्यात हाती घेतलेल्या प्रकल्पांसाठी लागणारा निधी 33 हजार कोटी रुपयांचा झालेला आहे. हे 33 हजार कोटी रुपयांचे हाती घेतलेले प्रकल्प पाहिल्यानंतर बाहेर मार्केटमध्ये क्रेडिट रेटिंगचा प्रश्न उभा राहतो. हे प्रकल्प केव्हा हाती घेतले, पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे हा मुद्दा आहे. दुसरा मुद्दा विकासवाढीचा वेग हा आहे. मागील 5 वर्षातील विकासवाढीच्या संदर्भात ॲग्रीकल्चर सेक्टरची वाढ मायनस 1.36 टक्के आहे. ज्यावेळी नवीन नियोजन पाच वर्षाचे तयार होते त्यामध्ये ॲग्रीकल्चर सेक्टरची 3 टक्के ॲक्सीलरेटेड ग्रोथ रेट आपण धरतो. ॲग्रीकल्चर सेक्टरमध्ये चार ते साडेचार टक्के ग्रोथबद्दल बोलतो तेव्हा आमचा प्रयत्न असा आहे की, हाती घेतलेले प्रकल्प ठराविक वेळेत पूर्ण करावे आणि ते पूर्ण करीत असताना मागील 3 वर्षात जलसिंचन विभागाने 90 हजार हेक्टर जमीन इरिगेशनखाली आणली. प्रोजेक्टवाईज अलोकेशन केले तर 2.42 लाख हेक्टर जमीन पाण्याखाली येऊ शकते. निधी बॅकलॉगसाठी दिला पाहिजे, तो देत आहोत. त्या जिल्हयात निधी गेल्यानंतर काही प्रकल्प पूर्ण केले तर, इरिगेशन पूर्ण झाले तर राज्याची जमीन पाण्याखाली येण्याचे प्रमाण वाढेल. पंचवार्षिक योजनेमध्ये ॲक्सीलरेटेड ग्रोथ गृहित धरले आहे त्यामध्ये इरिगेशन विभागाचे प्रमाण वाढेल. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना माझ्या दालनात बोलावून त्यांना विश्वासात घेऊन याचे नियोजन करु. त्या जिल्हयात जो पैसा जाणार आहे किमान त्यातून काही प्रकल्प पूर्ण करु. सगळे प्रकल्प अपूर्ण राहिले तर कोणाला न्याय मिळणार नाही अशी मला भीती वाटते.

प्रा.बी.टी.देशमुख : माझ्या प्रश्नाला उत्तर न देता इतर माहिती दिली जात आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, आम्हाला आमची अडचण मांडू दिली जात नाही. हाती घेतलेले प्रकल्प 33 हजार कोटी रुपयांचे आहेत असे सांगितले. भीमा अस्तरीकरणाच्या कामाचा 5 कोटी रुपयांच्या प्रकल्पाला एका मिनिटात मान्यता देऊन शासन मोकळे होते. लातूर, उस्मानाबाद जिल्हयातील 4-5 कोटी रुपयांचे प्रकल्प मान्य केले जात नाहीत. नैसर्गिक न्यायाच्या माध्यमातून अनुशेष नसलेल्या जिल्हयातील जितक्या कोटी रुपयांच्या प्रकल्पांना शासनाने प्रशासकीय मान्यता दिली, आमच्या भागातील तेवढ्याच कोटी रुपयांच्या प्रकल्पांना अनुशेषाच्या प्रमाणात प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे. हा आमचा नैसर्गिक, कायदेशीर, घटनात्मक अधिकार आहे आणि शासन ते अधिकार पुन्हा एकदा गोदावरी खोरे आणि विदर्भ विकास महामंडळाला ताबडतोब प्रदान करणार का?

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सर्व विभागांना समान ट्रिटमेंट दिलेली आहे. येथून पुढे कोणतेही प्रकल्प नव्याने मंजूर करीत असतांना त्या जिल्हयातील अनुशेषाची गती रोखली जाणार नाही, त्या जिल्हयात जो पैसा जातो तो पैसा पूर्णपणे खर्च झाला पाहिजे. तसेच जे पैसे जातील त्यातून ते प्रोजेक्ट पूर्ण केले पाहिजेत. प्रोजेक्ट पूर्ण न झाल्यामुळे कॉस्ट औव्हर रन, टाईम ओव्हर रन यामुळे प्रोजेक्टचे कॉम्प्लीकेशन होते त्यामुळे आपण जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर असे आहे की, सर्व विभागांना समाने न्याय देण्याच्या दृष्टीने सर्व अधिकार करेक्टेड केलेले आहेत. उदाहरण द्यावयाचे झाले तर विदर्भात 11000 कोटी रुपयांचे प्रकल्प आहेत. समजा उर्वरित ठिकाणी प्रकल्प मंजूर झालेले असले तरी त्या ठिकाणी पैसे जाणार नाहीत व प्रकल्पांची कामे त्यामुळे होणार नाहीत. समजा एका जिल्हयात 10 प्रकल्प असतील व 10 प्रकल्पांना 100 कोटीचे वाटप करतांना दहाही प्रकल्पांना थोडे थोडे करुन हे पैसे वाटले जातात.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 1974 ते 2005 पर्यंत असलेली व्यवस्था तुम्ही मागासलेल्या भागांना कापून काढण्याकरिता आता 2005 मध्ये बदलविलेली आहे. सन 1974 ते 2005 पर्यंत जी व्यवस्था होती त्यामध्ये प्रशासकीय मान्यतेचे अधिकार कधीही वित्त विभागाला नव्हते. मागासलेली भागातील कामे अटकवून ठेवण्यासाठी, दुष्टपणा करण्यासाठी हे अधिकार आता 2005 मध्ये तुमच्याकडे घेतलेले आहेत. आपण जे अधिकार आपल्याकडे घेतलेले आहेत ते माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेषाच्या विरोधात आहेत. त्यामुळे जर आपण हे अधिकार 8 दिवसात कपट कारस्थान रद्द केले नाही आम्ही त्याचा निषेध करुन सभात्याग करु.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, पहिले म्हणजे हे कपट कारस्थान नाही. राज्याचा वित्तमंत्री म्हणून जबाबदारी आहे, राज्य पुढे जात असतांना प्रोजेक्ट वेळेत पूर्ण व्हावेत, दिलेला पैसा वाया जाणार नाही यासंदर्भात माझी सुध्दा जबाबदारी आहे. अमरावती जिल्हयात जर 200 कोटी रुपये वाया गेले. हातात घेतलेले सर्व प्रोजेक्ट पूर्ण करुन 200 कोटीतील 10 कोटी रुपये जरी राहिले तरी ती माझी जबाबदारी राहील. दिलेला पैसा हा त्या जिल्हयात पूर्णपणे खर्च झाला पाहिजे. हातात 10 प्रोजेक्ट असतांना अजून 20-25 प्रोजेक्ट मंजूर करावयाचे, मग ते कृष्णा खो-यात असो किंवा अमरावती जिल्हयातील असोत. आपण हातात घेतलेले प्रोजेक्ट कॉस्ट ओव्हर रन, टाईम ओव्हर रनचे भान ठेवून केले पाहिजे. नाही तर मार्केटमध्ये आपली क्रेडीट रेटींग खाली जाते. हातात घेतलेले प्रोजेक्ट अपूर्ण ठेवणे योग्य नव्हे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी. या लक्षवेधी सूचनेवरील उत्तरे आलेली नाहीत. आमचे उत्तरही आम्ही समाधानकारकपणे ऐकावयाचे नाही का? आमच्या विभागांना पैसा दिला जात नाही, प्रशासकीय ऑर्डर दिल्या जात नाहीत.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात माझी अशी सूचना आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांसमवेत मी एक बैठक घेतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, साधा प्रश्न आहे. वित्त विभागाने जी 5 कोटी रुपयांची अट टाकलेली आहे ही कलम 371(2) खाली राज्यपाल महोदयांनी जे निर्देष दिलेले आहेत, जे घटनात्मक आहेत त्याचे व्हॉयोलेशन करणार आहे किंवा नाही? अशा प्रकारची अट टाकून मागासलेल्या भागातील प्रकल्प अडविणे आणि मग 31 मार्चला पैशाची इकडे तिकडे जमवा जमवी करणे हा काही चांगला उद्देश नाही. प्लॅनिंग सचिव आणि मुख्य सचिवांना माननीय राज्यपाल महोदयांनी कडक पत्र लिहिलेले आहे. त्यामुळे प्लॅनिंग सचिव आणि मुख्य सचिवांच्या नोक-या घालविण्याशिवाय आमच्या हातात आता काहीही राहिलेले नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

माझी विनंती आहे की, जी पाच कोटी रुपयांची अट घालण्यात आलेली आहे त्याची आवश्यकता नाही. अशाप्रकारे सर्व अधिकार स्वत:कडे घेणे म्हणजे प्रोजेक्टस डिले करणे, प्रोजेक्ट बंद करणे असे आहे. ही अट घटनाबाह्य आहे. तेव्हा शासन ही अट रद्द करणार आहे काय ? तसेच या संबंधी शासनाने विधि व न्याय विभागाचे किंवा ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतले आहे काय ? तसेच यासंबंधीची माहिती माननीय राज्यपालांना देण्यात आली आहे काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्य अनुच्छेद 166 मधील 11(अे) नुसार नवे दायीत्व निर्माण करणे, वित्तीय अधिकार घेऊन त्यावर काही मर्यादा राखण्याची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे राज्यसरकारच्या वित्त विभागाने कृती केलेली आहे. हे सर्व करीत असताना राज्यातील मागासलेल्या भागातील अनुशेष पूर्ण करण्यात कोणताही अडथळा येत नाही.

( अडथळा )

श्री.जयंत पाटील : ही मर्यादा एकाच विभागाला घालण्यात आली नसून सर्व विभागांना घालण्यात आलेली आहे.

( अडथळा )

श्री.जयंत पाटील : वित्त विभागाने केलेली कृती ही घटनाबाह्य नाही. जरी 5 कोटी रुपयांची मर्यादा घालण्यात आली असली तरी याचा अर्थ कोणत्याही प्रकल्पाला मान्यता देणार नाही असा होत नाही. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी अगोदर सभागृहात उपस्थित असते तर बरे झाले असते. सर्व प्रकल्पांच्या संदर्भात मी स्वत: दिनांक 6 जून, 7 जुलै, व 12 जुलै रोजी बैठका घेतल्या होत्या. ज्या जिल्ह्यामध्ये तीन वर्षात जे पैसे जाणार आहेत त्याच्यापेक्षा जास्त प्रकल्प ऑलरेडी घेतले असतील तर त्या विभागाला परवानगी देताना विचार केला जाईल. दरम्यानच्या काळात आपणास केंद्र सरकारकडून पॅकेज मिळणार आहे त्याचा लाभ आपल्याला होईल. तुमच्या मनात जे प्रकल्प आहेत त्या प्रकल्पांना अधिक मान्यता मिळू शकते कारण अधिकचा निधी त्या जिल्ह्यात येणार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आमच्या प्रश्नांना मंत्रिमहोदयांकडून न्याय मिळत नाही. जयंत इंडस्ट्रीची जी टर्कियामायसीनची कॅप्सूल आम्ही मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील लोक नेहमी घेत आहोत आणि याचे परिणाम पाहत आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी माझे चांगले मित्र आहेत. त्यांचे माझ्याबद्दलचे असे वक्तव्य आपल्या मैत्रीला शोभेसे नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री माझे चांगले मित्र आहेत. मी त्यांचा आदर करतो. परंतु मंत्रिमहोदयांनी माझ्या प्रश्नाची उत्तरे दिलेली नाहीत. नाहीतर याठिकाणी ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करण्यात यावे. मी मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारला होता की, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार वित्त विभागाने स्वत:कडे असे अधिकार घेणे हे घटनाबाह्य आहे किंवा कसे ? यासंबंधी वित्त विभागाने विधि व न्याय विभागाचे किंवा ॲडव्होकेट जनरल यांचे मत विचारात घेतले का ? तसेच यासंबंधीची माहिती त्यांनी माननीय राज्यपालांनी दिली आहे का ? या प्रश्नाचे उत्तर मंत्रिमहोदय देणार नाहीत कारण ते माझे मित्र आहेत. राज्याचा समतोल विकास व्हावा अशी मंत्रिमहोदयांची इच्छा आहे. खरे म्हणजे लिबरल इकॉनॉमी असली पाहिजे. ज्या विभागाचा जेवढे बजेट आहे तेवढ्या बजेटमध्ये काम करा, त्यानंतर माझ्याकडे एकही फाईल आणू नका. उदा. जर गृह विभागाने रेनकोटसाठी तरतूद मागितली असेल तेवढी देण्यात यावी. नंतर त्यांची मागणी आल्यास त्याचा विचार करु नये. परंतु आपण या सर्व घटनेला छेद देत आहात. त्यामुळे वित्तमंत्र्यांवर सर्व मंत्री नाराज आहेत, परंतु ते जाहीरपणे बोलू शकत नाही.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

आपण याबाबतीत बंधन टाकत असाल तर आमची काही हरकत नाही. परंतु मी चेहऱ्यावरुन आपल्या मनात काय आहे, हे ओळखू शकतो. सभापती महोदय, मला याठिकाणी एवढेच संरक्षण हवे आहे की, मी तर सगळयांनाच न्याय मिळाला पाहिजे, असे म्हणतो. जेव्हा आपले 200-300 कोटी रुपयांचे किंवा 5 हजार कोटी रुपयांचे प्रोजेक्ट होते तेव्हा आमच्या सरकारमध्ये याबाबतीत कुठल्याही प्रकारची अट घातली नव्हती, आम्ही याबाबतीतील अधिकार कॉरपोरेशनला दिले होते, त्यांनी अशा प्रोजेक्टना दणादण ॲप्रुव्हल दिले. परंतु आमची वेळ आल्यानंतर आपण अशा प्रकारच्या 5-5 कोटी रुपयांच्या प्रोजेक्टच्या बाबतीत आपण झटके मारायला लावता, हे योग्य नाही. आपला वित्त विभाग शेवटी अशा फाईलवर बसतो, हे योग्य नाही. हे आपले गैर कायदेशीर, गैरसंविधानिक, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांच्या विरोधात आहे. अशा प्रकारे जर संविधानाच्या विरोधात असेल.. माननीय सभापती महोदय, हे विधीमंडळ असून मला एका गोष्टीचे दु:ख आहे की, ज्या ज्यावेळी नियमांचा, घटनेचा आधार घेऊन मी आपल्याकडे अपील करतो त्यावेळी आपण अशा घटनात्मक पेच प्रसंगाच्यावेळी या सभागृहामध्ये जे कायदेशीर, न्यायीक व घटनात्मक असेल तर त्याबाबतीतील निर्देश देण्याचे अधिकार आपल्याला आहेत. हे सार्वभौम सभागृह आहे. याठिकाणी मी आपल्याला विनंती करु इच्छितो की, या प्रकरणांमध्ये सन्माननीय वित्त मंत्र्यांनी कळत-नकळत याठिकाणी घटनाबाहय वर्तन केलेले आहे. तेव्हा आजचे डिबेट महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरलकडे पाठवून त्यांचे ओपिनिअन घेऊन हे जर गैरकायदेशीर, गैर संविधानिक असेल तर तशा प्रकारचे निर्देश आपण सरकारला देणार का ? हे सभागृह नियमाने चालले पाहिजे, या सभागृहामध्ये घटनेची पायमल्ली होता कामा नये, या सभागृहामध्ये कायद्याचा आदर झाला पाहिजे, भारतीय घटनेचा आदर राखला पाहिजे, अशाच प्रकारची आपली भूमिका आहे, असा माझा विश्वास आहे. म्हणूनच मी आपल्याकडे आदराने व सन्मानाने पाहतो. आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. तेव्हा मी सरकारवर आरोप करीत आहे की, हे घटनाबाहय, गैरकायदेशीर आहे. मग, आपण ॲडव्होकेट जनरलकडे बसून हा मुद्दा तपासावा व आम्हाला न्याय द्यावा. जर आपल्याला ॲडव्होकेट जनरलकडे जाण्याची गरज वाटत नसेल तर मी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो माझा मुद्या गैरवाजवी असेल, चुकीचा असेल तर तो आपण खोडून काढावा. परंतु माझ्या या मुद्दाचे एक्सप्लनेशन आपण या सर्वोच्च चेअरवरुन द्यावे व मला ही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

जी घटनात्मक कॉन्ट्रॉवर्सी वाटते किंवा माननीय राज्यपालांच्या निर्देशांची जी पायमल्ली होत आहे, या संदर्भात आपण सभागृहाला क्लॅरिफिकेशन द्यावे, अशी माझी विनंती आहे. त्यामुळे आपण ही लक्षवेधी राखून ठेवावी, अशी माझी मागणी आहे. याबाबतीत आपण ॲडव्होकेट जनरलचे मत घ्यावे व ते सभागृहासमोर ठेवावे. त्यानंतर याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा व त्यानंतर निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. निवेदनाच्या सुरुवातीच्या पहिल्याच ओळीमध्ये जे वाक्य दिलेले आहे ते असंविधानिक आहे. याठिकाणी असे म्हटले आहे की, "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-166, खंड-(3) नुसार माननीय राज्यपाल यांनी" हे तयार केले आहे. घटनेच्या कलम 371(2) ची मुळात अशी सुरुवात आहे की, "Notwithstanding anything in this Constitution". **या** घटनेमध्ये काहीही म्हटले असले तरी माननीय राष्ट्रपतींना असे अधिकार राहतील अशा प्रकारचे ओपिनिअन ॲडव्होकेट जनरल यांनी दिलेले असून 371 (2) हे सुपेरिअर आहे. घटनेमध्ये काहीही म्हटले असले तरी 371 (2) प्रमाणे अशी व्यवस्था राहील. सुपेरिअर क्लॉज, असे त्यामध्ये शब्द वापरलेले आहेत. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, माननीय सभापती यांनी विचार करीत असताना हे खंड 166 चे जे घोंगडे यांनी घालून घेतले आहे व याठिकाणी ॲक्यूट सेंट्रलायझेशन केले आहे, डि-सेंट्रलायझेशन केले नाही. माननीय राज्यपालांनी सांगितले की, डि-सेंट्रलायझेशन करा, परंतु आपण ॲक्यूट सेंट्रलायझेशन केले. आपण वित्त मंत्रालयातील 2-4 जणांच्या तंगडया यामध्ये अडकून ठेवलेल्या आहेत, ही आपली कृती घटनाबाहय आहे हा यातील महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, आपण ही लक्षवेधी सचूना राखून ठेवावी व याबाबतीत मत घ्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी घटनेच्या विरोधात बोलणार नाही. 371 मध्ये असे म्हटले आहे की,....

या नंतर श्री. रोझे□र....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.......

"Special provision with respect to the State of Maharashtra and Gujarat. (2) Notwithstanding anything in this Constitution, the President may by order made with respect to the State of Maharashtra or Gujarat, provide for any special responsibility of the Governor for- (a) the establishment of separate development boards for Vidarbha, Marathwada, and the rest of Maharashtra or, as the case may be, Saurashtra, Kutch and the Gujarat with the provision that a report on the working of each of rest of these boards will be placed each year before the State Legislative Assembly; (b) the equitable allocation of funds for developmental expenditure over the said areas, subject to the requirements of the State as a whole;" यामधून हे सिध्द झाले. एवढेच नव्हे तर या सभागृहात या प्रश्नासाठी ओरडून ओरडून माझा आणि सन्माननीय सदस्य, प्रा.बी.टी.देशमुख यांचा घसा कोरडा पडला. आम्ही घटनात्मक मुद्दे मांडले, सभात्याग केला, पण आमचे ऐकले नाही. त्यामुळे आम्ही माननीय राज्यपाल महोदयांकडे गेलो. माननीय राज्यपाल, श्री.एस.एम.कृष्णा यांनी कॉन्स्टिटयूशनप्रमाणे शासनाला निर्देश दिले. नियोजन विभाग, वित्त विभागाला सांगितले की, खबरदार असे पुन्हा वागला तर तुमची नोकरी धोक्यात येईल. आता ते सहया करीत नाहीत म्हणून रिॲप्रोप्रिएशन करणे थांबले आहे. यापुढे नियमाप्रमाणे पैसे द्यावेच लागतील, मागास भागाला न्याय मिळेलच, अशा प्रकारची तरतूद झाली. नियमाप्रमाणे तरतूद झाल्याने आता ही कुणाची कृपा राहिलेली नाही. परंतु, आता यांनी नवीन मार्ग शोधला आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्याकरिता रुल्स तयार केले, विधीमंडळाकडे पाठविले, आपण त्याचे कायद्यात रुपांतर केले. त्या रुल्सप्रमाणे मागासलेल्या भागाच्या प्रकल्पांकरिता वित्त विभागाकडून ॲडमिनिस्ट्रटिव्ह ॲप्रुव्हल घेण्याकरिता ते राखून धरले आहे. सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील 3 प्रकल्प किती दिवसांपासून प्रलंबित आहेत, याची आपल्याला कल्पना आहे का ? हे प्रकल्प 6 महिन्यांपासून प्रलंबित आहेत. या भागातील प्रकल्पांची फाईल दाबून ठेवण्यात आली आहे, आम्हाला न्याय मिळत नाही, मागास भागाचा पैसा खर्च होत नाही. मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2....

श्री.नितीन गडकरी.........

असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ही कृती माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार केली आहे काय "Notwithstanding anything in this Constitution" This is special powerful provision. आणि याप्रमाणे अंमलबजावणी होणार नसेल तर तुम्ही आम्हाला सांगा की, सन्माननीय श्री.गडकरी तुम्ही गैरकायदेशीर बोलता, तुमच्या म्हणण्यामध्ये आरग्युमेंट नाही, लॉ नाही, लॉजिक नाही, म्हणून मी तुमचा मुद्दा फेटाळतो. सभापती महोदय, आपण जो निर्णय द्याल तो मला शिरसावंद्य असेल, तुम्ही म्हणाल ते मला मान्य होईल. मी या सार्वभौम सभागृहाचा सदस्य म्हणून आपल्याला विचारतो आहे, या सरकारला विचारीत नाही. कारण, यांच्या इंटेनशनवर आणि नियतवर माझा विश्वास नाही. सभापती महोदय, मी आपल्याकडे संरक्षण मागत आहे. कॉन्स्टिटयूशनप्रमाणे, नियमाप्रमाणे हे सभागृह चालणार आहे काय ? या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून आता आपण "दूध का दूध और पानी का पानी" करुन टाका. मी चुकीचे बोलत असेन तर आपण मला सांगा, मी खाली बसतो. शासनाची कृती इल्लिगल आहे, एक प्रकारे कायद्याचे व्हायोलेशन आहे, असंविधानिक आहे म्हणून आता यावर निर्णय देण्याचा अधिकार पीठासीन अधिकारी म्हणून आपल्याला आहे. आम्ही कायदेमंडळाचे सदस्य आहोत, सर्वोच्च अशा कायदे मंडळातील क्रमांक एकच्या पदावर, प्रमुख पदावर आपण आहात. त्यामुळे माझे म्हणणे कायदेशीर आहे की गैरकायदेशीर आहे, कॉन्स्टिटयूशनल आहे की अनकॉन्स्टिटयूशनल आहे, हे आता आपणच ठरवावयाचे आहे. मी आपल्यासमोर कॉन्स्टिटयूशनल मुद्दा उपस्थित केला आहे. मला मान्य आहे, कदाचित आपल्याला ताबडतोबीने यावर निर्णय घेण्याकरिता अडचण जाणार असेल तर ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी आणि उद्या, आपल्या दालनात ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करावे. मी तर असे म्हणेन की, या सभागृहातच ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करण्यात यावे. या सभागृहात education of public representative ही वैधानिक जबाबदारी आहे. सभागृहातील सदस्यांना कायद्याविषयी काही अडचण निर्माण झाली असेल तर लोकसभेमध्ये किंवा राज्यसभेमध्ये ॲटर्नी जनरल यांना पाचारण करण्याचा अधिकार आहे तसाच विधानसभा किंवा विधानपरिषदेत ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करण्याचा अधिकार आहे. म्हणून माझी विनंती आहे की, न्यायाचे राज्य असले पाहिजे, कायद्याचे राज्य असले पाहिजे,

..3.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

लोकशाहीचे राज्य असले पाहिजे, परंतु या ठिकाणी पंडित नेहरुंचा वारसा सांगणारी मंडळी कायद्याच्या चिंधडया उडवित आहेत. त्यामुळे आता आम्हाला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. आपण हे संरक्षण आम्हाला देणार काय ? आपण जर आम्हाला संरक्षण दिले नाही तर आम्ही असाच बुक्क्यांचा मार सहन करीत बाहेर जायचे काय ? आपण हे सर्व प्रकरण तपासा आणि खोटे असेल तर तसे आम्हाला सांगा, आम्ही आपला निर्णय शिरसावंद्य मानू. माझी आपल्याला विनंती आहे की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि माझी पहिली मागणी अशी आहे की, या ठिकाणी ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करण्यात यावे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .........

होऊ द्या चर्चा. प्रत्येक वेळी काही तरी खुसपट काढतात आणि आम्हाला अडकवितात. माननीय वित्तमंत्री श्री.जयंत पाटील हुशार आहेत, उत्तम प्रशासक आहेत, अमेरिकेमध्ये त्यांनी शिक्षण घेतलेले आहे. तुमच्यासारख्या संवेदनशील व्यक्तीने लोकशाहीच्याबाबतीत असे करु नये. हे इंदिरा काँग्रेसमध्ये ठीक आहे. तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहात. लोकशाहीची अशा प्रकारे धज्जी उडवता ? तुम्ही मन मोठे करा आणि मान्य करा की, मी हे करतो. नाही तर ॲडव्होकेट जनरलला बोलवा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर ब-याच वेळापासून चर्चा सुरु आहे. मुद्दा एकच आहे. एकाच मुद्याची पुनरावृत्ती केली जाते. सन्माननीय सदस्यांची एकच मागणी आहे की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवणे आणि सुधारित उत्तर देणे किंवा कायदेशीर सल्ला घेऊन फैसला करणे. सभापती महोदय, एका लक्षवेधी सूचनेवर सभागृहामध्ये किती वेळ चर्चा करावयाची ? लक्षवेधी सूचनेला दिलेले उत्तर चुकीचे असेल तर सुधारित उत्तर देऊन लक्षवेधी सूचना पुन्हा आणावी. या लक्षवेधी सूचनेवर किती वेळ चर्चा करावयाची असा प्रश्न उपस्थित होतो. सभापती महोदय यासंदर्भात आपण निर्णय द्यावा आणि पुढची लक्षवेधी सूचना घ्यावी.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या लक्षवेधी सूचनेमध्ये 3 प्रकल्पांचा उल्लेख आहे. त्यावर आम्ही 15 दिवसात निर्णय घेऊ.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 15 दिवसात निर्णय घेऊ असे मंत्री महोदयांनी सांगितले. मान्यता देऊ असे मंत्री महोदयांनी म्हटलेले नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, निर्णय करु याचा अर्थ Yes or No करु. सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे अनुशेष दूर करण्याबद्दल कोणाचेही दुमत नाही. त्या विभागाला दिलेले पैसे खर्च झाले पाहिजेत. प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत. प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यापेक्षा प्रकल्प पूर्ण करणे अभिप्रेत आहे. आपण प्रकल्पांना मोठया प्रमाणावर प्रशासकीय मान्यता देत सुटलो तर हातामध्ये घेतलेले प्रकल्प पूर्ण होणार नाहीत, अशी भिती वित्त विभागाला आणि आम्हाला वाटते.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : लक्षवेधी सूचनेसंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडले. पण माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे कोणीच ऐकून घेण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सूचविले की, एका लक्षवेधी सूचनेवर किती वेळ चर्चा करावयाची ? माझ्यासारखा माणूस सभापती म्हणून येथे बसतो त्यावेळी महत्वपूर्ण लक्षवेधी सूचनेवर सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी सर्वांना बोलण्याची संधी देतो. लक्षवेधी सूचनेवर किती बोलावयाचे याचे बंधन स्वत: सन्माननीय सदस्यांनी पाळले तर कदाचित हे ऐकून घेण्याची पाळी माझ्यावर येणार नाही. एक गोष्ट निश्चित आहे की, ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आहे. यापूर्वी देखील अशा प्रकारच्या लक्षवेधी सूचनेवर ॲडव्होकेट जनरलचे मत मागवावे असे म्हटले होते. घाईगर्दीने निर्णय न घेता, निर्देश असा शब्द मी वापरत नाही. परंतु या महत्वपूर्ण मुद्यावर माननीय सभापतींच्या दालनामध्ये ॲडव्होकेट जनरल यांना बोलवून त्या ठिकाणी माननीय वित्तमंत्री श्री.जयंत पाटील, विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, श्री.मधुकर सरपोतदार, प्रा.बी.टी.देशमुख व अन्य गट नेत्यांनी उपस्थित राहून हा प्रश्न आपण कायमचा निकाली काढू, जेणेकरुन सभागृहामध्ये यावर असे बोलण्याची वेळ येणार नाही.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

आता उद्या आपण या विषयावर चर्चा करतोच आहोत. तेव्हा ही लक्षवेधी सूचना रोखून ठेवावी असे मला वाटत नाही. तरीही आपले तसे म्हणणे असेल तर त्याला माझी हरकत नाही. उद्या या आसनावर मी असेन, माननीय सभापती असतील वा कोणी तालिका सभापती असतील पण अशाप्रकारे त्यांना ऐकून घेण्याची पाळी दोन्ही बाजूंकडील सदस्यांकडून येऊ नये असे मला वाटते. हा प्रश्न महत्त्वपूर्ण आहे. त्यावर शासनाने देखील आपली भूमिका योग्य प्रकारे बजाविण्याचा म्हणा वा मांडण्याचा म्हणा, प्रयत्न केला. पण आपले प्रश्न देखील सुटले पाहिजेत. म्हणूनच उद्या सकाळी 10.30 वाजता माननीय सभापतींच्या दालनामध्ये या विषयावर चर्चा करून तोडगा काढण्याच्या दृष्टीने ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करण्यात यावे आणि या प्रश्नाची तड लावावी असा निर्णय मी देतो. तसेच आता आपण विनंती केली आहे त्यानुसार ही लक्षवेधी सूचना राखून ठेवतो.

*****

**लक्षवेधी सूचने संबंधात** .....

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रमांक 3 वर असलेली लक्षवेधी सूचना संबंधित मंत्र्यांनी विनंती केल्यानुसार पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे आता यानंतरची लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

****

...... आयआय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील टॅक्सी, ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बंधनकारक करणे.

**मु.शी.** : मुंबईतील टॅक्सी, ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बंधनकारक करणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

----

श्री. मधुकर चव्हाण (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईत चालणाऱ्या टॅक्सी, ऑटोरिक्षांनी परिवहन विभागाकडून नेमून दिलेल्या छापील तक्त्याप्रमाणे भाडे न आकारता मनाप्रमाणे भाडे आकारणे, त्याचप्रमाणे गाडीमध्ये खोटे छापील भाडे तक्ते ठेवणे व त्यानुसार भाडे आकारणे, मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेने संबंधीत टॅक्सी चालकांची परिवहन विभागाकडे तक्रार केली असता चालकावर कोणतीही कारवाई न केल्यामुळे टॅक्सी व ऑटोरीक्षा चालकांची वाढलेली दंडेली, या सर्व गंभीर बाबींकडे शासनाचे लक्ष वेधले असता परिवहन मंत्र्यांनी मुंबईतील सर्व टॅक्सींना टप्प्या-टप्प्याने इलेक्ट्रॉनिक मिटर लावण्यात येतील असे मान्य करुनही कोणतीही कारवाई न करणे, त्यामुळे प्रवाशांच्या मनात पसरलेला असंतोष व संतापाची भावना, या प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...... आयआय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( परिवहन राज्यमंत्र्यांच्या लक्षवेधी सुचनेवरील निवेदनानंतर ... )

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी दिलेल्या निवेदनाद्वारे आपण जे उत्तर दिले आहे त्यामध्ये आपणास काही बदल करावयाचा आहे काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांबद्दल पूर्ण आदर ठेवून मी सांगू इच्छितो की, त्यांनी आतापर्यंत त्यांच्या खात्यासंबंधात जी जी उत्तरे येथे दिली आहेत त्यांची अमलबजावणी झालेली नाही वा त्यांनी करून घेतलेली नाही. मागे एसटी घोटाळ्यासंबंधातील विषय आला असताना त्याबाबत सीआयडी चौकशी करण्यात येईल असे त्यांनी सांगितले होते पण तसे केले गेलेले नाही. यापूर्वी देखील अशाच प्रकारची लक्षवेधी सूचना आम्ही 14 डिसेंबर 2005 ला नागपूर अधिवेशनामध्ये दिली होती. त्यावेळी माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे त्यातील एकही बाब पूर्ण झालेली नाही. परवाही बॉम्बस्फोटाचा अनुभव आला तेव्हा टॅक्सी, रिक्षा चालकांनी काही अपवाद वगळता जनतेची लूट करण्याचाच प्रयत्न केला. म्हणूनच आम्ही टॅक्सी व रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर लावण्याची मागणी केली होती. मध्यंतरी माननीय राज्यमंत्री श्री.म्हेत्रे यांनी देखील वाहतूक आणि टॅक्सी चालक प्रश्नासंबंधात एक बैठक घेतली होती. पण त्यामध्येही इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणार काय याबद्दल काहीच उत्तर दिलेले नाही. या ठिकाणी मागील वेळेस आपण जे उत्तर दिलेले आहे ....

( सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत खाली बसून काही बोलतात ... )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपण अशा प्रकारे खाली बसून जे काही बोललात ते योग्य नाही. यापूर्वीच्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.सरपोतदार यांनी जेव्हा एका लक्षवेधी सूचनेवर अधिक काळ चर्चा केल्याबद्दल हरकतीचा मुद्दा उपस्थित केला तोही मी मान्य केला आहे. तेव्हा आपण जे काही शब्द खाली बसून उच्चारलेत ते योग्य नाहीत इतकेच मी म्हणेन.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या निवेदनात आपण म्हटलेले आहे की, मुंबई शहरात प्रवासी सेवा पुरविणाऱ्या टॅक्सीमध्ये इलेक्ट्रॉनिक डिजिटल मीटर बसविण्याबाबत मोटार वाहन अधिनियम 1988 च्या कलम 74(2)(xiii) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र मोटार वाहन नियम, 1989 च्या नियम 137 मध्ये योग्य ती सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यासाठी विधी व न्याय

..... आयआय 4 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

विभागाकडे नियमात सुधारणा करण्याचा प्रस्ताव सादर केला असून त्या विभागाची मान्यता प्राप्त होताच नियमात सुधारणा करण्याची अधिसूचना निर्गमित करण्यात येईल. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, मागील अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना आपण उत्तर दिले होते की, ताबडतोब ही इलेक्ट्रॉनिक्स मीटर बसविण्यात येतील तर ती का बसविण्यात आली नाहीत ? त्याबाबतीत अमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत ? मागील डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये या संबंधात जे आश्वासन आपण दिले होते त्यानुसार मुंबईकर जनतेची टॅक्सी, रिक्षाचालकांनी जी लूट चालविली आहे ती थांबविण्याच्या दृष्टीने आपण निर्णय का घेतला नाही ?

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.गुरूनाथ कुलकर्णी )**

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये मी म्हणालो होतो की, टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक्स मीटर बसविण्याचे काम आपण ताबडतोब हाती घेणार आहोत. मात्र हे काम पूर्ण होण्यासाठी दोन वर्षे लागतील. त्यासाठी आपल्याला नियम 137 मध्ये दुरूस्ती आणावी लागेल. म्हणजे आपल्याला टॅक्सीचालकांवरच याची जबाबदारी टाकावी लागेल, इलेक्ट्रॉनिक मीटर लावणे त्यांना बंधनकारक करावे लागेल. ....

( यानंतर श्री. सरफरे .... जेजे 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम...

आणि त्याप्रमाणे ताबडतोब नोटिफिकेशन काढून ही जबाबदारी त्यांच्यावर टाकणार आहोत. दोन वर्षाच्या कालावधीमध्ये जवळ जवळ 55 हजार टॅक्सीकरिता लागणारे इलेक्ट्रॉनिक मीटरची निर्मिती आपल्याकडे होणे आवश्यक आहे. ही अडचण असल्यामुळे...

**(सभापतीस्थानी तालिकासभापती माननीय श्री. गुरुनाथ कुलकर्णी)**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. 25 फेब्रुवारी 2005 रोजी उत्तर देतांना आम्ही "लवकरात लवकर सुरु करु" असे सांगितले आहे. या गोष्टीला दीड वर्ष झाले तरी अजून कारवाई होत नाही.?

(गोंधळ)

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, या सभागृहामध्ये दीड वर्षापूर्वी झालेल्या चर्चेच्यावेळी आपण उत्तर दिले होते. त्या उत्तराचे स्मरण करुन आपण याठिकाणी उत्तर द्यावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझ्या हातामध्ये कार्यवृत्ताची प्रत आहे. त्यामध्ये मंत्रिमहोदयांनी जे आश्वासन दिले होते त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे. माझ्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले नाही. नियमामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे आपण कधी पाठविला? जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नासंबंधी लवकरात लवकर निर्णय न घेतल्याबद्दल आपण त्यांच्यावर काय कारवाई करणार?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, विधी व न्याय विभागाकडून आम्ही अभिप्राय मागविला आहे.

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदय, आपण मागील अधिवेशनामध्ये ठराविक कालावधीमध्ये कारवाई करु अशाप्रकारचे आश्वासन दिले होते. त्या संदर्भात आपण कोणती कारवाई केली याचे उत्तर द्यावे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, नियमामध्ये बदल करावा लागेल याकरिता विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे. विधी व न्याय विभागाशी संपर्क साधून नियम क्र. 137 मध्ये दुरुस्ती करण्यासंबंधीचा निर्णय एक महिन्याच्या आत घ्यावा अशाप्रकारचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न चार वेळा वेगवेगळया माध्यमातून आला आहे. मुळात आपण इलेक्ट्रॉनिक मीटर टॅक्सीवर कधी बसविणार आहात? त्या संदर्भात आपण मॅन्युफॅक्चरिंगची अडचण सांगितली. त्या अडचणीवर मात करुन आपण ही कार्यवाही केव्हा पूर्ण करणार? दुसरा प्रश्न असा आहे की, दादर स्टेशनवर टॅक्सीवाले प्रवाश्यांची लूटमार करतात. दादरच्या पश्चिमेकडील बाजूला असलेल्या टॅक्सीवाल्यांवर पोलिसांचा कंट्रोल नाही. त्याठिकाणी एक पोलीस चौकी बसविणार काय?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे, त्यासंबंधी व्हिजिलन्स स्क्वॉडला सांगण्यात येईल. आणि पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, येत्या दोन वर्षामध्ये इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यात येतील.

(अडथळा)

सभापती महोदय. त्यासंबंधीच्या नियमात दुरुस्ती झाल्यानंतर सर्वांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यासंबंधी आदेश देण्यात येतील.

**तालिका सभापती** : जवळ जवळ 30 वर्षापासून मुंबईतील टॅक्सीचे मीटर अस्तित्वात आहेत. टॅक्सीवाल्यांना देण्यात आलेले दरपत्रक आणि मीटर रिडींगमध्ये प्रचंड तफावत आहे. तेव्हा नवीन इलेक्ट्रॉनिक मीटर बसवितांना तशाप्रकारची कोणतीही तक्रार राहणार नाही. त्यादृष्टीने आपण लवकरात लवकर निर्णय घेऊन हे इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणार काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत हा नियम लागू करण्यात येईल. आणि हा नियम लागू झाल्यानंतर एक वर्षाच्या आत 55 हजार टॅक्सीजना इलेक्ट्रॉनिक मीटर लावण्याचे आदेश देण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबईमध्ये टॅक्सीज भाडयाने घेण्याची पध्दत आहे. प्रामुख्याने दादर रेल्वे स्टेशनच्या पश्चिम बाजूला अस्तित्वात असलेली पध्दत भयानक आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु..

यासाठी माझी एक सूचना आहे, त्याची अंमलबजावणी कराल काय ? याचे उत्तर द्यावे. एक पोलीस चौकी ठेवून त्या ठिकाणी ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करुन ज्याप्रमाणे गिऱ्हाईक येतील, त्याप्रमाणे त्यांना अंतराच्या भाड्याची स्लीप देण्याबाबतचे नियोजन करुन टॅक्सींच्या भाडयाबाबतचे नियंत्रण करणार आहात काय ? ज्याप्रमाणे मुंबई विमानतळावर व्यवस्था केलेली आहे, त्याचबरोबर दिल्ली येथील विमानतळावरही व्यवस्था केलेली आहे, त्या पध्दतीने टॅक्सीच्या भाडयाच्या संबंधात नियंत्रण करण्यासाठी त्वरित उपाययोजना करणार आहात काय ? करणार असाल तर किती दिवसात ही उपाययोजना करणार आहात ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : ट्राफिक पोलीस विभागाच्या संबंधीत प्रश्न आहे. तरी देखील तशाप्रकारची व्यवस्था करण्याबाबत शासनाच्या वतीने सांगण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : टॅक्सीमध्ये बसल्यानंतर असा अनुभव येतो की, टॅक्सी ड्रायव्हरना पत्ताच माहीत नसतो. माझा प्रश्न असा आहे की, टॅक्सीचा परवाना देताना वाहन चालकाचे नाव आणि त्यांचा रजिस्ट्रेशन क्रमांक, लायसन क्रमांक डिस्प्ले करण्याबाबतची अट घातली जाईल काय ? त्याचबरोबर परवाना देताना, त्याचे डोमिसाईल सर्टिफिकेट पाहिले जात नाही. त्यांच्याकडील डोमिसाईल सर्टिफिकेट पाहूनच त्यांना असा परवाना द्यावा. त्यांचे नाव आणि पत्ता, लायसन्स क्रमांक हे टॅक्सीमध्येच डिस्प्ले करण्याची अट घातली जाईल काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : याबद्दल जरुर विचार करता येईल.

ॲड.अनिल परब : निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "वाहतूक पोलीस शाखेने कारवाई करण्याबाबत कळविलेल्या टॅक्सी व रिक्षा विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, अशी वस्तुस्थिती नसून अशा टॅक्सी व रिक्षा विरुध्द दंडात्मक तसेच परवाना निलंबन अशा स्वरुपाची कारवाई परिवहन विभागाकडून करण्यात येते." प्रत्येक रेल्वे स्टेशनच्या बाहेर ट्राफिक पोलीस अधिकारी आणि पोलीस असतात. त्यांचा प्रत्येक टॅक्सीवाल्याकडून हप्ता ठरलेला असतो. टॅक्सी जेव्हा तेथून निघते, तेव्हा टॅक्सी चालक त्यांना पैसे देतात आणि पुढे निघतात अशाप्रकारच्या तक्रारी ग्राहकांकडून वारंवार झालेल्या आहेत, त्या संदर्भाने आतापर्यन्त गेल्या वर्षभराच्या कालावधीमध्ये किती टॅक्सी चालकांच्या परवान्यांचे निलंबन करण्यात आलेले आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सन 2005-200 मध्ये अशाप्रकारच्या 176 तक्रारी आलेल्या होत्या. त्या प्रकरणी 31 हजार रुपये दंड वसूल केलेला आहे. टॅक्सींची नियमित तपासणी केली



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/ KGS/ MAP/

श्री.धर्मरावबाबा आत्राम (पुढे सुरु....

जात असते. सन 2005-2006 मध्ये तपासलेल्या वाहनांची 28593 इतकी संख्या आहे, त्यामध्ये दोषी आढळलेले 5,941 टॅक्सी आहेत. त्यापैकी दंड वसूल केलेली रक्कम रुपये 8 लाख 89 हजार 351 इतकी आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : मुंबईतील टॅक्सीमधील दर्जा सुधारण्याची गरज आहे. याबाबत शासन विचार करेल काय ? टॅक्सीमध्ये मॅटिंग व्यवस्थित नसते, टॅक्सीचे दरवाजे बरोबर नसतात, टॅक्सीमध्ये अस्वच्छता असते, टॅक्सीमध्ये बसल्यानंतर कपड्यांना काळे लागते. टॅक्सी दर्जेदार करण्याच्या दृष्टीने शासन ठोस भूमिका घेईल काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : टॅक्सीवाल्यांच्या युनियनबरोबर बैठक घेऊन त्यांना तसे सांगण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : टॅक्सी युनियनचा काय संबंध आहे ? आपल्याकडे नियम आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : व्यवस्थित टॅक्सी गाड्या ठेवल्या पाहिजेत, या दृष्टीने आर.टी.ओ.ना आदेश देण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ प्रोसिजर आहे. अधिवेशनच्या काळामध्ये परिवहन विभागाच्या संदर्भात चर्चा करण्याची संधी मिळत नाही, म्हणून लक्षवेधी सूचनेच्या मार्फत परिवहन विभागाचा विषय चर्चेला आणला जातो परंतु त्यासाठी पाच-दहा मिनिटांचा वेळ मिळतो, सभापती महोदय आपण कृपा केली तर अर्धातासाचा वेळ आपण देऊ शकता. तरीही त्या संदर्भात सर्व प्रश्नांची उत्तरे मिळू शकत नाहीत. गेल्या अधिवेशनामध्ये मोटर वाहन अधिनियम 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक क्रमांक 17 आलेले होते. परंतु हे विधेयक शेवटच्या दिवशी आले. शेवटच्या दिवशी 6 विधेयके होती. या परिवहन विभागाच्या विधेयकाच्या संदर्भात आम्हाला चर्चा करावयाची होती.

यानंतर श्री.बरवड....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्या दिवशी चर्चा झाली नाही. दुसऱ्या दिवशी म्हणजे अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी हे विधेयक सभागृहासमोर आले. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होते. त्यांनी आम्हाला अशी विनंती केली की, आपण सर्व विधेयके संमत करावीत. त्या दिवशी 7 विधेयके होती. आम्ही त्यांच्या विनंतीला मान दिला परंतु आम्ही सांगितले की, या एका बिलावर आम्हाला चर्चा करावयाची आहे. माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, ठीक आहे, ज्या विधेयकावर चर्चा करावयाची आहे ते विधेयक राहू द्या आणि बाकीची 6 विधेयके संमत करा. त्यावेळी चर्चा न करता आम्ही ती विधेयके संमत केली. परंतु हे बिल या अधिवेशनात आले नाही. सर्व सन्माननीय सदस्यांना त्या बिलावर चर्चा करावयाची आहे. मुंबईच्या परिवहनाच्या संदर्भात ज्या भीषण समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या तातडीने अटेंड केल्या पाहिजेत अशी परिस्थिती आहे. त्यामुळे त्या विधेयकावर आम्हाला चर्चा करावयाची होती. ते विधेयक सभागृहासमोर का आले नाही ? हे समजत नाही. मी यासंदर्भात चौकशी केली. हे विधेयक "deemed to be passed" म्हणून अंमलात आलेले आहे असे समजले. या सदनातील आमचा अधिकार गेला असेल तर तो अधिकार कोणामुळे गेला आणि तो अधिकार जाण्याचे कारण काय ? हे समजले पाहिजे. त्या विधेयकावर आम्हाला चर्चा करता येणार नसेल तर असे का घडले ? हे आम्हाला या पॉइन्ट ऑफ प्रोसीजरच्या माध्यमातून समजले पाहिजे. याबाबतीत कोणाचा दोष आहे ? हे पीठासीन अधिकाऱ्यांकडून आम्हाला समजले पाहिजे. त्यामुळे पॉइन्ट ऑफ प्रोसीजरच्या माध्यमातून मी हा विषय मांडत आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मोटार वाहनाच्या संदर्भात एक विधेयक आपण पास करण्याचे ठरविले होते. आपण एकच बिल पास केलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : 17 क्रमांकाच्या बिलाचे काय झाले ?

**तालिका सभापती ( श्री. गुरुनाथ कुलकर्णी )** : दुसऱ्या बिलाचे स्टेटस काय आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : एकच बिल पास करावयाचे असा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्याप्रमाणे आपण एकच बिल पास केले.

**तालिका सभापती** : दुसऱ्या बिलाचे स्टेटस काय आहे ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. धर्मरावबाबा आत्राम : ते बिल पुढच्या अधिवेशनामध्ये आणावे लागेल.

श्री. दिवाकर रावते : आम्हाला मोघम उत्तर नको. सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 17 माझ्याजवळ आहे. हे मनी बिल आहे. हे बिल पुढच्या अधिवेशनात येणार आहे असे मी त्यावेळी लिहून ठेवले आहे.

**तालिका सभापती** : त्यावेळी दोन बिले आलेली होती. सर्वांच्या संमतीने एक बिल संमत करण्यात आले. दुसऱ्या बिलाचे स्टेटस काय आहे असे मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारले. एकच बिल संमत झाले आहे, दुसरे बिल सभागृहामध्ये आणले जाईल असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे.

श्री. दिवाकर रावते : या अधिवेशनामध्ये हे विधेयक का आणले नाही ?

**तालिका सभापती** : तो सरकारचा प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : 17 क्रमांकाचे विधेयक पुढच्या अधिवेशनामध्ये आणले जाईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, कोणती बिले घ्यावयाची याबाबत कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा होते. सभापती महोदय, आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये असता तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते कामकाज सल्लागार समितीमध्ये आहेत. कोणकोणती बिले घ्यावयाची यासंदर्भात चर्चा करुन प्रत्येक दिवशी कमीतकमी दोन बिले पास करावयाची असे ठरविले. मधल्या काळात अशा काही घटना घडतात की, ज्यामुळे त्या दिवशी कामकाज होत नाही. त्यामुळे ती बिले पुढच्या अधिवेशनात घेतो. क्रमांक 17 चे बिल कोणते आहे हे मी पाहून घेतो. जी बिले राहिली असतील ती पुढच्या अधिवेशनामध्ये घेऊ.

श्री. दिवाकर रावते : क्रमांक 17 चे विधेयक पुढच्या अधिवेशनात आणणार काय ?

**तालिका सभापती** : होय.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, कोणती बिले घ्यावयाची हे कामकाज सल्लागार समिती ठरविते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संबंधित सन्माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी उभे राहून सांगावे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मी उभे राहूनच बोललो की ते बिल आणणार.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिवाकर रावते : म्हणजे विधेयक क्रमांक 17 पुढच्या अधिवेशनात येणार असे आम्ही समजतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये "परिवहन मंत्र्यांनी मुंबईतील सर्व टॅक्सींना टप्प्या-टप्प्याने इलेक्ट्रॉनिक मीटर लावण्यात येतील असे मान्य करुनही कोणतीही कारवाई न करणे" असा उल्लेख केलेला आहे. म्हणजे मीटर लावतो असे आश्वासन दिले होते पण त्याबाबत कार्यवाही केलेली नाही यासंदर्भात लक्षवेधी सूचनेमध्ये विचारलेले आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "वाहतूक पोलीस शाखेने कारवाई करण्याबाबत कळविलेल्या टॅक्सी व रिक्षा विरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येत नाही अशी वस्तुस्थिती नसून अशा टॅक्सी व रिक्षा विरुध्द दंडात्मक तसेच परवाना निलंबन अशा स्वरुपाची कारवाई परिवहन विभागाकडून करण्यात येते."

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे...)

ही दंडात्मक कारवाई कशासाठी करण्यात येत आहे, हे सभागृहाला माननीय मंत्री महोदयांनी समजून सांगावे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : पीयुसी बरोबर नसते तसेच आणखी ज्या ज्या काही तक्रारी येत असतील त्याबद्दल त्यांना दंड करण्यात येतो.

**तालिका सभापती** : ही लक्षवेधी सूचना याच अधिवेशनामध्ये आलेले आहे असे नाही तर मागील दोन अधिवेशनामध्येही याच विषयावर लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली होती. हा विषय आपल्या विभागाने गांभीर्याने घेतलेला नाही. तेव्हा यासंदर्भात एक महिन्यामध्ये कारवाई सुरु करावी असे निदेश मी देत आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे 29 हजार पदे रद्द करण्यात येणे

**मु. शी** : शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे 29 हजार पदे रद्द करण्यात येणे यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, डॉ.नीलम गो-हे व ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाच्या अवाजवी काटकसरीच्या व फेर आढाव्याच्या धोरणामुळे सुमारे 29 हजार पदे अतिरिक्त ठरवून ती रद्द करण्यात येणे, तसेच हजारो पदे रिक्त असल्याने शासनाचे काम ठप्प होणे, हजारो पदे न भरल्याने ती व्यपगत होणे, त्यामुळे जनतेची कामेही रेंगाळणे, शासनाच्या नोकरभरती न करण्याच्या धोरणामुळे राज्यात सुशिक्षित तरुण मोठया प्रमाणावर बेकार असणे, शासनाने कर्मचाऱ्यावंरील खर्चात 1.5 टक्के बचत करण्याची सुरु केलेली कारवाई, परंतु प्रत्यक्षात 2.6 टक्क्यांनी खर्च कमी होणे, नवीन पदे निर्माण न करणे व असलेली पदे न भरणे, तसेच शासकीय सेवेतील नोकरभरती पूर्णत: बंद ठेवल्याने सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर पडणारा ताण, परिणामी जनतेच्या विकासांच्या कामांना विलंब झाल्याने जनतेत व तमाम कर्मचाऱ्यांत पसरलेली तीव्र संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.जयंत पाटील (अर्थ व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : शासनाने भरती बंद केलेली नाही असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. मग 2 टक्के, 5टक्के अशी भरती चालू आहे काय ? नोकरीमध्ये लिन ठेऊन सरकारी अधिकारी/कर्मचारी 5 वर्षे रजा घेऊ शकतात अशा प्रकारचा निर्णय शासनाने मध्यंतरी घेतला होता. तेव्हा कोणकोणत्या वर्गातील किती अधिकारी आणि कर्मचा-यांनी 5 वर्षाची रजा घेतलेली आहे ?

श्री. जयंत पाटील : भरती पूर्णत: बंद केलेली नाही. ज्यांचा आढावा झालेला नाही अशा विभागांना आपण ठराविक मर्यादेत भरती करण्याची परवानगी दिलेली आहे. 97 टक्के विभागांचा आढावा पूर्ण झालेला आहे. 3 टक्के विभागांचा आढावा पूर्ण झालेला नाही. ज्या विभागांचा आढावा पूर्ण झालेला आहे त्या विभागातील अतिरिक्त ठरलेली पदे वेगवेगळया ठिकाणी ॲब्सॉर्ब करण्यात आलेली आहेत. किती अधिकारी व कर्मचा-यांनी 5 वर्षे रजा घेतली यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु मला वाटते हा आकडा 100पेक्षा अधिक नसावा. तरीही ती माहिती मी पटलावर ठेवीन. शासनावरचा भार कमी होईल असा उद्देश होता. पण याबाबतीत फारसा प्रतिसाद मिळालेला नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : निवेदनाच्या शेवटून दुस-या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, शासनाच्या दिनांक 10.9.2001 च्या शासन निर्णयानुसार नवीन पदनिर्मिती तसेच असलेली रिक्त पदे भरण्यावर बंदी नाही ही वस्तुस्थिती आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद 2.5 नुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती नवीन पदनिर्मिती, व्यपगत झालेल्या पदांचे पुनरुज्जीवन करणे व रिक्त असलेली सर्व पदे आणि पुढे कोण्त्याही कारणांमुळे रिक्त होणारी पदे भरण्यास मान्यता देईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे." माझा प्रश्न असा आहे की, विविध कार्पोरेशन्स, नगरपालिका अशा संस्थांकडून भरती संबंधीच्या प्रस्तावांना दोन-दोन वर्षे मान्यता मिळत नाही. तेव्हा असे किती प्रस्ताव सचिव समितीकडे आलेले आहेत ? हे प्रस्ताव मान्यते अभावी किती काळ प्रलंबित राहिलेले आहेत ? असे प्रस्ताव प्रलंबित न राहाता त्यांना ठरावित मुदतीत मान्यता देण्यात येणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : उच्चस्तरीय समितीकडे किती प्रस्ताव केव्हा पासून प्रलंबित आहेत यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. अशा प्रकारच्या प्रस्तावांना लवकरात लवकर मान्यता दिली पाहिजे. उच्चस्तरीय समितीकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावासंबंधीची माहिती पटलावर ठेवण्यात येईल जेणे करुन उच्चस्तरीय समितीलाही वेळेवर निर्णये घेण्याबाबत प्रेशर तयार होईल.

..नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.5.........

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, निवेदनामध्ये शेवटच्या परिच्छेदात सांगण्यात आले आहे की, शासनाने शासन निर्णय दि.10.9.2001 नुसार पदाविषयक आढावा घेण्याचे आदेश निर्गमित केले असले तरी आढावा घेतल्याशिवाय शासन निर्णय, वित्त विभाग दि.9.1.2003 नुसार मागासवर्गीयांची अनुशेषांतर्गत 90 टक्के रिक्त पदे तसेच शासन निर्णय वित्त विभाग दि.1 जुलै, 2004 नुसार खुल्या प्रवर्गातील 50 टके रिक्त पदे भरण्याबाबत मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विविध प्रशासकीय विभागाकडून करण्यात येत आहे. माझा प्रश्न असा आहे की, वित्त विभागाच्या दि.9.1.2003 च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीयांची अनुशेषांतर्गत 90 टक्के रिक्त पदे भरावयाची होती, त्यापैकी आतापर्यंत किती पदे भरण्यात आली व खुल्या प्रवर्गातील 50 टक्के रिक्त पदे भरण्याची मुभा दिली असताना आतापर्यंत किती पदे भरण्यात आली?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी सर्व विभाग आणि विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या डिव्हीजनल सेंटर्सकडून माहिती गोळा करण्यास वेळ लागेल. मला आपण अनुमती दिली तर ही माहिती गोळा करुन सभागृहाच्या पटलावर ठेवू आणि लवकरच ती माहिती गोळा करुन देण्यात येईल.

**तालिका सभापती** : माहिती गोळा करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मध्यंतरी सदनामध्ये अपंगाच्या भरतीसंदर्भात आणि अनुकंपा तत्वावरील भरतीच्या संदर्भात लक्षवेधी सूचना चर्चेला आली असताना मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, वर्षभरात आम्ही अनुकंपा तत्वावरील अनुशेष भरुन काढू. याबरोबर अंशकालीन कर्मचाऱ्यांची संख्या सभागृहात जाहीर करण्यात आली. अंशकालीन कर्मचारी कोणत्याही प्रवर्गात बसू शकतात. शासनाने एक वर्षात अनुशेष भरुन काढू असा शब्द दिला असल्यामुळे त्यांचे उद्दीष्ट पूर्ण करण्यात आले आहे का?

श्री.जयंत पाटील : माझ्याकडे ती माहिती आता उपलब्ध नाही. सध्याचे जे प्रचलित धोरण आहे त्यानुसार वेगवेगळया कॅटॅगरीमध्ये किती लोकांची भरती झाली ही माहिती मी पटलावर ठेवीन.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासन कर्मचाऱ्यांच्या कामाचे पॅटर्न बदलण्याबाबत विचार करणार आहे का? रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये 1400 कर्मचारी असताना संगणकीकरणानंतर ही संख्या 300 वर आली आहे व त्याठिकाणी कामकाज सुध्दा व्यवस्थित चालू आहे. शासनाच्या सर्व कार्यालयांचे संगणकीकरण केलेले असल्यामुळे कर्मचारीवर्गाची संख्या कमी होऊन कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने आणि जूना पॅटर्न बदलण्याबाबत शासन गंभीरपणे विचार करील काय?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विचारलेला प्रश्न रास्त आहे. संगणकीकरण होत असल्यामुळे कार्यक्षमता वाढली पाहिजे. परंतु यामुळे कर्मचारी कमी करणे ही भूमिका नसली तरी त्यांना अधिक चांगले आणि प्रॉडक्टिव्ह काम देऊन शासनाची अधिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांच्या दोन्ही प्रश्नाचे उत्तर "होय" असे मी देतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये, राज्य शासनाच्या महसुली जमेच्या तुलनेत आस्थापनेवरील खर्च वाढत असल्यामुळे राज्याच्या विकासाच्या कामांवर विपरित परिणाम होत असल्यामुळे....असे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, महसुली उत्पन्न आणि राज्य शासनाकडील नोकरभरती याचा रेशो काय आहे?

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

शासन महसुली उत्पन्न विचारात घेऊन कर्मचा-यांची पदे भरते की, निरनिराळया खात्यात असणारी गरज आणि कामाची तातडी विचारात घेऊन कर्मचा-यांची भरती केली जाते का? व्यवस्थापन आणि महसुली उत्पन्न याचा रेषो आपण काय ठेवलेला आहे?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी एकंदर प्रशासनिक खर्च वाढतो त्यावेळी विकास कामे कमी प्रमाणात होतात. सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे, ज्यावेळी वेगवेगळया विभागाच्या मागण्या पुढे येतात, खर्च वाढतो त्यावेळी त्या वर्षाचा महसूली खर्च आणि वित्तीय परिस्थिती लक्षात घेऊन त्यावर निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे गेल्या काही वर्षामध्ये सर्वसाधारणपणे एकंदर महसूली खर्च, एकंदर खर्चाची किंमत पुढे आलेली आहे. वेगवेगळया डिपार्टमेंटमध्ये निर्माण झालेल्या गरजा, एकत्रित होऊन मागणी होत असते व त्यास अनुमती देऊन एकंदर येणारी बेरीज करुन त्याची आकडेवारी काढली जाते. खरे म्हणजे एकूण उत्पन्नाच्या 25 ते 30 टक्के प्रशासनीक खर्च असला पाहिजे. न्युझिलँडचा प्रशासनीक खर्च हा 20%, 28%, 30% टक्क्यापर्यंत आहे. परंतु आपल्याकडे एकूण महसूलाच्या 49 % पर्यंत प्रशासनिक खर्च गेलेला आहे. सन 2005-2006 चा रेषो 45 असून आताचा रेषो 41 टक्के आहे. हा रेषो जसजसा कमी होईल तस तशी विकास कामांची गती वाढत जाईल.

-----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ऊसतोड कामगारांची लाखो मुले राज्यघटनेने दिलेल्या शिक्षणाच्या मुलभूत हक्कांपासून वंचित होणे.

**मु. शी** : ऊसतोड कामगारांची लाखो मुले राज्यघटनेने दिलेल्या शिक्षणाच्या मुलभूत हक्कांपासून वंचित होणे यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, सुधाकर गणगणे, गोविंदराव आदिक, धनाजी साठे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील सुमारे 8 लाखाहून अधिक संख्येने असलेले आणि ऊसतोडणीच्या हंगामात नित्यनेमाने मराठवाड्यातून स्थलांतरीत होणारे ऊसतोड आणि ऊसवाहक कामगार, तसेच गुजरात आणि कर्नाटक या राज्यात देखील मोठ्याप्रमाणात महाराष्ट्रातून स्थलांतरीत होणारे ऊसतोड कामगार व या कामगारांबरोबर मोठ्या प्रमाणात राज्यात आणि बाहेरील राज्यांमध्ये स्थलांतरीत होणारी ऊसतोड कामगारांची 6 ते 14 वयोगटातील लाखो मुले, राज्यघटनेने दिलेल्या शिक्षणाच्या मुलभूत हक्कांपासून वंचित असलेल्या या मजूरांची अजूनही आकडेवारी निश्चित करण्यासाठी शिक्षण विभागाकडून सर्वेक्षण केले न जाणे, परिणामी लाखो मुलांचे भवितव्य अंधकारमय होणे, ऊसतोडणी मजुरांच्या सर्वच मुलांना शिक्षणाचा मुलभूत अधिकार मिळावा, यासाठी स्थलांतरीत मुलांचे तातडीने सर्वेक्षण करुन त्यांच्या करिता मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या तसेच बालकल्याणाच्या योजना तातडीने राबविण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिकिया."

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, स्थलांतरीत होणारी मुले ही लाखोंच्या संख्येत आहेत. मात्र ज्या मुलांना शिक्षण मिळत आहे त्यांची संख्या अत्यंत अल्प असण्याचे कारण काय आहे? आज लाखो मुले शिक्षणापासून वंचित आहेत त्या मुलांना शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने शासनाची काय भुमिका आहे? निवेदनात म्हटले आहे की, "स्थलांतरीत होणा-या कुटुंबाचे संरक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे." सभापती महोदय, त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आखलेल्या कृती आराखडयाची माहिती माननीय मंत्रीमहोदय देतील काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, राज्यामध्ये दोन ते सव्वादोन लाख मुले शिक्षणापासून वंचित आहेत असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे परंतु आम्ही ज्यावेळेस तीन दिवसात सर्व्हे केला तेव्हा त्या सर्व्हेमध्ये 4,38,798 मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे आढळून आले. जी मुले शिक्षणापासून वंचित राहतात त्याची वेगवेगळी कारणे आहेत. काही ठिकाणी व्हीजेएनटी,एनटीचे लोक चरितार्थासाठी स्थलांतर करीत असतात. स्थलांतर करणारे जिल्हे साधारणत: 4-5 आहेत. सर्वसाधारणपणे बीड, औरंगाबाद, नगर, हिंगोली, जालना या जिल्हयातून मोठया प्रमाणात स्थलांतर होत असते व हे स्थलांतर सांगली, नाशिक, ठाणे, पुणे या जिल्हयात होत असते. हे स्थलांतर साधारणत: विट भट्टया, साखर कारखान्यांसाठी होत असते. स्थलांतराच्या संदर्भात 2 मे रोजी बंगलोर येथे एक अंतर्राज्यीय कृती दलाची बैठक झाली होती. महाराष्ट्र, गोवा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ या राज्याचे प्रतिनिधी बैठकीसाठी उपस्थित होते. यांसदर्भात 1,2,3 ऑगष्ट महिन्यात सपरेट सर्व्हेक्षण होणार आहे. शिक्षण अधिकारी 31 ऑगष्ट रोजी सर्व्हे करणार आहेत. व यामध्ये जे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले आहेत त्यांना शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाईल. साधारणत: यासंदर्भात साखर शाळा काढून अशा मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली जाईल.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आता सांगितले की, जवळपास 4 लाख 28 हजार विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. निवेदनात म्हटले आहे की, "सर्व शिक्षा अभियान" योजनेंतर्गत 15,700 विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आतापर्यंत मुख्य प्रवाहात किती विद्यार्थी आले आहेत ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, घटनेतील तरतुदीनुसार राज्यातील 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक मुलाला प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी "सर्व शिक्षा अभियान" योजनेस सुरुवात केली. खरे म्हणजे कोणत्याही मुलाची वयाच्या अडीच वर्षापासून शिकण्यास सुरुवात होते. तेव्हा आम्ही या वर्षापासून त्याकडे लक्ष देण्याचा विचार केलेला आहे. अंगणवाडी, बालवाडी येथे लहान मुलांना फक्त खाऊ न देता त्यांचेवर योग्यप्रकारे संगोपन व चांगले संस्कार होतील यासाठी अंगणवाडी शिक्षिकांना प्रशिक्षण देणार आहोत. सभापती महोदय, ऊस तोडणी कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाने काही योजना सुरु केलेल्या आहेत, जसे साखरशाळा सुरु करणे, महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र उघडणे इत्यादी योजनांचा समावेश आहे. "सर्व शिक्षा अभियान" योजने अंतर्गत 15,700 विद्यार्थ्यांनी लाभ घेतलेला आहे. मुंबई शहरातील पुलाखाली, रस्त्यावर राहणारी कुटुंबे यांचा देखील सर्व्हे करण्यात येऊन त्यांच्या मुलांना शिक्षण देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. गेल्यावर्षी 1 लाख 78 हजार 572 विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणले. कोणीही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 4 लाख मुले शिक्षणापासून वंचित आहेत. त्यापैकी 15 हजार 700 विद्यार्थ्यांना निरनिराळ्या माध्यमातून प्रवाहात आणले असल्याचे सांगितले. निवेदनात म्हटले आहे की, अहमदनगर जिल्ह्यात 39 निवासी वसतिगृहे व धुळे जिल्ह्यात 1 वसतिगृह सुरु करुन त्यामध्ये अनुक्रमे 1533 व 38 ऊस कामगारांच्या मुलांना दाखल करुन घेण्यात आलेले आहे. तसेच बीड जिल्ह्यात 9 वसतिगृहे स्वयंसेवी संस्थामार्फत सुरु करुन त्यात सुमारे 403 मुलांना दाखल करुन घेण्यात आलेले आहे. तेव्हा वसतिगृहातील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची थोडी गल्लत होत आहे. स्थलांतरीत करुन बाहेर जाणाऱ्या व शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 4 लाख आहे. मुले शाळेत न जाण्याची जी विविध कारणे आहेत त्याचा आम्ही शोध घेतला आहे. त्याची संख्या 4 लाख आहे. सर्व मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून केंद्र शासनाच्या "सर्व शिक्षा अभियान" योजने अंतर्गत काही योजना सुरु केलेल्या आहेत. या योजने अंतर्गत जवळपास 15,700 विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा लाभ घेतलेला आहे. निवेदनात म्हटल्याप्रमाणे "सन 2005-2006 या वर्षाच्या ऊसतोड हंगामाच्या कालावधीत अशाप्रकारची अधिक वसतिगृहे सुरु करुन ऊसतोड कामगारांच्या मुलांचे स्थलांतर रोखून त्यांच्या शिक्षणात खंड पडणार नाही याबाबत शासन प्रयत्नशील आहे." बीड जिल्ह्यात 9 वसतिगृहे स्वयंसेवी संस्थामार्फत सुरु करु करुन त्यात सुमारे 403 मुलांना दाखल करण्यात आलेले आहे. जर स्वयंसेवी संस्थाकडून अशाप्रकारचे प्रस्ताव आल्यास त्यास मान्यता देण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. ऊस तोडणी कामगारांबरोबर त्यांच्या मुलांना ठिकठिकाणी प्रवास करावा लागतो. निवेदनात म्हटले आहे की,"ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरासोबत होणाऱ्या मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे." सभापती महोदय, ऊस तोडणी कामगारांना कंत्राटदाराने कॉन्ट्रॅक्टमध्ये बांधून ठेवलेले असल्यामुळे सरकारच्या योजना फिजिकली सक्सेस होत नाहीत. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, जी मुले स्थलांतरीत करुन दुसऱ्या शाळेत जातात तेव्हा त्या मुलांना ट्रान्स्फर सर्टीफिकेट देण्याची व्यवस्था केलेली आहे काय ? दोन ते सहा वयोगटातील मुलांना पोषण आहार दिला जातो का ?

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 14:30

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, 1ते 6 या वयातील मुलांना चांगला पोषण आहार मिळण्याच्या दृष्टीने योग्य ती दखल घेतली जाईल. तसेच, दुसरे असे की, ज्या ठिकाणाहून मुले दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात अशा दोन्ही ठिकाणी स्वतंत्र सेल निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल व मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल. तसेच, साखर कारखान्यांच्या संदर्भात असे सांगू इच्छितो की, कारखान्यांच्या ठिकाणी शाळा सुरु करण्यात आल्या, परंतु त्यास पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे याबाबतीत आपण पर्यायी व्यवस्था करु एवढे याठिकाणी मी सांगू इच्छितो.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, सध्या राज्यातील 13 साखर कारखान्यांच्या परिसरामध्ये साखर शाळा सुरु केल्या. माझा असा प्रश्न आहे की, राज्यामध्ये एकूण साखर कारखाने किती ? व प्रत्येक मोठया साखर कारखान्यांच्या ठिकाणी साखर शाळा शाळा चालविण्यासाठी आपण त्यांना कम्प्लशन करणार का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आपण साखर कारखानदारांना निश्चितपणे विनंती करणार आहोत की, शिक्षणापासून मुले वंचित राहू नये या दृष्टीने सर्वांनी कायमस्वरुपी शाळा सुरु करणे गरजेचे आहे. त्यामुळे याबाबतीत आपण पर्यायी व्यवस्था करणार आहोत.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये म्हटले आहे की, "अहमदनगर जिल्हयात 39 निवासी वसतिगृहे व धुळे जिल्हयात 1 वसतिगृह जिल्हा परिषदेमार्फत सुरु करुन त्यामध्ये अनुक्रमे 1,533 व 38 ऊसतोड कामगारांच्या मुलांना दाखल करुन घेण्यात आले आहे." याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, ती वसतिगृहे सुरु आहेत का, ती मुले त्या शाळांमध्ये शिक्षण घेतात का व त्यातील किती मुले पास झाली ? दुसरा प्रश्न असा की, ऊसतोड कामगार ज्या तालुक्यांतून, जिल्हयातून येतात, त्या मुलांच्या शिक्षणासाठी आपण त्याच तालुक्यांमध्ये वसतिगृहामध्ये व शिक्षणाची सोय करण्यासंबंधी शासन विचार करेल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, याठिकाणी नम्रपणे मान्य केले पाहिजे की, आपण कितीही शाळा निर्माण केल्या तरी या कामगारांची मुले एकाच शाळेमध्ये शिक्षण घेतील अशी परिस्थिती नाही.याबाबतीत वसतिगृहांची निर्मिती करुन वसतिगृहांची संख्या वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचा प्रश्न विचारला. घटनात्मक

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके....

आणि दर्जेदार शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करीत आहोत. मागील वर्षामध्ये याबाबतीतील पहिला प्रयोग आपण बीड जिल्हयामध्ये केलेला असून तो 100 टक्के यशस्वी झालेला आहे. त्याठिकाणी शिक्षणाधिकाऱ्यांनी वसतिगृहाची निर्मिती केलेली आहे. याबाबतीतील आपल्याला खरेच न्याय द्यावयाचा असेल तर निवासी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, ते आम्ही करतो. ही मुले जेव्हा शाळेमध्ये जातात तेव्हा त्याठिकाणी त्यांचा गुणात्मक विकास होतो किंवा नाही याबाबतचा आढावा घेतला जाईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ज्या तालुक्यांतून, जिल्हयांतून अशा प्रकारचे ऊसतोड कामगार जात असतील तर त्याच तालुक्यांमध्ये, जिल्हयांमध्ये या ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी जास्तीत जास्त संख्येने निवासी शाळा सुरु करुन त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली जाणार का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, ज्या ज्याठिकाणी साखर कारखाने असतील त्या त्याठिकाणी वसतिगृहांची व्यवस्था करण्यात येईल व त्याठिकाणी अशा प्रकारची शाळा सुरु करण्याच्या दृष्टीने व्यवस्था केली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मुलांच्या गुणवत्तेच्या विकासाचा मुद्दा मान्य केला आहे. परंतु याठिकाणी ज्या अनौपचारिक शाळा आहेत, त्या ताबडतोब बंद झाल्या पाहिजेत व या सर्व मुलांसाठी औपचारिक शिक्षण दिले पाहिजे. असे जर केले नाही तर ही मुले मेन स्ट्रीममध्ये येणार नाहीत.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..........

15 हजार मुलांपैकी किती पास झाले याची आकडेवारी माननीय मंत्रीमहोदयांकडे नाही. स्वयंसेवी संस्थांकडून फार मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे अनौपचारिक शाळांची परवानगी रद्द करुन त्या ठिकाणी औपचारिक शाळांना परवानगी देण्यात येईल काय ?

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदय, त्याही पलिकडे जाऊन मी सांगणार आहे की, केवळ अनुदान मिळते म्हणून शाळा चालविणा-या संस्थाकडे देखील शासनाचे लक्ष आहे. या मुलांना औपचारिक शिक्षणाकडे वळविणे गरजेचे आहे. जिल्हया जिल्हयात खाजगी संस्थांमार्फत ज्या शाळा सुरु आहेत अशा 96 शाळांना नोटीस देण्यात आलेली आहे. ज्यांनी अनुदान लाटले त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

-----------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

## <u>विशेष उल्लेख</u>

**पृ. शी.**:आदिवासी तालुक्यातील उच्च शिक्षणाच्या संदर्भात होणारी परवड

**मु. शी.**:आदिवासी तालुक्यातील उच्च शिक्षणाच्या संदर्भात होणारी परवड याबाबत श्री.रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग पदविधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विक्रमगड या आदिवासी तालुक्यातील उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात होणारी परवड या विषयासंबंधी विशेष उल्लेखाच्या सूचनेअन्वये सभागृहाचे लक्ष वेधत आहे. विक्रमगड हा आदिवासी तालुका असून या तालुक्यात सुमारे 17 माध्यमिक शाळा आहेत. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर अनेक विद्यार्थी विज्ञान व वाणिज्य शाखेकडे प्रवेश घेण्यास इच्छुक असतात. दुर्देवाने, या आदिवासी तालुक्यात विज्ञान व वाणिज्य शाखेचे वर्ग नसल्याने अनेक होतकरु गुणवंत आदिवासी विद्यार्थी विज्ञान शाखेच्या उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. या वर्षी 17 शाळांमधून 869 मुलांनी दहावीची परीक्षा दिली. 427 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून 139 विद्यार्थी 60 टक्केपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. तथापि, विज्ञान शाखेची उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण घेण्याचा मुलभूत अधिकार हिरावून घेण्यात आला आहे. अनेक संस्था विज्ञान शाखेचे उच्च माध्यमिक विभागाचे वर्ग सुरु करण्यास तयार असूनही शासनाने दुर्लक्ष केले आहे. आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासाचा विचार करता खास बाब म्हणून विक्रमगड तालुक्यात किमान 1/2 शाळांना तरी विज्ञान शाखेचे उच्च माध्यमिक विभागाचे वर्ग सुरु करण्याबाबत शासनाने सकारात्मक विचार करावा, अशी विनंती करीत आहे. उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु असणा-या कला शाखेच्या वर्गाबरोबर विज्ञान शाखेचे वर्ग सुरु करण्यास संमती देण्याबाबत विनंती आहे."

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी नोंद घ्यावी.

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी** :महाराष्ट्रातील ऑनलाईन लॉटरीमुळे जनतेची व शासनाची होणारी फसवणूक व कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार

**मु. शी.**:महाराष्ट्रातील ऑनलाईन लॉटरीमुळे जनतेची व शासनाची होणारी फसवणूक व कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, भारताच्या ईशान्येकडील राज्याच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून ऑनलाईन लॉटरी ठेकेदार महाराष्ट्रात लॉट-या चालवितात व त्याची रॉयल्टी ती राज्ये घेतात. त्या राज्याचे महाराष्ट्रातील लॉटरीवर कोणतेही नियंत्रण नसते. अनेक वेळा चार सोडतीची परवानगी घेतली जाते व 15 सोडती काढतात. एक सोडत यंत्रावर 10 घरे असतात. त्यातील ज्या घरातील क्रमांक सोडतीत लागून ग्राहाकाला बक्षिस मिळण्याची शक्यता असते ते घर हाऊसफुल दाखविले जाते व उरलेल्या 9 घरांवर ग्राहक 10 रुपये ते 550 रुपये पर्यन्त तिकिटे घेऊन सोडत खेळत असतात आणि सर्वस्व गमावतात. अशा लाखो रुपयांच्या सोडती खेळल्या जातात व लोकांची फसवणूक होते. ज्या राज्यातील लॅाटरी असते त्याच ठिकाणी सर्व्हर असावे लागतात. परंतु ते सर्व्हर महाराष्ट्रात आहेत. यामुळे नशिबाने सोडत न लागता मनाप्रमाणे सोडतीचे क्रमांक ठरवून (फिक्सिग) ग्राहकांना लाखो रुपयांला लुटले जाते. दर 15 मिनिटात सोडत निघते. तेंव्हा प्रत्येक सोडतीच्या निकालाची प्रत (गॅझेट कॉपी) महाराष्ट्रातील 25 हजार विक्रेत्यांना सोळाव्या मिनिटाला मिळाली पाहिजे असे कायदेशीर बंधन असतांना या निकालाची प्रत केंव्हाच दिली जात नाही व सर्वांना अंधारात ठेवले जाते. महाराष्ट्र शासनाने या गॅझेट कॉपीचा आग्रह धरणे आवश्यक आहे. त्यामुळे कोटयावधी रुपयांचा फायदा शासनाला होईल. दर 15 मिनिटांनी निघणा-या सोडतीची विकली गेलेली व न विकल्या गेलेल्या तिकिटांचा हिशोब हे लॉटरी

..4..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण............

ठेकेदार दाखवित नाहीत. परिणामत: लाखो रुपयांचा शासनाचा विक्रिकर बुडतो. महाराष्ट्रात सुमारे 2 हजार सोडत दिवसाला निघतात. त्याचप्रमाणे या ऑनलाईन लॉटरी तिकिटांची छपाई होत नाही. त्यामुळे शासनाची व ग्राहकांची कोटयावधी रुपयांची फसवणूक होते. महाराष्ट्रात चालणा-या देशातील अन्य राज्यांना या लॉटरीची रॉयल्टी मिळते परंतु त्यांची येथील गैर प्रकारावर फसवणूकीवर व जनतेच्या होणा-या लुटमारीवर कोतेही कायदेशीर नियंत्रण नसते. परंतु या गैरप्रकारामुळे महाराष्ट्र शासनाचा कोटयावधी रुपयांचा विक्रिकर बुडतो. आणि महाराष्ट्रातील नशीबाने श्रीमंत होण्याची हौस असणा-या लॉटरी खेळणा-या लाखो लोकांची फसवणूक होऊन ते आर्थिकदृष्टया लुबाडले जातात व त्यांचे संसार उद्ध्वस्त होतात."

**तालिका सभापती** : मंत्रीमहोदयांनी नोंद घ्यावी.

--------------

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जेजुरी येथील खंडोबा देवस्थानातील गैरकारभाराबाबत.

**मु.शी.** : जेजुरी येथील खंडोबा देवस्थानातील गैरकारभाराबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.निलम गो-हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"पुणे जिल्हयातील जेजुरी येथील खंडोबा देवस्थानाबाबत 9 जुलै, 2006 पासून 7 भागांची लेखमालिका प्रकाशित केली आहे. या लेखमालिकेत दर्शन मंडप, क्लोज सर्किट टिव्ही, नामफलक, चप्पल स्टँड, मल्हार महोत्सव याबाबतच्या गैरव्यवहाराबद्दत दैनिक पुढारी या वर्तमान पत्राने प्रकाशझोत टाकला आहे. यापूर्वी यासंदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. यापूर्वी देवाच्या मर्तीचीही चोरी झाली होती. मराठा विकास संघाचे जुजुरी शहर अध्यक्ष यांनी भाविकांना सुविधा देण्यासाठी लाखो रुपयांचा निधी जमा केला असून त्याचा कोणताही विनीयोग केलेला नाही. त्याबात शासनाने धर्मादाय आयुक्तांमार्पत चौकशी करणे आवश्यक आहेच. त्याच बरोबर ग्रामविकास विभाग, विधी व न्याय विभागाने योग्य त्या विश्वस्तांची नियुक्ती करावी याकडे मी विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधत आहे. ही लेखमाला चालविणारे पत्रकार श्री.नितीन राऊत व दै.पुढारी यांचा मी विशेष उल्लेख करत आहे. विवाहाचे पवित्र बंधन देवाकडे नोंदविणारा हा देव खंडोबा यांचे पावित्र्य राखावे व महाराष्ट्राचे वैभव, रक्षणकर्ता म्हणजे मल्हारी यांचेच रक्षण करण्याची वेळ आलेली आहे याकडे मी लक्ष वेधत आहे. भाविकांची सोय, सुविधा, मंदीराचे पावित्र्य, सुरक्षितता या सर्व मुद्यांची धर्मादाय आयुक्तांकडून दखल घेतली जावी, अशी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

**तालिका सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

--------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेखाच्या सूचनेबाबत.**

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नांदेडमध्ये आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या घरी दारुची पार्टी झाली याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना दिली होती. तशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रामध्ये आली होती. परंतु मी त्याबाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता सदरहू घटना वस्तुस्थितीला धरुन नाही असे माझ्या निदर्शनास आले आहे. तरी मी आपली क्षमा मागतो आणि माझी विशेष उल्लेखाची सूचना मागे घेतो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : वरळी, नायगाव व ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील बी.डी.डी.चाळीतील कामगार कल्याण मंडळाच्या कर्मचा-यांना सन 1940 मध्ये दिलेल्या खोल्या खाली करण्याच्या दिलेल्या नोटीसा.

**मु.शी.** : वरळी, नायगाव व ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील बी.डी.डी.चाळीतील कामगार कल्याण मंडळाच्या कर्मचा-यांना सन 1940 मध्ये दिलेल्या खोल्या खाली करण्याच्या दिलेल्या नोटीसा याबाबत श्री.विलास अवचट, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विलास अवचट (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील बी.डी.डी. चाळीतील 19 खोल्या शसनाने 1940 मध्ये कामगार कल्याण मंडळाच्या कर्मचा-यांसाठी दिल्या आहेत. सदर खोल्या आपल्या मागासवर्गीय कर्मचा-यांना राहण्यासाठी दिल्याने तेथे वर्षानुवर्षे राहत असून आता या खोल्या तात्काळ खाली करण्याच्या नोटीसा गृहनिर्माण मंडळाने बजावल्याने भर पावसाळयात सदर कर्मचा-यांवर बेघर होण्याची आलेली पाळी, याबाबतीत विशेष म्हणजे सदर खोल्या कामगार कयाण मंडळाच्या कर्मचा-यांच्या नावे करण्याचा मुख्यमंत्र्यांनी आदेश गृहनिर्माण मंडळाने फेटाळून लावून सदर खोल्या खाली करण्याच्या नोटीसा देऊन मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचा केलेला अवमान लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तात्काळ वस्तुस्थितीनिष्ठ व मागासवर्गीय कर्मचा-यांना दिलासा देण्याबाबत निवेदन करावे."

**तालिका सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भायखळा येथील कमर सानुम हॉस्पिटल हे महिलांचे प्रसुतीगृह दिनांक 1 डिसेंबर, 1996 पासून इमारत दुरुस्तीच्या नावाखाली महापालिकेने बंद केल्याबाबत.

**मु. शी.** : भायखळा येथील कमर सानुम हॉस्पिटल हे महिलांचे प्रसुतीगृह दिनांक 1 डिसेंबर, 1996 पासून इमारत दुरुस्तीच्या नावाखाली महापालिकेने बंद केल्याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"भायखळा येथील कमर सानुम हॉस्पीटल (संत सावता पथ क्र.3, भायखळा, मुंबई) हे हॉस्पीटल महिलांचे प्रसुतीगृह म्हणुन प्रसिध्द होते. दिनांक 1 डिसेंबर, 1996 पासून इमारत दुरुस्तीच्या नावाखाली महानगरपालिकेने हे हॉस्पीटल बंद केले. स्थानिक लोकांनी हॉस्पीटल सुरु ठेवण्यात यावे यासाठी मोर्चे, आंदोलने केली असता सदर हॉस्पीटल इमारत दुरुस्तीसाठी बंद करण्यात आले असून दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर पूर्ववत ते सुरु करण्यात येईल असे सांगण्यात येवून महानगरपालिकेने हे हॉस्पीटल सन 1996 पासून 2004 पर्यंत बंद ठेवले.

त्यानंतर अचानकपणे महानगर पालिकेने स्थानिक लोकांना काहीएक न सांगता त्यांना विश्वासात न घेता बालाजी मेडीकल ग्रुप या खाजगी संस्थेला त्यांच्या सोयीनुसार चालविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आले. हॉस्पीटलचे कमर सानुम हे जूने नाव बदलवून त्याला बालाजी हॉस्पीटल असे नाव देण्यात आले.

मुंबई शहरामध्ये महिलांच्या प्रसुतीसाठी हे एकमेव प्रसिध्द हॉस्पीटल होते. बालाजी ग्रुपने या ऐतिहासिक वास्तूचा दर्जा असलेल्या हॉस्पीटलच्या मूळ बांधकामात अनेक प्रकारचे बदल करुन अनधिकृत बांधकाम सुध्दा केले आहे.

सदर हॉसपीटलला सध्या पंचतारांकित स्वरुप देण्यात आले असून फक्त श्रीमंत लोकांसाठीच हे हॉस्पीटल उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....5/-

प्रा.जोगेंद्र कवाडे .........

ऐतिहासिक वास्तुचा दर्जा असलेल्या हॉस्पीटलच्या इमारतीच्या बांधकामात आणि हॉस्पीटल प्रशासनाच्या हस्तांतरणात मोठा गैरव्यवहार झाला असून याची चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर कारवाई करावी. तसेच, मुंबई महानगर पालिकेने सदरहू हॉस्पीटल पुन:श्च आपल्या ताब्यात घेऊन ते पूर्ववत महिलांचे प्रसुतीगृह हॉस्पीटल म्हणून सुरु करण्याचे तात्काळ निदेश शासनाने घावेत, अशी मागणी प्रस्तुत विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

**तालिका सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

--------

**(सभापतीस्थानी : माननीय उपसभापती)**

यानंतर श्री.सुंबरे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सुधारित तुळजापूर पाणी पुरवठा योजना, जिल्हा उस्मानाबाद या 2.59 कोटी रूपये खर्चाच्या कामाची देयके कंत्राटदारांना न मिळाल्यामुळे त्यांच्यात पसरलेली नैराश्याची भावना.

**मु. शी.** : सुधारित तुळजापूर पाणी पुरवठा योजना, जिल्हा उस्मानाबाद या 2.59 कोटी रूपये खर्चाच्या कामाची देयके कंत्राटदारांना न मिळाल्यामुळे त्यांच्यात पसरलेली नैराश्याची भावना याबाबत प्रा.शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य प्रा. शरद पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" सुधारित तुळजापूर पाणीपुरवठा योजना जिल्हा उस्मानाबाद या रूपये 2 कोटी 59 लाख रूपये खर्चाचे काम करण्याचे`आदेश 1986 वेगवेगळ्या कंत्राटदारांना देण्यात आले होते. काम करीत असताना स्थानिक मागणीनुसार व परिस्थितीनुसार वेळोवेळी मूळ आराखड्यामध्ये वाढ व बदल केल्यामुळे योजना पूर्ण होईपर्यंत वाढीव काम व वाढलेला कालावधी यामुळे या योजनेसाठी मंजूर रकमेपेक्षा 1 कोटी 12 लाख रूपये अधिक खर्च करावा लागला. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सदरच्या वाढीव खर्चास शासनाची मान्यता घेतली नाही. योजनेवर झालेल्या वाढीव खर्चास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने योग्य वेळी शासनाकडून मान्यता घेण्यात कुचराई केली. परिणामी ज्या कंत्राटदारांनी ही कामे केलेली होती त्यांनी आपली देयके देण्याबाबत तगादा लावल्यानंतर वाढीव खर्चाच्या मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. परंतु शासनाने त्यास मान्यता दिली नाही. त्यामुळे योजनेचे काम 1989 साली पूर्ण होऊन ही योजना नगरपरिषदेकडे 1991 साली हस्तांतरित करण्यात आली. तरीही कंत्राटदारांची देयके न मिळाल्या- मुळे त्यांच्यात झालेली नैराश्याची भावना व शासनाने त्याबाबत करावयाची कारवाई."

****

....... टीटी 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे ओवळा, ता.ठाणे येथील मे.कॉसमॉस स्टोनप क्वारी यांनी परवाना क्षेत्राबाहेर जाऊन केलेले अनधिकृत उत्खनन.

**मु. शी.** : मौजे ओवळा, ता.ठाणे येथील मे.कॉसमॉस स्टोनप क्वारी यांनी परवाना क्षेत्राबाहेर जाऊन केलेले अनधिकृत उत्खनन याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मौजे ओवळा, ता.ठाणे येथील सर्व्हे नं.208 पै. नवीन 4 पै. क्षेत्र 10.62.5 हे. पैकी 2.00.0 इतक्या क्षेत्रामध्ये मे.कॉसमॉस स्टोन क्वारी यांना मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 चे नियम 5 अन्वये दिनांक 16 एप्रिल 2001 रोजी पासून 5 वर्षांकरिता खनिपट्टा मंजूर करण्यात आलेला होता. तथापि या क्षेत्राबाहेर जाऊन सदर कंपनीने 42,912 ब्रास दगडाचे अनधिकृतपणे उत्खनन केले होते.

याबाबत जिल्हाधिकारी,ठाणे यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली असता जिल्हाधिकारी,ठाणे यांनी मे.कॉसमॉस स्टोन क्वारी यांना वादग्रस्त क्षेत्रात उत्खनन केल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल नियम 1966 च्या कलम 48(7) अन्वये बाजारभाव किंमतीच्या तिप्पट दंडाची रक्कम वसूल का करण्यात येऊ नये अशी नोटीस देण्यात आली.

पहिली नोटीस दिनांक 16 एप्रिल 2005 ला देण्यात आली व त्यात मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 च्या कलम 18)13) व 18 चा भंग केल्याबद्दल उपरोक्त खनिपट्टा रद्द का करण्यात येऊ नये अशी विचारणा करण्यात आली व याचा खुलासा 14 दिवसात करण्यास सांगितले गेले. दुसरी नोटीस दिनांक 30 मे 2005 रोजी देण्यात येऊन महाराष्ट्र जमीन महसूल नियम 1966 च्या कलम 48 (7) अन्वये बाजारभाव किंमतीच्या तीन पट दंडाची रक्कम वसूल का करण्यात येऊ नये अशी विचारणा करण्यात आली व याचा खुलासा नोटीस मिळाल्यापासून 7 दिवसात करण्यास सांगण्यात आले.

...... टीटी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

मे.कॉसमॉस स्टोन क्वारी यांनी यापैकी कोणत्याही नोटीशीची अद्याप पावेतो दखल घेतलेली नाही. एवढेच नव्हे तर भूविज्ञान व खनिकर्म विभागाचे सर्व्हेअर दिनांक 15 मार्च 2005 रोजी वादग्रस्त जागेतील खाणीची मोजमापे घेण्यास गेले असता मे.कॉसमॉस स्टोन क्वारीच्या माणसांनी त्यांना मज्जाव केला व मोजमापे घेऊ दिली नाहीत.

अनधिकृत उत्खननाप्रमाणेच बेकायदेशीर विस्फोटक साहित्य जवळ बाळगणे, साठा करणे, हाताळणे व स्फोट घडविणे हा कायदेशीर गुन्हा असताना या कंपनीने बिनदिक्कतपणे या भागात स्फोट घडवून आणले आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... यूयू 1 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

खनिकर्म विभागाच्या अधिकाऱ्यांनीही जिल्हाधिकारी, ठाणे यांना या प्रकरणी आपला चौकशी अहवाल सादर केला आहे. या अहवालात 43,912 ब्रास दगड उत्खनन करण्यात आलेले असल्यामुळे मुंबई प्रांतिक अधिनियम 1966 चे कलम 48 (7) नुसार ही कॉरी बंद करावी व याच अधिनियमाच्या कलम 18 (18) अन्वये दंडात्मक कारवाई करावी, असे नमूद केलेले आहे.

असे असतांना हे उत्खनन आज देखील दिवसरात्र सुरु आहे. सर्वसाधारणपणे विनापरवाना 2 ब्रास दगडास (1 गाडी) रु.7,848/- प्रमाणे 42,912 ब्रास दगडासाठी दंडाची एकूण रक्कम रु.16,87,32,000/- (16 कोटी 87 लाख 32 हजार) इतकी होते व ही रक्कम या कंपनीकडून वसूल करण्यात यावी असे खनिकर्म अधिकाऱ्यांनी सूचित केले तथापि अद्यापपावेतो या कंपनीने कोणाचेही ऐकलेले नाही.

विशेष म्हणजे ठाणे (जिल्हा) कॉंग्रेस कमिटी सचिव श्री.सुरेश पाटीलखेडे यांनी दिनांक 26 जून 2006 रोजी या प्रकरणी अशोक चव्हाण, उद्योग खनिकर्म यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार केलेली असतांना देखील त्याचीही दखल घेण्यात आलेली नाही. या प्रचंड भ्रष्टाचाराचे रक्षणकर्ते व पालनकर्ते कोण आहेत याचा उलगडा व्हावा यासाठी हे प्रकरण मी या विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणत आहे.

**उपसभापती** : तीन वेळा नोटीस देऊन सुध्दा कारवाई केली जात नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांना त्यांची मशिनरी जप्त करण्यास आपण सांगावे आणि त्यासंबंधी कडक कारवाई करुन उद्या संध्याकाळपर्यंत अहवाल सादर करण्यास सांगावे.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, होय.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन: भरेल.

(2.51 ते 3.30 मध्यंतर)

........

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी उपसभापती)**

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये विशेषत: मुंबई शहरातील सुशिक्षित बेरोजगारांना उपजीविकेचे साधन म्हणून युती शासनाच्या काळामध्ये "झुणका भाकर" केंद्रे दिलेली होती.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

ती झुणका भाकर केंद्रे त्यानंतर शासकीय निर्णयाप्रमाणे रद्द केली. त्यानंतर त्यातील काही झुणका भाकर केंद्रांचे प्रमुख एकत्र आले आणि त्यांनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. त्यातील 240 झुणका भाकर केंद्रांनी केलेल्या अपिलाला सर्वोच्च न्यायालयामध्ये यश आले. सर्वोच्च न्यायालयामध्ये जो निर्णय होतो तो सर्वसामान्यपणे सगळीकडे कायदा म्हणून वापरला जातो किंवा तो निर्णय सगळीकडे लागू केला जातो. त्या निर्णयावर सरकारने असा युक्तिवाद केला की, हे 240 सोडून बाकीची झुणका भाकर केंद्रे काढावयाची आहेत. 240 केंद्राचे लोक कोर्टात गेले असतील परंतु सर्वांचे प्रतिनिधी म्हणून ते कोर्टात गेले होते. ही शासनाची योजना होती आणि या या पध्दतीने त्या केंद्रांच्या बाबतीत सरकारने हा निर्णय घेतलेला आहे, त्यांच्या स्वत:च्या उपजीविकेवर परिणाम होणार आहे, हे सर्व याचिकेमध्ये म्हटलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिला. त्यावेळी शासनाने असे ठरविले की, ही 240 केंद्रे सोडली तर बाकीची केंद्रे तोडावयास हरकत नाही. कोर्टाचा एखादा निर्णय आल्यानंतर सर्वसामान्यपणे तो निर्णय त्या क्षेत्रातील सर्वांना लागू करावयाचा अशा प्रकारचा तो कायदा बनत असतो. शासनाने झुणका भाकर केंद्रे तोडण्याचा प्रयोग केला. या सदनामध्ये आमचे गट नेते श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी 28.3.2006 रोजी या सभागृहामध्ये हा मुद्दा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला होता. त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असताना शासनाची परिस्थिती माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्यानंतर आपण स्पष्ट निदेश दिले की, 240 लोकांना जो न्याय दिलेला आहे तोच न्याय सर्व झुणका भाकर केंद्रांना लागू झाला पाहिजे. कारण तो कोर्टाचा निर्णय आहे. कोर्टात हे गेले, ते गेले असे होता कामा नये. हे निदेश आपण दिले. त्यानंतर पुन्हा औचित्याच्या मुद्याची नोटीस दिली. ही नोटीस दिल्यानंतर आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अकोल्याला 3 झुणका भाकर केंद्रे पाडून टाकली. ही तक्रार घेऊन मी आपल्याकडे आलो होतो. आपल्या निदेशाचे जे नोटींग होते ते आयुक्तांना पाठविले आणि त्यांना सांगितले की, अशा प्रकारे सदनामध्ये सरकारने निर्णय सांगितलेला आहे आणि सरकार याबाबतीत निश्चित स्वरुपामध्ये धोरणात्मक निर्णय घेत आहे, तोपर्यंत अशा प्रकारची कारवाई करणे अयोग्य आहे. मी त्यांना सांगितले की, सदनामध्ये तुमच्याविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव येऊ शकतो. त्यानंतर पाडलेली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ D/

श्री. दिवाकर रावते ....

झुणका भाकर केंद्रे पुन्हा उभी करण्याची परवानगी त्या आयुक्तांनी दिली. त्यानंतर मुंबईच्या सर्व झुणका भाकर केंद्राचे काम चालू झाले. जिल्हाधिकाऱ्यांनी महापालिकेला कळविले की, ही केंद्रे आठ दिवसात रिक्त करा. त्यानंतर मी आपल्याकडे आलो. ते सर्व लोक आपल्याला भेटले होते. सदनामध्ये औचित्याचा मुद्दा काढल्यानंतर आपल्या निदेशाचा पुनरुच्चार केला. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांकडून माझ्याकडे फाईल आलेली आहे आणि लवकरात लवकर मंत्रिमंडळामध्ये तातडीने निर्णय घेऊ. ही झुणका भाकर केंद्रे धोरणात्मकरित्या चालू ठेवावी या स्वरुपाच्या निर्णयाप्रत शासन आलेले आहे. फक्त त्याला मंत्रिमंडळामध्ये मान्यता देण्याची तांत्रिक बाब राहिलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये आपल्या निदेशानंतर आधी 48 तासाची नोटीस दिली. काल 24 तासाची नोटीस दिली. मुंबईच्या हद्दीमध्ये महापालिका आयुक्ताकडून नोटीस जात आहे. आपणही यासंदर्भात माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. तटकरे साहेबांना लिहिले होते की, "उपरोक्त विषय व संदर्भाबाबत आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्याप पर्यंत माझ्याकडे प्राप्त झालेला नाही. तसेच सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात देखील यासंदर्भात औचित्याच्या मुद्याव्दारे सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित करुन हक्कभंग प्रस्ताव आणण्याबाबत सूचित केलेले आहे. झुणका भाकर केंद्रांना मुंबई मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नोटीसा बजावण्याचे काम सुरु असून त्यामुळे विधान परिषद सभागृहात झालेल्या निर्णयाचे पालन होत नसल्याचे माझ्या निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे. उपरोक्त विषयात आपण तातडीने व जातीने लक्ष घालून विधिमंडळ सदस्यांनी सभागृहामध्ये केलेल्या मागणीच्या आधारे व उपरोल्लेखित संदर्भाधिन पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने झुणका भाकर केंद्राच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक योग्य ते आदेश द्यावेत. असे पत्र आपण 10.7.2006 ला माननीय मंत्रिमहोदय श्री. तटकरे साहेबांकडे पाठविले. त्यानंतरही त्यांना नोटीस देण्याचे हे काम चालू राहिले. विधानसभेचे विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम यांनी माननीय मंत्रिमहोदयांना आणि माननीय मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात पत्र दिले. यासंदर्भात पत्र दिल्यानंतर सहआयुक्त, आर/मध्ये यांनी नोटीस दिलेली आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

सहआयुक्त यांनी पाठविलेल्या नोटीसीमध्ये असे म्हटलेले आहे की, तहसिलदार बोरिवली यांनी त्यांच्या उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये असे कळविले आहे की, सर्वाच्च न्या ालयाच्या स्थगिती आदेशा व्यतिरिक्त अन्य झुणकाभाकर केंद्रे ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.15.7.2006ची म्हणजे तीन दिवसापूर्वीची ही नोटीस आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशाव्यतिरिक्त अन्य झुणका भाकर केन्दे ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात यावी. सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयामध्ये एकाद्या विषयासंबंधीच्या ज्या ज्या केसेस दाखल होतात त्यासंदर्भातील निर्णय त्या सर्व केसेसना लागू होतो. आता सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज संगणक प्रणालीवर झालेले आहे. एखाद्या केसचे हिअरिंग करावयाचे असेल तर संगणकावर त्या विषयाच्या जेवढ्या केसेस असतील त्या एकाच दिवशी घेतल्या जातात. मग त्या 50 केसेस असोत वा 100 केसेस असोत. एका केसच्या बाबतीत दिलेला निर्णय सर्व केसेसना लागू होतो. कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतूद असेलही की, एकाच प्रकारचे अनेक रिटस् असतील तर त्या रिटस् एकाच वेळी ऐकल्या जातात आणि दिलेला निर्णय सर्व रिटस्ना लागू होतो. सर्वोच्च न्यायालयाने एका केसमध्ये घेतलेला निर्णय तशा प्रकारच्या सर्व रिटस्ना लागू होतो अशा प्रकारची कार्यप्रणाली सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारलेली आहे. शासन मात्र या झुणका भाकर केन्द्राच्या बाबतीत मूग गिळून गप्प बसून आहे. शासनाने झुणका-भाकर केन्द्रांना न्याय दिला असेल तर तो या सभागृहामध्ये योग्य पध्दतीने सांगावा. तसेच झुणका-भाकर केन्द्राना दिलेल्या नोटीसा आजच्या आज तातडीने मागे घेण्यात याव्यात. तसेच हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये आणून तातडीने निर्णय घ्यावा आणि या झुणका भाकर केन्द्रांना मान्यता द्यावी अशी मी उपसभापती महोदय, आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

**उपसभापती** : मागील अधिवेशनामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने 240 केसेसच्या बाबत निर्णय दिलेला होता. त्याबाबतीत मी असा निदेश दिलेला होता की, जरी एखाद्या केसच्या बाबतीत निर्णय दिला गेला असला तरी अशा प्रकारची कोणतीही झुणका भाकर केन्द्रे पाडण्याची कारवाई करु नये. अशा प्रकारचे स्पष्ट निदेश देऊन देखील न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन अशा प्रकारच्या नोटीसेस दिल्या जातात. तेव्हा अशा प्रकारच्या नोटीसेस रद्द करुन त्या मागे घेण्याचे अधिका-यांना कळविण्यात यावे.

..2..

श्री. सुनील तटकरे : सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी झुणका भाकर केद्रासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. हा प्रश्न जेव्हा सभागृहामध्ये उपस्थित झाला होता त्यावेळी शासनाचे म्हणणे सभागृहासमोर ठेवण्यात आलेले होते. या झुणका भाकर केन्द्रांच्या चालकांना सहकार्य करावे हा उद्देश मनामध्ये निश्चितपणे आहे. परंतु हे प्रकरण जेव्हा न्यायालयामध्ये गेले त्यावेळी उच्च न्यायालयामध्ये जेवढे अर्ज करण्यात आलेले होते त्या सर्व अर्जांच्या बाबतीत स्थगिती देण्यात आली. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर 240 झुणका भाकर केन्द्राच्या चालकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्या याचिकेपुरतीच सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. उरलेल्या झुणका भाकर केन्द्रांच्या बाबतीत सरकार निर्णय घेण्यास मोकळे आहे असे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे. ही सर्व झुणका भाकर केन्द्रे केव्हा सुरु झाली, केव्हा बंद झाली या तपशीलामध्ये मी जाऊ इच्छित नाही. आता माननीय उपसभापतींनी निदेश दिलेले आहेत. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, या प्रकरणी पुन्हा एकदा मंत्रिमंडळापुढे जाऊन, माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्यात येईल. तसेच माननीय उपसभापतींनी जे निदेश दिलेले आहेत त्यानुषंगाने ज्या ज्या अधिका-यांनी झुणका भाकर केन्द्रे ताब्यात घेण्याचे कळविले असेल त्याबाबतीत त्यांना योग्य त्या सूचना देण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : उपसभापती महोदय, या सदनामध्ये याबाबतीत चर्चा झाली होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने आपण निदेश दिले होते आणि त्या निदेशांचे पालन होण्याची आवश्यकता होती.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 15:45

श्री.मधुकर सरपोतदार..........

पण हे निदेश धुडकावून सहाय्यक महापालिका आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून संबंधित लोकांना नोटीसेस दिल्या जातात आणि त्यासंबंधी कारवाई केली जाते. या संदर्भात मी स्वत: 10 जुलै रोजी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. मी स्वत: मंत्रीमहोदयांना सांगितले आहे की, मला नाईलाजाने तुमच्याविरुध्द हक्कभंगाची सूचना द्यावी लागत आहे. काल मी सन्माननीय सभापतींना या प्रस्तावासंबंधी बोललो होतो तेव्हा ते म्हणाले की, ही बाब तपासून पाहिल्यानंतर त्यावर योग्य ती कारवाई केली जाईल. या प्रकरणात फाटे फुटू नयेत या दृष्टीकोनातून मंत्रीमहोदयांनी मंत्रिमंडळासमोर जाऊन योग्य तो निर्णय घ्यावा. परंतु एकदा या सदनामध्ये पीठासीन अधिकाऱ्यांनी निदेश दिल्यानंतर त्या निदेशाचा अवमान होणे, ते निदेश डावलून अशा प्रकारे कारवाई करणे उचित नाही. अन्यथा या सदनावरील लोकांचा विश्वास उडून जाईल. ज्यावेळी पीठासीन अधिकारी निदेश देतात तेव्हा त्या निदेशाचे पालन होणार नसेल, निदेश देऊनही काही लोकांना नोटीसेस देणे याचा अर्थ या सदनाबद्दल अनादर व्यक्त करणे हा आहे. संबंधित अधिकारी पूर्णत: अनादर व्यक्त करतात याचा अर्थ मंत्रीमहोदयांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना किंवा अन्य अधिकाऱ्यांना या संदर्भात सूचना दिलेल्या नाहीत. जोपर्यंत या प्रकरणाचा निकाल होत नाही तोपर्यंत कारवाई करु नये अशा प्रकारचे निदेश किंवा आदेश मंत्रीमहोदयांकडून जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले नाहीत असा अर्थ होतो. म्हणून या संदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट व्हावी, मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले त्याबाबत संभ्रम राहू नये, जनतेच्या मनात गोंधळ राहू नये यासाठी भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे एवढेच मला विनम्रपूर्वक सांगावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : उपसभापती महोदय, मंत्रीमहोदयांना मी आपल्यामार्फत विनंती करतो की, हे राज्य आपण लोकांसाठी चालवितो. आपण राज्याचे पोशिंदे आहोत. हे मायबाप सरकार आहे. सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे सरकार आहे. झुणका भाकर केंद्रचालक कोणत्या पक्षाचे आहेत, कोण आहेत हे पाहिले जाऊ नये. सर्वोच्च न्यायालयाने जरी 240 केंद्राबाबत स्थगिती दिली असली तरी इतर केंद्राबाबत निर्णय घेण्यास राज्य सरकार सक्षम आहे हे मंत्रीमहोदयांनी स्पष्ट केले याबाबत मला आनंद झाला. शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर संपूर्ण हिंदुस्थानात काय परिणाम होतील याची जाणीव झाल्याबरोबर केंद्र सरकारने त्या निर्णयावर मात करणारी घटना दुरुस्ती केली. केंद्र सरकार जनतेकरीता घटना दुरुस्ती करु

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

शकते. असे असताना उपाशी पोटाकरीता महाराष्ट्र सरकार निर्णय बदलू शकत नाही का? राज्य सरकारने असे केले नाही तर चुकीचे घडेल. दुर्दैवाने ही सगळी केंद्र चालक मंडळी मराठी माणसे आहेत. महाराष्ट्रात जन्मलेले भूमिपुत्र आहेत. या मातीवर हक्क असणारे, या सरकारवर त्यांचा हक्क आहे, त्यांना बेघर करणार असाल तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. सभापती महोदय, आपण या केंद्र चालकांना न्याय दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबद्दल केंद्र सरकार घटना दुरुस्ती करु शकते. म्हणून रोजीरोटीकरीता, आपले पोट भरण्याकरीता जे प्रयत्नशील आहेत त्यांच्या भल्यासाठी केंद्र सरकारचा आदर्श डोळयासमोर ठेवून राज्य सरकारने भूमिका घ्यावी अशी मी मंत्रीमहोदयांना विनंती करतो.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मागील वेळी सभागृहात हा प्रश्न उपस्थित झाला होता तेव्हा आपण निदेश दिले होते. 240 केंद्र चालकांबाबत सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे स्थगिती मिळालेली आहे. त्याशिवाय जे 3000 केंद्र चालक गोरगरीब असल्यामुळे सुप्रीम कोर्टात जाऊ शकले नाहीत त्यांच्याबाबत आपण स्थगनादेश दिला होता. असे असताना अकोला महानगरपालिकेचे आयुक्त श्री.चंद्रशेखर रोकडे यांना मी लेखी पत्र देऊन आपण दिलेल्या निदेशाची जाणीव करुन दिली होती. परंतु आयुक्त महाशयांनी सांगितले की, स्थगिती वगैरे काही नाही, ही केंद्रे रस्त्यावर असल्यामुळे मी ही केंद्रे तोडणारच. त्यानंतर एका रात्रीत 4 केंद्रे तोडण्यात आली. मी लेखी पत्र देऊनही सभागृहाचे निदेश मी मानत नाही असे महापालिकेच्या आयुक्त महाशयांनी मला सांगितले. मी त्यांना अशी रजिस्टर नोटीस पाठविली की, तुम्ही चुकीचा निर्णय घेतला आहे, त्याचे लेखी स्वरुपात मला उत्तर द्यावे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया ...

त्यानंतर त्या अधिका-याने ताबडतोब बैठक घेऊन अधिका-यांना सांगितले की, तुमच्या खर्चाने ते बांधून द्या. ही माहिती जर बाजोरियांकडे गेली तर चांगले होणार नाही. त्यामुळे सभापती महोदय, झुणका भाकर केंद्र न पाडण्याचे आदेश दिलेले असतांना त्या अधिका-यांनी जाणीवपूर्वक झुणका भाकर केंद्र पाडण्याचे काम केलेले आहे, सार्वभौम सभागृहाचा अवमान केलेला आहे, सार्वभौम सभागृहाच्या आदेशाचे उल्लघंन केलेले आहे. जर अशा प्रकारे काम होत राहिले तर या सार्वभौम सभागृहाचे कोणीही ऐकणार नाही. त्यामुळे संबंधित आयुक्तांवर किंवा ज्यानी या सभागृहाचे आदेश मानले नाही त्यांच्यावर कडक कारवाई होण्याची आवश्यकता आहे.

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भात मी स्वत: आयुक्तांशी बोललो आहे. यासंदर्भात आयुक्तांकडून कारवाई झालेली आहे. सभागृहाच्या या विषयाच्या निदेशाच्या संदर्भात कोठल्याही प्रकारची माहिती गेली नव्हती. आता माझ्या कार्यालयातून यासंदर्भातील फॅक्स आयुक्तांना पाठविण्यात आलेला आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या आसनावरुन दिलेले निर्देश आतापर्यंत शासन पाळीत आलेले आहे. या निर्देशाची पायमल्ली कोणी, कितीही मोठया अधिका-याने केली तर शासन त्यावर कारवाई केल्याशिवाय राहणार नाही एवढेच मी या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो.

----------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कर विषयक कायदे ( कर बसविणे, सुधारणा व विधिग्रहयीकरण) विधेयक.

**L. A. BILL NO.LXIX OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.)**

( विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आले. )

**उपसभापती** : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव यावर एकत्रितपणे चर्चा घेण्यात येईल. परवा सारखे होऊ नये याची दक्षता घ्यावी. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता मा.सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या बिलाच्या संदर्भात आम्ही एक सूचना केली होती. व या बिलावर चर्चा चालू असतांना सन्माननीय मंत्रीमहोदयांनी त्याला उत्तर देत असतांना मध्येच एका सन्माननीय सदस्याने उठून आजची बिलावरील चर्चा स्थगित करावी व या बिलावरील चर्चा सोमवारी घ्यावी अशी सूचना केली होती. या बिलाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय, त्यावेळेस म्हणाले होते की, या बिलावर सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे त्यामुळे हे बील आपण स्थगित करीत आहोत. परंतु सभापती महोदय, या बिलाच्या संदर्भातील अजून आमचा अभ्यास पूर्ण झालेला नाही. या विधेयकाची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामुळे या बिलाचा अभ्यास काही एक दोन दिवसात पूर्ण होऊ शकणार नाही. या बिलामध्ये वेगवेगळे प्रस्ताव आहेत, यामध्ये अनेक कायदे आहेत, अनेक विषय आहेत त्यामुळे एवढया मोठया बिलाचा अभ्यास दोन दिवसाच्या सुट्टीत आमच्याकडून होऊ शकला नाही. या बिलावर अभ्यास करीत असतांना बाहेर बॉम्बस्फोट संबंधी बोलले जात होते, शोकसभा घेतल्या जात होत्या असे गोंधळाचे वातावरण बाहेर असतांना या बिलावर आम्हाला अभ्यास करता आला नाही. त्यामुळे माझी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे की, या बिलावर अभ्यास करण्यासाठी सदस्यांना अजून चार दिवसाचा अवधी द्यावा. सभापती महोदय, हे सर्वोच्च सभागृह आहे. त्यामुळे येथे आलेल्या विधेयकावर अंगठा टेकवून बील पास करणे हे काही बरोबर नाही. ...3

**उपसभापती** : दोन दिवस या बिलावर अभ्यास होऊ शकला नाही हा चर्चेचा मुद्दा होऊ शकत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या दोन दिवसाच्या काळात बाहेर अनिश्चिततेची परिस्थिती होती, गोंधळाचे वातावरण होते, कोणाचा पायपोस कोणामध्ये नव्हता, राज्यसरकार मधील चार लोक चार प्रकारची उत्तरे देत होती, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे दोन्हीही वेगवेगळी माहिती देत होते, पोलीस संचालक , कमिशनर वेगळीच माहिती देत होते तर महसूल मंत्री अजून काही वसूल होईल हे बघत होते. त्यामुळे यासर्व गोंधळामुळे आम्हाला या बिलावर अभ्यास करण्यासाठी वेळ मिळाला नाही. या बिलाच्या संदर्भात प्रश्न एकच आहे की, या बिलाच्या संदर्भात आमची भुमिका आम्हाला मांडता आली पाहिजे. त्या दिवशी सत्ताधारी पक्षाने जसे सहकार्य केले होते तसे सहकार्य आम्हाला मिळावे यासाठी मी उभा आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दिनांक 14 जुलै, 2006 रोजी या विधेयकावरील चर्चा अर्धवट राहिली. त्यावेळी आपण उपसूचना मतास टाकण्याच्या स्टेजला आलो होतो. तेव्हा प्रथम आमची उपसूचना मतास टाकण्यात यावी. जर सूचना फेटाळली गेली तर आम्हाला या विधेयकावर पुढे चर्चा करता येईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या विधेयकाच्या अभ्यासासाठी दोन दिवस अपुरे पडले असे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचे म्हणणे आहे. आपल्यामार्फत माझी त्यांना विनंती आहे की, त्यांनी उपसूचना मागे घ्यावी व विधेयकावर चर्चा करण्यास सुरुवात करावी. या विधेयकावर मतदान होणे योग्य नाही असे मला वाटते. या विधेयकात कोणकोणत्या सुधारणा आहेत याची माहिती देत मी पाचव्या प्रकरणापर्यंत आलो होतो. सन्माननीय सदस्यांना ज्या शंका असतील त्याबाबत आपण चर्चा करु. तेव्हा आपण हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही अजून विधेयकावर काहाही बोललो नाही. आम्ही उपसूचनेवर बोलत होतो. उपसूचना मताला टाकण्याची स्टेज आली होती तेव्हा.....

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या विधेयकावर मतदान होऊ नये अशी आमची त्यादिवशी सुध्दा इच्छा होती आणि आजही आहे. या विधेयकावर मतदान होणे योग्य नाही असे मला वाटते. हे विधेयक अगदी साधे, सोपे आणि सरळ आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांची उपसूचना मागे घ्यावी. आता आपण या विधेयकावर चर्चा करु. जे प्रकरण सदस्यांच्या लक्षात आले नसेल त्याबाबत मी अधिक सविस्तर माहिती देतो.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, दिनांक 14 जुलै, 2006 रोजी हे विधेयक चर्चेला आले. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मुधकर सरपोतदार यांनी या विधेयकाला उपसूचना दिली होती आणि हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे का जावे याबद्दल त्यांचे मत मांडले होते. त्यास सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी समर्थन दिले आणि त्यांचे मत व्यक्त केले. त्यानंतर माननीय मंत्रिमहोदय उभे राहिले आणि त्यांनी प्रकरण एक,दोन, तीन..... याची माहिती सांगण्यास सुरुवात केली. तेव्हा आम्ही ऑब्जेक्शन घेतले आणि सांगितले की, जी उपसूचना दिलेली आहे ती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत..........

प्रथम मतास टाकावी आणि आपण त्या स्टेजला आलो होतो. तेव्हा आता माझी मागणी आहे की, प्रथम आपण उपसूचना मतास टाकावी. जर उपसूचना नामंजूर झाली तर आपण विधेयकावर चर्चा करु. जर उपसूचना मान्य झाली तर विधेयक 50 सन्माननीय सदस्यांच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विधेयकाला जी उपसूचना देण्यात आलेली आहे त्यामध्ये माझे सुध्दा नाव आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने हे अतिशय महत्वाचे विधेयक आहे. खरे म्हणजे शासनाची तिजोरी भरणारे हे विधेयक आहे. तेव्हा या विधेयकावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे. तेव्हा हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवून पुढील अधिवेशनापर्यंत संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल मागवून नंतरच हे विधेयक मंजूर करावे असा प्रस्ताव आम्ही दिलेला आहे. तेव्हा आम्ही दिलेली उपसूचना मागे घेण्याचा प्रश्न येत नाही. ज्यावेळी आमची उपसूचना मतास टाकण्याची वेळ आली त्यावेळी सभागृहाचे कामकाज स्थगित झाले. तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, आपण आमची उपसूचना मतास टाकावी.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझी विरोधी पक्ष नेते आणि ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांची उपसूचना मागे घ्यावी आणि विधेयकावर चर्चा सुरु करावी. हे महत्वाचे विधेयक आहे असा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला. तेव्हा आपण विधेयकातील प्रोव्हीजन्सवर चर्चा करु या.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MHM/ D/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 16:00

श्री.जयंत पाटील...

मागच्या आठवडयामध्येही या बिलाच्या मेरिटवर चर्चा होऊ शकली नाही. हे बिल संयुक्त समितीकडे पाठविले तर त्याठिकाणी विलंब होईल, तसेच हे बिल करविषयक असून राज्याच्या उत्पन्नाचा महत्वाचा मुद्दा यामध्ये असल्यामुळे हे बिल दीर्घकाळ पुढे ढकलणे योग्य होणार नाही. हे बिल आपण संयुक्त समितीकडे पाठविले तर त्याठिकाणी ते दीर्घकाळ राहील, त्यामुळे माझी विनंती आहे की, या बिलाच्या मेरिटवरील चर्चेला सुरुवात करावी. त्यानंतर यातून राज्यातील जनतेलाही अधिक चांगल्या प्रकारचा न्याय देता येईल. या बिलाच्या माध्यमातून आपल्या काही सुधारणा असतील तर त्याही आपल्याला दुरुस्त करता येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यामुळे शासनाचे काही नुकसान होणार नाही. कारण अगोदरच त्यांनी अध्यादेश काढलेला आहे. हायकोर्टाने या अध्यादेशाचे रुपांतर कायद्यामध्ये करावे अशा प्रकारची सरकारला तंबी दिल्यामुळे हे बिल याठिकाणी आले आहे, याला आमचा विरोध नाही, कायद्याला आमचा विरोध नाही. आम्हाला एवढेच म्हणावयाचे आहे की, कायदा करीत असताना तो सर्वंकष बाजूने चर्चा होऊन झाला पाहिजे. आपण या बिलाच्या माध्यमातून राज्याची तिजोरी भरा, याबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही. परंतु याठिकाणी आपण सन्माननीय सदस्यांची दिशाभूल करु नये. माननीय उपसभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी म्हणून विरोधी पक्षास न्याय द्यावा, ही विनंती. आपण आमची उपसूचना मताला टाकावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी याठिकाणी आमची दिशाभूल करु नये. अगोदरच अध्यादेश काढलेला असून त्याची मुदत सहा महिन्यांपर्यंत असते. डिसेंबरच्या अधिवेशनामध्येही या बिलावर चर्चा होऊ शकते. त्यामुळे आपण हे बिल प्रवर समितीकडे पाठवावे, ही विनंती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही याठिकाणी वादात जाऊ इच्छित नाही. शासनाने मुळात याठिकाणी बेकायदेशीर काम केलेले आहे. अधिवेशन एक महिना असताना, त्याच्या आत अशा प्रकारचा अध्यादेश काढता येत नाही. तरीही तो सरकारने काढला आहे. असे असतानाही आम्ही त्यास हरकत घेतली नाही. हा अध्यादेश सध्या फोर्समध्ये असून या बिलाप्रमाणे आपले काम चालू आहे. त्यामुळे याबाबतीत आपले नुकसान काहीच नाही. हे बिल संयुक्त समितीकडे पाठविण्यास काहीच हरकत नाही. त्यामुळे आता वेळ न घालवता आपण आमची उपसूचना मताला टाकावी, ही विनंती.

(..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याठिकाणी शासनाने चूक झालेली आहे. याठिकाणी बिलावर 20 जुलै,2006 अशी तारीख आहे. याठिकाणी स्पष्टपणे असे म्हटले आहे की, दि.20 जुलै,2006 रोजी महाराष्ट्र करविषयक कायदे (बसविणे बसविणे, सुधारणा व विधिग्राहयीकरण) अध्यादेश, 2006 हा प्रख्यापित केला होता.

श्री.जयंत पाटील : कृपया सन्माननीय सदस्यांनी बिलातील प्रकरण एक पहावे, त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, "दिनांक 20 जून,2006 रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल." कृपया सन्माननीय सदस्यांनी टेक्निकल पॉईंटमध्ये जाऊ नये. या बिलाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना आणखी एक-दोन दिवस अभ्यास करावयाचा असेल तर त्याबाबत माझी काहीच हरकत नाही. आपण या बिलावर अभ्यास करावा, त्यानंतर हे बिल गुरुवार किंवा शुक्रवारी घेण्यास माझी करत नाही. तसेच, या बिलाच्या बाबतीत येथील 50 सन्माननीय सदस्यांनीच अभ्यास केला तर बरे होईल. आपण तसे केले तर संयुक्त समितीचे कामही येथेच पूर्ण होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला या बिलाच्या बाबतीत विद्‌वान विधानसभा सदस्यांचीही गरज वाटते.

**उपसभापती** : मी सुरुवातीलाच सांगितले होते की, आपल्या सूचनेवर व या बिलावर एकत्रित चर्चा करु व त्यानंतर उत्तर झाल्यानंतर...

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सभागृहातील काही सन्माननीय सदस्य या विधेयकाचा अभ्यास करुन आलेले आहेत. त्यांना या विधेयकावर बोलण्याची संधी मिळाली पाहिजे.

**उपसभापती** : आपण ही चर्चा गुरुवारी ठेवू.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्याला सचिवांनी सल्ला दिला आहे काय ? सचिवांनी सल्ला दिला असेल तर तसे रेकॉर्डवर आले पाहिजे.

**उपसभापती** : मी सचिवांच्या सल्ल्यावर अवलंबून नसतो हे आपल्याला माहित आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, परंतु, हा प्रेसिडन्स होईल. असेच घडत राहिले तर ते बरोबर होणार नाही. एखादी गोष्ट करावाची असेल तर योग्य पध्दतीने केली पाहिजे. नियमाप्रमाणे घडली पाहिजे.

**उपसभापती** : या ठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की, असुरक्षित वातावरण असल्यामुळे, वातावरण चांगले नसल्यामुळे या विधेयकाचा अभ्यास करता आलेला नाही. त्यांच्या मताशी मी सहमत होऊन हे विधेयक गुरुवार, दिनांक 20 जुलै, 2006 रोजी चर्चेला घेऊ, असा निर्णय दिलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विरोधी पक्षाने विधेयकाला उपसूचना दिलेली आहे. त्या उपसूचनेवर जोपर्यन्त निर्णय होत नाही तोपर्यन्त आपल्याला पुढे जाता येणार नाही.

**उपसभापती** : मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मी अगोदर माझा निर्णय दिला होता. त्यानंतर देखील सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार व इतर काही सन्माननीय सदस्य या ठिकाणी बोलले. हे सर्व स्पष्टपणे रेकॉर्डवर आहे, आपणही ते ऐकले आहे. किमान दोन दिवस अभ्यास करण्यासाठी द्यावेत, अशा प्रकारची विनंती सन्माननीय सदस्यांनी केली. त्यामुळे मी माझा स्वत:चा निर्णय मागे घेतला आणि सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी जे म्हणणे मांडले ते मी सन्मानपूर्वक मान्य केले आहे, कारण ते ज्येष्ठ सदस्य आहेत. आता मी 2 दिवसांची अधिकची मुदत दिली आहे. गुरुवार, दिनांक 20 जुलै, 2006 रोजी या विधेयकावर चर्चा करण्यात येईल. आता मी पुढचे बिल पुकारतो.

------------------

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

## पॉईंट ऑफ इन्फोर्मेशनसंबंधी

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मुंबईमध्ये 11 जुलै 2006 रोजी बॉम्बस्फोट होऊन 200 माणसे मृत्युमुखी पडली व जवळ जवळ 600 माणसे जखमी झाली. आज सायंकाळी 6.25 ते 6.27 या वेळात बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली वाहण्यात येणार आहे. मी केवळ आठवणीसाठी हे सांगत आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

------------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

## औचित्याच्या मुद्यासंदर्भात

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अत्यंत खेदाने या ठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. या सदनामध्ये विविध विषयांवर चर्चा होते, विधेयके मांडली जातात. या सभागृहात मतदानाला मर्यादित प्रस्ताव असतात तर चर्चेचे प्रस्ताव अधिक असतात. सर्वंकष चर्चा करुन सर्वसामान्य महाराष्ट्रातील जनतेला होणारा लाभ, होणारी हानी याबाबत चर्चा करणे आणि त्याअनुषंगाने कायदा तयार करणे ही या सदनातील सदस्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. सत्तारुढ पक्षाच्या सदस्यांनी कमितकमी बोलावे आणि आपल्या सरकारने आणलेला प्रस्ताव मंजूर करवून घ्यावा, ही खास करुन सत्तारुढ पक्षाची जबाबदारी असते. तुम्ही सत्तेवर आहात कारण तुमच्याकडे मेजॉरिटी आहे. तुमच्याकडे मेजॉरिटी नसती तर सत्तारुढ बाकांवर तुम्हाला बसता आले नसते. आपल्या सरकारला पाठिंबा देऊन भक्कमपणे पुढे नेणे हे सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे महत्वाचे काम असते. सभापती महोदय, आपण जो निर्णय देता तो आम्ही मान्य करीत असतांना विरोध करण्याची नैतिक जबाबदारीही पार पाडतो. पण हे करीत असतांना ही पाचवी वेळ आहे की, सदनामध्ये असा प्रकार घडला व मतदानाच्या मागणीला विरोधी पक्षाला वंचित व्हावे लागले.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...........

त्यावेळी आम्ही मनाला लावून घेतले नाही, काही बोललो नाही. कारण कारभार चालवावयाचा आहे. प्रत्येक वेळी आम्हाला मतदानापासून वंचित केले जाते. समोरच्या ट्रेझरी बेंचवरील सदस्य आमदारकीचा लाभ घेऊन मौजमजा करण्यासाठी कोठे तरी गेलेले असतात. त्यांना सरकारच्या कामाची जबाबदारी कळत नाही, हा आमचा दोष आहे काय ? सभापती महोदय, नागपूरच्या "दी हितवाद" या वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे. "Finaly, the Deputy Chairman saved the Government." असे त्या बातमीचे हेडींग आहे. आपण सरकारला कसे वाचविले याचे वर्णन त्या बातमीमध्ये आले होते. मागच्या वेळी निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन माननीय मंत्री महोदयांनी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना सभागृहामध्ये उपस्थित राहण्यास सांगणे आवश्यक होते. हा प्रस्ताव सभागृहामध्ये आल्यानंतर जर मतदानाची वेळ आली तर कोणत्याही परिस्थितीमध्ये उप सूचना मंजूर होणार नाही याची काळजी सत्ताधारी पक्षाने घेणे आवश्यक आहे. आम्ही मतदान मागितले आणि आमची उप सूचना फेटाळली गेली, हा विषय नाही. प्रत्येक वेळी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जबाबदारी पाळावयाची नाही काय ? सरकार अडचणीत येत असतांना प्रत्येक वेळी आम्ही माघार घ्यावयाची काय ? आपल्यासारखा रामशास्त्री उच्च स्थानावर बसलेला असतांना अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपण त्यांना योग्य ती समज द्यावी. ही जबाबदारी ज्यांची आहे त्यांना ती घेऊ द्या. आपण जो निर्णय दिला तो आम्हाला मान्य आहे. प्रत्येक वेळी आमची मुस्कटदाबी होणार नाही, आमचा हक्क डावलला जाणार नाही अशी मी भूमिका मांडतो.

**उपसभापती** : मी निर्णय दिलेला आहे. त्यामुळे मतदानाचा प्रश्न उद्‌भवत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असे सांगितले की, शासन ज्यावेळी बील मांडते त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे आणि ते आपले नैतिक कर्तव्य आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जी विनंती केली ती आपण मान्य केलेली आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी दोन दिवसाची मुदत द्यावी असे म्हटले. परंतु एक गोष्ट निश्चितपणे अशी आहे की, गुरुवारी मी हे बील पुढे ढकलणार नाही. त्यावेळी या बिलावर अंतिम चर्चा होईल.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये. सन्माननीय सदस्यांनी अभ्यास करण्यासाठी मुदत मागितली म्हणून आपण वेळ देत आहोत.

**उपसभापती** : ज्यावेळी सभागृहामध्ये हे बील चर्चेला आले त्यावेळी असा निर्णय दिला होता की, विधेयकाला दिलेली उप सूचना आणि बिलावर एकत्रित चर्चा होईल आणि माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरानंतर दोन्ही प्रस्ताव मताला टाकण्यात येतील. या ठिकाणी विविध सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की, 4-5 दिवसापासून मुंबईमध्ये ज्या घडना घडत आहेत त्यामुळे आम्हाला या बिलावर अभ्यास करता आला नाही, म्हणून आम्हाला अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, दोन दिवसांची मुदत हवी असेल तर माझी काही हरकत नाही. सन्माननीय सदस्यांना अभ्यास करण्यासाठी आपण दोन दिवसांची मुदत देऊ.  सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मर्मावर बोट ठेवले. आपण आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. हे बील गुरुवारी सकाळी 10.30 वाजता चर्चेला घेण्यात येईल.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) विधेयक 2006.

L.A.BILL NO. LXVIII OF 2006.

(A BILL TO MAKE SPEICAL PROVISIONS FOR RESERVATION OF SEATS FOR ADMISSION FOR SHCEDULED CASTES,SCHEDULED TRIBES,DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES AND OTHER BACKWARD CLASSES IN PRIVATE POREFESIONAL EDUCTIONAL INSTITUTIONS; AND FOR MATTERS CONNECTED THREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 68 - खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्याकरिता जागांचे आरक्षण करण्यासाठी तसेच तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 68 - खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्याकरिता जागांचे आरक्षण करण्यासाठी तसेच तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडत असताना मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वगैरे समाजातील विद्यार्थ्यांना हे आरक्षण देतो आणि ते महाराष्ट्रामध्ये अगोदरसुद्धा होते. परंतु केंद्र सरकारने मध्यंतरी जी घटनात्मक दुर3स्ती केली त्यानंतर म्हणजे घटनेच्या कलम 93 मध्ये सुधारणा केल्यानंतर केंद्र सरकारने राज्य सरकारांना परवानगी दिली की, तुम्ही आपापल्या

...... 3इ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेट्टी ....

राज्यांमध्ये आरक्षण देण्यासाठी आपला आपला कायदा करून घ्यावा. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने 16 जून 2006 ला ऑर्डिनन्स काढला कारण त्यावेळी आपल्याकडे इंजिनिअरींग आणि मेडिकलच्या प्रवेशांची प्रोसेस सुरू होत होती. तेव्हा आता आपण आपल्या गेल्या वर्षीच्या पद्धतीमध्ये काहीही बदल केलेला नाही. या वर्षी देखील तीच पद्धती ठेवली आहे आणि आरक्षणाची टक्केवारी देखील तीच ठेवली आहे. तेव्हा 16 जून 2006 ला जो ऑर्डिनन्स आपण काढला तोच आता या विधेयकाच्या स्वरूपात आपण आणला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला मंत्री महोदयांकडून काही गोष्टी जाणून घ्यावयाच्या असल्याने मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनवर उभा आहे. सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात आम्हाला अनेक गोष्टींचे स्पष्टीकरणे होणे आवश्यक आहे. कारण या विधेयकात आपण म्हटलेले आहे की, आर्थिकदृष्ट्या संपन्न स्तर वगैरे वगैरे. तेव्हा याचे देखील स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. तरी त्यांचे स्पष्टीकरण कृपया मंत्री महोदयांनी करावे जेणे करून आम्हाला या विधेयकावर चर्चा करणे सोयीचे होऊ शकेल.

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्यावेळेस विधेयक येथे मांडले जाते तेव्हा त्या विधेयकाचा उद्देश्य काय आहे, हे विधेयक सदनाने का स्वीकारावे, यात कोणत्या गोष्टी अर्जंटली आवश्यक होत्या म्हणून हे विधेयक आणावे लागले आहे वगैरे गोष्टीं अगोदर मंत्र्यांनी सांगितल्या पाहिजेत. तसे झाले तर आम्हालाही त्यावर चर्चा करता येऊ शकेल.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश काय आहे मी अगोदरच सांगितले आहे. आता सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी यामध्ये इकॉनॉमीकल कंडिशन काय आहे याबाबत विचारले. तर मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, जे यापूर्वी शासनाने ठरविले आहे तेच यामध्येही लागू होणार आहे. म्हणजे क्रिमी लेअरसाठी 3 लाखाची मर्यादा घातलेली आहे ती यामध्ये देखील लागू होणार आहे. दुसरे म्हणजे अल्पसंख्यांकांची जी कॉलेजेस आहेत त्यांना हे विधेयक लागू होणार नाही. परंतु सर्व खाजगी, विनाअनुदानित तत्त्वांवरील कॉलेजेसना हे लागू होणार आहे. तरी आपण हे विधेयक विचारात घेऊन संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला. (यानंतर श्री. सरफरे ....

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विविध जाती जमातींना प्रवेशामध्ये आरक्षण देण्याच्या संदर्भात विधेयक आणले आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी याठिकाणी उभा आहे. सभापती महोदया, आज महाराष्ट्रामध्ये उदंड शिक्षण संस्था निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे या शिक्षण संस्थांच्या संदर्भात सभागृहामध्ये विषय येतात त्यावेळी उच्च माध्यमिक किंवा उच्च शिक्षणामध्ये त्यांना आरक्षण देण्याच्या संदर्भात आपण विचार करतो, त्यावेळी ते उच्च शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासंबंधीच्या एखाद्या विषयाकडे निश्चितपणे आपले दुर्लक्ष होते. म्हणून या विधेयकावर बोलतांना कोणत्या समाजाला किती टक्केवारी? आर्थिक स्तर म्हणजे काय? आर्थिकदृष्टया मागास म्हणजे काय? त्यांचे आरक्षण किती टक्क्यापर्यंत आहे? ओ.बी.सी. साठी क्रिमिलेयरची पध्दत म्हणजे काय? या आरक्षणाचा फायदा किती मुले घेतात? त्या मागासवर्गीय विद्यार्थ्याला या आरक्षणाचा फायदा खरेच मिळतो काय? मागासवर्गामधील गरीब असलेल्या विद्यार्थ्याला सुध्दा फायदा मिळतो काय? यासंबंधी आपण सारासार विचार करतो त्यावेळी लक्षात येते की, या समाजातील जाती-जातीमधील विशिष्ट वर्ग या आरक्षणाचा फायदा घेत असतो. म्हणून या विषयावर मी जाणीवपूर्वक बोलावयास उभा राहतो त्यावेळी या राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात तीन प्रकारचे वर्ग सुरु झाले असल्याचे दिसून येते. यामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कित्येकदा शिक्षक हजर नसतात, एखादा शिक्षक असला तर तो चार-पाच तुकडयांना मिळून असतो. पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांना एकच शिक्षक शिकवितो. काही ठिकाणी शाळांमध्ये शिक्षक सुध्दा नसतो.अशाप्रकारे आपण ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे आल्यानंतर नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या क्षेंत्रातील शाळांची सुध्दा परिस्थिती मुद्दामहून आपणास सांगतो. या क्षेत्रामध्ये दुसऱ्या बाजूने मोठया प्रमाणावर खाजगी शाळा सुरु झाल्याचे पहावयास मिळते. आज सकाळी या सभागृहामध्ये या विषयावरील चर्चेच्यावेळी मी बोललो आहे. अशाप्रकारच्या शिक्षण व्यवस्थेवर राज्य शासनाचा अंकुश कशाप्रकारे आहे? या खाजगी शाळांबरोबर सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. अशा दोन वेगवेगळया प्रकारच्या शिक्षण व्यवस्था अंमलात आणणाऱ्या शाळा निर्माण झाल्या आहेत. राज्य शिक्षण मंडळाच्या नियंत्रणाखाली असलेल्या शाळा, महाविद्यालये, आरोग्य विज्ञान विद्यापीठे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

अभियांत्रिकी विद्यापीठे इत्यादी वेगवेगळी विद्यापीठे आणि त्यांच्या वेगवेगळी फॅकल्टीज यांचे विद्यार्थ्यांकडे, समाजाकडे बघण्याचे दृष्टीकोन वेगवेगळे आहेत.

सभापती महोदया, एखादा विद्यार्थी मुंबई, पुणे की कोल्हापूर विद्यापीठामध्ये शिक्षण घेऊन आला असेल तर त्यानुसार त्याची वर्गवारी केली जाते. तेव्हा या विधेयकाचा हेतू जरी चांगला असला तरी या सर्व बाबींचा विचार करतांना मी मांडलेल्या विषयाचा विचार करणार आहात की नाही? यानिमित्ताने मी याठिकाणी जाणीवपूर्वक काही संस्थांची नावे घेणार आहे. मघाशी मी आपल्याला ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था सांगितली. त्याचप्रमाणे शहरी भागातील अनुदानित आणि विना अनुदानित खाजगी शाळांमध्ये देखील तीच अवस्था आहे. उदा. पुणे जिल्हयातील लोणावळा येथे सिंहगड इंस्टिटयूटमध्ये के.जी. मध्ये प्रवेश घेण्यासाठी दोन-दोन लाख रुपयांचे डोनेशन दिले जाते. नाशिक जिल्हयातील आदिवासी, मागासलेला भाग असलेल्या कळवण तालुक्यात श्री. शरद पवार इंटरनॅशनल स्कूल आहे. या शाळेमध्ये देखील दोन-दोन लाख रुपये फी आहे. कुणाची मुले या इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिक्षण घेत आहेत?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, ते श्री. शरद पवार चॅरिटेबल ट्रस्ट नसून पवार चॅरिटेबल ट्रस्ट आहे...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, मी ती शाळा पाहून आलो आहे, तरी देखील मला त्या विषयामध्ये जायचे नाही...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : त्या शाळेचे जे योग्य नाव असेल ते नमूद करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, माझा आक्षेप त्या शाळेच्या नावाबद्दल नाही. दोन समाजामध्ये डिस्पॅरिटी कशी तयार होत आहे? त्या डिस्पॅरिटीचा हा परिणाम आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 16:25

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु...

मी परवा देखील म्हणालो होतो. तुम्ही खाजगी शाळा धनदांडग्यांसाठी उभ्या करता, त्या ठिकाणी गरीब मुलांसाठी का आरक्षण देत नाही ? बुध्दीमत्तेला आरक्षणाची गरज नसते, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आरक्षणाची गरज लागली नाही. समाज इतरांच्या बरोबर यावा म्हणून आरक्षणाचा विचार करतो. मुलाला कसोटी क्रिकेट पर्यन्त जायचे असेल तर पहिल्यांना काऊंटी क्रिकेट खेळावे लागते, त्यानंतर रणजी क्रिकेट खेळावे लागते. म्हणून मी हे जाणूनबुजून पुन्हा पुन्हा बोलतो की,मुलांना ज्या वयामध्ये सक्षम व्हावयाचे आहे, त्यावेळेस हे त्यांना संधी देत नाही. आरक्षणामधून मुले प्रवेश घेतात, त्यापैकी किती मुले शिक्षण पूर्ण करतात, किती मुलांनी डॉक्टर होऊन स्वत:चे दवाखाने काढलेले आहेत, किती मुले डॉक्टर होऊन संपन्न झालेली आहेत, त्यांच्या समाजाचा विकास झालेला आहे ? हे पहाणे गरजेचे आहे. सगळी मुले ही डॉक्टर होऊन सरकारी नोकऱ्यामध्येच लागलेली आहेत. आपण या ठिकाणी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाबाबतचे विधेयक आणलेले आहे. मी डॉ.बाबा आमटे यांच्या हेमलकसा येथे गेलो होतो. त्यांच्या दवाखान्यामध्ये दोन एमबीबीएस डॉक्टर झालेली आदिवासी मुले काम करत होती. याचे मला खूप कौतुक वाटले. ही मुले ज्या संवर्गातून आली, त्यांना बाबा आमटेंसारखी त्यांच्यावर संस्कार करणारी माणसे मिळाली, म्हणून ती मुले पुढे आली. नंदूरबार जिल्ह्यातील तोरणमाळ या भागामध्ये चार-पाच आदिवासी घरांच्या वस्त्या आढळतात. त्या भागातील आदिवासींचे आरोग्य आणि शिक्षण त्यांच्या आयुष्यामध्ये त्यांना कधी मिळणार ? हे कळत नाही. म्हणून त्यांच्यासाठी जेव्हा आरक्षण ठेवतो ते शासन म्हणून ठेवतो. परंतु त्यांना आय.टी.चे शिक्षण कसे कळणार ? ते आकाशाकडे पहात असतात त्यांच्यापर्यन्त ते शिक्षण कधी पोहोचणार ? याचा कधी आपण विचार करतो काय ? राजकीयदृष्ट्या आरक्षण ठेवले हे सांगायला बरे वाटते. परंतु आपण नोकऱ्यांमध्ये पहातो की, त्यांच्यासाठी आरक्षण ठेवतो, परंतु पुढे त्या पदोन्नती देतांना त्या जमातीतील लोक मिळत नाही. ते लोक का मिळत नाहीत, याचा कधी विचार केलेला आहे काय ? मग आरक्षण म्हणून त्यांच्यासाठी टक्केवारी ठेवतो. परंतु त्याचा त्यांना उपयोग होत नाही. आजही आरक्षणाच्या 100 टक्के जागा भरल्या जातात काय ? अनुसूचित जातीच्या जागा भरल्या जातात. परंतु अनुसूचित जमातीच्या जागा भरल्या जात नाहीत. याचे कारण मुळामध्ये त्यांना शिक्षणच मिळत नाही. मुळामध्ये पाया नाही तर कळस कसा उभा रहाणार ? या विधेयकाला विरोध करुन फायदा नाही. प्रश्न असा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु....

आहे की, आरक्षण ठेवताना आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या माणसाला आरक्षण ठेवलेले आहे, ते आवश्यक आहे.परंतु माझे असे मत आहे की, जे क्रिमीलेअर आहेत,त्यांनी आरक्षणाचा फायदा घेतलेला आहे, आय.अे.एस. झालेले आहेत, आय.पी.एस. झालेले आहेत, एस.पी. झालेले आहेत त्यांच्या मुलांना जातीच्या नावाखाली पुन्हा आरक्षण दिले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांना वाटत होते की, या साऱ्या समाजाचा विकास व्हावा, इतरांच्या बरोबर ते यावेत. ते इतरांबरोबर आल्यानंतरसुध्दा ते फायदा घेत रहातात. समाजातील जो अविकसित माणूस आहे, त्याला वंचित ठेवले जाते, हा विचार त्यांच्या मनामध्ये येत नाही, हे दुर्दैव आहे. म्हणून क्रिमिलेअरना सगळया सुविधा आहेत, ते आर्थिक दृष्ट्या संपन्न आहेत तरी त्यांना जातीच्या आधारावर आरक्षण देणार आहात, हे बरोबर नाही. त्यापेक्षा त्या समाजातील गरिबांच्या मुलांना आरक्षण मिळत नाही, ते वंचित रहातात. क्रिमिलेअरच्या लोकांना सगळया सुविधा कळलेल्या आहेत, प्रशासन कळलेले आहे, माहिती मिळालेली आहे परंतु ज्यांना माहिती मिळत नाही ते आंधारात चाचपडतात, याची त्यांना जाणीव होते की नाही, हा खरा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. किल्लेदार 16:30

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदया, यामध्ये आपण बऱ्याच कॅटेगरीज केलेल्या आहेत. भटक्या जमाती ही एक कॅटेगरी आहे. ऊस तोडणी कामगारांच्या बाबतीत सकाळी विषय आला होता. ही भटकी जमात नाही काय ? या भटक्या जमातीच्या मुलांना शिक्षण मिळण्याच्या बाबतीत फार वाईट अवस्था आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील तसेच सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांना रेग्युलर शिक्षण मिळू शकत नाही. आपण साखर शाळा सुरु केल्या. त्या ठिकाणी काय करतात हे परमेश्वरालाच माहीत. ऑक्टोबरमध्ये तेथून गेल्यानंतर त्यांची मुले कोठे शिकणार ? "असूनी खास मालक घरचा, म्हणती चोर त्याला" याप्रमाणे तो उपाशीच राहतो. याचा फायदा नक्की कोण घेतात याचा सुध्दा अभ्यास करावा. शासन तो अभ्यास करणार की नाही ? हे या ठिकाणी सांगावे. जेवढ्या खाजगी संस्था उभ्या राहिलेल्या आहेत त्या खरोखरच शासनाच्या जागेवर आहेत. त्यांनी अनधिकृत बांधकामे करु नयेत. काही ठिकाणी व्यवस्था नसतांना सुध्दा मेडिकल कॉलेजेस सुरु केली. पंधरा वर्षापूर्वी कराडला मेडिकल कॉलेज सुरु झाले त्यावेळी मी त्या मेडिकल कॉलेजमध्ये मी गेलो होतो. त्या ठिकाणी फक्त इमारत होती. मेडिकल कॉलेजमध्ये जी लॅब असावी लागते ती नसते. त्या ठिकाणी फक्त इमारत असते. तरीही कॉलेज सुरु होते. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांची होरपळ होते. ते विद्यार्थी जगाच्या स्पर्धेमध्ये मागे राहतात. ते मेडिकलचे विद्यार्थी असतात पण जगाच्या स्पर्धेमध्ये ते धावतील की नाही, जगातील इतरांबरोबर ते जातील की, नाही याचा विचार केला पाहिजे. शासनाने केवळ पाट्या टाकण्याचे काम करु नये. शासनाने हे बिल मंजूर करण्यासाठी सभागृहासमोर मांडलेले आहे. या सवलती दिल्यानंतर त्याचा काय रिझल्ट मिळतो याचा अभ्यास शासनाने करावा अशी मी विनंती करतो. या गोष्टी पाहण्यासाठी अभ्यास गट असावा. ज्या सुविधा दिलेल्या आहेत त्या सुविधेतून चार साडेचार वर्षामध्ये किती मुले एमबीबीएस झाली, किती मुलांना परत परत नापास झाल्यामुळे बरीच वर्षे थांबावे लागले, किती विद्यार्थ्यांना सहा सात वर्षे थांबावे लागले याचा अभ्यास केल्यानंतर आपण दिलेल्या सुविधा तळागाळातील मुलांना मिळतात की, नाही हे लक्षात येईल. याचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट नेमावा. दरवर्षी या सुविधांचा लाभ ज्या मुलांनी घेतला त्यातील किती टक्के मुले यशस्वी झाली याचा अभ्यास करुन त्यांना पुन्हा सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो आणि माझे मनोगत थांबवितो.

-----

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, या बिलाच्या संदर्भात मला थोडे बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : माननीय मंत्रिमहोदयांना या चर्चेमध्ये हस्तक्षेप करावयाचा आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील ( वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदया, माननीय राज्यमंत्री महोदयांनी आरक्षणाच्या संदर्भातील हे विधेयक या सभागृहामध्ये मांडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी या विधेयकाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. ज्या सन्माननीय सदस्यांना याबाबत विचार व्यक्त करावयाचे आहेत तेवढा वेळ आम्ही ऐकून घेणार आहोत परंतु मला या बिलाचा हेतू आणि स्कोप थोडक्यामध्ये समजावून सांगावयाचा आहे. मी थोडा उशिरा सभागृहात आल्यामुळे पुन्हा सभागृहाचा वेळ घेत आहे.

सभापती महोदया, या राज्यामध्ये आणि या देशामध्ये भारतीय राज्य घटनेने वेगवेगळ्या संवर्गासाठी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये जे आरक्षण ठेवलेले आहे ते आरक्षण संपूर्ण देशभर लागू केलेले आहे. आपल्या राज्यामध्ये सुध्दा ते आरक्षण लागू केलेले आहे. जसे आरक्षण अन्य ठिकाणी लागू आहे तसेच शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये मागासलेल्या समाजातील लोकांना इतरांच्या बरोबरीने पुढे नेण्यासाठी आरक्षण ठेवण्याची भूमिका राज्य शासनाने जाणीवपूर्वक स्वीकारलेली आहे. आपल्या राज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीला घटनेने जे आरक्षण दिलेले आहे ते आरक्षण आपण देत आहोत परंतु अन्य वर्गाला सुध्दा या राज्यामध्ये आरक्षण देण्याच्या संदर्भात यापूर्वीच राज्य सरकारने भूमिका घेतलेली आहे. मधल्या काळामध्ये एक परिस्थिती अशी होती की, व्यावसायिक शिक्षणामध्ये, तंत्र शिक्षणामध्ये फक्त सरकारच्या शैक्षणिक संस्था होत्या. परंतु अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणामध्ये व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था राज्यामध्ये निर्माण झालेल्या आहेत. आपण जाणीवपूर्वक तसा प्रयत्न केलेला आहे. हा प्रयत्न झाल्यानंतर या संस्था स्वत:च्या हिमतीवर उभ्या राहिल्या. सरकाने त्यांना मदत केली असेल. परंतु या संस्थांमध्ये आरक्षण ठेवावयाचे की, नाही यासंदर्भात जी भूमिका यापूर्वीच्या काळामध्ये होती त्यामध्ये राज्य सरकारने आग्रह धरल्यानंतर आरक्षणाच्या संदर्भातील भूमिका या राज्यातील खाजगी शैक्षणिक संस्थांनी सुध्दा मान्य केलेली होती.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 16:35

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

गेल्या वर्षीपर्यन्त यामध्ये काही प्रश्न नव्हता. मधल्या काळामध्ये सर्वोच्च न्यायालयाने वेगवेगळया विषयाच्या बाबतीत वेगवेगळे निर्णय घेतले. 11 न्यायाधीशांच्या समोर काही विषय होते. काही विषय उच्च न्ययालयामध्ये होते. दरम्यानच्या काळामध्ये या राज्यातील अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांनी त्यांच्या असलेल्या मर्यादित अधिकारांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. ती याचिका दाखल केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, जोपर्यन्त पार्लमेंट किंवा संबंधित राज्य सरकारे असा कोणताही कायदा करीत नाहीत तोपर्यन्त या पुढच्या काळामध्ये खाजगी आणि व्यावसायिक शिक्षण देणा-या शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण ठेवता येणार नाही. मागील वर्षापर्यन्त इजिनिअरिंग, मेडिकल आणि अन्य व्यावसायिक शिक्षणक्रमामध्ये आरक्षण होते. इंजिनिअरिंगमध्ये 50 टक्क्याच्या आसपास तर मेडिकलमध्ये 25 टक्क्याच्या आसपास आरक्षण होते. ही टक्केवारी आपण दिलेली आहे. या बाबतीत देशामध्ये सर्वत्र नाराजीचा सूर उमटला गेला. या देशामध्ये राहाणारे एससी,एसटी आणि अन्य प्रवर्गातील लोकांना इंजिनिअरिंग, मेडिकल यासारख्या अभ्यासक्रमामध्ये आरक्षण राहाणार नसेल तर हे विद्यार्थी अन्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने येऊ शकणार नाहीत. यासंदर्भात केन्द्रीय एचआरडी मंत्र्यांनी देशातील सर्व राज्यांच्या शिक्षण मंत्र्यांची बैठक घेतली. त्याठिकाणी महाराष्ट्राने देखील आपली भूमिका मांडली. याबाबतीत कायदा करावा असे सुप्रीम कोर्टाने सांगितलेले आहे. तेव्हा पार्लमेंटने यासंबंधीचा कायदा करण्याऐवजी त्या त्या राज्यांनी हा कायदा करावा असे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी एकत्र बसून हा कायदा तयार केला आणि मंत्रिमंडळासमोर सादर केला. वेळ अत्यंत कमी होता. जर आपण याबाबतीत निर्णय घेतला नसता तर कदाचित प्रवेश प्रक्रियेमध्ये या विद्यार्थ्यांना आरक्षण राहिले नसते आणि हजारो विद्यार्थी या शिक्षणापासून, प्रवेशापासून, आरक्षणापासून वंचित राहिले असते. हा कायदा देखील केवळ आरक्षणापुरता मर्यादित नाही. तर प्रवेश प्रक्रिया, शिक्षण संस्थांमधील नियोजन, प्रवेश नियंत्रण समिती, फी रेग्युलेशन समिती, आरक्षण अशा विविध बाबींचा समावेश असलेला कायदा आहे. हा कायदा जेव्हा मंत्रिमंडळासमोर गेला त्यावेळी एवढ्या मोठ्या कायद्याच्या संदर्भात ऑर्डिनन्स काढण्या ऐवजी आता फक्त आरक्षणापुरतीच भूमिका घ्यावी आणि संपूर्ण कायद्यासंबंधीचे विधेयक सभागृहासमोर आणावे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

अशा स्वरुपाची भूमिका घेण्यात आली. या वर्षी प्रवेश प्रक्रियेपासून विद्यार्थी वंचित राहू नयेत म्हणून मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला की, गेल्या वर्षी इंजिनिअरिंगमध्ये, मेडिकलमध्ये आणि जेवढे प्रोफेशनल कोर्सेस असतील त्याबाबतीत आरक्षण नोटीफाय करावे. गेल्या वर्षी जेवढे आरक्षण होते त्यामध्ये बदल केलेला नाही. शासनाने यासंदर्भात जो अध्यादेश काढलेला आहे त्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी हे विधेयक सभागृहासमोर आणलेले आहे. विधानसभेने हे विधेयक मंजूर केलेले आहे. या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य जे जे काही मुद्दे उपस्थित करतील त्या मुद्यांना मी उत्तर देणार आहे. या विषयाच्या संदर्भातील सर्वंकष विधेयक आम्ही सभागृहासमोर घेऊन येणार आहोत. शिक्षण संथांना विविध अभ्यासक्रम चालविण्यास परवानगी देणे, परदेशी विद्यापीठ सुरु करण्यास परवानगी देणे, आरक्षण, एसएसी,एसटी विद्यार्थ्यांना राज्य सरकारच्या माध्यमातून आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली जाते त्याप्रमाणे आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी काय भूमिका घेता येईल, असे सर्व विषय त्या विधेयकामध्ये आम्ही घेणार आहोत. आता हे जे विधेयक आपल्या समोर आहे त्या विधेयकाची व्याप्ती मर्यादित आहे. गेल्या वर्षी जेवढे आरक्षण होते तेवढे आरक्षण चालू ठेवण्याच्या संदर्भातील हे विधेयक आहे. एक सर्वंकष असे विधेयक आम्ही सभागृहापुढे आणणार आहोत. तेव्हा या विधेयकाला पाठिंबा द्यावा अशी मी सदनाला विनंती करतो.

--

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 16:40

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांना प्रवेश देण्याकरीता जागांचे आरक्षण करण्यासाठी तसेच त्यासंबंधी तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक-68 सभागृहासमोर आणण्यात आले आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्राच्या महामहिम राज्यपालांनी 16 जून, 2006 रोजी महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमाती, निरधिसूचित जमाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांना प्रवेश देण्यासाठी अध्यादेश 2006 प्रख्यापित केला होता. या अध्यादेशाचे कायद्यामध्ये रुपांतर करण्यासाठी हे विधेयक आणण्यात आले आहे हे अत्यंत उचित आहे असे मला वाटते. या विधेयकाची भूमिका स्पष्ट करताना सन्माननीय मंत्रीमहोदयांनी अत्यंत सुरेख अशा प्रकारचे वक्तव्य केले. हे बिल आणण्याचे कारण, मुख्य उद्देश, अध्यादेश काढण्याचे कारण काय होते याची सविस्तर अशा प्रकारची मांडणी मंत्रीमहोदयांनी याठिकाणी केली.

सभापती महोदया, खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमाकरीता प्रवेश देण्यासाठी कोणत्याही जागा आरक्षित ठेवण्यास या खाजगी शिक्षण संस्थांना भाग पाडता येणार नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने टी.ए.इनामदार व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन या केसमध्ये दिला होता. त्यामुळे खाजगी शिक्षण संस्थांमध्ये मागासवर्गीय प्रवर्ग आहेत त्यांच्या प्रवेशावर जवळपास बंदी घालण्यात आली होती. ही दुरुस्ती करण्यासाठी केंद्र सरकारने मागील संसदेच्या अधिवेशनात संविधानामध्ये 93 वी दुरुस्ती आणली. या घटना दुरुस्तीनंतर भारतीय संविधानाच्या आर्टिकल 15(5) मध्ये अशा प्रकारची दुरुस्ती करण्यात आली आणि त्यानुसार खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमाती, निरधिसूचित जमाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांना प्रवर्गांना देखील आरक्षण लागू व्हावे अशा प्रकारची दुरुस्ती करण्यात आली. यासोबत केंद्र सरकारने राज्य सरकारांना देखील असे निदेश दिले की, त्या त्या राज्यांनी त्यांची परिस्थिती पाहून राज्याचा कायदा करावा. त्याप्रमाणे हे विधेयक आणले आहे त्याचे मी स्वागत करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

सभापती महोदया, यामध्ये एक महत्वाची बाब आहे, ती म्हणजे या विधेयकाचे कलम 6 अत्यंत महत्वाचे आहे. या कलमामध्ये म्हटले आहे की, या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करुन देण्यात आलेला कोणताही प्रवेश निरर्थक असेल. ही अत्यंत चांगली तरतूद आहे. म्हणजे या अधिनियमाच्या अंतर्गत प्रवेश प्रक्रिया पार पाडावी लागेल. असे न केल्यास ती प्रक्रिया बेकायदेशीर ठरेल असा अर्थ होतो.

कलम 7 मध्ये म्हटले आहे की, जो कोणी या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करील त्याला, अपराध सिध्द झाल्यानंतर, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची आणि वीस लाख रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु एक कोटी रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. ही अत्यंत कठोर अशा प्रकारची भूमिका मागासवर्गीयांना खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळण्याच्या दृष्टीने घेण्यात आली आहे. याचा निश्चितच चांगला परिणाम होईल आणि ज्या खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेताना जो अनागोंदी कारभार चालतो, जो भ्रष्टाचार होतो, गरीबांची लुटमार केली जाते, नाही रे चा जो वर्ग आहे..........

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

त्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटके, किंवा मागासवर्गातील समाजाची लुटमार करण्याचे काम केले जात आहे. अशा समाजातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी मिळू दिली जात नाही, जाणीव पूर्वक संधी मिळू दिली जात नाही. परंतु या विधेयकाच्या माध्यमातून अशा मागास समाजातील विद्यार्थ्यांना संधी मिळू शकेल. या मागास वर्गातील समाजाला वरच्या समाजातील लोकांच्या बरोबरीने जाण्याची संधी या विधेयकाच्या माध्यमातून मिळू शकेल. हे जे बील आहे ते स्वागतार्ह असे बील आहे. या विधेयकामध्ये पृष्ठ क्रमांक 2 वर स्पष्टीकरण करण्यात आले आहे की, "ज्या अर्थी नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या किंवा अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संविधान (त्र्याण्णवावी सुधारणा) अधिनियम, 2005 याद्वारे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 15 मध्ये खंड(5) जादा दाखल करण्यात आला आहे व या खंडानुसार, अशा वर्ग, जाती व जमातीच्या उन्नतीकरिता, संविधानाच्या अनुच्छेद 30 च्या खंड(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्याक शिक्षण संस्था वगळता, खाजगी शिक्षण संस्थासह शिक्षण संस्थामध्ये मग अशा संस्था या राज्याकडून अनुदान मिळालेल्या असोत वा नसोत- जेथवर प्रवेश देण्याचा संबंध आहे तेथवर, कायद्याद्वारे विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आला आहे."

सभापती महोदया, त्यामुळे मला आपल्या माध्यमातून माननीय मंत्रीमहोदयांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, धार्मिक अल्पसंख्याक आणि भाषिक अल्पसंख्याक आहेत समजा गुजराथी समाजाची व्यावसायिक शैक्षणिक संस्था असेल तर अशा संस्थेमध्ये गुजराथी समाजामध्ये जे मागासवर्गीय आहेत त्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे. किंवा तामिळनाडूची व्यावसायिक शैक्षणिक संस्था असेल तर अशा संस्थेमध्ये त्या भागातील मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे, किंवा जे तेलगू भाषिक आहेत त्यामध्ये जे मागासवर्ग आहेत अशा मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी प्रवेश मिळण्याची आवश्यकता आहे त्यामुळे याही गोष्टीचा विचार होण्याची आवश्यकता आहे एवढे मला या मुद्याच्या संदर्भात सांगावयाचे आहे. सभापती महोदया, मुस्लीम समाजामध्ये पिंजारी, खाटीक असे कितीतर मागासवर्ग आहेत. तसेच जैन, बौध्द,मुस्लीम हे सुध्दा अल्पसंख्याक आहेत त्यामुळे ज्या ठिकाणी अल्पसंख्याकाचा फॅक्टर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

येईल त्या ठिकाणी या समाजातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे. त्यामुळे अनुच्छेद 30 च्या खंड(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्याक शिक्षण संस्था वगळता याचा फायदा घेऊन भाषिक अल्पसंख्याक आणि धार्मिक अल्पसंख्याकांच्या संस्था त्या त्या समाजातील मागासवर्गावर अन्याय करीत असतात त्यामुळे शासनाने याची दखल घ्यावी. शासनाने हे जे चांगले विधेयक आणले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. राज्यातील खासगी शिक्षण संस्थेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध आता मिळणार आहे त्यामुळे मी पुनश्च एकदा शासनाचे अभिनंदन करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया , सन 2006 चे विधेयक क्रमांक 68, महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था ( अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागावर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण ) विधेयक, 2006. आणलेले आहे. सभापती महोदया, शिक्षणामध्ये ग्लोबलायझ ेशन होत आहे ही चांगली गोष्ट आहे. शिक्षणाचे आरक्षण हे राज्य घटनेने दिलेले आहे, भारतीय संविधानाने दिलेले आहे. हे आरक्षण काय असावे, किती असावे यासाठी नॉर्म्स ठरविण्यात आलेले आहेत. या बिलाच्या उद्देश व कारणाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, सुप्रिम कोर्टाने याबाबत गाईडलाईन दिलेल्या आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..........

त्याप्रमाणे प्रत्येक राज्याने आपले धोरण निश्चित करावे. सभापती महोदया, ज्यावेळी ही बाजू सुप्रीम कोर्टापुढे मांडण्यात आली त्यावेळी खाजगी मेडिकल कॉलेजेस आणि खाजगी इंजिनिअरींग कॉलेजेसना महाराष्ट्र शासनाने कोणकोणते फायदे दिले आहेत हे नीटपणे मांडण्यात आले नाही. शासनाने खाजगी शिक्षण संस्थाना जागा दिली, पाणी दिले, सर्व मूलभूत सुविधा दिल्या या सर्व बाबी ॲफिडेव्हीटमध्ये मांडल्या गेल्या नाहीत अशी माझी माहिती आहे. जर ही माहिती चुकीची असेल तर माननीय मंत्रिमहोदयांनी ती करेक्ट करावी. शासन सांगत आहे की, ही कॉलेजेस स्वत:च्या हिम्मतीवर उभी आहेत. कोणती कॉलेजेस स्वत:च्या हिम्मतीवर उभी आहेत त्याची लिस्ट माननीय मंत्रिमहोदयांनी आम्हाला द्यावी. कॉलेजेसचा स्वत:चा कॉरपस फंड आहे काय ? शासनाने त्यांना एक रुपया प्रति स्वे.मीटरप्रमाणे जागा भाड्याने दिलेली आहे. मग ही कॉलेजेस स्वत:च्या हिम्मतीवर उभी आहेत असे शासन कसे सांगू शकते ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, आपण रेकॉर्ड तपासून पहावे. मी असे म्हटले आहे की, "जी कॉलेजेस स्वत:च्या हिम्मतीवर उभी आहेत आणि ज्या कॉलेजेसना सरकारने मदत केली अशी कॉलेजेस" असे शब्दप्रयोग वापरलेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सरकारने त्यांना जागा दिली नसेल तर मी माझे शब्द मागे घेतो. पाणी पुरवठा केला नसेल तर माझे शब्द मागे घेतो. सभापती महोदय, आज महाराष्ट्रात खाजगी मेडिकल कॉलेजेस आणि खाजगी इंजिनिअरींग कॉलेजेस किती आहेत ? विधेयकात उल्लेख करण्यात आलेला आहे की, तीन अभिमत महाविद्यालयांना हा कायदा लागू नाही. सरकारला कायदा करायचा आहे तर त्यांनी तो सर्वंकष केला पाहिजे. फी स्ट्रक्चरवर शासनाचा कंट्रोल नाही. या ठिकाणी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती ,इतर मागासवर्ग यांच्यासाठी किती आरक्षण ठेवण्यात आलेले आहे त्याची माहिती दिलेली आहे. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, तत्कालीन मंत्रिमहोदय श्री.दिग्विजय खानविलकर यांनी सांगितले होते की, डोंगरी विभागातील विद्यार्थ्यांना आरक्षण देण्यात येणार आहे. हे आरक्षण का काढून टाकण्यात आले ? प्रत्यक्षात आरक्षण ठेवण्यात आले होते की, पेपरवर ते पडून होते याचा खुलासा झाला पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना या आरक्षणाचा फायदा मिळणार होता. हे आरक्षण कुठे गेले ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..........

सभापती महोदया, आज महाराष्ट्रातील किती खाजगी मेडिकल व इंजिनिअरींग कॉलेजेस अभिमत विद्यापीठाच्या मार्गावर आहेत. शासनाने हा कायदा आणण्यापूर्वी ऑर्डीनन्स आणला. या प्रकरणी सुप्रीम कोर्टात निर्णय झाला, पार्लमेंटमध्ये चर्चा झाली त्यास सहा महिने होऊन गेलेले आहेत. परंतु अद्यापि शासनाने परिपूर्ण बील आणलेले नाही. खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थामध्ये आरक्षण लागू झाले पाहिजे या दबावाखाली हे विधेयक आणले आहे काय ?

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 16:55

डॉ.दीपक सावंत...

आपल्यावर कोणाचे तरी प्रेशर आल्यामुळेच हा कायदा येत आहे. This is just an eye-wash. आपली खरोखरच मानसिकता असती तर अशा प्रकारचा कायदा आणत असताना आपल्याकडे आणखी 6 महिने होते, 3-4 महिने तर निश्चितच होते. याबाबतीत आपली सर्व टीम लावून आपल्याला परिपूर्ण कायदा करुन आणता आला असता. आपल्याला खरेच हा कायदा लागू करावयाचा असेल तर आपण महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या सर्व महाविद्यालयांचा यामध्ये अंतर्भाव करुन घ्यावा.

सभापती महोदया, दुसरी गोष्ट अशी की, बिलातील पान क्रमांक 6 मध्ये आपण असे म्हटले आहे की, "या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करुन देण्यात आलेला कोणताही प्रवेश निरर्थक असेल," तसेच, "जो कोणी, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करील त्याला, अपराध सिध्द झाल्यानंतर, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची आणि वीस लाख रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु एक कोटी रुपयांपर्यंत असू शकेल एवढया द्रव्यदंडाची शिक्षा होईल," परंतु यातील ट्रान्सफरंसी आपण कशी मेंटेन करणार आहात ? कारण, खाजगी मेडिकल, इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये एकदाच लिस्ट डिस्प्ले होत असते. त्यामुळे याबाबतीत आपण ट्रान्सफरंसी कशी मेंटेन करणार आहात ? याबाबतीत आपल्याला खरोखर कायद्याने जरब आणावयाची असेल तर याबाबतीत आपल्याला यापेक्षा वेगळा मार्ग अनुसरणे आवश्यक आहे, असे मला वाटते. सभापती महोदया, याठिकाणी न भरलेल्या जागांचे काय ? त्या जागा तशाच राहतात का ? कारण, शासकीय महाविद्यालयांच्या बाबतीत त्या जागा तशाच ठेवल्या जातात. खाजगी मेडिकल व इंजिनिअरींग महाविद्यालयांतील जागा तशाच राहतात का ? एस.टी.,एस.सी.,व्ही.जे.एन.टी. च्या जागा मिळाल्या नाही तर त्या जागा आपण कशा भरणार ? आपण या जागा कोणत्या मार्गाने भरणार ? त्यामुळे या जागांच्या बाबतीत ऊहापोह होणे आवश्यक आहे. कारण, यामध्ये विविध समाजाच्या मुलांचे नुकसान होते. याठिकाणी आपण सर्वंकष व परिपूर्ण असा कायदा आणणे आवश्यक आहे. मागासवर्गातील मुले शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, यादृष्टीने आपण पाहिले पाहिजे. त्यामुळे याबाबतीत राज्य सरकारने धोरण ठरविले पाहिजे, असे मला वाटते. सभापती महोदया, आज नियामक विद्यापीठ अनुदानाच्या आयोगाचे नेमके काम काय आहे ? याबाबतीत राज्य सरकारचे कंट्रोल असले पाहिजे. ज्या डीम

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

युनिव्हसिटीज, मेडिकल-इंजिनिअरिंग कॉलेजस्, नवीन कॅम्पस् आहेत त्यावर राज्य सरकारचा अंकुश असला पाहिजे. त्यामुळे याबाबतीत कंट्रोल असणे आवश्यक आहे. आपण असे जर केले नाहीत तर सत्तचे वारेमाप सुटतात. आपल्यासमोर त्याचे उदाहरण आहेच. त्यामुळे याबाबतीत आपण मॉनेटरिंग कमिटीच्या माध्यमातून कंट्रोल ठेवणार का ? कारण, असे कंट्रोल ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. मला अतिशय खेद वाटतो की, माननीय मंत्री महोदयांकडे व विभागाकडे एवढा वेळ असताना आपण हा सर्वंकष कायदा करुन हे बिल याठिकाणी आणवयास पाहिजे होते. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

-----

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, याठिकाणी माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. या सदनामध्ये एखादे बिल मांडत असताना, हे विधेयक कशासाठी आणत आहोत, त्याचा उद्देश काय ? याबाबतीत माहिती देणे आवश्यक असते. जेणेकरुन सन्माननीय सदस्यांना भाषण करीत असताना बिलाच्या संदर्भातील सरकारचा उद्देश लक्षात घेऊन त्रुटी सांगता आल्या असत्या...

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

आणि जर बील चांगले असेल तर अभिनंदन करु शकलो पाहिजे. आजच्या विधेयकावर सन्माननीय सदस्य, प्रा.जोगेंद्र कवाडे यांचे चांगले मार्गदर्शन झाले. बील का आले ? कोर्टात काय घडले ? सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून या विधेयकाची गरज काय आहे ? वगैरेचा ऊहापोह त्यांनी आपल्या भाषणातून केला. खेदाने नमूद करावेसे वाटते की, राज्यमंत्रीमहोदय जेंव्हा हे बील सभागृहात मांडत होते त्यावेळी आम्ही या बीलाचा उद्देश सांगावा अशी मागणी करीत होतो. त्यावेळी राज्यमंत्रीमहोदयांना मुभा होती. त्याप्रमाणे त्यांनी आपले म्हणणे मांडले, आम्हीही ते स्वीकारले व त्यानंतर बीलावरील भाषणे सुरु झाली. भाषणे सुरु झाल्यानंतर सन्माननीय मंत्रीमहोदय आले आणि मी या बीलाच्या संदर्भात आणखी काही जास्त सांगू इच्छितो असे म्हणून त्यांनी पुन्हा बीलाचा उद्‌देश या ठिकाणी सांगितला आणि कळत-नकळत आपल्या राज्यमंत्र्यांचे अज्ञान प्रगट करण्याचा प्रयत्न केला.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, माझ्या खात्याचे राज्यमंत्री हे पूर्णपणे कॉम्पिटंट आहेत. हे बील मीच मांडणार होतो परंतु माननीय राष्ट्रपतींचा कार्यक्रम आटोपून येण्यास मला विलंब झाला. त्याआधी माननीय राज्यमंत्री महोदयांनी बीलासंदर्भात भूमिका सभागृहात मांडली. सर्वसाधारणपणे या सभागृहात विधेयक मांडतांना मंत्र्यांनी भाषण करण्याची पध्दत आहे, पण विधानसभेमध्ये नाही. तरी सुध्दा माननीय राज्यमंत्री महोदयांनी त्यांना जे सांगावयाचे होते ते सांगण्याचा प्रयत्न केला. मी येथे येण्यापूर्वी माझ्या दालनात बैठक सुरु असतांना सभागृहातील कामकाज स्पिकरवर ऐकले होते. या बीलाचा स्कोप फार लिमिटेड आहे, यासंदर्भात जर सभागृहात म्हणणे मांडले तर या बीलावरील कडेने जाणारी चर्चा थांबेल म्हणून मी अधिकचे स्पष्टिकरण केले. परंतु, मी हे स्पष्ट करु इच्छितो की, माझ्या खात्याचे राज्यमंत्री हे पूर्णपणे कॉम्पिटंट आहेत. त्यांना कोठेही कमी दाखविण्याचा माझा प्रयत्न नाही. कृपया, विनाकारण चुकीचे रेकॉर्डवर आणू नका. माझी सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांना विनंती आहे की, आपण जे बोलला ते मागे घ्या किंवा माननीय सभापती महोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांचे वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे. बीलाचा उद्देश अधिक सुस्पष्ट व्हावा, यादृष्टीकोनातून मी सभागृहात भूमिका मांडली आहे.

.2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी असे सांगितले की, विधानसभेमध्ये बील मांडतांना भाषण करण्याची प्रथा नाही. हे त्यांचे म्हणणे आणखी दुर्देवी आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय मंत्री महोदयांनी प्रथा सांगितली. विधानपरिषदेमध्ये बीलाचा उद्देश सांगितला जातो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, या सभागृहातील रेकॉर्ड काढून बघा, अनेक बीलांवर, बील मांडतांना मंत्र्यांची भाषण झालेली नाहीत.

**तालिका सभापती** : भाषणे केलेली आहेत, असेही आहे. अनेक वेळा बीलाचा उद्देश स्पष्ट केलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री, श्री.दिलीप वळसे-पाटील सभागृहात आले, त्यानंतर माननीय राज्यमंत्री दोन मिनिटे खाली बसले. आपण उभे राहून सांगितले की, बीलाचा उद्देश काय आहे ? कशासाठी हे बील आले आहे ? ते सदनाला सांगावे. त्यानुसार माननीय राज्यमंत्री महोदय उभे राहिले आणि पुन्हा बसले. विधानसभेमध्ये आम्हीही काम केलेले आहे. आम्हाला माहित आहे की, कोणत्याही कायद्यातील बदल असेल तर त्यावर मंत्र्यांनी भाष्य करण्याची पध्दत आहे किंबहुना भाष्य केलेच पाहिजे. लोकसभेमध्ये सुध्दा अशीच पध्दत आहे. एखादा कायदा आणला, त्यामध्ये दुरुस्ती आणली तर त्याबाबत भाष्य करण्याची पध्दत आहे.

**तालिका सभापती** : मंत्र्यांनी बील मांडत असतांना भाषण करण्याची पध्दत योग्य आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा पूर्ण झालेला नाही. सन्माननीय सदस्यांनी डिस्टर्ब केल्यामुळे माझा हरकतीचा मुद्दा तसाच राहिला. सभागृहाला विधेयकाची संपूर्ण माहिती देणे, त्यावर सविस्तर चर्चा करुन विधेयक मंजूर करणे आवश्यक असते. आपण नवीन कायदा करतो, त्या कायद्यामध्ये आपण कोणत्या सुधारणा करीत आहेत यासंबंधीची माहिती सभागृहाला देणे आवश्यक आहे. आपण हे विधेयक का आणतो, आपण कोणाच्या कल्याणासाठी हे विधेयक आणतो आहेत याबाबतची माहिती वर्तमानपत्राच्या माध्यमातून बाहेर जाणे आवश्यक असते. मिडीया ही माहिती कव्हर करीत नाही. परंतु प्रिंट मिडीया ही माहिती कव्हर करीत असते. विधेयकातील फायदे, तोटे याबाबतची माहिती लोकांसमोर जाणे आवश्यक असते. आम्ही माननीय मंत्री महोदयांना अडविलेले नाही. माननीय मंत्री महोदयांनी दिलेली माहिती आम्ही स्वीकारली. माननीय राज्यमंत्री महोदयांनी हे विधेयक मांडले. त्यांची जबाबदारी कमी आहे असे नाही. राज्यमंत्र्यांनी विधेयक मांडावयास नको होते किंवा माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये येईपर्यंत कामकाज थांबवावयास पाहिजे होते.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, विधेयक विद्यापीठाचे होते आणि सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी शाळेसंदर्भात बोलावयास सुरुवात केली. म्हणून मला बोलण्यासाठी उभे रहावे लागले.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी चेष्टेवारी विषय नेलेला आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, .......

श्री.अरविंद सावंत : तुला जर यासंबंधी काही माहिती असेल तर तू सांग....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत अरे कारे बोलतात, त्यांना अशा प्रकारे बोलता येणार नाही. त्यांनी बोलण्याची शिस्त पाळावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव आपण खाली बसावे, त्यांनी जो शब्द वापरलेला आहे तो आपण रेकॉर्डवरुन काढून टाकू. आता आपण पुढे जाऊ.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये दिशाभूल करणारे वक्तव्य करणे गैर आहे. विधेयकाच्या पृष्ठ क्र.3 वरील पोट कलम (झ) मध्ये असे म्हटलेले आहे की, "खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था याचा अर्थ, समुचित प्राधिकरणने संमती दिलेला अथवा मान्यता दिलेला कोणताही एक वा अनेक व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणारे आणि कोणत्याही विद्यापीठाशी संलग्न असलेले, कोणत्याही नावाने संबोधले जाणारे कोणतेही महाविद्यालय, शाळा, संस्था, परिसंस्था किंवा इतर कोणतेही मंडळ असा आहे." सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जे भाषण केले ते बिलाच्या बाहेर नव्हते. माननीय मंत्री महोदयांना बिलाची माहिती नसेल तर त्यांनी अज्ञान का प्रकट केले ? हे दुर्दैवी आहे.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी या ठिकाणी खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण देणाऱ्या या विधेयकाचे मन:पूर्वक स्वागत करतो. ज्यावेळेस या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय झाला होता त्याचवेळेस संस्था चालकांच्या बैठकीमध्ये मी ज्या संस्थेचा पदाधिकारी आहे त्या नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक मंडळ या संस्थेतर्फे मी जाहीर केले होते की, सरकारने यासाठी कायदा करो अथवा न करो, कोर्टाने याबाबत निर्णय देवो वा न देवो. पण आमची संस्था सामाजिक न्यायाची भूमिका सोडणार नाही आणि आम्ही आमच्या संस्थेमध्ये आरक्षण ठेवणार आहोत. त्या अनुषंगाने आता आज महाराष्ट्र सरकारने जे विधेयक आणले आहे त्याबद्दल मी मन:पूर्वक सरकारला धन्यवाद देतो आणि या विधेयकाचे स्वागत करतो. त्याचबरोबर मी या ठिकाणी दोन महत्त्वाच्या सूचना करणार आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विद्यापीठ अनुदान आयोग कायदा 1956 च्या कलम 3 अंतर्गत ज्या डीम युनिवर्सिटीज स्थापन झालेल्या आहेत त्यांना देखील हे लागू करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण आपण आपल्या कलम 1 मध्ये म्हटलेले आहे की, संपूर्ण महाराष्ट्र राज्याला हा कायदा लागू आहे. तेव्हा डीम युनिवर्सिटीजना देखील हे विधेयक लागू करणे आवश्यक आहे, तसे आपण करावे. सभापती महोदय, दुसरे म्हणजे या मध्ये आपण सगळ्या व्याख्या दिलेल्या आहेत. परंतु 'प्रवेश' म्हणजे काय याची व्याख्या दिलेली नाही, ती देणे गरजेचे आहे. कारण प्रवेश घेताना त्या विद्यार्थ्याची इलिजिबिलिटी महत्त्वाची असते म्हणजे त्या विद्यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, त्याने भरावयाची फी तसेच त्याचे मेडिकल फिटनेस प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रवेश होत नाही. त्यातील एकही नसल्यास संस्थेने प्रवेश दिला नाही तर आपल्या कलम 7 प्रमाणे संस्थेवर आणि प्राचार्यावर कडक कारवाई आपण करणार आहात. त्या दृष्टीने कलम 7 मध्ये यासाठी 3 वर्षपर्यंत त्या संस्था चालकांना किंवा प्राचार्यांना कारावासाची शिक्षा आणि 20 लाख रूपये पर्यंतच्या दंडाची शिक्षा सुचविलेली आहे. तेव्हा यामध्ये प्रवेशाची प्रोसिजर देखील निश्चितपणे ठरविली गेली पाहिजे. प्रवेश म्हणजे काय याची व्याख्या असल्याशिवाय या बाबतीत कारवाई होणे कठीण दिसते आहे. तरी त्या दृष्टभ्ने शासनाने विचार करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, त्यानंतर शेवटचा मुद्दा असा आहे की, यातील कलम 9 मध्ये आपण म्हटले आहे की, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियम

...... 3पी 2 ...

डॉ. वसंत पवार ......

करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे. आता या नियमाने करावयाचे म्हटले तर त्यासाठी तेथे चांगली समिती असणे आवश्यक आहे आणि त्या समितीमध्ये विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी, आरक्षित कॅटेगरीचे प्रतिनिधी, प्राचार्यांचे प्रतिनिधी, संस्था चालकांचे देखील प्रतिनिधी असले पाहिजेत. तरच हे नियम योग्य प्रकारे तयार होतील आणि या कायद्याचा जास्तीत जास्त ससेमिरा संस्था चालक आणि प्राचार्य यांच्या मागे लागणार नाही व विद्यार्थ्यांना याचा जास्तीत जास्त फायदा मिळेल एवढे सांगून मी या विधेयकाला पाठिंबा देतो. धन्यवाद.

****

..... 3पी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, या विधेयकाचे स्वागत करीत असतानाच काही मुद्यांची पुनरूक्ती केल्याचा दोष पत्करून मला काही मुद्दे येथे मांडावयाचे आहेत. माननीय शिक्षण मंत्र्यांनी या ठिकाणी या विधेयकाचा उद्देश सांगत असताना पी.ए.इनामदार विरूद्ध महाराष्ट्र शासन यांच्या प्रकरणाचा उल्लेख केला आणि त्या प्रकरणी सुप्रीम कोर्टाचा जो काही निर्णय आला त्यातून हे विधेयक अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी मांडण्यात आले आहे. सभापती महोदय, खरे म्हणजे राज्यात अल्पसंख्यांकांच्या संस्थांबाबत सरकारने अकारण वाद निर्माण केला आहे. तो वाद उपस्थित केला गेला नसता, त्यांचे प्रश्न टेबलवर नीट समजून घेतले असते तर आज ही स्थिती आली नसती. त्यामुळे सुप्रीम कोर्टाचा निर्णय आपण एक प्रकारे अंगावर ओढवून घेतला आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 3क्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

त्याच्या अगोदर बरेच संरक्षण होते ते स्वत:हून हटविले गेले आहे. माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, डॉ. वसंत पवार व माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी अभिमत विद्यापीठाचा मुद्दा मांडला. या क्षेत्रातील शिक्षण सम्राटांना वाचविण्यासाठी व त्यांच्याकडे लक्ष जाऊ नये याकरिता अल्पसंख्यांकाच्या शिक्षण संस्थांना टारगेट केले जात आहे, व त्यामधून नवीन वाद निर्माण केला जात आहे. त्यामुळे ते लोक कोर्टामध्ये गेले अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे. या विधेयकामधून आज अल्पसंख्याकांच्या शिक्षण संस्था वगळल्याचा उल्लेख केला आहे. शेवटी कलम 11 मध्ये त्यांनी म्हटले आहे की, त्या शिक्षण संस्थांना कोणताही अटकाव असणार नाही. आरक्षण ठेवण्यासाठी माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी याठिकाणी मुद्दा मांडला आहे. त्यानिमित्ताने मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, अल्पसंख्यांक समूह समाजातील जे मागासवर्गीय घटक आहेत त्यांना देखील आरक्षण मिळाले पाहिजे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

मुंबईमध्ये मोठया शिक्षण संस्था आहेत. प्रामुख्याने त्या भाषिक अल्पसंख्यांक आहेत, त्या वर्गातील मागासवर्गीय घटक आहेत त्यांना सुध्दा आरक्षण ठेवले जात नाही. या विधेयकाचा फायदा घेऊन त्यांच्यामधील मागास घटक आहे, त्याला बाजूला सारले जाईल की काय याची मला भीती वाटते. मुस्लिम शिक्षण संस्था फार थोडया आहेत, परंतु त्यामधील इतर मागासवर्गीय आहेत त्यांना सुध्दा प्रवेश मिळाला पाहिजे त्यासाठी आपला आग्रह राहिला पाहिजे. आपण ज्यावेळी सर्वंकष कायदा घेऊन याल, त्यावेळी या अल्पसंख्यांकामधील छोटया घटकाला सुध्दा आपणाकडून संरक्षण मिळेल याची मला आशा वाटते.

आपण आर्थिकदृष्टया मागासवर्गीयांबाबत उल्लेख केला आहे, तो कां केला हे मला समजले नाही?. घटनेमध्ये आर्थिक निकषाबाबत कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे जोपर्यंत घटनेमध्ध्ये दुरुस्ती होत नाही तोपर्यंत राज्यामध्ये आपल्याला तशाप्रकारचा कायदा आणता येणार नाही. केवळ पक्षांतर वादावर पांधरुन घालण्यासाठी आपण बोलत असाल तर गोष्ट वेगळी. घटनेतील तरतुदीनुसार आरक्षण फक्त सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीयाना दिले जाते. त्यामध्ये मंडल आयोगाने काही निकष ठरवितांना 11 व्या निकषामध्ये आर्थिक निकष ठरविले आहेत तो भाग वेगळा. परतु घटनेमध्ये आर्थिक निकषाचा उल्लेख नसल्यामुळे सध्या जो वाद सुरु आहे त्यावर

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )3Q. 2

DGS/ MHM/ D/ 17:15

श्री. कपिल पाटील...

सत्ताधारी पक्षाने पांघरुण घालावे म्हणून आपण अशाप्रकारचे आश्वासन देत असाल तर ते समाजाच्या व राज्याच्या हिताविरुध्द आहे.

सभापती महोदय, आरक्षणाच्या कक्षेमध्ये येणारे अनेक वर्ग आहेत. सकाळी ऊस तोडणी करणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या शाळांचा उल्लेख झाला. त्यामध्ये सुध्दा मराठा समाजातील 8 ते 9 टक्के इतका मोठा वर्ग आहे. अशा ऊस तोडणी मजुरांच्या मुलांना सुध्दा संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. माथाडी कामगार, शेतमजूर यांच्या मुलांना सुध्दा संरक्षण दिले पाहिजे. त्यामुळे केवळ आर्थिक निकषाचा मुद्दा उपस्थित करुन या सभागृहाची दिशाभूल करणे चुकीचे होईल म्हणून ही बाब मला आपल्या निदर्शनास आणावयाची आहे. सभापती महोदय, या विधेयकाच्या दुसऱ्या भागाविषयी माझा आक्षेप आहे. जर आपणास शक्य असल्यास तो भाग आपण वगळावा अशी माझी विनंती आहे. किंवा ज्यावेळी सर्वंकष कायदा येईल त्यावेळी हा भाग वगळण्यात यावा. अल्पसंख्यांकाच्या शिक्षण संस्थाना वाचविण्यासाठी आपण हा वाद उत्पन्न केला आहे. राज्यामध्ये अभिमत विद्यापीठे कुणाची आहेत? शासनामध्ये जे स्वत:ला प्रतिष्ठित म्हणून मिरवितात अशा लोकांची आहेत. आज मेडिकल कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज इत्यादी उच्च शिक्षणाची कॉल्‌जेस आहेत. दिल्लीमध्ये सामाजिक न्यायाच्या विरोधात ज्या डॉक्टरांनी आंदोलन केले. जे आंदोलन करीत नाहीत त्यांचे हे उद्योग आहे.शासनाच्या जीवावर, पैश्यावर जमिनीवर स्वत:च्या संस्था उभ्या करुन त्यांना आरक्षणामधून वगळण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. सुरुवातीपासून या अभिमत विद्यापीठांना आणि त्यांची मालकी असलेल्या महाविद्यालयांना वाचविण्यासाठी तरतूद केली जात आहे असे मला वाटते. माननीय शिक्षण मंत्र्यांनी नवीन सर्वंकष कायदा आणण्याचे आश्वासन दिले असले तरी यापुढील काळात ते कसे संरक्षण देतील हा प्रश्न आहे. जागतिकीकरणामध्ये नवीन विद्यापीठे या राज्यामध्ये येऊ धातली आहेत. मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असल्यामुळे अनेक आंतरराष्टीय विद्यापीठांचे कोर्सेस आणि केंद्रे याठिकाणी सुरु होतील.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (पुढे सुरु...

त्यांच्यावर देखील आरक्षणाचा बडगा चालवावा लागेल, त्यांना सुध्दा या परिघात आणावे लागेल. ते आणायला लावू नये म्हणून अभिमत विद्यापीठाला वगळले. मला वाटते, उच्च शिक्षण मंत्र्यांना तो शब्द वगळता आला तर वगळावा आणि शासनाचा हेतू स्वच्छ आहे ते समोर यावे. याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.पवार साहेबांनी प्रवेशासंबंधातील प्रक्रियेबाबत सांगितले. आरक्षणाचे धोरण केवळ प्रवेशाचे नाही तर ही विद्यापीठे चालविणाऱ्या संस्था चालकांच्या संबंधात आहे. विद्यार्थी मिळतात, उमेदवार मिळतात परंतु त्यांना कसे डावलायचे याची आखणी त्यांच्याकडे तयार असते. अशा पध्दतीने ज्या संस्था पळवाटा शोधतात, त्या त्यांनी शोधू नयेत म्हणून अधिक कडक यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. या यंत्रणेचा अभाव या विधेयकामध्ये आहे, तशी तरतूद करणे आवश्यक आहे. हे विधेयक मांडतांना सामाजिक न्यायाची तुम्ही भाषा करत असला तरी सगळया दुबळ्या घटकांना पुरेसे संरक्षण देण्यामध्ये राज्य सरकार दररोज अपयशी ठरत आहे. म्हणून माझी सभापती महोदय, उच्च शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, अभिमत विद्यापीठाला वगळण्याची जी तरतूद आहे तीच वगळावी. आपण अधिक सकारात्मक आहोत. सामाजिक न्यायाच्या बाजूने आहोत हे दाखवून द्यावे,एवढे बोलून मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ D/

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, 68 क्रमांकाच्या बिलाला, विशेषत: आरक्षणाचा विषय खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था आणि महाराष्ट्र राज्याचे धोरण काय असावे, या विषयी आरक्षणाच्याबाबतीत सरकारने आपले धोरण या बिलातून व्यथित केलेले आहे. यामध्ये काही गोष्टी निश्चितपणे आक्षेपार्ह आहेत. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की,सगळ्यात महत्वाची गोष्ट अशी आहे की,या बिलाचे एका दृष्टीकोनातून स्वागत केले पाहिजे. याचे कारण व्यावसायिक शिक्षणामध्ये समाजातील सर्व वर्गांचा, सर्व जातींचा, सर्व धर्मांचा समावेश झाला पाहिजे] हा जो आग्रह महाराष्ट्राच्या पुरोगामी सरकारने ठेवलेला आहे त्या विषयी माझ्या पक्षाचा आणि माझा सकारात्मक पाठिंबा देण्याचे धोरण राहिलेले आहे. माननीय मंत्री महोदयांना विनंती केली होती की, व्यावसायिक शिक्षणाच्याबाबतीत महाराष्ट्राचा मास्टर प्लॅन काय आहे? हे त्यांनी उद्देश आणि कारणामध्ये स्पेसिफाय करुन सांगायला पाहिजे होते. माझी कल्पना होती की, 40 ते 50 लाख समाज घटकातील विद्यार्थी उच्च व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी खाजगी शिक्षण संस्थांचे दरवाजे ठोठावतात. आता खाजगी व्यावसायिक शिक्षण म्हटले म्हणजे फक्त मेडिकल आणि जमले तर इंजिनियरींगचे शिक्षण होऊन बसलेले आहे. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम सारखा आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाचे डेफिनिशन करताना या ठिकाणी म्हटलेले आहे की, " राजपत्रात वेळोवेळी व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित केलेला कोणताही शैक्षणिक अभ्यासक्रम होय." मंत्री महोदय हे सध्या हायर एज्युकेशन कौन्सिलची बैठक ध्यायला वेळ नसतो. ती अटॉनॉमस बॉडी म्हणून काम करते. दरवर्षी वेगवेगळे व्यावसायिक अभ्यासक्रम एक्स्पांड होत असतात. विद्यार्थी वेगवेगळी डिग्री घेऊन बाहेर पडतात. आपण राजपत्रामध्ये म्हटलेले आहे की, व्यावसायिक शिक्षणाची यादी उघडून पाहिली तर 50,60,70 कोर्सेस आहेत. व्यावसायिक शिक्षणाचा एनसायक्लोपेडिया पाहिला तर हजारो व्यावसायिक कोर्सेस येऊ घातलेले आहेत. राजपत्रात ते कोर्स नसतील तर त्यांना कायदा लागू रहाणार नाही. मला असे वाटते की, हा कायदा राजपत्रात असो वा नसो. एम्प्लॉयमेंट जनरेशन निर्माण करण्यासाठी कोर्सेसना कायदा लागू केला पाहिले. यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम राजपत्रात अनुसूचित केलेले...

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

अथवा शासनाने न केलेले सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, इयत्ता दहावीनंतर कोणताही कोर्स असेल त्याला व्यावसायिक अभ्यासक्रम म्हटले पाहिजे. शेवटी हायर एज्युकेशन कशासाठी आहे ? हायर एज्युकेशन हे एक तर हॉबी म्हणून असते किंवा नोकरीसाठी असते. केवळ आवड म्हणून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या लाखात एक दोन एवढी असेल. 99.99 टक्के विद्यार्थी नोकरीसाठी, स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, उपजीविकेसाठी शिक्षण घेत असतात. हौस म्हणून किंवा ज्ञानी व्हावयाचे असे वाटणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नगण्य आहे. Mind set of the Higher Education Ministry and it's officials has to be changed for effective globalisation. जागतिकीकरणामध्ये येत असेलेले शेकडो विषय या कायद्यामध्ये अंतर्भूत केले पाहिजेत. हा कायदा परिपूर्ण असला पाहिजे. दुसरा मुद्दा असा की, आपल्याकडे बघण्याचा चुकीचा दृष्टीकोन तयार झालेला आहे. पेईन्ग क्लास किंवा ज्याला अभ्यासक्रम परवडेल अशी फी देणाऱ्या क्लास मधील लोकच शिकू शकतात अशी मानसिकता तयार झालेली आहे. अर्ज ऑफ नॉलेज, अर्ज ऑफ एज्युकेशन, शिकण्याची जिद्द ही माणसाला शिकण्यासाठी प्रवृत्त करीत असते. आपण स्टॅटिस्टिक्स पाहिले तर आपल्याला काय दिसून येते ? माझ्या जवळच्या एका कुटुंबामध्ये सगळ्यात मोठा भाऊ डॉक्टरेट झालेला आहे आणि एका ठिकाणी तो व्हाईस चान्सलर किंवा तत्सम प्रोफेसर म्हणून काम करीत आहे.. दुसरा भाऊ लेक्चरर म्हणून काम करतो. तिसरा भाऊ माध्यमिक शिक्षक म्हणून काम करतो आणि चौथा भाऊ प्राथमिक शिक्षक म्हणून काम करतो. या चारही भावांच्या उत्पन्नामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. ही सगळी मुले हुशार आहेत कारण त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक आहेत. याचे कारण असे की, सरस्वती आणि लक्ष्मी कधीच एकत्र आलेल्या नाहीत. गरिबांमध्ये अर्ज ऑफ नॉलेज जास्त असते. त्यांच्यामध्ये शिकण्याची इच्छा असते. ज्या ठिकाणी आर्थिक उत्पन्न कमी आहे, ज्या ठिकाणी दारिद्र्य भरपूर आहे त्या ठिकाणी शिकण्याची इच्छा, पुढे जाण्याची इच्छा असते हे स्टॅटिस्टिक तुम्हाला दाखवून देऊ शकतो. आपण व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये रिझर्वेशन ठेवत आहोत पण त्यासाठी जे फी स्ट्रक्चर आपण ठरवितो त्यामध्ये खऱ्या अर्थाने जिद्दीने पुढे जाणारा गरीब माणूस हा घटक आपण गृहीत धरलेला नाही. घटनेने रिझर्वेशन दिलेले आहे आणि त्यामुळे शेवटी धोरण म्हणून आपण हे आणले असेल परंतु पर कॅपिटा उत्पन्न 25 हजार रुपयांपेक्षा कमी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

असलेले आणि व्यावसायिक शिक्षण घेऊ शकणारे 30 लाख मॅट्रीक झालेले तरुण उपलब्ध आहेत. 25 ते 30 हजार अंगणवाडी सेविका आहेत. आपल्याकडे शिक्षक आहेत. एखादी नर्स असेल, एखादा ग्रामसेवक असेल, एखादा तलाठी असेल, एखादा कंडक्टर असेल, एखादा टायपिस्ट असेल, एखादा स्टेनो टायपिस्ट असेल, एखादा कंडक्टर असेल, अशा प्रकारे लोअर क्लासमधील लोक सर्व जाती धर्मामध्ये विभागलेले असतील, ज्यांची पेईन्ग कॅपॅसिटी कमी आहे त्याचा विचार होणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीमधील एखादा डॉक्टर असेल तो पाच लाखरुपये भरु शकतो परंतु अनुसूचित जातीचाच असेलला त्याचा कंपाऊंडर असेल तर त्याला फक्त तीन ते चार हजार रुपये पगार असतो. त्यांच्या मुलाला रिझर्वेशनचा फायदा होणार नाही. कारण व्यावसायिक अभ्यासक्रमाचे फी स्ट्रक्चर मोठे आहे. यामध्ये इकॉनॉमिक क्रायटेरियाचा विचार आपण केलेला नाही. सामाजिक परिस्थितीबरोबरच त्यांचा पर कॅपिटा इन्कम काय आहे ? याचा विचार केलेला नाही. आपण आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना रिझर्वेशन देऊ शकत नाही. आपण व्हर्टिकल देऊ शकत नाही पण हॉरिझोन्टल देऊ शकतो. फी स्ट्रक्चरमध्ये ते रूपांतरित करु शकतो. ते केले नाही तर उच्च शिक्षणाच्या बाबतीत फार मोठी अनागोंदी निर्माण होईल. आपण जातीच्या आधारावर रिझर्वेशन देत आहोत परंतु गरीब आणि श्रीमंत हा भेद वाढत आहे. प्रत्येक गोष्ट म्हटली की श्रीमंत चांगले शिक्षण घेऊन पुढे जातील आणि जिद्द असलेला गरीब माणूस मागे राहील. म्हणजे जाती-जातींमध्ये वर्णभेद होण्यास सुरुवात होईल. यातून वेगळ्या पध्दतीची मानसिकता निर्माण होईल. समाजाला वेगळ्या दिशेला नेण्याचे पाऊल यामध्ये दिसते. हा मूलभूत विचार यामध्ये करण्याची गरज आहे. या विचाराचा अंगीकार करणारा नवीन कायदा आपल्याला पुढच्या काळात निश्चितपणे आणावा लागेल. यामध्ये दोन गोष्टी केल्या आहेत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.श्रीकांत जोशी..

एक म्हणजे अभिमत विद्यापीठ आणि दुसरी अल्पसंख्यांक संस्था. अभिमत विद्यापीठ आणि अल्पसंख्यांक संस्थांना हा कायदा लागू नाही. आमच्या संभाजीनगर येथील एका बी.एड.कॉलेजचा संस्थाचालक हा मुस्लिम समाजाचा आहे. त्या बी.एड् कॉलेजमध्ये फक्त तीन मुस्लिम विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. बाकीच्या अन्य धर्मातील मुलांना पैसे घेऊन प्रवेश दिलेला आहे. हे अल्पसंख्यांक संस्थाचालक अशा पध्दतीने प्रवेश देऊन करोडपती झालेले आहेत. अल्पसंख्य समाजाचा नाही तर केवळ स्वत:चा विकास व्हावा या उद्देशाने अल्पसंख्यांकांच्या संस्था काढण्यात आलेल्या आहेत. अशा संस्थांना आपण आरक्षण का लागू करत नाही हा माझा प्रश्न आहे. ज्या समाजाच्या त्या शिक्षण संस्था असतील त्या समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा या उदात्त हेतूने त्या शिक्षण संस्था कार्य करीत असतील तर ते मी समजू शकतो. पण अशा शिक्षण संस्था त्यांच्या स्वत:च्या समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश न देता अन्य विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन करोडो रुपये कमवित आहेत. ज्या अल्पसंख्यांक शिक्षण संस्था आहेत त्या शिक्षण संस्थांमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश का दिला जात नाही ? या पुढच्या काळामध्ये या अल्पसंख्यांक शिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्याकांच्या मुलांना प्रवेश दिला जात नसल्याच्या कारणावरुन ते लोक मोर्चे आणि आंदोलने केल्या शिवाय राहाणार नाहीत. या अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही, सरकारचा इण्टरफिअरन्स नाही, कॅपिटेशन फीवर निर्बंध नाही. तेव्हा अशा संस्थांचे दोर कापले गेले पाहिजे. या निमित्ताने मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, एखादी जागा रिक्त होण्याची प्रोसेस आपल्याला ॲक्सेप्ट करावी लागेल. प्रत्येक विद्यार्थ्याला चांगल्या संस्थेमध्ये प्रवेश घेण्याची इच्छा असते. विद्यार्थी ब-याचशा संस्थांमध्ये प्रवेश फॉर्म भरतात आणि नंतर ते जेथे जेथे प्रवेश मिळालेला असेल त्यातील चांगल्या संस्थेची निवड करतात. यामुळे 25 ते 30 टक्के जागा रिक्त होता आणि नंतर त्या जागा भरण्याच्याबाबतीत पुन्हा गोंधळ होतो. ह्या जागा भरताना संस्थाचालक करोडो रुपये कमावतात. इंजिनिअरिंग प्रवेशाच्या बाबतीत श्री.पासलकर यांनी काय गोंधळ धातला हे माननीय मंत्री महोदयांना माहीत आहे. सॉफ्टवेअरमध्ये बिघाड झाला होता आणि आजपर्यन्त ते सॉफ्टवेअर सुरु झाले नव्हते.

..2..

.

(श्री. श्रीकांत जोशी...)

पृ.क्र. 5वर असे म्हटलेले आहे की, "परंतु, एखाद्या विद्यावर्षात अनुसूचित जाती. अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (ए), भटक्या जमाती (बी), भटक्या जमाती (सी), भटक्या जमाती (डी) आणि इतर मागासवर्ग यासाठी राखून ठेवलेल्या जागांवर प्रवेश देण्यास ती जात, जमात किंवा वर्ग यामधील विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास, त्या जागा, त्याच विद्यावर्षात शासन, राजपत्रातील आदेशाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा रीतीने भरण्यात येतील." शासनाने हे "वेळोवेळीचे" धोरण बदलले पाहिजे. एकदा अल्पिकेशन दिल्यानंतर संगणकावर यादी तयार झाली पाहिजे. त्यामध्ये नंतर कोणताही गोंधळ होता कामा नये. जसे आयआयटीमध्ये कोणताही गोंधळ होत नाही. प्रवेश प्रक्रिया ही अगदी क्लिअर कट आणि सरळ असली पाहिजे. त्यामध्ये संस्था चालकांना कोणत्याही प्रकारे फेरफार करता येणार नाही, अशी व्यवस्था असली पाहिजे. जूनमध्ये ॲडमिशन होणार असेल तर संस्थाचालकांनी पुढच्या डिसेंबर पर्यन्त काय तो गोंधळ घालावा. आता जून महिन्यामध्ये विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे प्रवेशासंबंधीचे टेन्शन आम्हाला बघवत नाही. त्यांचे टेन्शन बघून आम्हाला टेन्शन येते. या ॲडिमिशन प्रक्रियेमध्ये जबरदस्त कंफ्युजन करुन ठेवलेले आहे. जो कायदा करणार आहात त्याची अंमलबजावणी 2006 पासून लागू करा. उदा. 2007 जून मधील प्रवेशांचे जे निकष ठरवायचे असतील ते 31 डिसेंबर 2006 पर्यन्त पब्लिश करा. त्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल होता कामा नये. माझे असे स्पष्ट मत आहे की, या कायद्यामध्ये बदल करावयास पाहिजे. ज्या ठिकाणी आरक्षण ठेवलेले आहे त्या जागेवर ते विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर शासन जो काही फॉर्म्युला देईल त्याप्रमाणे त्या जागा भराव्या लागतील अशा प्रकारची तरतूद कायद्यात केली पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

आणि हे न झाल्यास जी काही ओपन कॅटगरी आहे त्यामध्ये इकॉनॉमिकली बॅकवर्ड क्लास आणि त्यानंतर इकॉनॉमिकली सधन अशा प्रकारची रचना केली तर महाराष्ट्रामध्ये मोठा वर्ग आपल्याला धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाही. आज त्या पालकांच्या डोक्यावर सतत टेन्शन ठेवणे योग्य नाही. अनुदानित शिक्षण संस्थांच्या संदर्भात 50 टक्क्यापेक्षा अधिक आरक्षण असणार नाही असे म्हटले आहे. ज्याला अनुदान दिले जात नाही त्याचा क्वालिफिकेशन क्रायटेरिया स्ट्रिक्ट करण्याची आवश्यकता आहे. ओपन कॅटगरीतील लोवेस्ट मार्क मिळविणारा विद्यार्थी ज्याप्रमाणे आयआयटीमध्ये नॉट क्वालिफाईड विद्यार्थी समजतात. ठराविक मार्कापेक्षा खालचा विद्यार्थी आला तर नॉट क्वालिफाईड. त्यामुळे काही वेळेला जागा रिक्त राहतात. पुढच्या काळात खाजगी शिक्षण संस्था आपला क्वालिफाईड क्रायटेरिया निश्चित करणार आहेत. एखादी शिक्षण संस्था 90 प्लसचा विद्यार्थी पाहिजे म्हणून उदाहरण सांगू शकेल. त्याबद्दलचे निकष आपण लावणार आहात का? प्रत्येक संस्थेचा क्वालिफाईड क्रायटेरिया वेगळा असू शकतो, प्रत्येक फॅकल्टीचा वेगळा असू शकतो. आजच्या मुक्त शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्याला तो ठेवावाच लागेल. त्यामध्ये सरकारला ढवळाढवळ करता येणार नाही. तो क्रायटेरिया दिल्यानंतर विशिष्ट जाती जमातीचा विद्यार्थी क्वालिफाईड होऊ शकला नाही तर सरकारचा रोल काय असणार आहे? मार्क नव्हे तर, काही ठिकाणी फिजिकल फिटनेस किंवा फिजिकल परफॉर्मन्स हा क्रायटेरिया असू शकतो. म्हणून मला असे वाटते की, क्वालिफाईड क्रायटेरियाबाबत सरकारचे धोरण यामध्ये कुठेही आलेले नाही याचा खुलासा झाला पाहिजे. क्वालिफाईड क्रायटेरिया न सर्टिफाय करणाऱ्या मागासवर्गीयांच्या जागा रिक्त राहतील. या जागाबाबत काय करावयाचे हाही त्या शिक्षण संस्थांचा अधिकार असणार आहे का? या शिक्षण संस्थांना जगातील संस्थांशी स्पर्धा करावयाची आहे. त्यांना त्यांचे प्रॉडक्ट म्हणजे त्यांची मुले टॉप कशी येतील हे पहावे लागणार आहे. बारावीची मुले विशिष्ट दर्जाची असल्याशिवाय घेणार नाही अशी भूमिका ते घेतील. अशी भूमिका घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली संस्था टॉपवर आणण्याचे काम करीत असतील आणि त्यांनी क्वालिफाईड क्रायटेरिया निश्चित केली असेल, तशी संस्था महाराष्ट्रात येणार असेल, अशा संस्थेविषयी या विधेयकामध्ये काहीही म्हटलेले नाही. अशा ज्या टॉपमोस्ट संस्था महाराष्ट्रात यायला सुरुवात होईल तेव्हा महाराष्ट्रातील या संस्थांची जबरदस्त जंग पुढच्या काळात होण्याची शक्यता आहे. They will

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

say, we do not believe in caste. We want this type of competition. If it is there, we are ready. उद्या एखाद्या वेळेला एखादी पोस्ट ग्रॅज्युएट संस्था येऊ शकते. ती संस्था सांगेल आम्हाला जीआरईमध्ये 15 ते 20 पेक्षा जास्त स्कोअर पाहिजे. Provided there should be minimum competence level. If it is not achieved in that area, what we are going to do. मग विद्यार्थी कोणत्या कास्टचा आहे, कोण आहे ते आम्ही बघणार नाही. Whether it is required or not. मला वाटते सरकारने याही पुढे जाऊन त्या संस्थांना लागणारी मिनिमम कॉम्पिटन्स लेव्हलसाठी पॅरालल व्यवस्था करावी. अशा पध्दतीच्या जगातील कोणती संस्था येणार असेल, त्यांचा प्रॉडक्टिव्ह सकारात्मक दृष्टीकोनाचा असावा, ती संस्था बदमाष असेल तर जरुर अडवा, पण खरा दर्जा आहे का, असेल तर ते ठरवावे लागेल. त्यामध्ये सरकारचा हस्तक्षेप असणार का हे याठिकाणी नमूद केलेले नाही म्हणून याची गरज आहे. कास्ट आरक्षणाचा हा कायदा, अधिनियम आलेला आहे. परंतु नवीन बदलून येणारा कायदा कधी येणार आहे हे महत्वाचे आहे. शेवटचा विषय म्हणजे रिझर्व्हेशन पॉलिसीकडे बघताना कुठेतरी आपण एक महत्वाचा विषय विसरतो. सगळया खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये कशासाठी आरक्षण आणतो? मला असे वाटते की, नॉलेज एरामध्ये या सगळया शिक्षण संस्था ज्या gaining better & better knowledge यासाठी पुढे येत आहेत, त्यांचे नॉलेज आऊटपूट कुठे जाणार याचा देखील विचार केला पाहिजे. या संपूर्ण शिक्षण संस्थांबाबत विचार करीत असताना जसे कास्ट आरक्षण आपण निश्चित केले. त्याचप्रमाणे या संस्थाचे कशा पध्दतीचे आपले मॉडेल असणार आहे याचे उद्देश व कारणामध्ये छोटेसे स्वरुप असणे आवश्यक होते. तुम्ही आमच्याकडे येत आहात. You are getting yourself knowledge rich, you are getting our boys knowledge rich. But, what next? सगळे करुन महाराष्ट्राला काय मिळणार आहे, महाराष्ट्राची प्रगती होणार आहे का हे उद्देश व कारणामध्ये असावयास पाहिजे होते.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. श्रीकांत जोशी .....

दुर्दैवाने तसे नसले तरी पुढील काळात यासंदर्भात आपण लक्ष द्याल अशी अपेक्षा करतो. पुढील वर्षी प्रवेश प्रक्रियेच्या अगोदर यासंदर्भातील सर्व नियम तयार करण्याची आवश्यकता आहे. व त्यानंतर पुढच्या वर्षी यामध्ये काहीही बदल होणार नाही अशी भुमिका आपण धेऊन नियम तयार केले पाहिजेत. यासाठी आपण त्यांना 31 डिसेंबरची शेवटची तारीख दिली पाहिजे, यामध्ये काय नियम करायचे, प्रवेशाच्या संदर्भात तुम्हाला काय किर्तन करावयाचे असेल, काय धिंगाना घालावयाचा असेल तर तो 31 डिसेंबरच्या आत फायनल करा परंतु त्यानंतर काहीही चालणार नाही अशी भूमिका शासनाने घेतली पाहिजे. नियमानुसार प्रवेश प्रक्रिया झाली पाहिजे. कोर्टात सुध्दा यासंदर्भात कोणाला जाता येणार नाही याचीही काळजी घेण्याची आवश्यकता आहे. There should not be any change for the next year. यासाठी कायद्यात प्रोव्हीजन करा की, 31 डिसेंबर नंतर कोणालाही कोर्टात जाता येणार नाही यासाठी कायद्यात प्रोव्हीजन करण्याची आवश्यकता आहे. असे जर झाले तर प्रवेश प्रक्रिया सुरळीत होऊन प्रवेश प्रक्रियेमध्ये गोंधळ होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे असे जर झाले तरच हा कायदा परीपूर्ण होऊ शकेल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेमध्ये आरक्षणाच्या संदर्भातील बील या ठिकाणी आणलेले आहे. या सभागृहामध्ये या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. खरे म्हणजे मी या बिलाचे स्वागतच करतो, समर्थन करतो. या बिलाला समर्थन करीत असतांना माझ्या मनात जे मुद्दे आहेत ते मुद्दे या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. या ठिकाणी आरक्षणाच्या संदर्भात या विधेयकात जी व्याख्या केलेली आहे, खरे म्हणजे या ठिकाणी जातीच्या आधारे आरक्षण ठेवलेले आहे. सेक्शन 4 मध्ये 50 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यात अनुसूचित जाती, जमाती, व्हीजेएनटी आणि इतर मागासवर्गीय आहेत. या विधेयकाच्या क्र. 2 मधील (ज) मध्ये म्हटले आहे की, " इतर मागास वर्ग" याचा अर्थ, शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या, नागरिकांचे, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास असलेले कोणतेही वर्ग, असा आहे आणि त्यामध्ये, भारत सरकारने महाराष्ट्र राज्याच्या संबंधात घोषित केलेल्या इतर मागासवर्गांचा समावेश होतो." असे म्हटलेले आहे . याचा अर्थ सामाजिक दृष्टया जे मागासलेले आहेत त्यांचाही इतर मागासवर्गामध्ये समावेश होतो. यासंदर्भात उदाहरण द्यावयाचे झाले तर जातीच्या संदर्भात आरक्षण ठेवलेले आहे. 19 टक्के आरक्षणामध्ये जे सामाजिक दृष्टया मागासलेले आहेत त्यामध्ये अपंगाचाही उल्लेख करण्यात आलेला आहे त्यामुळे ते सुध्दा यामध्ये येतील की काय? यामध्ये जर अपंगाचाही उल्लेख झाला तर मग आरक्षण कमी पडेल की काय याचाही विचार होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी आरक्षणाची टक्केवारी 50 टक्के दिलेली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये काही जिल्हयात म्हणजे ठाणे आणि धुळे जिल्हयात अनुसूचित जमातीचे प्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात जास्त आहे. या भागात अनुसूचित जातीच्या लोकांना प्राधान्य मिळावे म्हणून त्या ठिकाणी आरक्षणाची टक्केवारी वाढण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी अनुसूचित जमातिची टक्केवारी 22 टक्के आहे व अनुसूचित जमातीसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी 7 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. परंतु अशा ठिकाणी अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त असल्यामुळे धुळे, नंदुरबार किंवा ठाणे जिल्हयात व्यावसायिक शिक्षणाच्या आरक्षणाची टक्केवारी 22 टक्के ठेवण्याची आवश्यकता आहे त्यामुळे याबाबीचा उल्लेख होण्याची आवश्यकता आहे. नोटीफिकेशन प्रमाणे आरक्षण गठीत करुन उमेदवार मिळाले नाहीत तर,

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.रामनाथ मोते.........

अनुसूचित जातीसाठी जे 13 टक्के आरक्षण आहे त्यातील 5 टक्के कमी करुन ते अनुसूचित जमातीसाठी वळवावे आणि इतर मागासवर्गीयांसाठी जे 19 टक्के आरक्षण आहे त्यातील 10 टक्के अनुसूचित जमातीसाठी वळविले तर एकूण 15 टक्के आरक्षण अनुसूचित जमातीसाठी होईल आणि खऱ्याअर्थाने अनुसूचित जमातीसाठी 22 टक्के आरक्षण उपलब्ध होईल आणि त्याचा लाभ त्या वर्गातील विद्यार्थ्यांना मिळेल.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, ज्या अल्पसंख्यांक संस्था आहेत त्यांना या विधेयकातून वगळण्यात आलेले आहे. आर्टीकल 33 प्रमाणे अल्पसंख्याक संस्थाची व्याख्या पाहिली तर त्यामध्ये धार्मिक अल्पसंख्याक व भाषिक अल्पसंख्याक असे दोन गट आहेत. त्या संस्था कोणत्या वर्गासाठी शिक्षण देते हे महत्वाचे नाही. याठिकाणी संस्था चालविणारे किंवा संस्था स्थापन करणारे भाषिक अल्पसंख्याक असतील किंवा धार्मिक अल्पसंख्याक असतील त्यांना अल्पसंख्याकांचा दर्जा मिळतो आणि त्याचा फायदा या संस्थांना मिळत असतो. जर गुजराथी लोकांनी एकत्र येऊन एखादी शिक्षण संस्था काढली आणि त्याठिकाणी बी.एड, डी.एड. मराठीचा अभ्यासक्रम सुरु केला तर त्या संस्थेला अल्पसंख्याकाचा दर्जा मिळतो. याचा फायदा महाराष्ट्रातील अनेक शिक्षणसंस्था घेत आहेत. तेव्हा याबाबतीत गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे. सभापती महोदय, मी आपणास एक उदाहरण सांगतो. एक मराठा समाजातील व्यक्ती आहे. त्याने आरक्षणाचा फायदा मिळण्यासाठी जात बदलली आणि तसे नोटीफिकेशन निघाले. अशाप्रकारे नोटीफिकेशन काढून जात बदलता येत नाही. त्याने गॅझेटमध्ये प्रसिध्द केले की, मी धर्म बदललेला आहे, आता ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला आहे आणि त्याप्रकारे त्याने आरक्षणाचा लाभ घेतलेला आहे. तेव्हा अशा संस्थाचालकांना अल्पसंख्याकाचा दर्जा देताना काळजी घ्यावी अशी माझी विनंती आहे. जे खरोखर अल्पसंख्याक आहेत त्यांचा प्राथम्याने विचार झाला पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी जागा भरण्याच्या संदर्भात सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यानुसार जागा भरण्याची प्रोसिजर देणे आवश्यक आहे. तेव्हा खऱ्याअर्थाने गैरव्यवहार होणार नाही. ज्या अतिरिक्त, उर्वरित जागा असतील त्या कशाप्रकारे भरल्या जातील याचा देखील उल्लेख होणे आवश्यक आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

-----------

यांनतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण होईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक...

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्यायाच्या उदात्तीकरणासाठी हे बिल याठिकाणी मांडण्यात आले आहे. या विषयी मला एकच सूचना करावयाची आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता आपण पुढे गेलो असता आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी कशी काय देता ?

श्री.प्रकाश शेंडगे : माननीय सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी संधी दिली आहे. मला याठिकाणी फक्त एक सूचना करावयाची आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण सर्वांना समान न्याय द्यावयास पाहिजे. आपण पुढे गेलो असता, सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी देणे योग्य नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

**उपसभापती** : मी आता कोणाचेही ऐकून घेणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी उत्तराला सुरुवात करावी.

श्री.प्रकाश शेंडगे : मला बोलू दिले जात नाही, हे योग्य नाही. याबाबत मी निषेध व्यक्त करतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, याठिकाणी सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 68-खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्याकरिता जागांचे आरक्षण करण्यासाठी तसेच तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक...

(अडथळा)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्री महोदय बोलले. आपल्याला...

**उपसभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. माननीय मंत्री महोदयांनी आपले उत्तराचे भाषण सुरु ठेवावे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सदनातील सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, प्रा.जोगेंद्र कवाडे, डॉ.दीपक सावंत, श्री.कपिल पाटील, श्री.श्रीकांत जोशी, श्री.रामनाथ मोते, श्री.वसंत पवार, श्री.विनोद तावडे यांनी या बिलावर आपल्या शब्दरुपाने व अभिव्यक्तीरुपाने ज्या भावना व्यक्त केल्या, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. मी सुरुवातीलाच सांगितले की, हे बिल मांडत असताना....

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील................

भविष्यात यासंदर्भातील सर्वंकष बील सभागृहात आणण्यात येणार आहे, त्यावेळी सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना असतील, जी मते असतील ती निश्चितपणे विचारात घेण्यात येतील.

डॉ.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, यासंबंधी शासनाने अगोदर ऑर्डिनन्स आणला आणि सर्वांची तोंडे बंद केली. आता आपण जेंव्हा कायद्यात रुपांतर करीत आहोत तेंव्हा सन्माननीय सदस्यांना बोलू न देणे ही चुकीची प्रथा आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : परंतु, भाषण करण्यासाठी आपले नांव प्रतोद म्हणून माझ्याकडे आलेले नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, बीलावर बोलण्यासाठी प्रतोदांकडे नाव देण्याची आवश्यकता नसते. अशाप्रकारे शासन हे बील रेटून नेत आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, बील रेटून नेण्याचा प्रश्न नाही.

श्री.विनोद तावडे : जर बील रेटून नेण्याचा प्रश्न नसेल तर मग सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : माझे म्हणणे कृपया ऐकून घ्यावे. या बीलावर मी आणखी दोन तास सन्माननीय सदस्यांचे मुद्दे ऐकून घेण्यास तयार आहे. प्रश्न असा आहे की, प्रोसिजरप्रमाणे सभापतींनी ज्या स्टेजेस वाचावयास पाहिजे होत्या...........

श्री.विनोद तावडे : तुम्हीच प्रोसिजर मोडली आहे.

**उपसभापती** : मी आता येथे स्पष्ट सूचना देतो की, माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांचे भाषण सुरु करण्यास मी परवानगी दिलेली आहे. आता मी कुणाचेही म्हणणे ऐकून घेणार नाही. आपल्याला जो काही दोष द्यावयाचा असेल तो मी पत्करण्यास तयार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांचे बोलणे झाल्यानंतर मी माननीय मंत्रीमहोदयांना बोलण्याची परवानगी दिली होती. आता सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, जे बील सभागृहात आणलेले आहे हे बील....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, या विधेयकावर चर्चा सुरु झाली. मी देखील बोलण्यासाठी

..2........

श्री.मधुकर सरपोतदार..........

परवानगी मागितली होती. निरनिराळया सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळत होती. सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळालीच पाहिजे. परंतु, याचा अर्थ असा नाही की आम्ही त्यावर विचार मांडू नयेत. मी थोडया वेळासाठी टॉयलेटला गेलो त्यावेळी सभागृहात सन्माननीय सदस्यांची भाषणे सुरु होती. ज्यावेळी सभागृहात आलो त्यावेळी बीलाची पुढील स्टेज सुरु झाली होती व मंत्रीमहोदय उत्तराच्या भाषणासाठी उभे राहिले होते. त्यामुळे या बीलावर बोलण्याची संधी आम्हाला मिळाली नाही. मध्यंतरी सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित केला, परंतु, आपण परवानगी दिली नाही. सन्माननीय मंत्रीमहोदय सदनामध्ये आले, राज्यमंत्र्यांनी विधेयक मांडले. दोन वेळा विनंती करुन सुध्दा मंत्रीमहोदयांनी हे बील मांडले नाही. सन्माननीय सदस्य, श्री.अरविंद सावंत जे बोलले त्यावर उत्तर देण्यास सन्माननीय मंत्रीमहोदय उभे राहिले आणि आपण त्यांना परवानगी दिली. सन्माननीय सदस्य, श्री.कमलकिशोर कदम यांनी या ठिकाणी भूमिका मांडली. हे विधेयक आहे, यावर सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. विधेयकावर चर्चा सुरु आहे, सर्व सन्माननीय सदस्य या ठिकाणी बसण्यास तयार आहेत. त्यानंतर आपण एकदम एक भूमिका घेतली, आपण त्या स्थानावरुन जी भूमिका घेतली त्यावर आम्ही गप्प बसलो. आता जे पुढचे स्वरुप आले आहे ते बरोबर नाही.

**उपसभापती** : या ठिकाणी, या स्थानावर बसल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय देण्याची भूमिका मी घेत असतो. परंतु, अशा प्रकारे आपला हट्ट माझ्यावर लादण्याचा प्रयत्न होत असेल तर सभागृहातील कामकाज पुढे चालविण्यासाठी मला ठाम भूमिका घ्यावी लागेल. यापुढे सन्माननीय सदस्यांना बोलावयाचेच असेल तर बीलावरील चर्चा पूर्ण होईपर्यन्त सभागृहाचे कामकाज चालू राहिल. अशा प्रकारे सगळे काम करुन, सहकार्य करुन जर दोषारोप होणार असतील तर मला या स्थानी बसण्याची इच्छा नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण पुढे गेलो आहोत, प्रोसिजर झालेली आहे..........

**The Deputy Chairman : I** don't want to seat in the chair.

(माननीय उपसभापती सभागृहातून निघून गेले.)

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी माझ्या दालनातून सभागृहातील चर्चा ऐकत होतो. ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे सभागृहाच्या बाहेर गेले होते त्यावेळी माननीय उपसभापतींनी माननीय मंत्री महोदयांना बोलण्याची परवानगी दिली होती. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे सभागृहामध्ये आले. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी अशी सूचना करण्यात आली होती. परंतु माननीय मंत्री महोदयांनी उत्तरास सुरुवात केल्यानंतर माननीय उपसभापतींनी आता आपण दोन स्टेजेस पुढे गेलेलो आहोत असे सांगितले. एक वेळ आपण पुढे गेल्यानंतर मागे येण्याची पद्धत नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित करण्यास परवानगी मागितली होती. ज्यावेळी सभागृहात सन्माननीय सदस्य पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित करतात त्यावेळी इतर सन्माननीय सदस्य किंवा माननीय मंत्री महोदय बोलत असतील तर त्यांना थांबवून त्या सन्माननीय सदस्यांचा पॉईंट ऑफ प्रोसिजर समजावून घेणे आवश्यक असते. पॉईंट ऑफ प्रोसिजर समजावून घेतल्यानंतर आणि माननीय मंत्री महोदयांनी उत्तरास सुरुवात केल्यानंतर आता पुन्हा पाठीमागे जाणे योग्य नाही. म्हणून मला असे वाटते की, माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे भाषण पुढे सुरु ठेवावे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांना मी अन्य विषयावर किंवा अन्य मुद्यावर बोलण्याची संधी देईन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे होते की, मघाशी माननीय राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी विधयेक मांडले. विधेयक मांडल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विधेयकावर बोलण्यास सुरुवात केली. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत बोलत असतांना माननीय मंत्री महोदय श्री.दिलीप वळसे-पाटील सभागृहामध्ये आले आणि त्यांनी त्यांचे म्हणणे मांडले. एकदा बिलावर चर्चा सुरु झाल्यानंतर प्रत्येक सन्माननीय सदस्याच्या भाषणानंतर मंत्र्यांना रिप्लाय सुरु करता येतो काय ? आणि एकदा राज्यमंत्र्यांनी विधेयकातील कारणे व उद्देश मांडल्यानंतर व चर्चा सुरु झाल्यानंतर मग पुन्हा मंत्री महोदयांना विधेयकाचा उद्देश सांगता येतो का ? याची माहिती मला जाणून घ्यावयाची होती. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांचा वेगळा विषय होता. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कमल किशोर कदम यांनी देखील

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ............

आपले म्हणणे मांडले. त्यावर त्यांचे प्रतोद म्हणाले की, विधेयकावर बोलण्यासाठी प्रतोदांकडे नाव द्यावे लागते. परंतु, मला या ठिकाणी स्पष्ट करावयाचे आहे की, विधेयकावर बोलण्यासाठी प्रतोदांकडे नाव देण्याची आवश्यकता नसते, चर्चा सुरु असतांना फक्त हात वर करुन सभापतींकडे परवानगी मागावयाची असते.

यानंतर श्री.सुंबरे ........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, माननीय राज्यमंत्र्यांनी हे विधेयक सदना-समोर मांडले त्यावेळी त्यांनी त्रोटक पद्धतीने या विधेयकाचा आशय सांगण्याचा प्रयत्न केला. मला वाटते की त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी, सरकार पक्षाकडून सदनामध्ये विधेयक मांडत असताना विधेयक मांडणाऱ्या मंत्र्यांनी ते विधेयक मांडण्यामागील सरकारचा हेतू काय आहे, आशय काय आहे हे स्पष्टपणे सांगणे गरजेचे आहे असे सूचित केले. त्या दरम्यानच मला वाटते की, माननीय मंत्री श्री.वळसे-पाटील सभागृहामध्ये आले असावेत. मी माझ्या दालनात बसूनसुद्धा सभागृहातील प्रत्येक मिनिटाचे काम होत असते ते सारे ऐकण्याचा प्रयत्न करीत असतो. त्या दरम्यानच्या काळामध्ये माननीय मंत्री श्री.वळसे-पाटील यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने आपल्या सगळ्यांच्या ज्या अपेक्षा होत्या त्याप्रमाणे या विधेयकाचा आशय काय आहे, उद्देश काय आहे ते सांगितले. सुरूवातीस माननीय राज्यमंत्री श्री.शेट्टी यांनी हे विधेयक सदनामध्ये मांडताना त्रोटक स्वरूपात ते मांडले होते आणि चर्चा सुरू झाली होती. दरम्यानच्या काळात हा इश्यू असा आला. तो चालू असताना माननीय मंत्री श्री.वळसे-पाटील सभागृहात आले. त्यावेळी त्यांनी एवढेही सांगितले की, माननीय राष्ट्रपतींच्या कार्यक्रमामुळे त्यांना सभागृहात येण्यास उशीर झाला, हे विधेयक मांडण्याच्या वेळेस त्यांना येथे पोहोचता आले नाही. ही वस्तुस्थिती आहे. हे मी सगळे माझ्या दालनात बसून ऐकत होतो. आता या ठिकाणी शेवटचा क्षण जो होता तो असा की, ज्यावेळेस माननीय मंत्री श्री.वळसे-पाटील यांचे नाव घेतले. त्यानंतर अर्धा किंवा एक मिनिट असेल तेवढ्यातच सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे हे येथे आले. ही देखील वस्तुस्थिती आहे. ते येथे आल्यानंतर त्यांनी भाषणाला सुरूवात केली होती, ते एक वाक्य बोलले देखील. पण तत्पूर्वी विधेयक मताला देखील टाकले गेले होते. म्हणजेच आपण पुढे गेलो आहोत, तेव्हा परत मागे जाणे योग्य होणार नसल्याने मी माननीय मंत्री महोदयांना बोलण्यास परवानगी देतो.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, विधेयक मंजूर करतानाची सभागृहातील प्रोसिजर सन्माननीय सदस्यांना जाणून घ्यावयास असेल तर मी त्यांना सांगू इच्छितो की, प्रत्येक विधेयकाच्या एकंदर चार स्टेजेस असतात. त्यातील पहिली स्टेज म्हणजे मंत्री सदनामध्ये विधेयक इंट्रोड्यूस करतात ती. दुसरी स्टेज म्हणजे विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मंत्र्यांकडून मांडला जातो ती आणि त्यानंतरची तिसरी स्टेज म्हणजे विधेयक खंडश: विचारात

....... 4ए 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ......

घेण्याची. यावेळी विधेयकाला काही सुधारणा मांडावयाच्या असल्यास सदस्यांना त्या मांडता येतात. त्यानंतर चौथी स्टेज म्हणजे विधेयक संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मंत्री सदनामध्ये मांडतात तेव्हाची. तेव्हा आतापर्यंत या विधेयकाच्या तीन स्टेजेस संपून गेल्या आहेत आणि आता चौथी स्टेज माननीय सभापतींनी पुकारलेली आहे. विधेयक सभागृहात मंजूर करण्याच्या स्टेजला असून त्यावर उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. तेव्हा आता या संदर्भात माननीय सभापतींनी योग्य तो निर्णय घ्यावा असे मला वाटते.

**सभापती** : मंत्री महोदयांनी आपले उत्तराचे भाषण सुरू ठेवावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी या विधेयकावर आपले विचार मांडले, काही सूचनाही केल्या. ....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला या ठिकाणी एकच गोष्ट सांगावयाची आहे. खरे म्हणजे या विधेयकावर काही सदस्यांना बोलावयाचे होते. आम्हीसुद्धा बोलण्यासाठी हात वर करून बसलो होतो. परंतु सदस्यांना विधेयकावर बोलण्याची संधी देखील दिली गेली नाही त्यामुळे आम्ही सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्ष सदस्य सभात्याग करतात.... )

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, पी.ए.इनामदार विरूद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर, या देशातील व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थांमध्ये आरक्षण लागू होणार नाही अशा प्रकारचा निर्णय दिल्यानंतर या देशामध्ये जी काही परिस्थिती निर्माण झाली त्याची दखल देशाच्या पार्लमेंटने घेतली. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... 4बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

व त्याप्रमाणे राज्य संविधानामध्ये बदल करण्यात आला. खरे तर आम्हा सर्वांची अपेक्षा होती की, या संदर्भातील आवश्यक असलेला कायदा या देशाची संसद करील. परंतु प्रत्येक राज्यात वेगवेगळया जमातीसाठी असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीचा विचार करुन केंद्र सरकारने एक कायदा संमत करुन तो या देशाला लागू करण्याऐवजी या देशातील प्रत्येक राज्य सरकारने आपापल्या गरजेनुसार कायदा करावा यासाठी एनेब्लिंग प्रोव्हिजन त्यामध्ये केली. या विधेयकाच्या संदर्भात चर्चा करीत असतांना हा अध्यादेश काढला नसता तर कदाचित या वर्षी या विद्यार्थ्यांना आरक्षणाची सुविधा देता आली नसती ही राज्य शासनाची भूमिका आहे. आणि त्यामधून वेगळया प्रकारचा प्रक्षोभ समाजात तयार झाला असता. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत म्हणाले की, मागासवर्गीयांना या सुविधा देण्यासंबंधी आपण वेळेत निर्णय कां घेतला नाही? या संदर्भात सुप्रिम कोर्टामध्ये 12.8.2005 ला निर्णय झाला. तो निर्णय झाल्यानंतर त्या संदर्भात केंद्र सरकार निर्णय घेईल अशाप्रकारची सर्व राज्य सरकारमध्ये चर्चा होती, त्यामध्ये काही वेळ गेला. त्या कालावधीमध्ये केंद्र सरकारने 20.1.2006 ला घटनेमध्ये दुरुस्ती केली. ती दुरुस्ती केल्यानंतर दरम्यानच्या काळात प्रत्येक राज्य सरकारकडून प्रारुप मागवून घेण्यात आले व त संमत करण्यात आले. शेवटी ही जबाबदारी केंद्र सरकारने राज्य सरकारवर सोपविल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने या विधेयकाला 10.5.2006 रोजी मान्यता दिली. आणि दि. 16.6.2006 रोजी या संदर्भातील अध्यादेश पारीत केला. तो करीत असतांना हा अध्यादेश काढला नसता तर समाजातील मोठा वर्ग यापासून वंचित राहिला असता. हे सर्वंकष असे विधेयक सभागृहासमोर मांडले असते तर शिक्षण संस्थामध्ये करावी लागणारी प्रवेश प्रक्रिया, फी फिक्सेशन इत्यादी बाबीसंबंधी आक्षेप घेण्यात आले असते. म्हणून या संदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेतला की, यावर्षी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी परसेंटेजचा विचार न करता गेल्या वर्षीच्या वेगवेगळया कोर्सेसमधील परसेंटेज विचारात घेऊन त्याप्रमाणे लागू करण्यात यावे. त्यामध्ये जर स्पेसिफिक तरतूद केली असती तर इंजिनिअरींगसाठी वेगळे आरक्षण, मेडिकलसाठी वेगळे आरक्षण, एम.बी.ए. साठी वेगळे आरक्षण, वेगवेगळया कोर्सेससाठी वेगवेगळे आरक्षण करावे लागले असते. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे आज शिक्षण संस्थांमध्ये हजारो नवनवीन कोर्सेस सुरु होत आहेत, त्याठिकाणी सुध्दा आरक्षण लागू करावे. तसे केले तर त्याठिकाणी जागा रिक्त राहतील.. किंवा इंजिनिअरींग कॉलेज, मेडिकल कॉलेज,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

मॅनेजमेंट कॉलेज याठिकाणी महत्वाचे कोर्सेस आहेत त्याठिकाणी मोठया प्रमाणाावर विद्यार्थी शिक्षणापासून ंवंचित राहतील. ते राहू नयेत यासाठी राज्य सरकारला या संदर्भात नोटिफिकेशन काढून निर्णय घ्यावा लागला.

सभापती महोदय, याठिक्‍ाणी नोटिफिकेशनसंबंधी बोलतांना दोन मुख्य आक्षेप घेण्यात आले. त्यामध्ये तुम्ही अभिमत विद्यापीठे आणि अल्पसंख्यांकांची विद्यापीठे यांना बाहेर कां ठेवले? अशाप्रकारचा मुख्य आक्षेप घेतला. या देशामध्ये अल्पसंख्यांकांच्या संस्था स्थापन झाल्या आहेत, त्या संदर्भात भारतीय राज्य घटनेचे कलम 30(1) हे मी या सभागृहामध्ये माहितीसाठी वाचून दाखवितो. " Right of minorities to establish and administer educational institutions - (1) : All minorities, whether based on religion or language, shall have the right to establish and administer educational institutions of their choice."

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे.. 18:15

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

त्या मायनॉरिटी इन्स्टीट्युशनमध्ये कोणता कोर्स नाही असे नाही. एखादी संस्था स्थापन होत असताना,संस्था स्थापन करण्यासाठी सभासद एकत्र आलेले असतात, ते ज्या समाजाचे आहेत, तो समाज मायनॉरिटीमधील असेल, त्या संस्थेला मायनॉरिटी स्टेटस प्राप्त होतो. यासंबंधाने अनेक लिगल एक्स्पर्टचे मत घेतले. शालेय शिक्षण विभागाने मायनॉरिटीच्या संबंधाने वेगळया पध्दतीने प्रोसिजर स्वीकारायचे, मायनॉरिटी स्टेटस देण्यासाठी हायर एज्युकेशन विभागाने वेगळे प्रोसिजर ॲडॉप्ट करायचे, टेक्निकल एज्युकेशन विभागाने वेगळे प्रोसिजर ॲडॉप्ट करायचे, मेडिकल एज्युकेशन विभागाने वेगळे पोसिजर ॲडॉप्ट करायचे असे चाललेले होते. मी चार-पाच वर्षापासून या विभागाचा मंत्री म्हणून चार्ज घेतला आणि त्यावेळचे प्रोसिडींग पाहिले तर माझी ही भूमिका राहिलेली आहे की, राज्य घटनेच्या आर्टिकल 30 (1) खाली अल्पसंख्यांक समाजाला त्यांचा हक्क आहे. समाजाच्या आधारावर घटनेमध्ये तरतूद केलेली आहे. ते टाळण्याचे कारण नाही. परंतु ही बाब खरी आहे की, काही ठिकाणी लोकांनी संस्था स्थापन केली, त्यांच्या बॉडीवर मायनॉरिटीचे लोक घेतले, मायनॉरिटी स्टेटस प्राप्त झाल्यानंतर जे लोक बाहेर गेलेले लोक होते, ते पुन्हा आत आले. यामध्ये निश्चित प्रकारे दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. म्हणून या संदर्भात निर्णय घेतला की, या पुढच्या काळामध्ये एखाद्या संस्थेला मायनॉरिटी म्हणून स्टेटस द्यायचे...त्यांना ते नाकारण्याचे कारण नाही. शासनाने भूमिका स्वीकारलेली आहे की, या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. मुख्य सचिवांच्या कमिटीला सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून अधिकार दिलेले आहेत. संस्था नवीन असेल तर त्यांना राज्य घटनेने देऊ केलेले स्टेटस देण्याबाबतचे युनिफॉर्मेलिटी प्रोसीजर ॲडॉप्ट करण्याची भूमिका घेतलेली आहे. त्याचा निश्चितप्रकारे या राज्यातल्या मायनॉरिटी संस्थांना फायदा होऊ शकेल, चुकीच्या पध्दतीने वागणाऱ्या लोकांना नियंत्रित करता येऊ शकेल. मायनॉरिटी इन्टीट्युशनमध्ये आरक्षण लागू करु नये, ही राज्य सरकारची भूमिका नाही. केंद्र सरकारनेसुध्दा मध्यंतरीच्या काळामध्ये, जानेवारी महिन्यामध्ये पार्लमेंटने कायदा करुन अल्पसंख्यांक संस्थांना वगळण्याचा निर्णय घेतला. आताची माझ ी माहिती अशी आहे की, राज्य सरकार जसा सर्वंकष कायदा करु इच्छिते, अशाच प्रकारे केंद्रसरकार कायदा करण्याचा विचारात आहे. केंद्र सरकारने या संदर्भातील कायदा केला तर केंद्र सरकार कायदा करणार आहे, तो सगळया राज्यांना लागू हो्ईल. परंतु केंद्र सरकारचा कायदा होईपर्यन्त वाट पहायची, ही भूमिका आपली नाही. म्हणून राज्यामध्ये स्वत:चा सर्वंकष कायदा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

करुन सभागृहासमोर आणायची ही भूमिका घेतलेली आहे.

अभिमत युनिव्हर्सिटीच्या संदर्भात मी बोलतो. अभिमत युनिव्हर्सिटीला ग्रॅन्ट कमिशनची मान्यता आहे. त्याप्रमाणे त्यांना स्टेटस दिला जातो. या संबंधाने कायदा करण्याचा विचार गेली सहा महिने सातत्याने करतो आहोत. त्याबाबत लिगल एक्स्पर्टकडून मत घेत आहेत. समाजावर चांगला परिणाम करणारे, विधेयक घेऊन जायचे आहे. त्यामुळे सगळया बाजूने विचार झाला पाहिजे. युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशनच्या माध्यमातून स्थापन झालेल्या अभिमत युनिव्हर्सिटीजना कंट्रोल करण्या संबंधात कायदेशीर सल्ला देण्यात आलेला आहे, त्याचा विचार सर्वंकष बिलामध्ये केलेला आहे. परंतु ॲडमिशनची प्रोसिजर कोणत्याही प्रकारे थांबता कामा नये...

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

युजीसीचा केंद्र शासनाचा कायदा असल्यामुळे त्यामध्ये राज्य सरकारला तरतूद करता येणार नाही असा सल्ला आम्हाला देण्यात आला आणि त्यामुळे आज या वर्षापुरता तरी त्यामध्ये त्याचा समावेश करण्यात आलेला नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, हे बिल घाईघाईने आणलेले आहे, आय वॉश करण्यासाठी बिल आणलेले आहे. हे बिल घाईघाईने किंवा कोणाच्या दडपणाखाली आणलेले नाही. या राज्यामध्ये लोकशाही आघाडीच्या सरकारने मागासलेल्या, आर्थिकदृष्टया आणि सामाजिकदृष्टया मागासलेल्या वर्गाला, शेतकरी वर्गाला न्याय देण्याची भूमिका जाहीरपणे घेतलेली आहे. ती भूमिका घेऊन जाताना सर्व वर्गाच्या कल्याणाची भूमिका या राज्यामध्ये घेण्यासाठी कोणी तरी दडपण आणल्यामुळे आरक्षणाचा कायदा करीत आहोत असे म्हणणे योग्य नाही. ती बाब सरकारवर किंवा माझ्यावर अन्याय करणारी ठरेल, एवढेच मी नम्रपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, दुसऱ्या एका बाबीचा उल्लेख मी मघाशी माझ्या भाषणामध्ये केला. जे आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत त्यांना आरक्षण देण्याच्या बाबतीत चुकून उल्लेख झाला असेल तर तो रेकॉर्ड दुरुस्त करुन घ्यावा. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना आरक्षण देण्याची भूमिका मी सभागृहात मांडलेली नाही. परंतु बऱ्याचवेळा आपण असे म्हणत असतो की, तुम्ही आरक्षण द्या परंतु आरक्षण दिल्यानंतर एखाद्या कोर्सची फी एक लाख रुपये, दोन लाख रुपये असेल आणि त्या विद्यार्थ्याची किंवा त्याच्या पालकाची आर्थिक कुवत नसेल तर त्याला काही तरी आर्थिक मदत केली पाहिजे अशी भूमिका सुध्दा समाजातील अनेक लोकांची राहिलेली आहे. या राज्यातील जे आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थी असतील त्यांच्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या बजेटमधून तरतूद करुन इंजिनिअरींगपासून मेडिकलपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी 100 टक्के रिएम्बर्समेंट नाही पण त्यासाठी वेगवेगळे निकष ठरविलेले आहेत. इंजिनिअरींगमध्ये विद्यार्थ्यांची काही ना काही फी भरत असतो. शालेय शिक्षणामध्ये स्कॉलरशीप आणि इतर योजना आहेत. त्या योजनांची सविस्तर माहिती मी देऊ इच्छित नाही. आदिवासी विद्यार्थी असतील त्यांच्यासाठी ट्रायबल सबप्लॅनच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या फी च्या संदर्भात सुध्दा भूमिका घेण्यात आलेली आहे. समाजामध्ये अशी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

भूमिका मांडण्यात आली की, तुम्ही सामाजिक विकर सेक्शनला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गाला हे आरक्षण देत आहात त्याबद्दल काही म्हणणे नाही, आमचा कोणाचाही त्याला विरोध नाही, परंतु जे सामाजिकदृष्टया मागास नाहीत परंतु आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतील, उदाहरणार्थ ब्राम्हण समाजातील तरुण असेल, बुध्दिमान असेल परंतु घरची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही म्हणून त्याचे शिक्षण थांबले पाहिजे अशी भूमिका राज्यामध्ये स्वीकारावयाची काय ? हा खरा प्रश्न आहे. आपल्या राज्याच्या ज्या संपूर्ण प्रायोरिटीज आहेत, राज्याच्या बजेटवरचे जे कन्स्ट्रेन्ट्स आहेत, विकास कामासाठी उपलब्ध होणारा पैसा, सबसिडीच्या कामासाठी, शालेय शिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येणारी तरतूद असेल, उच्च व तंत्रशिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येणारी तरतूद असेल या सगळ्यांची मर्यादा असल्यामुळे काही ना काही प्रमाणामध्ये तरी या विद्यार्थ्यांना निश्चित प्रकारे यामध्ये दिलासा दिला पाहिजे ही भूमिका या राज्यामध्ये या लोकशाही आघाडीच्या सरकारने जाहीरपणे घेतलेली आहे. परंतु कोणी तरी आवाज उठविला किंवा त्यासंदर्भात भूमिका घेतली म्हणून सरकार काही तरी करावयास निघाले आहे अशी भूमिका घेणे बरोबर नाही. आज सुध्दा या राज्यामध्ये इ.बी.सी.ची व्याख्या केली नसती तर ग्रामीण भागातील तुमच्या आमच्या सारखे विद्यार्थी या सभागृहापर्यंत पोहोचू शकले नसते. श्री. बाळासाहेब देसाई, श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या त्या काळातील सर्व नेते मंडळींनी ही भूमिका घेतली.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ.शी./मु.शी.**: दि. 11 जुलै, 2006 रोजी पश्चिम उपनगरीय रेल्वे गाड्यांमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या लोकांना श्रध्दांजली.

**सभापती** : दिनांक 11 जुलै, 2006 रोजी पश्चिम उपनगरीय रेल्वे गाड्यांमध्ये 7 ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या आत्म्यास शांती मिळावी यासाठी त्यांना सायंकाळी 6.25 ते 6.27 या वेळेत सार्वत्रिक विनम्र श्रध्दांजली अर्पण करण्यात येणार आहे. त्या वेळेत सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

( सन्माननीय सदस्य उभे राहतात )

सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

----

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) विधेयक

L.A.BILL NO.LXVIII OF 2006.

(A BILL TO MAKE SPEICAL PROVISIONS FOR RESERVATION OF SEATS FOR ADMISSION FOR SHCEDULED CASTES,SCHEDULED TRIBES,DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES AND OTHER BACKWARD CLASSES IN PRIVATE POREFESIONAL EDUCTIONAL INSTITUTIONS; AND FOR MATTERS CONNECTED THREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना मी उत्तरे देऊन माझे भाषण संपवितो. हे जे विधेयक या सभागृहामध्ये मांडण्यात आलेले आहे त्यासंदर्भात शासन काही रुल्स तयार करील, त्याबाबतीत डिटेल्स ठरविण्यात येतील, असा उल्लेख केलेला आहे. काही सन्माननीय सदस्यांनी पॉवर टू मेक रुल्सच्या बाबतीत मत व्यक्त करुन विधेयक पारदर्शक असले पाहिजे असे सांगितले. मी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचे नियम 220कडे लक्ष वेधू इच्छितो. त्यामध्ये अशी तरतूद आहे की, जेव्हा राज्य सरकार एखाद्या कायद्याच्या आधारे रुल्स तयार करते त्यावेळी ते रुल्स राज्य सरकारला सभागृहासमोर आणावे लागतात आणि त्यासाठी विधिमंडळाची उपविधान समिती गठित करण्यात आलेली आहे. राज्य सरकारने केलेले रुल्स उपविधान समिती समोर जाऊन त्यावर विचारविमर्श केला जातो. व्यावसायिक शिक्षणाच्या संदर्भात, क्वालिफायिंग क्रायटेरियाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यानी आपले मत व्यक्त केले. मी त्याबाबतीत सांगू इच्छितो की, काही कोर्सेस असे राहाणार आहेत की त्यामध्ये वेगवेगळे क्रायटेरिया असणार आहेत आणि त्या क्रायटेरियाच्या आधारे प्रवेश दिले जाणार आहेत. राज्यामध्ये उपलब्ध असलेले सगळेच्या सगळे अभ्यासक्रम या कायद्यांतर्गत आले पाहिजेत असे नाही. सर्वसाधारणपणे ज्याची मोठया प्रमाणात मागणी आहे आणि जेथे ॲडमिशन मिळत नाही

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

असे अभ्यासक्रम आहेत, तसेच अनेक कोर्सेस असे आहेत की, तेथे विद्यार्थी जाण्यास इच्छूक नसतात, अनेक वेळा इनटेक जास्त असतो आणि त्यावेळी टेकर नसतो अशा परिस्थितीचा वेळोवेळी विचार करुन त्या संदर्भातील भूमिका ठरवावी लागेल.

...नंतर श्री. भोगले...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 18:30

श्री.दिलीप वळसे पाटील........

एका बाजूला आपण असे म्हणता की, क्वालिफाईड क्रायटेरिया ठरवा आणि दुसऱ्या बाजूला नंबर ऑफ कोर्सेस नोटीफाय केले नाहीत असेही म्हणता. आपल्याच भूमिकेमध्ये परस्परविरोधी विचार दिसतो. म्हणून माझी आपल्याला या संदर्भात आग्रही विनंती आहे, या राज्यातील शिक्षण व्यवस्था पुढे घेऊन जायचे असेल तर हे जे बिल आहे, जो ऑर्डिनन्स फक्त गेल्या वर्षीचे पोझिशन रिटेन करण्याच्या उद्देशाने काढला गेला, नागपूरला या संदर्भातील बिल मंजुरीसाठी सभागृहासमोर घेऊन येईन. यावर्षी विद्यार्थ्यांना प्रोटेक्ट करण्यात आले आहे. पुढील वर्षाची प्रोसेस सुरु करावयाची तेव्हा आरक्षणाचा मुद्दा नाही तर त्यामध्ये संस्थांचे रेग्युलेशन, परदेशी संस्थांचा विचार करता येतो का अशीही भूमिका चर्चेमध्ये मांडली आहे. त्यामध्ये काय काय बाबी समाविष्ट करता येतात, करता येतात की नाही, यासाठी एकच कायदा करावा की वेगवेगळे कायदे करायचे याचाही विचार निश्चितपणे करु. मी एवढेच आश्वस्त करतो, शेवटी परदेशातून येणाऱ्या संस्था या देशातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणार असतील, मग या देशातील अल्पसंख्याकांनी निर्माण केलेल्या संस्था असतील, या राज्यामध्ये इतरांनी निर्माण केलेल्या संस्था असतील, सरकारी संस्थांमध्ये सगळे आरक्षण लागू आहे, अनुदानित संस्थांमध्ये आरक्षण लागू आहे. फक्त विनाअनुदानित संस्था आहेत, खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था आहेत त्याठिकाणी आरक्षण लागू करण्याच्या संदर्भात कायद्याने जबरदस्ती करण्याऐवजी एक मानसिकता समाजामध्ये तयार करणे या संदर्भात आपल्या सगळयांसमोर एकत्रितपणे विचारविमर्श झाला पाहिजे. यावर्षी विद्यार्थ्यांना आणि पालकांना संरक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून सरकारने भूमिका घेतली. सर्वंकष बिल आणू त्यावेळी भूमिका मांडली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.मधुकरराव सरपोतदार पार्लमेंटमध्ये कशी पध्दत आहे याबाबत अधिक चांगले सांगू शकतील. एखाद्या बिलाला कॅबिनेटने मंजुरी दिल्यानंतर सभागृहासमोर मांडण्याअगोदर पार्लमेंटच्या वेबसाईटवर ते बिल टाकले जाते. त्यावर लोकांच्या सजेशन्स मागविल्या जातात. मी जरुर विधिमंडळाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करेन, लिगल एक्स्पर्टशी चर्चा करेन. सर्वंकष विधेयकाला मान्यता दिल्यानंतर अगोदर लोकांच्या सजेशन्स मागविणे, संस्थांचे म्हणणे काय आहे, तज्ज्ञ लोकांचे म्हणणे काय आहे, पत्रकार मंडळींचे मत काय आहे हे अगोदर समजून घेता आले तर सभागृहामध्ये एकमेकांसमोर उभे राहण्याऐवजी परफेक्ट कायदा या राज्यामध्ये निर्माण झाला आणि अन्य राज्यांनी तो कायदा ॲडॉप्ट केला अशी भूमिका निर्माण

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील........

करण्यासाठी जरुर प्रामाणिक प्रयत्न करु.

आज या सभागृहासमोर या कायद्याबाबत चर्चा झाली. सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी आरक्षणाची अंमलबजावणी केली नाही तर आर्थिक दंड किंवा शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे त्याची प्रोसीजर कोण ठरविणार? नक्की कोणाला जबाबदार धरणार या संदर्भात भूमिका मांडली. या संदर्भात विधी व न्याय विभागाशी विचारविनिमय सुरु आहे. या संदर्भात विनाकारण कोणाला त्यामध्ये त्रास होणार नाही अशा प्रकारची भूमिका घेतली जाईल. परंतु हेतू:पूर्वक टाळण्याच्या दृष्टीने कोणी भूमिका घेतली तर कोणाला त्यामध्ये पाठिशी घातले जाणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आदिवासी भागाच्या संदर्भात मुद्दा मांडला की, एखाद्या समाजासाठी ठराविक टक्केवारी तुम्ही आरक्षित ठेवली. त्या वर्गातील विद्यार्थी मिळाले नाही तर काय भूमिका असणार आहे असा मुद्दा होता. आरक्षणाच्या संदर्भात जी प्रवेश प्रक्रिया आहे त्या संदर्भात राज्य सरकारने जे नोटिफिकेशन काढले आहे त्यामध्ये हे अतिशय स्पष्ट केले आहे की, एखाद्या वर्गासाठी ठराविक परसेंटेज आरक्षण ठेवले असेल आणि त्या वर्गातील विद्यार्थी मिळाले नाहीत तर तो वर्ग जनरल कॅटगरीमध्ये जाणार नाही, दुसऱ्या आरक्षण कॅटगरीमध्ये जाणार आहे. त्यामध्ये विद्यार्थी मिळाले नाहीत तर तिसऱ्या कॅटगरीमध्ये जाईल. सगळे राऊंड संपल्यानंतर त्या वर्गातील विद्यार्थी शिल्लक राहिले नाहीत तर ओपन कॅटॅगरीमध्ये जाऊ शकेल.

डॉ.दिपक सावंत : असा प्रकार घडला आहे का?

श्री.दिलीप वळसे पाटील : या संदर्भात नोटिफिकेशन काढले आहे. आपल्याला या नोटिफिकेशनची प्रत द्यायला मी तयार आहे.

श्री.दिवाकर रावते : ओपन कॅटगरीमध्ये जाऊ शकेल का?

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : जाईलच. कसे जाईल यासंदर्भात प्रोसिजर ले डाऊन करीत आहोत. समजा एखाद्या भागात आदिवासींची संख्या एस.सी.च्या वर्गापेक्षा जास्त असेल तर एस.सी आणि आदिवासींची वेगवेगळया जिल्हयात जी टक्केवारी आहे ती चेंज करण्याची मागणी सन्माननीय सदस्य मोते साहेबांनी केलेली आहे. जर एखाद्या भागात आदिवासी जास्त असतील आणि त्या ठिकाणी एस.सी. संख्या कमी असेल तर त्या ठिकाणी एस.सी. ला अधिक जागा मिळू शकेल. त्या ठिकाणी इंटर ग्रुप ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल, जास्तीत जास्त काळजी घेण्याचा प्रयत्न केला जाईल. या बिलाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत, अनेक सूचना केलेल्या आहेत त्या सभागृहाच्या रेकॉर्डवर आलेल्या आहेत. या ठिकाणी आपण ज्या सूचना केल्या आहेत त्या विधेयकाला मार्गदर्शक ठरणा-या आहेत. यासंदर्भात जेव्हा कायदा घेऊन येऊ त्यावेळी आपण केलेल्या सूचनांचा जरुर विचार करु. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, या विधेयकाच्या संदर्भात आपल्या जवळ जर अजून अधिक सूचना असतील तर त्या सूचना आपण आमच्याकडे सादर कराव्यात. आपल्या सूचनांचा कायद्यात समावेश करण्याचा निश्चित प्रयत्न केला जाईल एवढे सांगतो व पुन्हा सर्वांचे आभार मानतो व हे विधेयक संमत करावे अशी सभागृहाला विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, कॅबिनेट पुढे विधेयक आल्यानंतर ते वेबसाईटवर टाकले जाते परंतु केंद्रामध्ये विधेयकांच्या संदर्भात स्टँडींग कमिटया तयार केलेल्या आहेत. या स्टँडिंग कमिटयामध्ये विधेयकाच्या संदर्भात सखोल चर्चा होते व नंतर हे विधेयक पार्लमेंटमध्ये येत असते. आपल्या येथे अगोदर स्टँडींग कमिटया होत्या परंतु या स्टँडींग कमिटया आता आपण रद्द केलेल्या आहेत. स्टँडींग कमिटया असल्यामुळे विधेयकाच्या संदर्भात गोंधळ कमी होतो त्यामुळे स्टँडींग कमिटीच्या संदर्भात पुनर्विचार करावा अशी विनंती आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात अनुसूचित जाती जमाती, भटके, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेमध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु भारतीय राज्य घटनेने भाषिक अल्पसंख्यांक आणि धार्मिक अल्प संख्यांकाच्या आर्टीकल 30(1) मध्ये भाषिक अल्पसंख्यांक आणि धार्मिक अल्पसंख्यांकांना वगळण्यात

....2

प्रा. जोगेंद्र कवाडे........

आलेले आहे. मी जो प्रश्न उपस्थित केला होता त्यामध्ये गुजराथी समाजाची व्यावसायिक शिक्षण देणारी संस्था असेल तर गुजराथी समाजात सुध्दा अनेक मागासवर्गीय जाती आहेत त्यामुळे या मागावर्गीय जातींच्या उमेदवारांना या ठिकाणी प्रवेश मिळाला पाहिजे. तसेच मुस्लीम समाजामध्ये सुध्दा अनेक मागासवर्गीय जाती आहेत जसे, पिंजारी, खाटीक, तडवी असे जे मागासवर्गीय जाती आहेत त्यांना सुध्दा या व्यावसायिक शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे. त्यामुळे अशा अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना या ठिकाणी प्रवेश देण्याच्या संदर्भात आपण काय करणार आहात?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी अल्पसंख्याक समाजाच्या संस्था स्टेटस घेतात त्यावेळी आपल्या समाजातील इतर मागास समाजातील विद्यार्थ्यांना त्यांनी प्रवेश दिला पाहिजे अशी भूमिका सन्माननीय सदस्यांनी मांडली. परंतु यासंदर्भातील कंट्रोलींग पॉवर त्यांच्याकडे असल्यामुळे याबाबतीत काय अंमलबजावणी करावी या बाबत संबंधितांशी विचार विनिमय करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

डा. दीपक सावंत : सभापती महोदय, मी भिती व्यक्त केली होती की, प्रायव्हेट मेडीकल कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेजमध्ये आरक्षण लागू आहे. परंतु या संस्था आता अभिमत विद्यापीठाचा दर्जा घेत आहे त्यामुळे अभिमत विद्यापीठात आरक्षणाचा कायदा लागू करण्याच्या संदर्भात शासन काय निर्णय घेणार आहे?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भात केंद्र शासनाच्या ज्या हालचाली सुरु आहेत त्याची मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मला असे समजले की, अभिमत युनिव्हर्सिटीत आरक्षण आणण्याबाबत केंद्र सरकार विचार करीत आहे. कदाचित ही माहिती वेगळीही असू शकेल. आपल्याकडे फक्त संस्थाना एन.ओ.सी.द्यावयाची एवढेच अधिकार आहेत. ज्या युनिव्हर्सिटी ऑलरेडी अभिमत झालेल्या आहेत त्यावर राज्य सरकारला कंट्रोल ठेवता येणार नाही. या संदर्भातील सर्व अधिकार केंद्र सरकारला आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गेल्यावर्षी प्रमाणे 50 टक्के फ्री ॲडमिशन आणि पेमेंट सीटस्‌साठी 50 रिझर्व्हेशन म्हणजे 25 टक्के आरक्षण आहे. ज्या महाविद्यालयात जेवढे विद्यार्थी प्रवेश घेतील, त्यातील 50 टक्के आरक्षण मिळणार आहे की, जागेच्या 25 टक्के प्रमाणे आरक्षण मिळणार आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी या संदर्भात स्पष्टपणे सांगितलेले आहे की, गेल्यावर्षी जे आरक्षण लागू होते त्याच पध्दतीने यावर्षी आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या घटकांना वेगवेगळे आरक्षण आहे. इंजिनिअरींगसाठी वेगळे आरक्षण आहे, मेडिकलसाठी वेगळे आरक्षण आहे. इतर कोर्सेसाठी वेगळे आरक्षण आहे. या संदर्भातील माहिती आम्ही पब्लिश करीत असतो आणि त्याचा लाभ विद्यार्थी घेत आहेत. यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**सभापती** : विधयेक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 13 ( दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.दिलीप वळसे-पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र.68 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2006 चे वि.स.वि.क्र. 68 संमत झाले आहे.

----------

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4H-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई दारुबंदी ( सुधारणा ) विधेयक

L.A.BILL NO LXVII OF 2006.

A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY

PROHIBITION ACT, 1949

श्री.गणेश नाईक (उत्पादन शुल्क व कामगार मंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र. 67 - मुंबई दारुबंदी अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.गणेश नाईक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र.67 - मुंबई दारुबंदी अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, अवैध दारु तयार करण्यासाठी काळ्या गुळाचा वापर करण्यात येतो. त्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुंबई दारुबंदी अधिनियम 1949 च्या कलम 2 च्या खंड (28) मध्ये समाविष्ट असलेल्या "मळी" या संज्ञेच्या व्याख्येत, सन 2000 चा महाराष्ट्र सुधारणा अधिनियम क्रमांक 35 द्वारे फेरबदल करण्यात आले होते. .

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक...

"मळी" याचा अर्थ गूळ किंवा साखर तयार करताना उत्पन्न झालेला व ज्यामध्ये आंबवता येण्याजोगी द्रवरुप किंवा तरंगणारी साखर आहे असा जड व काळसर रंगाचा चिकट द्रवपदार्थ असा आहे. इतर पदार्थांपासून मद्य तयार करताना, त्यामध्ये मोहा फुले, ऊसाची मळी, या कच्चा पदार्थांपासून गावठी दारु देखील तयार केली जात होती. परंतु मोहा फुले, ऊसाची मळी व्यतिरिक्त कच्चा पदार्थ्यांचा दारुबंदीत समावेश होत नव्हता. अशामुळे सन 2006 मध्ये या काळया गुळावर नियंत्रण येण्याच्या दृष्टीने व्यापाऱ्यांना आणि घटकांना गूळाचा साठा, वाहतूक करण्यासाठी व त्याची विक्री करण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाकडून लायसन्स घेणे सक्तीचे केले आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना त्याचा फार मोठा त्रास होऊ लागला म्हणून आपण हे सक्तीचे केले आहे. म्हणून निश्चितपणे त्याठिकाणी त्या पदार्थाला काळा गुळ म्हणावा आणि कुठल्या पदार्थाला मळी म्हणावे अशा प्रकारची व्याख्या करण्याकरिता काही तज्ज्ञ लोकांची समिती नेमण्यात आली. त्यानुसार सल्फरडॉय ऑक्साईडचा उल्लेख या व्याख्येतून कमी करण्यात आला. डेक्ट्रोज व लेव्हूलोज मिश्रित साखर (इन्व्हर्ट) म्हणून म्हटली जाणारी 90 टक्क्यांपेक्षा कमी असेल इतकी एकूण साखर आणि 60 टक्क्यांपेक्षा कमी असेल इतकी याची साखर, अशा प्रकारे या प्रकरणांमध्ये आलेल्या पदार्थाला काळा गूळ म्हणून संज्ञा देण्यात आली. त्याची वाहतूक करण्यासाठी लायसन्सची जरुरी आहे अशा प्रकारे या बिलाचा साधारणत: ढाचा आहे. भविष्य काळामध्ये ज्या पदार्थामध्ये 85.5 टक्क्यांपेक्षा जास्त म्हणजे 90 टक्के प्रमाण असेल आणि 60 टक्के मळी म्हटली तर अशा मळीसाठी वाहतूक करताना त्याचे सबल कारण दिले नाही तर त्यावर कारवाई होऊ शकते. शेतकऱ्यांना व व्यापा-यांना होणारा त्रास कमी होण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचा छोटासा बदल यामध्ये करण्यात आलेला आहे, एवढेच मी याठिकाणी सांगू इच्छितो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, याठिकाणी मंत्री महोदयांनी एका गोष्टीचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. दारुबंदीचा कायदा झाल्यानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ज्या ग्रामपंचायती महिलांच्या ताब्यात आहेत, त्याठिकाणी त्यांनी एकताने ठराव केला तर त्या गावांमध्ये दारुबंदी करावयाची अशा प्रकारचा शासनाने कायदा केला. त्यानुषंगाने महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागामध्ये महिलांनी आंदोलनेही केली. त्याबाबतीत शासनाने केसेस केलेल्या आहेत. त्या केसेस बाबतीत अजूनही निर्णय घेतलेला नाही. त्या केसेस आपण मागे घेणार का ? तसेच, याठिकाणी आपण संपूर्ण मुंबई दारुबंदी सन 1949 मध्ये मळीच्या व्याखेमध्ये विवक्षित बदल सुचविले आहेत. आपण जे निश्चिपणे विवक्षित असे बदल सुचविले आहेत, त्याची माहिती मिळणे आवश्यक आहे. मुंबई शहरामध्ये जेवढी दारु विक्री केली जाते तेवढी जगाच्या पाठीवर कुठेही विकली जात नाही. म्हणून आपण दारुबंदीतून कोणते उद्दिष्टे साधले ? वर्धा शहरामध्ये सव्वा लाख रुपयांची अवैध दारु पकडली गेली. अशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये दारुबंदी कायदा अंमलात आणला जात आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट.......

मी सभागृहात या अगोदर सांगितले होते की, गृह विभाग आणि उत्पादन शुल्क विभाग यांचा जोपर्यन्त समन्वय होत नाही तोपर्यन्त कायमस्वरुपी दारुबंदी होणार नाही. त्यामुळे या दोन्ही विभागांच्या समन्वयाच्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी स्पष्टीकरण करावे, अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

----------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, गुळ आणि मळी यामध्ये फरक करण्यासाठी आज हे बील या ठिकाणी आलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील व सन्माननीय सदस्य, श्री.भास्कर जाधव हे आपआपसात बोलत आहेत. माननीय मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांना जर काही प्रवचन करावयाचे असेल तर ते त्यांनी करावे. आम्ही ते ऐकण्यास तयार आहोत. तसेच, सन्माननीय सदस्य, श्री.भास्कर जाधव यांना या व्यवसायाची काही माहिती असेल तर त्यांनी त्याबाबत आपले विचार या ठिकाणी मांडावेत, आमची काही हरकत असणार नाही. हा पुष्कळांच्या आत्मीयतेचा विषय आहे. गावठी दारु ही लोकांच्या जीवनाची साथीदार बनली आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी अशा घोषणा यापूर्वी केल्या होत्या की, दारुबंदी करावी आणि दारुची दुकाने उभी करावीत. अशा प्रकारचे त्यांचे निवेदन वृत्तपत्रात छापून आले होते, कदाचित ते चुकीचेही असू शकेल. परंतु, दारुबंदी खाते कशासाठी ठेवले आहे ? हे मला कळत नाही. जेवढी दारु ज्याला हवी आहे तेवढी दारु महाराष्ट्रात उपलब्ध आहे. गावठी दारु आहे, विलायती दारु आहे, देशी दारु आहे, सर्व प्रकारची दारु मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्राच्या खेडयापाडयांमध्ये उपलब्ध आहे. मी एक उदाहरण देऊन सांगतो की, गावात दारुबंदी असावी, गावात दारु विकली जाऊ नये, अशी मागणी करणा-या महिलांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केलेले आहेत. यापूर्वी सन्माननीय सदस्य, श्री.विलास अवचट यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. मी एका गावामध्ये प्रयोग केला होता. तेथील महिलांना सांगितले की, या गावात दारुबंदी असावी. आपल्याला आश्चर्य वाटेल की, गावातील जे पुरुष दारु पित होते, त्या पुरुषांनी तक्रार करणा-या महिलांवर बहिष्कार टाकला. पोलिसांनी गावात येऊन महिलांना धमकी दिली की, ताबडतोब दारुबंदीची तक्रार मागे घ्या, नाही तर दुसरा विचार करावा लागेल. दुसरा विचार म्हणजे काय ? तर ज्या महिलांनी तक्रार केली असेल त्यांच्या नव-याला किंवा मुलाला पोलीस कोठडीत टाकायचे. म्हणजे मग त्यांच्या घरातील लोक पोलिसांकडे येतात आणि नव-याला किंवा मुलाला सोडण्याची विनंती करतात. अशा प्रकारचे दबावतंत्र वापरुन दारुबंदीची योजना उद्ध्वस्त करण्यात आली आहे. सन्माननीय दारुबंदी मंत्र्यांना विनंती आहे की, ही नाटके कशासाठी करीत आहात ? दारुबंदीच्या नावाने दारु पिण्यास शिकवित आहात. आता मळी आणि गुळ यामधील फरक या बीलाच्या माध्यमातून करीत आहात. या बीलाच्या उद्देश व

..3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.............

कारणांमध्ये म्हटलेले आहे की, "खाद्य गुळाचे प्रामाणिक गूळ उत्पादक शेतकरी व व्यापारी उक्त राज्य अधिनियमान्वये गुन्हयामध्ये गोवले जाऊ नयेत म्हणून, समितीने, मुंबई दारुबंदी अधिनियम 1949 मध्ये अंतर्भूत असलेल्या 'मळी' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये विवक्षित फेरबदल सुचविलेले आहेत." आणि यासाठी हे विधेयक आहे. सन्माननीय मंत्री, श्री.विनय कोरे या ठिकाणी उपस्थित आहेत, ते कोल्हापूर जिल्हयातील आहेत, कोल्हापूर जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर गुळाचे उत्पादन होते. ज्या ठिकाणी गुळाचे उत्पादन होते त्या ठिकाणी हा प्रश्न येतो. त्यामुळेच हा संघर्ष उभा राहिला आहे. काळा गुळ उत्पादित केला तर परवानगीमधून सवलत मिळू नये, त्यामधून शासनाला उत्पन्न मिळावे आणि यामधील संभ्रम दूर व्हावा, यासाठी हे विधेयक आणलेले आहे. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, हे दारुबंदी खाते रद्द करण्यात यावे आणि दारु मोकळी करावी. ज्याला दारु प्यायची असेल तो दारु घेईल, ज्याला नको असेल तो घेणार नाही. ज्याला दारु प्यायची असते त्याला दारु मिळत नाही, असा प्रश्न महाराष्ट्रात निर्माण होत नाही. पोलिसांना मोठया प्रमाणात उत्पन्न मिळते आहे. उत्पन्नाचे साधन हा एकच दारुबंदीचा अर्थ आहे. अवैध मार्गाने पोलिसांना उत्पन्न मिळावे, असे मला स्वत:ला वाटत नाही. पोलिसांना दारु पिण्याची सवय लागली आहे. तुम्ही रात्रीच्या वेळी एखाद्या पोलीस स्टेशनमध्ये गेला तर दारु न पिणारा पोलीस अधिकारी मिळणे अशक्य आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ........

या पार्श्वभूमीवर या प्रश्नाकडे बघण्याची आवश्यकता आहे. मी या विषयाला मुद्दाम वाचा फोडली की, कृपा करा. परंतु दारुबंदी करा. आपल्याकडे अंधश्रध्दा विधेयक येणार आहे त्यावेळी तो विषय येणार आहे. कायदे केल्यामुळे माणसांमध्ये बदल होत नाही. कायदे केल्यामुळे माणसे जास्त हट्टाने तसे करतात. आपण घटस्फोटासंदर्भात कायदा केला. परंतु घटस्फोटांची संख्या वाढतच आहे. कायद्यामध्ये तरतूद करुन आपण मार्ग दाखवितो आणि मार्ग दाखविले की, त्याचे अनुकरण करणारे पुष्कळ लोक समाजामध्ये आहेत. आपण जे केले ते उत्पन्नाचे साधन म्हणून केले. काळया गुळापासून शासनाला उत्पन्न मिळते. शासनाचे उत्पन्न वाढले पाहिजे. परंतु ते कोणत्या मार्गाने वाढविले पाहिजे हे फार महत्वाचे आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, दारुबंदी हा विषय खूप भयानक आहे. महात्मा गांधीजींना जाऊन आता 50-60 वर्षे झाली. महात्मा गांधींना जे अभिप्रेत होते ते अजून साध्य झालेले नाही. स्वर्गीय मोरारजी देसाई यांना जाऊन बरीच वर्षे झ ाली. काय प्यावे हे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. किती लोक दारु पितात, किती लोक पित नाहीत, यासंबंधी मला काही बोलावयाचे नाही. महाराष्ट्रामध्ये दारुबंदी हा विनोदाचा विषय झालेला आहे. महाराष्ट्रातील जनतेची कायद्याबद्दल टिंगलटवाळी होऊ नये, लोकांच्या मनामध्ये घृणा निर्माण होऊ नये, महिलांना संरक्षण मिळावे, त्यांच्या मुलांनी दारु पिऊ नये, त्यांच्या नव-याने दारु पिऊ नये, महिलांना त्या पासून संरक्षण मिळावे अशा पद्धतीने जर कायदा केला तर कदाचित या परिस्थितीमध्ये सुधारणा होईल, असे मला वाटते. त्याद्ष्टीने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

---------

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव शिंदे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मळी, गूळ आणि मग दारुबंदी यासंबंधी पातळ गूळ, काळा गूळ आणि मळी यासंदर्भात काळया गुळापासून चांगली दारु तयार होते म्हणून काळा गूळ विकण्यास बंदी घालण्यात आली होती. काळा गूळ कशामुळे तयार होतो याची माननीय मंत्री महोदयांकडे माहिती आहे काय ? कोणत्या ऊसाच्या जातीपासून काळा गूळ तयार होतो ? गूळ तयार झाल्यानंतर त्याचा पातळ गूळ तयार होतो. तो कशा प्रकारे तयार होतो ? आणि किती दिवसात तयार होतो ? याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी घेतली आहे काय ? ज्या केसेस होणार आहेत त्या कोणावर होणार आहेत ? शेतक-यांनी काळा गूळ विकला म्हणून, पातळ गूळ विकला म्हणून त्यांच्यावर केसेस होणार आहेत. हा गूळ कशा पद्धतीने तयार होतो याबाबतची पूर्व कल्पना यामध्ये असली पाहिजे. त्यामध्ये ग्लुकोज, सल्फर यांचे प्रमाण किती आहे. गूळ तयार करण्याच्या चुकीच्या प्रक्रियेमुळे अशा प्रकारचा गूळ तयार होते हे सिद्ध झालेले आहे. गूळ तयार करणा-यांवर केस दाखल करावयाची का गूळ विकणा-यांवर केस दाखल करावयाची ? यासंबंधी चर्चा होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास शिंदे ....

जुन्या काही ऊसाच्या जाती आहेत, त्या ठराविक जमिनीमध्ये येतात, उदाहरणार्थ कोल्हापूर भागामध्ये पिवळा गूळ होतो, असो. परंतु अन्य ठिकाणी जमिनीच्या प्रतीमुळेदेखील अशा प्रकारचा काळा गूळ तयार होतो. तेव्हा या केसेस होताना या सगळ्यांचा विचार व्हावा की, गूळ तयार करणारे, ऊसाची जात तसेच जमिनीची प्रत यामुळे देखील काळा गूळ होऊ शकतो. तेव्हा याचाही विचार व्हावा आणि यामध्ये विनाकारण शेतकरी अडकला जाऊ नये, पोलिसांच्या हाती यातून एक साधन येऊ नये इतकेच मला येथे सांगावयाचे आहे. बाकी दारूबंदीच्या बाबतीत मी माझे मत सांगितलेच पाहिजे असे नाही. गूळ आणि मळी यांचा विचार करता आता देखील गुऱ्हाळ करण्यासाठी देखील परवाने दिले जातात आणि ते देत असताना याचा काही विचार होणार आहे काय याचादेखील विचार यामध्ये व्हावा अशी इच्छा मी या प्रसंगी व्यक्त करतो. धन्यवाद.

****

....... 4एल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 67 - मुंबई दारूबंदी अधिनियम 1949 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक माननीय मंत्री महोदयांनी येथे आणले आहे. मला वाटते आमचे येथील अनेक सदस्य मित्र माझ्या मताशी सहमत होतील की, या विधेयकाचे नाव थोडे बदलले पाहिजे. दारू निर्माण करण्यासाठी सारा आपला खटाटोप सुरू आहे आणि नाव मात्र 'दारूबंदी' असे आहे. तेव्हा 'दारू उत्पादकता अधिनियम' किंवा 'दारू उत्पादकता विधेयक' असे याचे नाव केले तर ते जास्त सयुक्तिक होईल असे मला वाटते. सभापती महोदय, आमच्या काही मित्रांनी येथे सांगितले की, ऊसापासून मळी आणि मळीपासून गूळ तयार होतो. त्यामुळे यामध्ये गूळ तयार करणारे, शेतकरी आणि व्यापारी यांचा संबंध आहे. यातील गूळ निर्माण करणारे शेतकरी यामध्ये कोणत्याही प्रकारे कायद्यात सापडू नयेत म्हणून आपण सोय करीत आहोत. सभापती महोदय, दारूबंदीच्या बाबतीत आमच्या अनेक सदस्य मित्रांनी आपले विचार येथे मांडलेले आहेत. दारूमुळे कसे वैयक्तिक आणि सामाजिक नुकसान होते, परिवाराची कशी हानी होते, परिवार कसे उद्‌ध्वस्त होतात, विषारी दारू पिण्याचे किती लोक मृत्यूमुखी पडतात हे काही आपल्या राज्यासाठी आणि देशासाठी नवीन नाही. असे असले तरी आम्ही दारू निर्माण करण्यास देखील परवानगी देतो आणि ती विकण्यासाठीही परवानगी देतो शिवाय दारूबंदी देखील करतो. अशा प्रकारचा विरोधाभास यामध्ये दिसतो आहे तो अत्यंत न समजण्यापलिकडचा आहे, त्याचा विचार करण्याची गरज आहे. कधी कधी विषारी दारू पिऊन, गावठी दारू पिवून मुंबईमध्येच नव्हे तर ग्रामीण भागामध्ये, विदर्भामध्ये अनेक लोक मेले आहेत. गुजराथ राज्यामध्ये देखील असे प्रकार घडले आहेत. त्यामुळे विषारी दारू पिऊ नये असे सांगतानाच चांगली दारू प्या असाही संदेश मंत्री देत असतात. दारू पिऊन लोक मरू नयेत या शुद्ध भावनेतून असे बोलण्याची पाळी त्यांच्यावर येते आणि मग त्यांच्या टीकेचे प्रहार केले जातात. पण ही एक पुरातन अशा प्रकारची इंडस्ट्री आहे अगदी देवादिकांना देखील दारू लागत होती असे म्हणतात. म्हणूनच सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी दारूबंदी करण्याऐवजी दारू मोकळी करून टाका असे सांगितले. काही लोकांची सोय करण्यासाठी, पोलीस खात्यातील लोकांची सोय करण्यासाठी दारूबंदी केली जाते असेही म्हटले जाते. दारू पाजायची आणि जास्त दारू पिऊन दंगामस्ती केली म्हणून त्या व्यक्तीला दंड करावयाचा हे बरोबर नाही. आपल्याला

....... 4एल 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

माहितीच आहे की, दारूच्या आहारी गेलेली मंडळी प्रसंगी फ्रेंच पॉलिश देखील घेतात. गावठी दारू जास्त तेज व्हावी, परिणामकारक व्हावी म्हणून त्यात एंड्रीन सारखे अत्यंत विषयी द्रव्य मिसळले जाते आणि त्यामुळेही अनेक लोक मृत्यूमुखी पडल्याचे आपण पाहिलेले आहे. मुंबईसारख्या शहरामध्ये दारू फर्मेंट करण्यासाठी नवसागर वापरला जातो. विदर्भातील काही जिल्हे असे आहे की, तेथे मोहाची झाडे खूप आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ....4एम 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

या मोहाच्या फुलांपासून उत्कृष्ट प्रकारची दारु तयार होते. असे म्हटले जाते की, या मोहाच्या दारुची सर जगातील कोणत्याही दारुला येत नाही. रशियातील व्होडका असो नाही तर शँपेन असो, कोणत्याही दारुला ही सर येतच नाही. अशाप्रकारे मोहाच्या फुलापासून बनविण्यात आलेली पहिल्या धारेची दारु विदर्भामध्ये प्रसिध्द आहे.

सभापती महोदय, याचे एक उदाहरण मी आपणास सांगतो. मी कॉलेजमध्ये शिकत असतांना वर्धा जिल्हयामध्ये एका शेतावर माझ्या मित्रांबरोबर हुरडा पार्टी करावयास गेलो होतो. आमच्या बौध्द धर्मामध्ये दारु पीत नाही.परंतु माझे दोन-चार मित्र त्यामधील शौकीन होते. त्यांनी गावातील एका माणसाला मोहाची दारु आणण्यास सांगितले. त्यावेळी तो एका शिशीमध्ये पहिल्या धारेची मोहाची दारु घेऊन आला. शेतावर गेल्यानंतर मी माझ्या मित्राला विचारले की, ही पहिल्या धारेची दारु कशावरुन ओळखावयाची? त्यावेळी त्याने एक ट्रायल करुन दाखविली. त्याने आपले बोट त्या दारुच्या शिशीमध्ये बुडविले आणि काडीपेटीने ते पेटविले. त्यावेळी बोटाला लागलेली दारु फक्त पेटली. त्यानंतर त्याने 100 रुपयांची एक नोट त्या दारुमध्ये बुडवून ती काडीपेटीने पेटविली. त्यावेळी त्या नोटेला लागलेली दारु फक्त जळाली, त्या 100 रुपयाच्या नोटेला काही झाले नाही. तेव्हा मला एवढेच म्हणावयाचे आहे की, आपण पश्चिम महाराष्ट्रातील साखर उत्पादक, गूळ उत्पादक शेतकऱ्यांची आणि व्यापाऱ्यांची सोय बघत असतांना विदर्भातील, मराठवाडयातील मोहाच्या फुलापासून दारु निर्माण करण्यास आपण परवानगी दिली तर दारु पिणाऱ्या मंडळींना एक चांगल्या प्रकारची दारु मिळेल. याच्या पलिकडे जाऊन सांगतो की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आपण दारुबदी लागू केली तर महाराष्ट्रातील तमाम आया-बहिणी महाराष्ट्र सरकारला डोक्यावर घेऊन नाचल्याशिवाय राहणार नाहीत यादृष्टीने आपण विचार करावा. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, एका अतिशय गंभीर विषयावर या सदनामध्ये चर्चा चालू आहे. त्यामुळे आपल्याला या विषयाचे महत्व किती आहे हे समजते. खरे तर या विषयावर वेगळी अर्ध्या तासाची चर्चा आणि प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. आज वस्तुस्थिती अशी आहे की, या देशामध्ये गेल्या काही दिवसापासून उदारीकरणाचे धोरण आल्यापासून असे चित्र स्पष्ट झाले आहे की, या व्यवसायातील सहा प्रकारच्या वेगवेगळया लॉबी महाराष्ट्रामध्ये कार्यरत आहे. त्यामध्ये विदेशी दारुचे व्यावसायिक आहेत, देशी दारुचे उत्पादक व व्यावसायिक आहेत, त्याचप्रमाणे विदेशातून दारु आणून ती आपल्या ब्रँड नेमने विकणारे लोक देखील आहेत. त्याचप्रमाणे बीअर स्वस्त दरामध्ये विकून दारुच्या उत्पादकांना जास्त बाजारपेठ मिळावी यामध्ये सुध्दा खूप हितसंबंध गुंतले आहेत. ज्याप्रमाणे दारुच्या उत्पादकांची खूप मोठी लॉबी आहे त्याप्रमाणे बीअरमध्ये सौम्य आणि तीव्र अशाप्रकारच्या बीअर उत्पादकांची सुध्दा लॉबी आहे, वाईन उत्पादकांची लॉबी आहे. एक सत्य असे आहे की, जेवढे गावठी दारुवर नियंत्रण आणले जाते तेवढा देशी दारु उत्पादकांना, बीअर उत्पादकांना फायदा होतो ही वस्तुस्थिती आहे. हे लक्षात घेतले तर विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे त्याप्रमाणे खरोखरच शासनाचे विसंगतीपूर्ण धोरणाचे चित्र स्पष्ट दिसते. यामध्ये सुरुवातीला गूळाची व्याख्या बदलण्यात आली. आणि आता प्रामाणिक गूळ उत्पादक म्हटले आहे. ज्याप्रमाणे सराफाच्या दुकानामध्ये प्रामाणिक सराफ आणि चोरीचा माल विकत घेणारा सराफ यांची सीमारेषा ठरविणे अवघड असते. एका बाजूला काळा गूळ कुठेही मिळणार नाही, परंतु कुठेही सहजपणे मिळणाऱ्या मिथेनॉलवर आपण बंदी आणली पाहिजे. अशाप्रकारची बंदी न आणल्यामुळे समाजातील या पाच-सहा प्रकारच्या लॉबी शक्तिमान होतात . आणि त्या या ना त्या मार्गाने त्याचा पाठपुरावा करीत असतात. आणि म्हणून दारुबंदी करावी की करु नये एवढाच हा काल्पनिक प्रश्न राहिलेला नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु...

प्रसंगी गुन्हेगारीशी संबंधित प्रश्न तयार झालेले आहेत. केवळ महिला आणि ठराविक लोक सोडले तर संपूर्ण दारुबंदीच्या बाजूने कोणी नाही, ही वस्तुस्थिती आहे. या विधेयकाच्या माध्यमातून मला प्रश्न उपस्थित करावासा वाटतो की, यामध्ये वेगवेगळ्या लॉबी आहेत. ते वेगवेगळ्या प्रकारचे विसंगतपूर्ण निकाल आणत असतात. शासनाने मागच्या अधिवेशनामध्ये आश्वासन दिले होते की, या संदर्भाने ज्या ज्या महिलांनी आंदोलने केली, त्यांच्यावरील खटले मागे घेऊ. त्यानंतर पुन्हा शासनाने पत्र पाठविले की, महिलांवर कोणकोणते खटले आहेत, ते सांगावे. म्हणजे मी पोलीस अधीक्षकाची, पोलीस कमिशनरांची भूमिका घ्यावयाची आणि सांगायचे. पोलीस डिपार्टमेंट चालवायचे असेल तर शासनाला याची माहिती असावयास पाहिजे. मुळामध्ये गुळाची व्याख्या बदलून आमच्यासमोर विधेयक आणलेले आहे. पुन्हा कोणती तरी लॉबी भूमिका घेणार आणि पुन्हा आपण आमच्यासमोर बदल करणारी सुधारणा आणणार. मिथेनॉलसारखे पदार्थ स्वस्त मिळत असल्यामुळे तिचा उपयोग अवैधरित्या दारु तयार करण्यामध्ये केला जातो. मला आयुर्वेदाविषयीची माहिती आहे. दारु प्यालेल्या माणसामध्ये कोणत्या प्रकारची लक्षणे दिसतात याची मला कल्पना आहे. पहिल्यांदा दारु प्यायल्यानंतर त्याला संगीत ऐकावेसे वाटते, गाणी म्हणावेसे वाटते. दुसऱ्यांना दारु प्यायल्यानंतर तो खरे बोलायला लागतो आणि तिसऱ्यांदा प्यायल्यानंतर तो गाढवासारखा आवाज काढायला सुरुवात करतो. अशाप्रकारच्या त्याच्या स्टेजेस आहेत. म्हणून मला सांगावेसे वाटते की, शासनाने दारुबंदी विधेयकामध्ये त्रुटी ठेवू नये. धन्यवाद.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : खाजगी गुंतवणुकीद्वारे अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना प्राधान्याने वित्त सहाय्य उपलब्ध करुन देणे.

**मु.शी.** : खाजगी गुंतवणुकीद्वारे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांना प्राधान्याने वित्त सहाय्य उपलब्ध करुन देणे, यासंबंधी माननीय अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन.

श्री.विनय कोरे (अपारंपारिक ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील विविध स्त्रोतांसाठी शासनाने निर्धारित केलेल्या लक्ष्यांच्या पूर्ततेसाठी पोषक वातावरण तयार करुन सार्वजनिक व खाजगी गुंतवणुकीद्वारे अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना प्राधान्याने वित्त सहाय्य उपलब्ध व्हावे व या क्षेत्राचा कालबध्दरित्या जलदगतीने विकास व्हावा या दृष्टीकोनातून ऊर्जांकुर निधीची स्थापना करण्याचा धोरणात्मक निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असून, दिनांक 9 मार्च,2006 रोजी ऊर्जांकुर निधी ट्रस्टची नोंदणी करण्यात आली. देशात असा अभिनव नियोजन करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे.

ऊर्जांकुर निधी एकूण रु.418 कोटीचा असून, त्यात महाऊर्जाचा सहभाग हरित ऊर्जा निधीतून रु.218 कोटी, तर खाजगी गुंतवणूक रुपये 200 कोटी आहे. पुढील दोन वर्षाच्या कालावधीत रु. 2800 कोटीची गुंतवणूक आकर्षित करुन 1000 मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प 2008 अखेर कार्यान्वित करण्यात येतील.

ऊर्जांकूर निधीचा शुभारंभ माननीय ना.शरदचंद्रजी पवार, केंद्रीय कृषी मंत्री यांच्या हस्ते व माननीय ना.श्री.विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, माननीय ना.श्री.पतंगराव कदम, सहकार मंत्री, माननीय श्री.रवि पार्थसारथी, अध्यक्ष, आय.एल.एफ.एस. व सहभागी साखर कारखान्यांचे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत दिनांक 17 जुलै 2006 रोजी सकाळी 11-00 वाजता समारंभपूर्वक मुंबई येथे संपन्न झाला आहे.

----

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई दारुबंदी (सुधारणा ) विधेयक

**L.A. BILL NO. LXVII OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROHIBITION ACT, 1949.)**

( चर्चा पुढे चालू )

श्रीमती कांता नलावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, दारुबंदी यशस्वी व्हावी अशी सगळ्यांची इच्छा आहे. परंतु दारुबंदी करीत असताना शेतकऱ्यांना अडचणीत आणणारे काही मुद्दे यामध्ये नाहीत ना हे पाहिले पाहिजे. मला काकवीच्या संदर्भात सांगावयाचे आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये जे ऊस उत्पादक शेतकरी आहेत त्या प्रत्येक शेतकऱ्याच्या घरामध्ये गुऱ्हाळ असते आणि अशा शेतकऱ्यांच्या घरी काकवी मिळू शकते. जेवणामध्ये गोड पदार्थ म्हणून लहानांपासून मोठ्यांपर्यंत लोक काकवी खात असतात. अशा प्रकारे ज्या शेतकऱ्यांच्या घरी काकवी मिळेल ते शेतकरी यातून अडचणीत येणार आहेत काय ? हा प्रश्न यामध्ये निर्माण होतो. त्या ठिकाणी सर्रास लोकांच्या घरी काकवी असते. गोड पदार्थ म्हणून प्रत्येक घरामध्ये काकवी मिळू शकेल. दारु तयार करण्यासाठी ते काकवी घरामध्ये ठेवत नाहीत. असे लोक अडचणीत येणार नाहीत हे यामध्ये पाहिले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ D/

श्री. भास्कर जाधव ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 67 मांडण्यात आलेले आहे त्यासंदर्भात मी एकच प्रश्न विचारु इच्छितो. 1997-98 साली शासनाने एक निर्णय घेतला होता आणि खासकरुन आम्ही त्यासंदर्भात पाठपुरावा केला होता. गोव्यामध्ये काजू बोंडांपासून काजू फेणी बनविली जाते आणि गोव्यामध्ये विकली जाते. ती महाराष्ट्रामध्ये विकण्यास परवानगी नाही. परंतु कोकणामध्ये आता काजूची लागवड मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. एकट्या रत्नागिरी जिल्ह्याचा विचार केला तर वर्षाला 60 लाख टन बोंडे वाया जातात. एका रुपयाला एक किलो अशा पध्दतीने विक्री केली तरी नियोजन मंडळाच्या आराखड्यापेक्षा जास्त उत्पन्न या जिल्ह्याला मिळेल. हे करीत असताना शासनाचा महसूल वाढावा आणि शेतकऱ्यांना रोजगार मिळावा म्हणून गोव्याच्या धर्तीवर काजू फेणीला 9:1 याप्रमाणात शासन परवानगी देईल काय ? एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 67- मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे. ही सगळी चर्चा पाहिल्यानंतर आणि एकूण वातावरण पाहिल्यानंतर..

श्री. मधुकर चव्हाण : मी सन्माननीय सदस्यांना एक आठवण सांगतो. एकच प्याला नाटकामध्ये श्री. गडकरी यांनी सिंधुला इतके पवित्र ठेवलेले आहे की, त्या संपूर्ण नाटकामध्ये दारु हा शब्द तिच्या तोंडामध्ये नाही. सिंधु म्हणते की, स्वारीने तिला स्पर्श केला नाही तर चालेल काय ? असे आपले आहे काय ?

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, दारुबंदी हा माझा अतिशय व्यक्तिगत जिव्हाळ्याचा विषय आहे. या ठिकाणी सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 67 या विधेयकावरील सगळी चर्चा ऐकल्यानंतर आणि एकूण वातावरण पाहिल्यानंतर ज्या काही शंका आहेत त्यासंदर्भात बोलण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी सांगितल्याप्रमाणे काळा गूळ किंवा कोल्हापूरमध्ये मिळणारा गूळ आहे, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे फ्रेंच पॉलीश आहे तसेच मी पुण्यामध्ये पूर्व भागात राहतो त्या ठिकाणी स्पिरिट आणि फ्रेच पॉलीश लोक पित असत. त्याला पुण्यामध्ये डालडा म्हणावयाचे. या खात्याचे सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. गणेश नाईक यांची वर्तमानपत्रात एक बातमी आली होती की, हातभट्टीला अधिकृत करा. अशी बातमी माननीय मंत्रिमहोदयांच्या नावावर आली होती. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी एक मुद्दा मांडला की, एका बाजूला 60 टक्के माहिलांनी मागणी केली तर दारु दुकान बंद करण्याचा अतिशय चांगला निर्णय शासनाने घेतला. असा निर्णय लोकांच्या समोर आणावयाचा आणि दुसऱ्या बाजूला त्याच महिलांवर केसेस करुन त्या केसेस काढावयाच्या नाहीत अशी परिस्थिती आहे. यामध्ये नक्की काय करावयाचे आहे याबाबत स्पष्ट आणि स्वच्छ उद्दिष्ट दिसत नाही, हे अतिशय दुर्दैवी आहे. मला नम्रपणे सांगितले पाहिजे की, या देशामध्ये स्व. लोकमान्य टिळकांपासून, महात्मा ज्योतिबा फुलेंपासून, महात्मा गांधींपासून परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सर्वांनी दारु विषयक आपली मते मांडलेली आहेत आणि

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ...

खऱ्या अर्थाने दारुबंदीचे समर्थन केलेले आहे. मला सांगितले पाहिजे की, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्यावेळी परदेशामध्ये शिकण्यासाठी होते तेव्हा आठवड्यातून एक दिवस सर्व विद्यार्थ्यांना सर्व कामे करावी लागत होती आणि काम केल्यानंतर सायंकाळी जेवण असावयाचे. त्या जेवणामध्ये पाश्चिमात्य पध्दतीप्रमाणे दारु पुरवावयाचे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. उल्हास पवार...)

एकदा प्राचार्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विचारले की, Where is your glass ? त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, मी आयुष्यामध्ये दारुला कधीही स्पर्श केला नाही. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले, महात्मा गांधींनी केले. दारुबंदी करणे आणि दारुचा परवाना देणे ही दोन्ही कामे एकाच खात्याकडे सोपविलेली आहेत. अलीकडच्या काळामध्ये दारुबंदी प्रचारासाठी गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते, कैकाडी महाजराज संप्रदायाचे कार्यकर्ते, भागवत संप्रदायाचे कार्यकर्ते कार्य करीत होते आणि त्याबद्दल त्यांना मानधन दिले जात होते. परंतु आता त्यांचे मानधन बंद करुन ही जी दारुचा प्रसार करण्याची पध्दत शासनाने अवलंबिलेली आहे ती अत्यंत खेदजनक अशी आहे. या दारुपायी समाजातील सर्वात गरीब माणूस भरडला जातो. या दारुपायी गरीब माणसांचे संसार कसे उद्ध्वस्त होतात हे तुम्ही आम्ही डोळयांनी पाहिलेले आहे. या ठिकाणी शुध्द दारु असा उल्लेख केलेला आहे. विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. बाळासाहेब भारदे यांनी असे म्हटलेले आहे की, विष हे कधीही शुध्द असू शकत नाही, विष हे विषच असते. दारु ही सुध्दा विषासारखीच आहे. त्यामुळे शुध्द दारु असू शकत नाही. जी गरीब कुटुंबे दारुमुळे उद्ध्वस्त होतात अशा गरीब कुटुंबातील महिलांनी दारुबंदीबाबत आंदोलन केले तर पोलीस अशा महिलांना पोलीस स्टेशनमध्ये रात्र-रात्र आणि दिवस-दिवस अटक करुन ठेवतात. त्यामुळे या राज्यामध्ये ख-या अर्थाने दारुबंदी व्हावी अशा प्रकारचा सरकारचा हेतू मला दुर्देवाने कधीच दिसला नाही असे खेदपूर्वक अंत:करणाने मी माझे मत या सभागृहामध्ये मांडत आहे. मूळ कायद्यामध्ये रेव्हेन्यू वाढविणे हा उद्देश असल्यास सांगितलेले आहे. जेव्हा बिअर ही सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध होईल अशा प्रकारचा निर्णय राज्य सरकारने घेण्याचे ठरविले त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, हा निर्णय घेतला तर मी महात्मा गांधीच्या पुतळ्याखाली उपोषणाला बसेन. असे मी सांगितल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी तो निर्णय मागे घेतला. मुद्दा असा आहे की, आज लोकांना शुध्दीवर ठेवण्या ऐवजी त्यांना बेशुध्द ठेवून समाज कसा चालेल हे पाहाण्याचा प्रयत्न होतोय. अशा प्रकारचे विधेयक आणण्याचा निर्णय घेत असताना समाजातील गरीब माणूस उद्ध्वस्त होणार नाही हे कटाक्षाने पाहिले पाहिजे. तसेच दारुबंदीसाठी ज्या महिलांनी आंदोलने केली अशा महिलांवर

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. उल्हास पवार...)

जे खटले दाखल झालेले आहेत ते खटले मागे घेतले पाहिजेत आणि दारुबंदीसाठी ज्या महिला आंदोलन करतात त्यांना संरक्षण दिले पाहिजे अशी भावना या विधेयकाच्या निमित्ताने व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2..

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (उत्पादन शुल्क मंत्री ) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी महिलांवर भरलेले खटले शासनाने मागे घ्यावेत अशा प्रकारची जी मागणी केलेली आहे तिचा पुनरुच्चार सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी केला. एखाद्या ठिकाणी दारुबंदी करावयाची असेल तर 50 टक्के महिलानी एकत्र येऊन मतदान केले तर ते दारुचे दुकान बंद होते. तसेच ग्रामपंचायतीने तसा ठराव पास केला तर ते दुकान बंद होते. दारुचे दुकान बंद करण्यासंदर्भात काही आंदोलने झाली असतील किंवा काही घटना घडल्या असतील. अशा आंदोलनाच्या वेळी जर विशेष हानी झाली नसेल किंवा मारहाण झाली नसेल, महात्मा गांधीच्या विचारसरणीनुसार सत्यागृहाचा अवलंब करुन आंदोलन झाले असेल तर अशा आंदोलनाच्या संदर्भात महिलांवर भरलेले खटले निश्चितच मागे घेण्यात येतील. परंतु एखाद्या ठिकाणी मारहाण आणि तोडफोडीचे प्रकार झाले असतील तर त्यासंदर्भातील खटले मागे घेता येणार नाहीत. माझ्याकडे दारुबंदी खाते नसून उत्पादन शुल्क हे खाते आहे. मद्य निर्मिती आणि त्यावरील नियंत्रण या गोष्टी माझ्या खात्याच्या अंतर्गत आहेत. दारुच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी निषेध व्यक्त केलेला आहेत त्यांच्या मताशी मी देखील सहमत आहे. गावठी दारुला बंदी आहे. देशी दारुला बंदी नाही. 1970 सालापर्यन्त या राज्यामध्ये दारुबंदी होती.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 19:25

श्री.गणेश नाईक..........

खोपोली येथे विषारी दारुचे प्रकरण झाले, तत्कालीन मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्या कालखंडात हे प्रकरण घडले होते. दारु ही अतिशय वाईट आहे. दारु व्यक्तीला, कुटुंबाला, समाजाला अत्यंत धातक आहे. दारुमुळे संस्कृतीचा नाश होतो. खोपोली येथे विषारु दारु प्राशन केल्यामुळे लोकांचे बळी गेले त्यामुळे पर्याय म्हणून देशी दारुच्या निर्मितीला सुरुवात झाली. दारुच्या विक्रीवरील करातून किंवा उत्पन्नातून हे शासन चालविण्याची आमची निश्चितपणे इच्छा नाही. मी खालच्या सभागृहात अध्यक्ष महोदयांना विनंती केली, या विषयावर 5-10 मिनिटे चर्चा न होता 3-4 तासाची चर्चा झाली पाहिजे. दारुविषयी तीव्रतेने बोलणारे काही घटक खाजगीमध्ये दारुचे लायसन्स कधी खुले होणार, अजून काही दारुची दुकाने वितरित होणार आहेत का अशी चर्चा करतात. दाखवयाचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे अशातला हा प्रकार आहे. माझे म्हणणे असे आहे की, प्रत्येक पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आपापल्या पक्षाचे प्रमुख, अध्यक्ष किंवा हायकमांड, पक्षश्रेष्ठी यांच्याशी चर्चा करुन या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणावी. सभापती महोदय, गुजराथ राज्यामध्ये दारुबंदी आहे परंतु सर्रास दारु पिणे देखील चालू आहे. त्याठिकाणी विषारी दारुमुळे मृत्यू झाल्याची बातमी ऐकायला मिळालेली नाही. गुजराथ राज्यामध्ये गावठी दारु सुध्दा निर्माण होत असावी. यासंबंधी माझे स्पष्ट मत आहे, या सभागृहात किंवा खालच्या सभागृहात चर्चा झाली पाहिजे आणि दारुबंदी या विषयावर मतदान झाले पाहिजे. या शासनाला दारुवरील उत्पन्नातून राज्य चालविण्याची इच्छा बिलकूल नाही. देशी दारु बंद केल्यानंतर त्याचे जे दुष्परिणाम होतील त्याला सामोरे जाण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. याठिकाणी जे बिल आणले आहे त्यामध्ये मळीच्या व्याख्येत फेरबदल सुचविलेले आहेत. मळी आणि काकवी यामध्ये फरक आहे. काकवीमुळे कधी त्रास होणार नाही. सर्वजण ती बाळगू शकतात. परंतु मळी बाळगता येणार नाही. या बिलामध्ये इन्वर्ट साखर म्हणून संबोधल्या जाणाऱ्या साखरेमध्ये घटकद्रव्य 85 टक्क्यापेक्षा कमी आणि सुक्रोजचे प्रमाण 57 टक्क्यापेक्षा कमी एवढाच बदल घडविण्यात आला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी समितीने ज्या 7 सूचना केल्या त्या काय आहेत असा मुद्दा उपस्थित केला. त्या सूचना पटलावर ठेवल्या जातील. याठिकाणी मिथेनॉलचा उल्लेख करण्यात आला. मिथेनॉल हे एफडीएच्या अखत्यारित येते. निश्चितपणे या पदार्थापासून विषारी दारु बनते आणि निश्चितपणे उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस विभाग या पदार्थाचा गैरवापर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 19:25

श्री.गणेश नाईक.........

होणार नाही याविषयी दक्षता बाळगून आहे. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांनी मोहा फुलाविषयी माहिती दिली. मोहा फुलाच्या उत्पादनावर 13 टक्के कर लावला जातो. खरे म्हणजे वाईन चांगली आहे किंवा ती अधिक उत्पादित करावी असे कोणी प्रोत्साहित करणार नाही. वाईन या राज्यामध्ये किंवा देशामध्ये तयार होत नव्हती, ती परदेशातून आयात होत होती. उद्देश एवढाच आहे की, ज्यावेळी महाराष्ट्रातील कोल्हापूर, नाशिक, सांगली, पुणे या जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात द्राक्षांचे उत्पादन घेतले जाते त्या द्राक्षापासून शेतकऱ्यांना उत्पादन खर्च देखील मिळत नाही. अशी द्राक्षे परदेशात पाठवावी तर खतामध्ये आणि फवारणीमध्ये वापरले जाणारे केमिकल यामुळे द्राक्षांना मागणी येत नाही. अशा प्रकारच्या द्राक्षांपासून जर वाईन निर्मिती करुन ती परदेशात पाठविली जाणार असेल आणि आपल्या देशामध्ये किंवा राज्यामध्ये अशा वाईनची विक्री होणार असेल तर निश्चितपणे आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहित करुन त्यांच्या शेतामध्ये वाईन निर्मितीसाठी उपयुक्त द्राक्षांची लागवड व्हावी, आजुबाजूच्या परिसरातील मजुरांना त्यापासून रोजगार मिळावा, त्यामधून उत्पन्न निर्माण व्हावे.............

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ......

ही वाईन निर्मितीची भूमिका आहे. विदर्भातील शेतक-यांनी मोसंबी पासून वाईन तयार करावी, मोहाच्या फूलापासून वाईन तयार करावी व त्याला 10 वर्षाकरता एक्साईज माफ करावे, कोकणातील शेतक-यांनी काजूच्या बोंडापासून मद्य निर्माण करावे व त्याला 10 वर्षाकरिता एक्साईज माफ करावे. बाजरी-ज्वारीपासून मद्य निर्माण करावे व त्याला 10 वर्षाकरिता एक्साईज माफ करावे असे सांगण्यात आलेले आहे. परंतु धान्यापासून जे मद्य निर्माण होते व द्राक्ष किंवा संत्रीपासून जे मद्य निर्माण होते यामध्ये मोठया प्रमाणात तफावत आहे. अन्नधान्यापासून निर्माण होणारे मद्य हे महाग पडते. त्यामुळे मळी आणि अन्न धान्यापासून तयार होणा-या मद्याच्या किमतीत मोठी तफावत आहे. विदर्भ आणि मराठवाडयात मोठया प्रमाणात ज्वारी आणि बाजरीचे उत्पादन केले जाते. त्यामुळे बाजरी आणि ज्वारी पासून तयार करण्यात आलेल्या मद्याला चांगली बाजारपेठ मिळते. मळी पासून निर्माण केलेले अल्कोहोल विदेशात स्वीकारले जात नाही तर ग्रेन बेस पासून तयार करण्यात आलेले अल्कोहोलच परदेशात स्वीकारले जात असते. त्यामुळे या खात्याचा मंत्री म्हणून मद्य निर्मितीसाठी शेतक-यांना प्रोत्साहित केले जाईल व त्या अनुषंगाने शेतक-यांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाईल. सभापती महोदय, जर आपण आपल्या राज्यात मद्य निर्माण केले आणि ते परदेशी पाठविले तर त्याला कोणी बंदी केलेली नाही. दारुचे प्राशन करु नये या मताचा मी सुध्दा आहे. परंतु काही लोक सांगतात की, माझ्या शरिराच्या घटकाला अल्कोहोलची आवश्यकता असल्यामुळे डॉक्टरांनी मला अल्कोहोल घेण्यास सांगितलेले आहे व त्यामुळे मी लायसन्स घेतलेले आहे असे सांगणारेही लोक बरेच आहेत. शेवटी गावठी दारु प्राशन करुन मरण्यापेक्षा देशी मद्य पिणे बरे असे म्हणावे लागते. शेवटी मद्य पिणे हे वाईटच आहे. मी मद्याचा पुरस्कार करणारा नाही. या ठिकाणी "मळी" च्या व्याख्येत फेर बदल करावा अशी विनंती शेतक-यांनी आणि व्यापा-यांनी केली होती. शेतक-यांना आणि व्यापा-यांना काळया गुळापासून फार त्रास होत होता त्यामुळे यासंदर्भात शिफारस केल्या प्रमाणे "मळी" च्या उक्त व्याख्येत फेरबदल करण्याचे ठरविण्यात आलेले तसेच "काळा गुळ" या संज्ञेची पुन्हा व्याख्या करतांना अवैध दारु तयार करण्यासाठी वापरल्या जाणा-या या काळया गुळाला उक्त अधिनियमान्वये सूट मिळणार नाही याची सुनिश्चिती करण्यात आलेली आहे व त्यामुळेच हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. हे विधेयक संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शिर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. गणेश नाईक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 67 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 67 संमत झाले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी ( सुधारणा ) विधेयक

L. A. BILL NO. LXXIV OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र. 74- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्र. 74 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आपण 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती केली आहे. परंतु आजही भारतीय घटनेला देखील संसदीय पध्दतीची नागरी प्रशासकीय पध्दत अभिप्रेत आहे. केंद्र सरकारने राज्यातील सर्व नगरपरिषदांचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली होती. त्या समितीने काही शिफारशी केलेल्या आहेत. त्यातील पहिली शिफारस अशी आहे की, सर्व नागरी संस्थामध्ये एकच कायदा असावा. दुसरी शिफारस अशी की, सर्व नगरपरिषदेचे कार्यकारी अधिकार स्थायी समितीला असावे. मॉडेल लॉ ने देखील अशी शिफारस केलेली आहे. आजची जी कार्यपध्दती आहे त्याबाबत आपल्याला अनेक उदाहरणे देता येतील. नगरपरिषदेमध्ये अध्यक्षांना अधिकार नसतो. सर्व अधिकार हे स्थायी समितीला आणि जी.बी.ला असतात. जर अध्यक्ष वेगळ्या विचारांचा असेल आणि कौन्सिलर वेगळ्या विचारांचा असेल तर हाती घ्यावयाच्या विविध विकास विषयक कामांवर त्याचा प्रतिकूल परिणाम दिसून येतो. जर अध्यक्षांची इच्छा नसेल तर ते अजेंड्यावर विषय आणत नाहीत अशाप्रकारची अनेक उदाहरणे आपल्याला पहावयास मिळालेली

श्री.राजेश टोपे.........

आहेत. त्यामुळे शासनाचा पैसा अखर्चित राहिलेला आहे. अशाप्रकारे विकास कामांना रोख लागल्याचे चित्र आपणास अनेक नगरपालिकांमध्ये पहावयास मिळेल. म्हणून अशाप्रकारचे विधेयक आणण्यात येत आहे. आम्ही कोणालाही अस्थीर करीत नाही. अध्यक्षावर दोन वर्षे अविश्वासाचा प्रस्ताव आणता येणार नाही. जर अविश्वास प्रस्ताव आणावयाचा असेल तर तो 50 टक्क्यांनी आणावा लागेल आणि 3/4 मतदान पध्दतीने त्यांना काढता येईल. कोणत्याही परिस्थितीत अस्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न या विधेयकामार्फत होणार नाही.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात मराठवाड्यात एक अधिवेशन घेतले होते. त्याठिकाणी मराठवाड्यातील सर्व नगरसेवक आणि नगराध्यक्ष आले होते. त्यावेळी सर्व नगरसेवकांनी सांगितले की, नगराध्यक्ष आणि नगरसेवकांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेबनाव असल्यामुळे विकासाची कामे ठप्प झ ाालेली आहेत. मागच्या पाच वर्षात हे विधेयक का आणण्यात आले नाही अशी विचारणा करण्यात येईल. याबाबतीत मी आपणास सांगू इच्छितो की, राज्य शासनाच्या वतीने एक प्रयोग करण्यात आलेला आहे. त्यानुसार हे विधेयक आणलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ ऑर्डरसंबंधी</u>.**

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, या बिलानंतर आपण अर्धा-तासाच्या सूचना चर्चेसाठी घेणार का ?

**सभापती** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची तयारी असेल तर आपण अर्ध्या-तासाच्या सूचना घेऊ.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण अर्ध्या-तासाच्या सूचना विशेष बैठकीमध्ये घ्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : अगोदर आपण हे बिल पूर्ण करुन घेऊ. त्यानंतर उद्या सकाळी 10.30 ते 1.00 वाजेपर्यंत विशेष बैठक घेऊव त्यामध्ये आपण अर्धा-तासाच्या सूचना चर्चेसाठी घेऊ.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO.LXXIV OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)**

(चर्चा पुढे सुरु...

श्री.विलास अवचट (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक वाचत असताना मला महंम्मद तुघलकांची आठवण झाली. ज्याप्रमाणे महम्मद तुघलक राजधानी बदलत होता, त्याप्रमाणे शासनाने याठिकाणी हे बिल आणलेले आहे. या बिलाचा उद्देश सांगत असताना माननीय राज्यमंत्र्यांनी शेवटी असे सांगितले की, हा प्रयोगात्मक विषय होता. हा विषय प्रयोगात्मक करीत असताना आपण महाराष्ट्राला 5 वर्षे मागे नेत आहात. यामध्ये आपण असे म्हटले आहे की, "बहुतेक नगरपरिषदांमध्ये थेट निवडून आलेला अध्यक्ष आणि परिषद सदस्य यांच्यामध्ये सहकाराची भावना किंवा मतैक्य नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे नगरपरिषदेने हाती घ्यावयाच्या विविध विकासविषयक कामांवर व योजनांवर प्रतिकूल परिणाम होत आहे." म्हणजे, पाच वर्षापूर्वी मांडलेला मुद्दा आपण परत मांडत आहात. हे विधेयक घातक आहे, याबाबत आपण अनेक उदाहरणे दिलेली आहेत. 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती करुन आपण हे विधेयक आणले व 5 वर्षांमध्ये परत याठिकाणी हे विधेयक यावे, ही फार मोठी शोकांतिका आहे. आपण प्रभागनिहाय निवडणूक घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फसला. म्हणून याठिकाणी पूर्वीची महापालिका आणि नगरपरिषदांची निवडणूक परत घेता येते असे म्हटले. त्यामुळे या विधेयकामध्ये विसंगती आहे. त्यामुळे याबाबत खुलासा व्हावा. विधेयकातील पान क्रमांक 2 मध्ये असे म्हटले आहे की, "नगरपरिषदेवर निवडून आलेल्या परिषद सदस्यांची नावे कलम 19 च्या पोट-कलम (1) अन्वये, राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द करण्यात येतील किंवा, यथास्थिति, प्रथम प्रसिध्द करण्यात येतील, त्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी, अध्यक्षाला निवडून देण्यासाठी परिषद सदस्यांची एक विशेष सभा बालावील." तसेच पुढे असेही म्हटले आहे की, "पोट-कलम (2)

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट....

अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी याबाबत लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा, त्याला नगर परिषदेच्या अध्यक्षाला नगरपरिषदेच्या सभेच्या अध्यक्षपदी असताना जे अधिकार असतात तेच अधिकारी असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही," यामध्ये आपण निश्चित कोणत्या अधिकाऱ्यास बसविणार आहात ? याबाबतचा खुलासा करावा. तसेच यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "अध्यक्षाच्या निवडणुकीत जर समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल चिठ्ठया टाकून करण्यात येईल व चिठ्ठया टाकण्याचे काम जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा पीठासीन अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, तो ठरवील अशा रीतीने करण्यात येईल. अध्यक्षाच्या निवडणुकीबाबतचा कोणताही वाद राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल."

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट.....

राज्य शासन याबाबत कोणता निर्णय घेणार आहे ? नगरपालिका, महापालिका निवडणुकांमध्ये एकाच ठिकाणी 2 महापौर निवडले गेले. राज्य शासन अशा प्रकरणी कोणते निकष लावणार आहे ? यासाठी कायद्यात कोणती तरतूद आहे ? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बीलात असे नमूद केले आहे की, "अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणाने रिक्त झाले असेल तर, अध्यक्षाच्या नंतरच्या निवडणुकीकरिता, पोट कलमे (2) ते (6) (दोन्ही धरुन) यात ठरवून दिलेली कार्यपध्दती लागू होईल, मात्र पद रिकामे झाल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावील." ज्या प्रमाणे आपल्या सभागृहात पीठासीन अधिकारी असतात, अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष कारभार चालवितात, त्याप्रमाणे नगरपालिकांमध्ये अध्यक्षांऐवजी उपाध्यक्ष कारभार चालवतील का ? याचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे मतदानाची पध्दत कोणती असणार आहे ? गुप्त पध्दतीने मतदान होणार आहे काय ? आतापर्यन्त मी ज्या विसंगती दाखविल्या त्यामध्ये सगळयात महत्वाची विसंगती ही आहे की, मतदानाची पध्दत सूचविलेली नाही. आतापर्यन्त रुढ असणारी पध्दतच असणार आहे की, नवीन पध्दत येणार आहे ? याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे. धन्यवाद.

----------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ D/ MHM/

श्री.सुरेशदादा देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी शासनाचे या ठिकाणी मन:पूर्वक आभार मानतो. मराठवाडयामध्ये नगराध्यक्ष, नगरसेवक, उपाध्यक्ष, नगरपालिकांचे पदाधिकारी यांची एक परिषद आयोजित करण्यात आली होती व त्या परिषदेला सन्माननीय मुख्यमंत्री व नगरविकास राज्यमंत्री उपस्थित होते. त्या परिषदेमध्ये थेट नगराध्यक्ष आणि नगरसेवकांमधून निवडले जाणारे नगराध्यक्ष यामधील फरक आम्ही निदर्शनास आणून दिला आणि शासनाने या बीलाच्या माध्यमातून आज आमची विनंती मान्य केली आहे. आमची विनंती मान्य केल्याबद्दल, नगराध्यक्षांच्या वतीने, नगरसेवकांच्या वतीने आणि तमाम जनतेच्या वतीने मी शासनाचे आभार मानतो. हिंगोली येथील नगराध्यक्षांच्या निवडीसंदर्भातील उदाहरण मी या ठिकाणी देऊ इच्छितो. त्या ठिकाणी थेट नगराध्यक्ष निवडले गेले व सभागृहातील बाकीचे नगरसेवक हे इतर विविध पक्षातील होते. त्या नगरपालिकेकडे निधी असतांना नगराध्यक्षांना कामे करता आली नाहीत. पर्यायाने 31 मार्चला उपलब्ध निधी लॅप्स झाला. नगराध्यक्षांचे एक मत होते तर नगरसेवकांची वेगवेगळी मते होती. त्यामुळे त्या शहराचे नुकसान झाले. नगरसेवकांमधून ज्यावेळी नगराध्यक्ष निवडला जातो त्यावेळी तो एका पक्षाचा असतो, त्याच्याबरोबर सभागृहातील बहुमत असते. नगराध्यक्ष हे पद सक्षम होण्याच्या दृष्टीने आता जी पध्दत शासनाने स्वीकारली आहे ती पध्दत योग्य आहे. 5 वर्षापूर्वी किंवा त्यापूर्वी नगरपालिकेच्या नगराध्यक्षांना जे अधिकार होते त्यामध्ये नगरपालिका आणि नगरपालिकेतील सदस्य यांच्यामध्ये एकमत होते आणि त्यामुळे नगरपालिकेचा कारभार चांगला चालत होता. आता जर 62 नगरसेवक असतील आणि नगराध्यक्ष वेगळया पक्षाचा असेल तर त्यांची मते भिन्न असतात व त्यामुळे नगरपालिकेचा कारभार करणे कठीण जाते. त्यामुळे ही सर्व वस्तुस्थिती परिषदेमध्ये मांडण्यात आली व विनंती करण्यात आली की, नगरसेवकांमधून नगराध्यक्ष निवडला गेला पाहिजे. आज हे विधेयक आणून अतिशय चांगला निर्णय शासनाने घेतला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बोरले.............

श्री.सुरेश देशमुख ........

माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपेसाहेबांना नगराध्यक्ष आणि नगरसेवकांबद्दल बरीच माहिती आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांचा नगरपालिकेविषयी चांगला अभ्यास आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते ज्यावेळी मराठवाडयाचे संपर्क प्रमुख होते त्यावेळी मी नगरसेवक होतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ज्यावेळी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष होते त्यावेळी मी नगरसेवक होतो. त्यावेळी विधायक कामांसाठी सर्व नगरसेवक एका बाजूने आले होते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे सभागृहाचे उद्‌घाटन करण्यासाठी आले होते. त्या सभागृहासाठी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 74 लाख रुपये निधी दिला होता. नगरसेवक आणि नगराध्यक्ष एकत्र असल्यामुळे हे होऊ शकले. एका दिवसामध्ये निर्णय घेण्यात आला, दुस-या दिवशी सर्वसाधारण सभा झाली आणि तिस-या दिवशी नोटीस दिल्यानंतर प्रस्ताव मंजूर करण्यात आला. नगराध्यक्ष आणि नगरसेवक एकत्र असल्यामुळे हे होऊ शकते. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला पाठिंबा द्यावा, अशी मी विनंती करतो आणि शासनाचे अभिनंदन करुन माझे दोन शब्द संपवितो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4V-2

GRB/ D/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ....... 19:50

श्री.विनोद तावडे (महाराष्ट्र सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी जे भाषण कले, जे मुद्दे मांडले ते मुद्दे 5 वर्षापूर्वी या बाजूने मांडले गेले होते. पृथ्वी गोल फिरते, बहुधा उलटे झाले असावे. मी सन्माननीय सदस्य श्री.सुरेश देशमुख यांना सांगू इच्छितो की, हे जे विधेयक मांडण्यात आले आहे त्याचे श्रेय आपण घेऊ नका, नगरपरिषदांना देऊ नका, शासनाला देऊ नका, याचे श्रेय द्यावयाचे असेल तर ते श्री.नंदलाल यांना द्या. त्यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या तोंडाला जो फेस आणला ते याचे खरे गमक आहे. विधेयकामध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, "जिल्हाधिकारी स्वत: किंवा त्यांनी नेमलेला प्रतिनिधी तो त्याचा अध्यक्ष राहील. या नंतर समजा कोणताही वाद निर्माण झाला तर शासनाकडे येईल आणि शासनाचा निर्णय अंतिम असेल". हे खरे या विधेयकातील छूपे गमक आहे. त्यावेळी अनेकांनी असे सल्ले दिले की, थेट निवडणूक घेऊन अल्पसंख्यांकांनी जर आपल्याला मते दिली तर आपला नगराध्यक्ष निवडून येऊ शकतो. लोकशाहीतील हे अडथळे, प्रश्न खालच्या सभागृहामध्ये आणि या सभागृहामध्ये त्यावेळी अतिशय प्रखरपणे सर्वांनी मांडले होते. अमेरिका, फ्रान्स, रशियामध्ये राष्ट्राध्यक्ष थेट निवडला जातो. त्यामुळे नोकरशहाला डोके वर करण्यासाठी वेळ मिळत नाही, अशी भाषणे त्यावेळी समोरच्या बाकावरुन झाली होती.

यानंतर श्री.सुंबरे ..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे ....

आता काय झाले ? आमचे समोरचे मित्र एक चांगले वकील आहेत. त्यामुळे असे मांडले तर असे, तसे मांडले तर तसे ते सांगणार. यामध्ये नगरपालिकांचे, नगरसेवकांचे अधिकार वाढावेत म्हणून आपण हे केलेले नाही. तर आपल्या हातामध्ये सर्व अधिकार रहावेत, ही सगळी प्रोसेस आपल्या हातामध्ये रहावी यासाठी म्हणून हे विधेयक येथे आलेले आहे आणि म्हणूनच या अर्थाने ते घातक आहे. मला असे वाटते की, निवडणूक आयोगाची जी प्रक्रिया आहे ती नि:पक्ष अशीच राहू द्यात. कशासाठी आपण ती आपल्या हातामध्ये घेताहात ? याचे उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेच नाही. दुसरे असे की, यामध्ये आपण सांगितले आहे की, यामध्ये अपील हे केवळ प्रादेशिक संचालक यांचेकडे करता येईल. ही या विधेयकातील चिंतेची बाब आहे असे मला वाटते. लोकशाही प्रगल्भ करावयाची असेल तर आपण हे करता कामा नये. मध्यंतरी आपण केंद्र सरकारला ठराव करून सांगितले की, उघड मतदान पद्धती असावी पण हे आम्ही अत्यंत दु:खद अंत:करणाने ठराव करून केंद्र सरकारला पाठविला आहे. आपल्या लोकांवरील पकड सैल झाली म्हणून असेल, पण आपण ते केले आहे. परंतु त्यामुळे पुन्हा नगर परिषदेचे सदस्य निवडणार म्हणून ती पद्धत पुन्हा आली पाहिजे. ती नाही आली तर त्यावर ठीका होणार. पण या संदर्भात अहमदनगर जिल्ह्यामध्ये काय झ ाले ते आम्ही डोळ्यांनी पाहिले आहे. तेथे दोन वेळा हाऊसचे प्रोसिडींग चालू ठेवण्यास आयुक्त परवानगी देतातच कशी ? हे कळत नाही. ज्यावेळेस तेथे जी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली त्यामध्ये समोरचा अर्ज बाद ठरविला गेला तेव्हा त्याच्याशी जे सहमत नसतील त्यांनी कोर्टामध्ये गेले पाहिजे. एखादी निवडणूक झाली आणि तिची प्रक्रिया मला सदोष वाटली, ती योग्य वाटली नाही तर त्या विरोधात आम्ही कोर्टात जायला पाहिजे होते. परंतु तेथे महापौर आणि उपमहापौर दोघांचीही निवडणूक झाली. शासकीय अधिकाऱ्यांच्या हातामध्ये ही सारी प्रक्रिया गेली तर काय होते याचे डोळे उघडणारे असे उदाहरण म्हणजे नगर जिल्ह्यातील सदरची निवडणूक आहे. आता एका महानगरपालिकेच्या महापौरांचे दालन सील केले आहे. कारण शासकीय अधिकाऱ्याकडे त्या निवडणुकीच्या निर्णयाची सगळी सूत्रे होती. आता प्रकरण कोर्टामध्ये गेले आहे. औरंगाबाद खंडपीठाकडे केस आहे आणि तेथील महापौर कोण आहे हे कोर्ट ठरविणार आहे. संपूर्ण धक्कादायक असे ते चित्र आहे. त्यामुळे थेट निवडून आल्यामुळे काही होत नाही. यापेक्षा आपल्या हातामध्ये सगळी सूत्र सरकारला घ्यायची आहेत हे यातील दुर्दैव आहे आणि सरकारने ते टाळायला पाहिजे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद. ***



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे-नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी या विधेयकाचे खऱ्या अर्थाने स्वागत करतो. परंतु माझी या निमित्ताने एक छोटीशी विनंती राहील. नुकताच केंद्र सरकारने देखील राज्यसभेच्या संदर्भात कायदा केला की, राज्यसभेच्या निवडणुका या उघड मतदान पद्धतीने होतील आणि त्याप्रमाणे राज्यसभेच्या निवडणुका घेतल्या गेल्या. आम्ही देखील या ठिकाणी एक ठराव केला आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील खुल्या मतदान पद्धतीने झाल्या पाहिजेत म्हणून सांगितले. आता 10 दिवसांपूर्वी आमच्या धुळे आणि नंदूरबार जिल्हयामध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकादेखील ओपन बॅलेट पद्धतीने झाल्या. म्हणून नगराध्यक्षाची निवडणूक आपण नगरसेवकांच्या मधून केली तर एका बाजूने हा विचार बरोबर आहे. यात काही अडचणी आल्या परंतु काही ठिकाणी नगराध्यक्ष आणि नगर सेवक हे एकाच विचाराचे असतील तर त्या शहराचा विकास झपाट्याने झालेला आपल्याला दिसतो. म्हणून एका विचाराची सत्ता जेथे होती तेथे खऱ्या अर्थाने विकास देखील झाला आहे. परंतु जेथे अडचणी आल्या त्यातून आपण ही दुरूस्ती सुचविली त्यामुळेच मी याचे स्वागत करतो.

( यानंतर श्री. सरफरे ....4एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी...

माझी या संदर्भात एकच विनंती वजा सूचना आहे की, येणाऱ्या नगराध्यक्षांची निवडणूक आपण खुल्या मतदानाने घेतली तर खऱ्या अर्थाने त्या संस्थेला स्थैर्य प्राप्त होईल.नाही तर या नगराध्यक्षाच्या निवडणुकीमध्ये खरेदी विक्रीचे सुरु असणारे व्यवहार यापुढे देखील चालू राहतील. ते बंद करावयाचे असतील तर पक्षाच्या निष्ठेवर निवडून आलेला नगरसेवक पक्षाच्या व्हीपप्रमाणे मतदान करील. त्याकरिता आपण खुल्या मतदानाने निवडणूक घेण्याकरिता या विधेयकामध्ये सुधारणा करावी अशी सूचना करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी सुधारणा विधेयकावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहामध्ये एक मिनिटापूर्वी 68 क्रमांकाचे विधेयक पारित करण्यात आले. या विधेयकामध्ये संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ यामध्ये "दिनांक 16 जून 2006 रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल" असे म्हटले आहे. परंतु या विधेयकाच्या बाबतीत "राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेव्दारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल" असे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, हे विधेयक केव्हापासून अंमलात येणार आहे? माझे मित्र माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी नगर जिल्हयाचा उल्लेख केला. माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये ठराव मांडला त्यावर सर्व माननीय सदस्य बोलले. त्या ठरावाच्या वेळी आम्ही विनंती केली होती की, हा ठराव आपण दुरुस्त करावा. त्यामध्ये फक्त नगरपालिकेतून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधानपरिषदेवर येणाऱ्या सदस्यांसाठी खुले मतदान घेण्यासंबंधीचा क्लॉज घातला. तेव्हा आम्ही विनंती केली की, कृपया हा ठराव आपण दुरुस्त करावा. ही सुधारणा सर्वच निवडणुकांना लावावी. तेव्हा फक्त तात्विकदृष्टया आपण मान्य केले, परंतु ठराव तसाच्या तसा पारित केला. आज आपल्याला ही संधी आली होती. म्हणून या निवडणुकीमये जेव्हा जेव्हा नगरपरिषदेचे अध्यक्ष निवडले जातात तेव्हा खुले मतदान होईल असे सांगता येत नाही. महापौराच्या पदासाठी देखील तीच पदत आहे. आणि मग वरुन निर्देश दिले जातात. निवडणुकीच्या आधी दोन दिवस आपापसात बोलले जाते. कोण म्हणते निवडणूक कशी होईल याची आपल्याला कल्पना नाही. कोण म्हणते खुल्या मतदानाने होईल, तर दुसरे म्हणतात गुप्त मतदानाने होईल. आणि मग घोडेबाजार सुरु होतो. हे सर्व टाळण्यासाठी खुल्या पध्दतीने मतदान झाले पाहिजे, व ते करण्याची आवश्यकता आहे. दुसरी गोष्ट अशी की, आपण याठिकाणी सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. आम्ही यासंबंधी काय अनुभव घेतला आहे? त्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे त्याठिकाणी पिठासीन अधिकारी हे महापौर असतात. राजपत्रामध्ये असे म्हटलेले असते की, पिठासीन अधिकारी हे आलेल्या अर्जाची छाननी करतील. आणि त्यामधील वैध व अवैध अर्ज कोणते हे ते ठरवतील. त्यानंतर पिठासीन अधिकारी निवडणूक घेतील. राजपत्रामध्ये असा उल्लेख होता, त्या अर्थी महापौर हे पिठासीन अधिकारी होते. त्यांच्या अधिकारामध्ये त्यांनी अर्जांची छाननी केली होती. ती केल्यानंतर त्यांनी एकच अर्ज वैध ठरविला. आणि मग निवडणुकीची सर्व प्रक्रिया



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

पार पाडून आपल्याला हव्या असलेल्या व्यक्तिला महापौर पदी बसविले. अशाप्रकारे दादागिरी करुन नवीन महापौरांना दोन मिनिटामध्ये आसनावर बसविले. नवीन आलेल्या महापौरांनी उपमहापौरांची निवडणूक जाहीर केली. पुन्हा संध्याकाळी सभागृह सुरु झाले आणि त्यावेळी उपमहापौरांची निवड झाल्याचे त्यांनी जाहीर केले. हे प्रकरण घडल्यानंतर त्यांनी शासनाकडे विचारणा केली की, यासंबधी तुम्ही कोणती भूमिका घेतली? या संदर्भात शासन दोन दिवस गप्प राहिले. नवीन निवडून आलेल्या महापौरांनी आपल्या कार्यालयाचा ताबा घेतला,गाडीचा ताबा घेतला. दोन दिवसानंतर आयुक्त विचारायला आले की काय करावयाचे? हे सर्व "मिलीजुली भगत" आहे. यामध्ये सरकारने मारल्यासारखे करीत असा निर्णय दिला की, याबाबत काय करावयाचे ते आयुक्तांनी ठरवावयाचे?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 20:05

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु...

आयुक्त तेथे गेले आणि आयुक्तांनी संध्याकाळी अनधिकृत बैठक घेतली आणि महापौर घोषित केला. सन्माननीय सदस्य श्री.तावडे साहेब मी आपल्याला अधिक माहिती सांगतो की, पीठासीन अधिकाऱ्यांनी ज्यांना महापौर म्हणून निवडल नाही ते महापौर झाले. पीठासीन अधिकारी नसतील आणि आपण काहीही बोललो आणि ते प्रोसिडींग लिहिले गेले तर चालेल काय ? तसाच प्रकार धुळ्यामध्ये घडला. म्हणून जो अधिकार दिलेला आहे तो घातक आहे. शेवटी जिल्हाधिकारी हे शासनाचेच ऐकणार. या बिलामध्ये असे म्हटलेले आहे की, "दिलेला निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही" म्हणजे कोठेही आव्हान देता येणार नाही. पुढे असे म्हटले आहे की, "निर्णय कळविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत,संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे अपील सादर करता येईल आणि त्याच वेळी त्यास, अशा अपिलाची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास देता येईल." म्हणजे कालमर्यादा नमूद केलेली आहे. संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर..." वाजवी कालावधीमध्ये कितीही वेळ घेतील. पुढे म्हटलेले आहे की, "प्रादेशिक संचालक शक्य असेल तितक्या शीघ्रतेने असे अपील निकालात काढील. . प्रादेशिक संचालकाचा अशा अपिलावरील निर्णय आणि केवळ अशा निर्णयास (कोणताही असल्यास) अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा किंवा, यथास्थिती, अशा अधिकाऱ्याचा, उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्यासंबंधीचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही." ही लोकशाही आहे. या लोकशाही मध्ये अन्याय करणारे शासन आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संचालकांच्या माध्यमातून अन्याय करते हे स्पष्ट दिसले. त्याला आव्हान करता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये आपण हे बील पास करतो आहोत. जो काही अनुभव आहे तो आपण पहात आहोत. सन्माननीय श्री. देशमुखसाहेबांनी या ठिकाणी नंदूरबारचा उल्लेख केला. यामध्ये दोन्ही बाजू आहेत. काही वेळा महंमद तुघलकी का निर्णय घ्यावे लागतात ? याचा शासनाने विचार करावा. हा निर्णय लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. आता नगरपरिषदांची निवडणूक आहे. निवडणुकीच्या अगोदर या बिलाची अंमलबजावणी करु नये. कारण नगराध्यक्ष हे थेट निवडून आलेले आहेत. त्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर या बिलाची अंमलबजावणी करावी. माझी विनंती आहे की, या बिलामधील जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार पूर्णत: काढून टाकून ते अधिकार निवडणूक आयुक्तांकडे द्यावेत, म्हणजे न्याय मिळेल. प्रशासन आणि शासन या दोघांमध्ये संगनमत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु....

होईल आणि न्याय मिळणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, या बिलामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. त्यानंतर सर्वच सन्माननीय सदस्यांनी खुल्या मतदानाने निवड होण्याची सूचना केलेले आहे, त्याचा विचार व्हावा. अन्यथा पुन्हा एकदा चिकित्सा समितीकडे हे बिल पाठवून त्यावर सर्वंकष विचार करावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

---

यानंतर श्री.बरवड.....

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या ठिकाणी जे महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा ) विधेयक आलेले आहे त्याचे मी स्वागत करतो. सन 2001 च्या आधी सन 1978 मध्ये नगराध्यक्षांची डायरेक्ट निवड करण्याची तरतूद महाराष्ट्र शासनाने विधेयकाव्दारे केलेली होती. त्यावेळी रिझर्वेशन पध्दत नव्हती. 1996 मध्ये नगरपरिषदेमध्ये त्र्याहत्तराव्या घटना दुरुस्तीनुसार अध्यक्षपदासाठी रिझर्वेशन लागू केले होते. त्यावेळी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी नगराध्यक्ष पद दहा वर्षासाठी आरक्षित केले होते. 1996 मध्ये 1 वर्ष, 1997 मध्ये 1 वर्ष, 1998 मध्ये एक वर्ष रिझर्वेशन झाले. मध्यंतरी शासनाने अध्यक्ष पदासाठी मुदतवाढ देऊन अध्यक्षाची मुदत अडीच वर्षे राहावी असा नियम केला. ते पद चार वेळा रिझर्व झाले. त्यानंतर डायरेक्ट निवड पध्दतीच्या संदर्भात 2001 मध्ये नवीन विधेयक आले. त्यानुसार जनतेमधून डायरेक्ट अध्यक्ष पदाची निवडणूक होणार होती. त्यावेळी पुन्हा मागील रिझर्वेशनचा जी.आर. बाद करण्यात आला आणि सेन्ससव्दारे पुन्हा नवीन रिझर्वेशन लागू केले. तीनवेळा रिझर्वेशन झाल्यानंतर आमच्याकडे बल्लारशामध्ये 4 वेळा रिझर्वेशन्स झाले. आता 2006 मध्ये नवीन विधेयक येत आहे. आधी नगरपरिषदेच्या सहअध्यक्षाच्या बाबतीत रिझर्वेशन आले होते. त्यावेळी सहअध्यक्षाच्या निवडीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 10 वर्षाची रिझर्वेशन पध्दत आखली होती. ज्यावेळी 2001 मध्ये अध्यक्षपदाची डायरेक्ट निवड करण्याची पध्दत आणली त्यावेळी 10 वर्षाची अट काढून टाकली. सेन्ससनंतर शासनाने नवीन पध्दत लागू केली. आता नवीन सेंसस आलेले आहे. त्या ठिकाणी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी यांच्यासाठी रिझर्वेशन आले तर ओपन कॅटेगरीवर अन्याय होणार आहे. चार पाच वर्षे एका एका कॅटेगरीसाठी नगरराध्यक्ष पदाचे रिझर्वेशन झालेले आहे. पुन्हा हे विधेयक मंजूर केल्यानंतर 1996 ची रिझर्वेशन पध्दत राहणार आहे की, 2001 ची रिझर्वेशन पध्दत राहणार आहे की, 2006 मध्ये नवीन रिझर्वेशन पध्दत येणार आहे ? 2006 मध्ये नवीन रिझर्वेशन पध्दत लागू करणार असाल तर मग चार पाच वर्षे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी यांच्याकरिता पद रिझर्व झालेले आहे आणि वर्षानुवर्षे ओपन कॅटेगरीला संधी मिळणार नाही. चंद्रपूर आणि बल्लारपूर या दोन्ही ठिकाणी तशीच परिस्थिती आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

1996 मध्ये अनुसूचित जातीला एक वर्ष हे पद मिळाले. 1997 मध्ये ओबीसी महिलेला हे पद मिळाले. 1998 मध्ये अनुसूचित जमातीला हे पद मिळाले. त्यानंतर पुन्हा त्यांना मुदतवाढ देण्यात आली. एका वर्षाच्या जागी अडीच वर्षाची मुदत केली त्यामुळे अनुसूचित जमातीचे अध्यक्ष अडीच वर्षे राहिले. 2001 मध्ये नवीन सेन्सस काढले. आमच्या गावामध्ये पाच वर्षासाठी अनुसूचित जातीचे रिझर्वेशन झाले. आता 2006 मध्ये माननीय मंत्रिमहोदय कोणती पध्दत लावणार आहेत ? नवीन सेंसस लावला तर पुन्हा अडीच वर्षे जातील. अशी पध्दत चालूच राहील. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एकदा पाच वर्षाचा निर्णय घेतला होता. त्यांच्या अगोदर 1978 मध्ये डायरेक्ट निवड होत होती. डायरेक्ट पध्दत आली की पुन्हा रिझर्वेशन लागू होणार आणि नगराध्यक्षपद अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग यांना मिळणार. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा. हा कायदा करीत असताना कोणती रिझर्वेशन पध्दत लागू करणार आहात याचा खुलासा करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहासमोर जे विधेयक चर्चेला आलेले आहे त्याचे मी समर्थनही करतो आणि काही जे मुद्दे आहेत त्याबाबतीत विरोध करतो. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. देशमुख यांनी हिंगोली आणि लातूर या दोन नगरपालिकांची उदाहरणे दिली. खरे पाहिले तर या दोन नगरपालिका सोडून महाराष्ट्रातील बाकीच्या सगळया नगरपालिकांचे जे नगराध्यक्ष आहेत त्यांचा महासंघ आहे. महाबळेश्वरला ज्यावेळी मेळावा झाला आणि सर्व नगराध्यक्षांची कार्यशाळा झाली त्यावेळी सगळ्या नगराध्यक्षांनी एकमुखी ठराव संमत केला होता की, नगराध्यक्षाची निवड जनतेतून व्हावी. हा महासंघ दिल्लीपर्यंत शिष्टमंडळ घेऊन गेला होता. हे आपण वर्तमानपत्रात वाचले असेलच.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुरेश जेथलिया...)

माझे तर असे मत आहे की, 5 वर्षाच्या कालावधीसाठी जो नगराध्यक्ष जनतेतून निवडून येतो तो ख-या अर्थाने काम करतो. आता या 5 वर्षाच्या काळामध्ये ज्या ज्या सोयीसुविधा शहरी भागात झ
ालेल्या आहेत त्या यापूर्वीच्या काळात कधीही झालेल्या नव्हत्या. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीबाबत वेळोवेळी निर्णय बदलले जातात. जनतेने नगराध्यक्ष निवडून देण्याची पध्दत अतिशय चांगली होती. या नगराध्यक्षांनी खूप चांगली कामे केलेली आहेत. परंतु विधानसभेतील काही मंडळीना हे नगराध्यक्ष पद जड जाऊ लागल्यासारखे वाटल्यामुळेच हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे की काय असे मला वाटते. कारण एक लाख लोकांमधून निवडून येणारा नगराध्यक्ष हा उद्या आमदारकीच्या रेसमध्येतर येणार नाही ना, अशी विधानसभेतील काही मंडळींची भावना झालेली आहे असे वाटते. सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी साहेबांनी सांगितल्या प्रमाणे जस जसे हे कायदे बदलले जातात तसे तसे रिझर्व्हेशनमध्येही बदल होतात. आता नगरसेवक नगराध्यक्षांची निवड करणार आहेत. त्यामुळे घोडेबाजार वाढणार आहे. पूर्वी प्रभाग पध्दत होती. त्यामधून निवडून येणारा नगरसेवक हा खरा लोकप्रतिनिधी होता. आता ती पध्दत बंद करुन वार्ड पध्दत अवलंबिलेली आहे. या पध्दतीमुळे नगरसेवक हे कोणत्याही एका पक्षाचे येणार नाहीत. ही नगराध्यक्ष निवडण्याची पध्दत गुप्त न ठेवता ओपन ठेवली पाहिजे आणि त्यासाठी या विधेयकामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, एवढें बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय,सन 2006चे वि.स.वि.क्रमांक 74, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयकाचे मी स्वागत करतो. हे स्वागत करीत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांना एक प्रयोगशाळा समजून त्यांच्या बाबतीत वारंवार प्रयोग केल्यामुळे तोंडघशी पडण्याचे हे जे प्रकार घडतात ते कुठेतरी थांबायला पाहिजे. महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या बाबतीत मुंबई महानगरपालिका सोडली तर राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये प्रभाग पध्दत वापरण्यात आली. मुंबई महानगरपालिका अपवाद का करण्यात आली, याचे उत्तर सापडत नाही. मुंबई महानगरपालिकेमध्ये वार्ड पध्दत आहे आणि इतर महानगरपालिकांमध्ये प्रभाग पध्दत आहे. जे कायदे आपण केले त्यामुळे विकासाची किती कामे ठप्प झाली हे सन्माननीय सदस्यांना चांगले ठाऊक आहे. हीच बाब नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या डायरेक्ट निवडणुकीमुळे कशी झाली आणि कशा प्रकारे अडथळे आले हे काही सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले. त्याचा मी पुनरुच्चार करीत नाही. नगरपरिषदा, जिल्हापरिषदा किंवा महानगरपालिका यामध्ये आरक्षण करीत असताना ज्या वार्डामध्ये अनुसूचित जातीची संख्या 50 टक्क्या पेक्षा, 40 टक्क्या पेक्षा कमी आहे तो प्रभाग अनुसूचित जाती करता आरक्षित ठेवला जातो ...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

आणि चिठ्ठया टाकल्या जातात, ओबीसीकरीता असेल तर तेथे ओबीसी समाजाची संख्या नगण्य असेल असे वॉर्ड ओबीसीकरीता आरक्षित ठेवले जातात हे संपले पाहिजे. या चिठ्ठया टाकताना संपूर्ण नगरपरिषदेमध्ये ज्या वॉर्डमध्ये अनुसूचित जातीची संख्या जास्त असेल त्याच वॉर्डच्या चिठ्ठया असल्या पाहिजेत, ओबीसी समाजाची संख्या जास्त असेल तर त्याच वॉर्डच्या चिठ्ठया असल्या पाहिजेत, अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असेल तर त्याच वॉर्डच्या चिठ्ठया असल्या पाहिजेत. जेणेकरुन त्या समाजाला न्याय मिळेल. सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरी यांनी जी भीती व्यक्त केली, अशा प्रकारचे गैरप्रकार सगळीकडे चालले आहेत. नगरपालिकांच्या नगराध्यक्षांच्या निवडणुकांमध्ये, महानगरपालिकांच्या महापौर पदाच्या निवडणुकांमध्ये निवडणुकीच्या वेळेला जे नगरपालिकांचे रुपांतर खरेदी विक्री संघामध्ये होते, हे खरेदी विक्री संघ बनता कामा नये यासाठी नगरपरिषदांची निवड करताना खुल्या निवडणूक पध्दतीने केली जावी. ज्याप्रमाणे विधानसभेतून विधानपरिषदेवर निवडून देताना जी पध्दत आहे, विधानसभेतून राज्यसभेवर निवडून देताना जी पध्दत आहे तीच पध्दत नगराध्यक्षांच्या निवडणुकीसाठी राबविण्यात यावी ही सन्माननीय सभागृहाची भावना आहे तिचा शासनाने जरुर विचार करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, जे बिल सभागृहासमोर सादर झालेले आहे त्याचे स्वागत करीत असताना धोक्याची सूचना मी सांगू इच्छिते. मागील वेळेला सांगण्यात आले की, डायरेक्ट निवडणूक नको. पुन्हा उशिरा सरकारच्या लक्षात आले. मी सातारा आणि अक्कलकोट नगरपालिकेचे उदाहरण देऊ इच्छिते. सातारा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा होत्या त्या कोणाचे ऐकायच्या नाहीत, मी डायरेक्ट निवडून आलेले आहे, माझे स्वत:चेच साम्राज्य आहे असा त्यांचा कारभार सुरु होता. इतर कोणत्याही सदस्यांची कधीही दखल घेतली नाही. अक्कलकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्ष्या ज्या होत्या त्यांचा कारभार याच्या उलट होता. त्यांच्यावर स्थानिक मंत्र्यांचा दबाव होता. त्यांना मोकळेपणाने काम करु दिले जात नव्हते. हे धोके डायरेक्ट निवडणुकीमध्ये होते. आता ते होणार नाहीत. नगराध्यक्षांची निवड ही नगरपरिषदेत जे सदस्य निवडून येतील त्यांच्यामधून केली जावी. परंतु ही निवडणून खुल्या पध्दतीने झाली पाहिजे ही सुधारणा करण्याकरीता हे बिल आणले आहे. हे बिल संयुक्त समितीकडे पाठवावे. या बिलाच्या पृष्ठ क्रमांक-3 वरील मुद्दा क्र.2 मध्ये म्हटले आहे की, निवडणुकीमध्ये समसमान मते असतील तर निवडणुकीचा निकाल चिठ्ठया टाकून करण्यात येईल, ते काम जिल्हाधिकारी किंवा पीठासीन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत केले जाईल असे म्हटले आहे. याठिकाणी नेमका वाद झ ाल्यास तो निर्णय घेण्याचे काम राज्य शासनाकडे घेतलेले आहे. खरे म्हणजे राज्य शासन आपल्याकडे अधिकार घेऊ इच्छिते. मला वाटते हा धोक्याचा इशारा आहे. खुल्या पध्दतीने मतदान झाले पाहिजे. त्यामुळे हे बिल संयुक्त समितीकडे पाठवावे अशी विनंती करुन माझे भाषण संपविते.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियमान्वये जे बिल नंबर 74 याठिकाणी सादर झालेले आहे त्यामधील कलम 4 संबंधी पुन्हा पुन: उल्लेख होऊनही काही गोष्टींचा खुलासा होत नाही त्याबद्दल मी थोडक्यात बोलणार आहे. सभापती महोदय, हे बिल अत्यंत मर्यादित स्वरुपाचे आहे. नगराध्यक्षांची निवड ही नगरसेवकांमधून केली जावी अशा प्रकारचे मर्यादित स्वरुपाचे बिल आहे. ज्यावेळी नगराध्यक्ष पदासाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होतो त्या कार्यक्रमामध्ये सकाळी किती वाजल्यापासून किती वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरावा याचा कालावधी दिला जातो. त्यानंतर त्या अर्जांची छाननी किती कालावधीत केली जाईल याची वेळ दिली जाते. त्यानंतर अर्ज मागे घेण्याची वेळ दिली जाते. त्यानंतर आवश्यक वाटल्यास मतदान होते अशी ती प्रक्रिया आहे. याठिकाणी स्पष्ट म्हटले आहे की, जिल्हाधिकारी किंवा जो निवडणुकीचा तत्सम अधिकारी असेल त्याच्याकडे तक्रार आली तर एखादा अर्ज वैध किंवा अवैध ठरविण्याचा पूर्णपणे अधिकार त्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्करराव जाधव ...

जर त्याच्या विरोधात अन्याय झाला असेल किंवा चुकीचा निर्णय दिला गेला असेल तर त्याला 48 तासाच्या आत जिल्हाधिकारी किंवा उपसंचालक नगरविकास यांच्याकडे तक्रार करता येते. परंतु अशा प्रकारे तक्रार करावयाची असेल तर संबंधित व्यक्ती जिल्हाधिकारी किंवा उपसंचालक नगरविकास यांच्याकडे कधी जाणार ? खरे म्हणजे 48 तासाच्या आत अपिल करावयाचे असते. याचा अर्थ जिल्हाधिकारी किंवा उपसंचालक नगरविकास यांनी 48 तासात निर्णय द्यावयाचा असतो. तोपर्यंत निवडणूक होऊन गेलेली असते त्यामुळे आपण ही निवडणूक प्रक्रिया तोपर्यंत थांबविणार आहात काय? खरे म्हणजे संबंधितावर अन्याय झाला तर संबंधित व्यक्ती जिल्हाधिकारी किंवा उपसंचालक नगरविकास यांच्याकडे जाऊ शकते आणि जिल्हाधिकारी किंवा उपसंचालक नगरविकास यांनी तो अर्ज वैध ठरविला तर परत निवडणूक घ्यावयाची किंवा नाही यासंदर्भात असंधिग्धता निर्माण झालेली आहे. अशामुळे घोळ होण्याची शक्यता आहे. त्याच बरोबर ओपन बॅलेट पध्दती अवलंबविण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती आहे.

-----------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या बिलामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत. या त्रुटीं पूर्ण झाल्याशिवाय या बिलाचे स्वागत करणे कठीण आहे. काही सन्माननीय सदस्यांनी हात वर करुन मतदान घेण्याची पध्दत अवलंबविली पाहिजे असे सांगितलेले आहे. त्यामुळे हे बील न्यायाचे वाटत नाही. या बिलामध्ये एक वेगळया प्रकारचा वास येतो आहे. या विधेयकाच्या संदर्भात जिल्हाधिकारी आणि शासनाकडे यासंदर्भात अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भातील अंतिम अधिकार निवडणूक आयुक्तांकडे देण्याची आवश्यकता आहे. सध्या निवडणूकीच्या निर्णयामध्ये जो गोंधळ होतो आहे तो यामुळे दूर होण्यास मदत होऊ शकेल. पूर्वी महानगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये पॅनल पध्दती होती. परंतु ही पॅनल पध्दती नंतर बंद करण्यात आली त्यामुळे त्याचे परिणाम निवडणूकीवर होतांना दिसत आहेत. पॅनल पध्दती बंद केल्यामुळे विकासाला सुध्दा त्यामुळे खीळ बसतो. याचे पुरोगामी परिणाम लक्षात घेऊन हे बील आणले गेले पाहिजे. कोणतेही विधेयक आणतांना ट्रायल अँड एरर करु नये. यामुळे खरे म्हणजे पेशंट दगावण्याचीच शक्यता असते. तसेच त्याचे परिणाम विकासावर सुध्दा होत असतात. त्यामुळे या बिलामध्ये ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष घालावे अशी विनंती आहे.

----------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मी केवळ एक-दोन सूचना करणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी हा एक प्रयोग होता असे म्हटलेले आहे. परंतु लोकशाही ही काही रंगभूमीचे प्रांगण नाही. मुंबई महानगरपालिकेचा महापौर निवडला जातो तेव्हा त्यावेळी सिनिअर मेंबरला सभापती म्हणून नेमले जाते आणि त्यावेळेस जर दोन्ही बाजूला समसमान मते आली तर त्यावेळी सभापती कास्टींग व्होट वापरत असतो. आपण या ठिकाणी अंधश्रध्देचे बील आणलेले आहे ते खरे म्हणजे अंधश्रध्देला खतपाणी घालण्यासारखे बील आहे. या ठिकाणी आपण जे बील आणलेले आहे ते असंविधानिक ठरण्याचीच शक्यता जास्त आहे. सभापती महोदय, लोकसभेत काही सदस्यांनी गैरकारभार केल्यानंतर लोकसभेच्या अध्यक्षांनी त्यांचे सदस्यत्व रद्द केले होते तसेच ही केस कोर्टात देखील गेलेली आहे. या केसच्या संदर्भात काही निर्णय झालेले आहेत तर काही निर्णय अजून व्हावयाचे बाकी आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

लोकशाहीमध्ये आणखी प्रयोग नको. फार पूर्वी राणीच्या पोटातून राजकुमार जन्माला यायचा आणि तो पुढे राजा व्हायचा. त्यामुळे राजा कोण असावा यावर कोणाचे बंधन नव्हते. राजा हा राजघराण्यातूनच यायचा आणि तो राज्य करायचा. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाला मतदानाचा हक्क दिलेला आहे. त्या मतपेटीतून राजा जन्माला येतो. परंतु या लोकशाहीमध्ये राज्य सरकारने स्वत:कडे अधिकार ठेवलेले आहेत, म्हणजे सत्ताधारी पक्षाकडे अधिकार आहेत. सभापती महोदय, याठिक्राणी घोडेबाजार होणार नाही असे कशावरुन सांगता येईल ? हात वर करुन निवडणूक होणार आहे किंवा कसे याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. आपण दोनच दिवसांपूर्वी नैतिकतेच्या गोष्टी केल्या आणि एक विधेयक मंजूर केले. माझी आपणास विनंती आहे की, शासनाने हे विधेयक परत घेऊन ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे. याठिक्राणी मघाशी कोणीतरी बोलले की, आपण हे विधेयक पास करुन घेऊ. पण मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, एखाद्या विधेयकावर बोलताना त्यातील कंगोरे लक्षात आले तर आपण सर्वजण मिळून ते विधेयक मागे तरी घेतो किंवा अधिक चर्चेसाठी संयुक्त चिकित्सा समितीकडे तरी पाठवितो. तेव्हा सरकारने हा प्रतिष्ठेचा प्रश्न न करता याबाबत सर्वंकष विचार करावा आणि हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे. यातून जे नवनीत निघेल ते नागपूर हिवाळी अधिवेशनात पहावयास मिळेल अशी विनंती करुन माझे दोन शब्द पूरे करतो.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या विधेयकाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. "उद्देश आणि कारणे" यामध्ये दुसऱ्या परिच्छेदात नमूद करण्यात आले आहे की, "बहुतेक नगरपरिषदांमध्ये थेट निवडून आलेला अध्यक्ष आणि परिषद सदस्य यांच्यामध्ये सहकाराची भावना किंवा मतैक्य नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे नगरपरिषदेने हाती घ्यावयाच्या विविध विकासविषयक कामांवर व योजनांवर प्रतिकूल परिणाम होत आहे." सभापती महोदय, माझ्या दृष्टीकोनातून हे विधेयक आपल्या सभागृहाचा अवमान करणारे आहे असे मला वाटते. पूर्वी नगरसेवकांमधून नगराध्यक्ष निवडून देण्याची पध्दत होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या पध्दतीमध्ये दोष निर्माण झालेला आहे. नगरसेवकांची खरेदी-विक्री होऊन नगराध्यक्ष निवडून येत आहेत. अशाप्रकारे निवडून आलेले नगराध्यक्ष आणि नगरसेवक जनतेची लूट करीत आहेत. त्यामुळे लोकशाहीला धोका निर्माण झालेला आहे. म्हणून ही पध्दती बदलण्याची आवश्यकता आहे असे पाच वर्षापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषण केले होते. त्यामध्ये तथ्यांश होता. त्यावेळी दोन्ही बाजूच्या सदस्यांनी भाषणे केली होती. आता पुनश्च हे विधेयक सभागृहापुढे आणलेले आहे.

सभापती महोदय, श्री.जनार्दन वाघमारे हे मराठवाड्यातील शिक्षण महर्षी. ते कुलगुरु होते. त्यांना नगरसेवकांनी नगराध्यक्ष म्हणून कधीही निवडून दिले नसते. पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ज्या गावात राहतात त्यांना प्रचंड प्रयत्न करुनही स्वत:च्या पक्षाचा नगराध्यक्ष निवडून आणता आला नाही. भाजप व शिवसेना पक्षाला सुध्दा त्यांच्या पक्षाचा नगराध्यक्ष निवडून आणता आला नाही. परंतु माणूस पाहून लोकांनी त्यांना निवडून दिले होते. तेव्हा अशाप्रकारचा निर्णय घेऊन लोकांच्या भावनेचा अपमान करण्याचे कारण काय ? याचा आपण विचार केला पाहिजे. श्री.विनोद बारोडे, सेलू, यांच्यावर नगरसेवकांनी अविश्वासाचा प्रस्ताव आणून त्यांना घरी पाठविले. परंतु जनतेने त्यांना पुन्हा निवडून पाठविले. What is the basic principle behind this law.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

सभापती महोदय, आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मतभेद करावयाचे असतील तर आपण अशा प्रकारचा कायदा आणून डायरेक्ट नख लावण्याचे काम करीत आहात. या विषयी सभागृहामध्ये चर्चा झालेली नाही. नगराध्यक्षांच्या कोणत्या वागणुकींमुळे परिणाम झाला ? याबाबतीत आपण याठिकाणी चर्चा केली का ? नगराध्यक्षांच्या बाबतीत या सभागृहामध्ये डिबेट झाले काय ? याठिकाणी पास केलेल्या कायद्याची अंमलबजावणी होत असताना कुठे तरी व कधी तरी विभागीय परिषद होत असते, त्यामध्ये प्रचंड गोंधळ होत असतो, त्यामध्ये 10-12 जणांची भाषणे होतात व माननीय विलासराव देशमुख हे मोठमोठया हाराखाली दबलेले असतात. याठिकाणी नगरविकास खात्याला आलेले अपयश असून या सरकारच्या फेल्यूअरची कारणमिमांसा करण्याऐवजी त्यास वेगळे वळण देण्याचा प्रयत्न होत आहे....(अडथळा) मग, असे कसे झाले ? सभापती महोदय, बिलामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 30 जोनवारी, 2006 रोजी परभणी येथे घेतलेल्या मराठवाडा विभागीय नागरी विकास परिषदेमध्ये, मराठवाडा विभागातील नगरपरिषदांचे सर्व अध्यक्ष व परिषद सदस्यांनी, नगर परिषदेचा अध्यक्ष, परिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांमधूनच निवडून देण्याची तरतूद असणारी आधीची पध्दतच पूर्ववत करण्यात यावी अशी मागणी केली होती." याबाबतीत सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक होते. नगरपालिकेमध्ये नगरसेवक व नगराध्यक्ष असतात, त्यांना कायदे करण्याचे अधिकार नसून आपणा सगळयांना येथे कायदे करण्याचे अधिकार आहेत. डायरेक्ट जनतेतून निवडून आलेल्या नगराध्यक्षांच्या बाबतीत काय प्रॉब्लेम झाला, याबाबतीत अगोदर याठिकाणी चर्चा होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, लोकशाहीच्या बाबतीत दिनदयाळ यांनी जे प्रिसिंपल सांगितले ते मला आजही आठवते. ते असे म्हणाले होते की, "Vote for a person and not for a purse. Vote for a Party and not for a person. Vote for principles and not for a Party." हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. जेव्हा दोन चांगली माणसे असतील तेव्हा आपण पैशाला मत देऊ नका, अशा व्यक्तिंना मत द्यावे. दोन चांगल्या व्यक्तिला, चांगल्या पक्षाला मत द्यावे व त्यांचा प्रभाव वाढवावा. पक्षाचा प्रभाव वाढविण्याच्या दृष्टीने आपण प्रभाग पध्दत आणत आहात. मग, याठिकाणी पक्षाचा प्रभाव आणावयाचा नाही का ? डायरेक्ट जनतेतून निवडून आलेल्या कार्यकर्ता जर मोठे काम करत असेल व ज्याला डायरेक्ट 40-50 हजार मतदारांनी निवडून दिले असेल तर... मला मान्य आहे

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

की, या पध्दतीमध्ये 4-5 वर्षांत काही दोष निर्माण झाले असतील किंवा अडचणी निर्माण झाल्या असतील, परंतु त्या दुरुस्त करण्यासाठी सरकारने प्रथम प्रयत्न करणे आवश्यक आहे. म्हणूनच माझे म्हणने आहे की, आपण या माध्यमातून घोडेबाजाराला उत्तेजन देत आहात. आपण याबाबतीत पक्षाचा पुन्हा विचार का करत नाही ? ही थेट नगरसेवकातून नगराध्यक्ष निवडून देणे हे मुळामध्ये डेमॉक्रॉसिला घातक आहे, लोकशाहीला घातक आहे. अशा प्रकारे लोकशाहीला घातक होत असताना, परत नगरसेवकांचे भाव चढणार आहेत, नगराध्यक्षांमध्ये सेटलमेंट होणार आहे. हे सर्व नगरसेवक व नगराध्यक्ष काम स्वत: पाहत असतात, त्यांना प्रत्येकांच्या एरियामध्येच काम व्हावे असे वाटत असते. म्हणून त्यांची जनतेशी बांधिलकी असली पाहिजे. माझ्या दृष्टीकोनातून लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींची बांधिलकी ही जनतेशी व त्यांच्या कामांशी असली पाहिजे. परंतु या विधेयकाच्या माध्यमातून आपण लोकशाहीचा इन-डायरेक्टली खून करण्यास निघाला आहात, हे मला याठिकाणी सांगितले पाहिजे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/ प्रथम श्री.पुरी.......... 20:40

श्री.श्रीकांत जोशी.........

अध्यक्षीय पध्दतीमध्ये लेजिसलेचरचा रोल काय असतो ? Legislation चा रोल हा एक्झिक्युटिव्हवर वॉच करण्याचा आहे. आपण कल्पना करा की, I will supposed to be Executive. तर आपण एक्झिक्युटिव्हचेच काम करावयास हवे. आपल्याला कल्पना आहे की, माननीय राष्ट्रपती महोदयांनी ऑफीस ऑफ प्रॉफीटचे बील परत पाठविले आहे. What is the concept of Office of Profit ? त्यांची आरग्युमेंट काय आहे ? सत्ताधारी लोकांनी एक्झिक्युशनमध्ये जास्त भाग घेऊ नये. लोकशाहीमधील पिपल रिप्रेझेंटेटिव्हची कायद्यामध्ये काय भूमिका आहे ? त्याचा मूळ अर्थ काय आहे ? जे पिपल रिप्रेझेंटेटिव्ह असतात त्यांनी एक्झिक्युशनमध्ये कमीतकमी भाग घ्यावा आणि पॉलिसी ठरविण्याचे काम करावे, असे अभिप्रेत आहे. कोणताही बेनिफिशरी कायदा करता कामा नये, असे मला वाटते. 5 वर्षापूर्वी एक चांगले पाऊस उचलले होते. परंतु, शासनाने पुन्हा त्यामध्ये बदल केला. लोकल परफॉर्मन्स बेनिफिटचा विचार आता मागे पडत चालला आहे. ही सर्व पध्दती करप्ट कशी होईल, हे या बीलातून मांडलेले आहे, असे मला खेदाने नमूद करावेसे वाटते. या चर्चेत भाग घेतांना बहुतांश सन्माननीय सदस्यांनी हे बील संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे, अशा प्रकारची विनंती केली आहे. या बील संयुक्त चिकित्सा समितीकडे गेल्यानंतर सन्माननीय सदस्य सखोलपणे यावर विचार करु शकतील, आपली मते मांडू शकतील आणि एक सर्वंकष कायदा तयार होण्यास त्यामुळे मदत होईल. लोकप्रतिनिधी म्हणजे त्या गावाचा कोणी तरी राजा आहे, गाव बरबाद करण्याचा त्याला अधिकार दिलेला आहे, अशा प्रकारचा मेसेज या बीलाच्या माध्यमातून जाता कामा नये. त्यामुळे सन्माननीय मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी हे बील संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावी. लोकशाही परिपक्व करावयाची असेल तर या बीलाची सविस्तर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. कारण लोकशाही आहे म्हणून आज आपण या ठिकाणी बसलो आहोत. लोकशाही नसती आपण या ठिकाणी दिसलो नसतो. कोणत्याही परिस्थितीत लोकशाहीचा गळा घोटण्याचा अधिकार कुणालाही नाही. संयुक्त चिकित्सा समितीकडे हे बील पाठविले तर त्या ठिकाणी "Whether this bill is pro-democracy or anti-democracy ?" याबाबत निर्णय लागू शकेल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद .

---------------

..2............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, जवळ जवळ 13 सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार मांडलेले आहेत. चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय सदस्य, श्री.विलास अवचट यांनी असा प्रश्न विचारला की, अध्यक्षीय निवडणुकीत कोणते अधिकारी रिर्टनिंग ऑफीसर असतील ? यासाठी अशी तरतूद आहे की, जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी नॉमिनेट करतील ते अधिकारी रिटर्निंग ऑफीसर म्हणून काम करतील.

सभापती महोदय, अध्यक्ष निवडीसंदर्भात एखादा वाद निर्माण झाला तर त्यासंदर्भातील अंतीम निर्णय राज्य शासन घेईल. अर्थातच, वादासंबंधी निर्णय देत असतांना अध्यक्षीय निवडणुकीची जी नियमावली आहे त्या नियमावलीस धरुनच शासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे. या नियमावलीच्या बाहेर जाऊन शासनाला निर्णय घेण्याचा अधिकार असू शकत नाही. एखाद्या प्रकरणी जर वाद निर्माण झाला तर त्यासंबंधी अंतिम निर्णय देता यावा व त्यासाठी शासनाकडे अधिकार हवेत म्हणून हे अधिकार शासनाकडे घेण्यात आलेले आहेत. कोणत्याही प्रकारचा गैरवापर करण्यासाठी हे अधिकार शासनाकडे घेण्यात आलेले नाहीत.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी अध्यक्षीय पदाच्या निवडणूक पध्दतीविषयी शंका उपस्थित केली आहे. तसेच, अशी मागणी करण्यात आलेली आहे की, अध्यक्षीय पदाची निवडणूक ही ओपन बॅलेट पध्दतीनुसार व्हावी. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अध्यक्ष पदाच्या निवडणुकीचे रुल्स आहेत. तसेच, या रुल्समध्ये बदल करण्याचे अधिकार राज्य शासनाला आहेत. आपल्या कल्पना आहे की, अलिकडेच आपण राज्यसभेमध्ये, विधानपरिषदेमध्ये 'ओपन बॅलेट' पध्दत स्वीकारली आहे. अध्यक्षीय निवडणुकीसाठी देखील ओपन बॅलेट पध्दत असावी, या मताचा मी आहे व ओपन बॅलेट पध्दतीचे मी स्वागत करतो. सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन निश्चितपणे ही बाब तपासून पहाण्यात येईल व आवश्यकती दुरुस्ती रुल्समध्ये करण्यात येईल.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 5G-1

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 20:45

श्री.राजेश टोपे .........

सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी असे सांगितले की, गुप्त मतदान पद्धतीमुळे घोडे बाजार होईल आणि ओपन बॅलेट केले तर घोडे बाजार होणार नाही. आपल्याला या गोष्टी नियमामध्ये नमूद करता येतील. मी सुरुवातीलाच सांगितले की, 3/4 बहुमत असेल तर अविश्वासाचा ठराव आणता येऊ शकतो. रिझर्वेशन कशा पद्धतीने असावे अशा प्रकारची अपेक्षा काही सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली. अध्यक्ष पदाच्या निवडणूकीच्या संदर्भातील रिझर्वेशन सन 2001 मध्ये ठरविण्यात आलेले आहे. आता डिसेंबर, 2006 मध्ये ज्या निवडणुका होणार आहेत त्या निवडणुकांच्या आधी पुन्हा एकदा चिठ्ठया काढून रिझर्वेशनच्या संदर्भातील निर्णय घेण्यात येणार आहे. सभापती महोदय, अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत जर समसमान मते पडली तर निवडणुकीचा निकाल चिठ्ठया टाकून करण्यात येणार आहे, अशी नियमामध्ये तरतूद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी विचारले की, सभा बोलाविण्याकरीता आणि अवैधता झ ााल्यानंतर काय करता येईल. कलम 4 मध्ये आपण बाधित झालेल्या कोणत्याही परिषद सदस्यास 48 तासाच्या आत संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे अपील करण्यासाठी मान्यता दिली आहे. अध्यक्ष पदाच्या निवडणूकीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी अर्जाची छाननी झाल्यानंतर 2-3 दिवसांनी जाहीर करीत असतात. त्यामुळे संभ्रम निर्माण होण्याचे कारण नाही. अध्यक्षपद रिक्त झाल्यानंतर उपाध्यक्षांकडे अधिकार देता येतात काय ? असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. उपाध्यक्षांकडे अधिकार देण्यासंबंधी नियमामध्ये तरतूद नाही. अध्यक्ष पद रिक्त असेल तर जिल्हाधिका-यांकडे अधिकार दिले जातात आणि 25 दिवसानंतर रिक्त पद भरुन काढण्यासाठी अध्यक्ष पदाच्या निवडणुकीची कार्यवाही पार पाडली जाते. बहुसंख्य सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी प्रभाग पद्धती का बदलली असा मुद्दा उपस्थित केला. वार्ड पद्धतीमध्ये बदल करण्याचे एकच कारण आहे की, त्या ठिकाणी अकाऊंटिबिलीटी नव्हती. विकासासाठी कोणत्या सदस्याला जबाबदार धरावयाचे यासाठी अकाऊंटिबिलीटी फिक्स करता येत नव्हती. प्रभागाचा विकास होण्यासाठी कोणत्या तरी लोकप्रतिनिधीवर अकाऊंटॅबिलीटी असावी, म्हणून बदल करण्यात आला

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

श्री.राजेश टोपे ..........

आहे. आपल्या देशामध्ये, आपल्या घटनेमध्ये संसदीय पद्धती महत्वाची आहे. आपण मुख्यमंत्री आमदारांमधून निवडून देतो. पंतप्रधान खासदारांमधून निवडून देतो. ग्रामपंचायतीचा सरपंच सदस्यांमधून निवडला जातो त्यामुळे तेथे योग्य समन्वय असू शकतो. समन्वयाचा अभाव निर्माण झाला होता म्हणून हे विधेयक आणण्यात आले आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना अशी विनंती करतो की, त्यांनी हे विधेयक मंजूर करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6, (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 74 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 74 संमत झाले.

----------

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** (पुढे सुरू..)

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या बुधवार, दिनांक 19 जुलै 2006 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.30 ते 1.00 या वेळेत घेण्यात येईल आणि सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल.

सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 52 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 19 जुलै 2006 रोजीच्या सकाळी 10 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही